म. ग्रं. सं. ठाणे
विषय
सं. नं. २८८

आणि

लेखक

REFBK-000333

संग्रहालय

ता.

3333

# मुसलिनी

आणि

# फॅशिस्मो



मुसलिनी—स्वभावदर्शन

# मुसलिनी आणि फॅशिस्मो.

साहसे श्रीः प्रतिवसति ।

लेखकः—

दत्तात्रय विश्वनाथ ताम्हनकर, बी. ए.

राजशक २५

REFBK-0003333

किंमत २ रुपये.

*Printer:-*

P. WARDE, M. A., B. Com.

Fine Art Press, Fort,

BOMBAY.

*All rights reserved by the Publisher.*

*Publisher:-*

D. K. GONDHALEKAR,

507, Shanawar Peth, Poona City.

( मॉरिशस–निवासी )

ती. प्रिय बंधु

# पंडित आत्माराम

यांस,

सप्रेम अर्पण.

दत्तात्रय.

"All true work of a man,–hang the author of it on what gibbet you like,–must and will accomplish itself."

—*Carlyle.*

# प्रस्तावना.

**माधवाश्रम.**
गिरगांव–**मुंबई.**
ता. १५।११।२७.

बुद्धीची कुशलता, भावनेचा उमाळा, मनाचा मोकळेपणा, अंतःकरणाचें औदार्य, तारुण्याचें साहस, कार्याची धडाडी, देशभक्ताचा उत्साह वीराचें शौर्य आणि मुत्सद्याची कार्य कुशलता या गुणांचा नितांत रम्य संगम पहावयाचा असल्यास तो मुसलिनीच्या चरित्रांतच पहावा. त्याच्या चरित्रांत उषःकालीन उमदी शांतता आहे, माध्यान्ह कालीन प्रखरता आहे आणि संध्या समयीन उदात्त रम्यता आहे. फॅशिस्मोचा अनाकलनीय द्रुत-गति प्रसार म्हणजे जलप्रपाताचें प्रचंड धावनच. मुसलिनीचा आतां पर्यंतचा आयुष्यक्रम इतका रहस्यपूर्ण झाला आहे कीं, त्याच्या बहुरंगी वर्तनाची संगती लावणें पुष्कळ वेळां कठिण जातें. त्याच्या चरित्राकडे आम्ही कोणत्या दृष्टीनें पहातों तें खालीं दिलेल्या अवतरणावरून दिसून येईल. आमच्या मतें, "एका व्यक्तीच्या कर्तबगारीचा उत्तम नमुना म्हणून मुसलिनीचें चरित्र आदरणीय आहे. तसेंच तें, स्वतंत्र राष्ट्रांत व्यक्तींना आप-ल्या आंगच्या गुणांचा विकास करण्यास कसा अमर्याद अवकाश असतो हें दाखविणारा, स्वातंत्र्याची आत्यंतिक अवश्यकता पटवून देणारा, आणि अंतःकरण थरारून सोडणारा एक साहसपूर्ण चित्रपट म्हणूनहि मननीय आहे."

मुसलिनीचा फॅशिस्मो पंथ म्हणजे सर्वांगीण स्वदेशाभिमान होय. मायदेशाचा सर्व बाजूंनीं परमोत्कर्ष करण्याचें प्रतिज्ञा-कंकण फॅशिस्मोनें बांधलें आहे. त्याची उज्ज्वल ध्येयनिष्ठा, आत्यांतिक स्वार्थत्यागबुद्धी, स्पृहणीय शिस्त

आणि निरपवाद स्वदेशभक्ती पाहून कोणतें तरुण अंतःकरण थरारून जाणार-नाहीं ? फॅशिस्मोचें सार म्हणून आम्ही त्यास 'शंभर नंबरी स्वदेशाभिमान' असें म्हटलें आहे तें याचसाठीं.

ज्याला मुसलिनीसारखा सामर्थ्यसंपन्न अष्टपैलू पुढारी आणि फॅशिस्मोसारखा कार्य प्रवर्तक उत्साह–संदेश लाभला आहे, तें राष्ट्र थोड्याच अवधींत सुधारणेच्या अत्युच्च शिखरांवर कां जाऊन पोहोंचणार नाहीं. ?

महाराष्ट्र आणि इटाली यांचा कांहींतरी गूढ ऋणानुबंध आहे कीं काय न कळे. कारण आतांपर्यंत मराठींत गॅरीबाल्डी, मॅझिनी आणि काव्हूर या इटालियन राष्ट्रभक्तांचीं चरित्रें यापूर्वींच प्रसिद्ध झालीं आहेत. त्यांत आज मुसलिनीच्या चरित्र–ग्रंथाची भर टाकण्याचा मान यदृच्छया मला लाभला याबद्दल आनंद वाटतो. असो.

या पुस्तकाचें प्रकाशन आपल्या अंगावर घेऊन, माझे स्नेही श्री. **नानासाहेब गोंधळेकर** यांनीं मला कायमचें ऋणी करून ठेविलें आहे. पुस्तकाच्या लेखनापासून तों तें छापून बाहेर पडेपर्यंत त्यांनीं दाखविलेली कार्यतत्परता आणि निरलस वृत्ती यांचें फल म्हणजेच ही प्रस्तुत कृती होय.

पुस्तकाच्या छपाइचें कामीं, फाईन आर्ट प्रेसचे मालक श्री. **वर्दे**, चालक श्री. **देवस्थळी**, व फोरमन रा. **मांजरेकर**, यांनीं, स्नेहभावानें दाखविलेली कळकळ आणि घेतलेली मेहनत खरोखरीच स्पृहणीय होती. त्याबद्दल त्यांचा साभार उल्लेख करणें जरूर आहे.

प्रस्तुत ग्रंथासारखा ग्रंथ आधाराशिवाय लिहितां येत नाहीं, व त्यासाठीं अनेक पुस्तकें जमवावी लागतात. या कामीं दे. भ. **अण्णासाहेब भोपटकर**; **इटालियन कॉन्सल**; आणि फॅशिस्ट सेक्रेटरी **सिनार बॅटिस्टेसा** यांनीं महत्त्वाचीं पुस्तकें देऊन मला जें सहाय्य केलें त्याबद्दल मी त्यांचा फार आभारी आहे.

आतां एकाच व्यक्तीचे आभार मानावयाचे राहिले ते म्हणजे, '**माधवाश्रम**' संस्थेचे मालक श्री. **परशरामपंत महाजन** यांचे. त्यांनीं आपली धंदेवाईक दृष्टी बाजूस ठेऊन माझ्या हरएक प्रकारच्या नडी अडचणींची स्पृहणीय जाणीव ठेविली व त्यांच्या आश्रमांतील माझें वास्तव्य शक्यतों सुखपूर्ण केलें या बद्दल त्यांचे औपचारिक आभार न मानतां त्यांच्या विषयीं अनौपचारिक कृतज्ञताबुद्धी व्यक्त करून त्यांची रजा घेतों.

शेवटीं एकाच गोष्टीचा उल्लेख करावयाचा राहिला तो म्हणजे ज्यांना हें पुस्तक अर्पण केलें आहे, त्यांचा. **पंडित आत्माराम** हे प्रस्तुत लेखकाचे बंधु असून मॉरीशसमधील मुदत--बंद मजुरांची स्थिति सुधारण्यासाठीं डॉ. मणीलाल यांजबरोबर पहिल्यानें ते तेथें गेले. सध्यां तेथील हिंदी लोकांच्या शिक्षणासाठीं ते अहर्निश खटपट करीत असतात. असो.

हौसेनें हातीं घेतलेलें काम पुरें करून आज तें जनस्वरूप जनार्दनाच्या चरणीं अर्पण करीत आहे. त्याच्या अपुरेपणाविषयीं लेखकास पूर्ण जाणीव आहे. विशेषतः छपाईतील शुद्धाशुद्धतेच्या बाबतींत बरेच अपराध झाले आहेत. परंतु त्याविषयीं सुज्ञ वाचकांची नम्रभावानें क्षमा मागण्याशिवाय अन्य मार्ग नाहीं. उदार वाचक ती करतील अशी अपेक्षा करून त्यांची रजा घेतों.

कार्तिक कृष्ण ७
शके १८४९

**द. वि. ताम्हनकर.**

# अनुक्रमणिका.

## भाग १ ला–मुसलिनी.


| प्रकरण. | | पृष्ठ. |
|---|---|---|
| १ | हा कोण ? ... ... ... | १ |
| २ | युद्धोत्तर जग ... ... ... | ४ |
| ३ | पूर्व परिचय ... ... ... | ११ |
| ४ | मुसलिनीचे आईबाप ... ... | १८ |
| ५ | बालपण आणि शिक्षण ... ... | २२ |
| ६ | शिक्षणासाठीं प्रयाण ... ... | २७ |
| ७ | नोकरीसाठीं धडपड ... ... | ३३ |
| ८ | शिक्षकाची नोकरी ... ... | ३६ |
| ९ | पाटीवाला आणि पहिला कारागृहवास ... | ४१ |
| १० | विद्यार्थी आणि चोर ... ... | ४७ |
| ११ | खुनी–मुसलिनी–भिकारी ... ... | ५७ |
| १२ | शिक्षक आणि प्रोफेसर ... ... | ६५ |
| १३ | ट्रेन्ट येथें ... ... ... | ७२ |
| १४ | आस्ट्रियांतून हकालपट्टी ... ... | ७७ |
| १५ | नवें पत्र–क्लास वॉर ... ... | ८६ |
| १६ | मनोराज्य ... ... ... | ९५ |
| १७ | मुसलिनीची राष्ट्रीय दृष्टी ... ... | १०२ |
| १८ | सतचिं वाण ... ... ... | ११२ |

| प्रकरण. | | पृष्ठ. |
|---|---|---|
| १९ | पोपोलो डी इटालिया ... ... | १२५ |
| २० | खांद्यावर बंदूक टाकून ... ... | १३३ |
| २१ | जखमी शिपाई ... ... ... | १३७ |
| २२ | पुनश्च हरिः ओम् ... ... | १४३ |
| २३ | फॅशिझम् ... ... ... | १४९ |
| २४ | मध्यन्तरीचीं दोन वर्षें ... ... | १५८ |
| २५ | विरोध–विजय ... ... ... | १६५ |
| २६ | हरहर महादेव ... ... ... | १७६ |
| २७ | राज–निमंत्रण ... ... ... | १८१ |
| २८ | मुख्य प्रधान ... ... ... | १८८ |
| २९ | केवळ खाजगी ... ... ... | २०० |


## भाग २ रा–फॅशिस्मो.


| | | |
|---|---|---|
| १ | प्रास्ताविक ... ... ... | २१९ |
| २ | फॅशिस्मोच्या आजूबाजूला ... ... | २२६ |
| ३ | फॅशिस्मो ... ... ... | २३८ |
| ४ | फॅशिस्मोचें कार्य ... ... ... | २५१ |
| ५ | भविष्य कालांत ... ... ... | २७६ |

म. गांधीजीकृत.

# हिंद-स्वराज्य.

पुस्तकाचा

## मराठी अनुवाद.

ले.—द. वि. ताम्हनकर

पुस्तकें मागविण्याचा पत्ताः—परचुरे पुराणिक आणि मंडळी.

माधवबाग मुंबई नं. ४

# मुसालिनी आणि फॅशिस्मो.

## भाग १ ला.

### प्रकरण १ लें.

### हा कोण?

I shall make my own life my masterpiece:

—*Mussolini.*

" काय तुला कोणी मारलं ?—आणि तो मुलगा तुझ्यापेक्षां मोठा होता ह्मणतोस ? होय, असेल—मोठा असेल. पण त्याला उलट दोन ठोसे तूं कां नाहीं लगावलेस ? काय तूं हातांत कांकणें भरलीं होतीस ?— भागूबाईसारखा मुळूं मुळूं रडतो आहे ! चल नीघ येथून. तुला मारणाऱ्या मुलाचा सूड घेतल्याशिवाय परत आलास तर खबरदार. " एक बाप आपल्या ९ वर्षांच्या मुलाला बोलत होता. त्या बालकाचे डोळे रडून रडून लाल झाले होते; कपडे धुळीनें भरून गेले होते व झालेल्या अपमाननें अंतःकरण जळत होतें. बालस्वभावानुसार त्यानें आपली तक्रार आपल्या वडिलांकडे नेली. पण त्याला वरील उत्तर मिळालें ! बालकाची निराशा झाली. इतक्यांत त्याला एक विचार सुचला. रडून लाल झालेले त्याचे डोळे नव्या कल्पनेनें चमकूं लागलें; म्लान झालेलें मुखकमल पुन्हां टवटवलें. आजूबाजूला त्यानें एकवार पाहिलें व एक अणकुचीदार दगड उचलून घेतला व द्रुतगतीनें धांवत जाऊन तो आपल्या प्रतिपक्ष्यापुढें उभा राहिला.

<u>हा कोण?</u>

म. गांधीजीकृत.

# हिंद–स्वराज्य.

पुस्तकाचा

## मराठी अनुवाद.

ले.–द. वि. ताम्हनकर

पुस्तकें मागविण्याचा पत्ताः—परचुरे पुराणिक आणि मंडळी.

माधवबाग मुंबई नं. ४

४८४

# मुसलिनी आणि फॅशिस्मो.

## भाग १ ला.

### प्रकरण १ लें.

### हा कोण ?

नं. ३२

I shall make my own life my masterpiece :

—*Mussolini.*

" काय तुला कोणी मारलं ?–आणि तो मुलगा तुझ्यापेक्षां मोठा होता ह्मणतोस ? होय, असेल–मोठा असेल. पण त्याला उलट दोन ठोसे तूं कां नाहीं लगावलेस ? काय तूं हातांत कांकणें भरलीं होतीस ?– भागूबाईसारखा मुळूं मुळूं रडतो आहे ! चल नीघ येथून. तुला मारणाऱ्या मुलाचा सूड घेतल्याशिवाय परत आलास तर खबरदार. " एक बाप आपल्या ९ वर्षांच्या मुलाला बोलत होता. त्या बालकाचे डोळे रडून रडून लाल झाले होते; कपडे धुळीनें भरून गेले होते व झालेल्या अपमानानें अंतःकरण जळत होतें. बालस्वभावानुसार त्यानें आपली तक्रार आपल्या वडिलांकडे नेली. पण त्याला वरील उत्तर मिळालें ! बालकाची निराशा झाली. इतक्यांत त्याला एक विचार सुचला. रडून लाल झालेले त्याचे डोळे नव्या कल्पनेनें चमकूं लागले; म्लान झालेलें मुखकमल पुन्हां टवटवलें. आजूबाजूला त्यानें एकवार पाहिलें व एक अणकुचीदार दगड उचलून घेतला व द्रुतगतीनें धांवत जाऊन तो आपल्या प्रतिपक्ष्यापुढें उभा राहिला.

हा कोण ?

" माझें तोंड फोडलेंस नव्हे काय ? ठीक आहे. हें घे त्याचें उत्तर " असें ह्मणत त्यानें त्या दगडानें त्या दुसऱ्या मुलाच्या तोंडावर प्रहारामागून प्रहार चालविले. प्रतिपक्षाचें तोंड रक्तबंबाळ झालेलें पाहून त्या बालकाला अत्यानंद झाला. स्वपराक्रमाबद्दल अभिमान वाटून, ही आनंदाची बातमी आपल्या वडिलांस देण्यासाठीं बालक त्वरेनें तेथून परत फिरला. त्याचा तो बालआवेश पाहून त्याच्या बापाला त्याचें किती कौतुक वाटलें असेल !

* * * *

" संध्याकाळचे ५ वाजले. सकाळीं पावाचे १।२ तुकडे खाऊन मी सारखा भटकत होतों. दुपारपासून " विल्यम टेल " च्या पुतळ्याच्या पायथ्याशीं बसून बराच वेळ काढला. धुळीनें तोंड भरलेलें, कपडे घाण झालेले आणि केंस पिंजारलेले असें माझें चित्र पाहिलें असतेस तर तूं मला खास ओळखलें नसतेंस. माझें तें विचित्र ध्यान पाहून लोक माझेकडे टकमका बघूं लागले म्हणजे डोकें फिरून जाई; अंतःकरणाचा कसा भडका उडे. इकडे पोटांत भुकेनें नुसती आग पेटून गेली होती. तापवून लाल केलेल्या हजारो सुया टोंचाव्यांत त्याप्रमाणें वेदना होत होत्या. हातापायांत पेटके येऊन डोळ्यापुढें अंधेरी येत होती तथापि मी तसाच पुढें चाललों होतों. तळ्यावरून जाणाऱ्या रस्त्याची शोभा अवर्णनीय होती. मावळत्या सूर्याचे तें शेवटचें किरण आणि संध्याकालीन प्रार्थनेच्या घंटांचा तो मंजुळ ध्वनी यांनीं क्षणभर मला माझ्या स्थितीचा विसर पाडला. पण दुसऱ्याच क्षणीं " असलें जीर्ण जगण्यांत कांहीं अर्थ आहे काय ? " अशा विचारानें मन खिन्न झालें. इतक्यांत तळ्याच्या बाजूनें गायनाचे मधुर आलाप कांनीं आले. वर पहातों तों, समोरच्याच बाजूला 'हॉटेल व्यू रिव्हेज !' तेथें अनेक लोक मजा मारित होते, आणि खालीं मी मात्र भुकेनें मरत होतों. !! काय हा

भेसूर परिस्थिती-विरोध? इतक्यांत एक इंग्रजी जोडपें तेथें आलें. त्याच्याकडे त्या रात्रींपुरते पैसे मागावेत असें वाटलें. पण भीक मागण्यास जीभच उचलेना. त्यांना शिव्या-शाप देत मी तेथून चालता झालों. त्या वेळीं राज्यक्रांतीच्या कल्पना मला किती रमणीय वाटल्या! त्या इंग्रज बाईचीं बोटें हिऱ्या-माणकांच्या अंगठ्यांनीं झगझगून गेलीं होतीं आणि माझेजवळ एक फुटकी कपर्दिकाहि नव्हती. रात्रीं दहापासून सकाळीं साजेपर्यंतचा काल मी सार्वजनिक मुतारीमध्यें घालवितों. कांहींवेळ एखाद्या जुन्या होडीच्या आश्रयास जाऊन राहतों, किंवा पुलाखालीं जाऊन झोंपतों. सकाळीं उठून भटकतांना रस्त्याच्या बाजूच्या दुकानांतील एका आरशांत मी एके दिवशीं सहज डोंकावलें! काय भेसूर तें माझें चित्र! तें पाहून माझें मलासुद्धां भय वाटलें. इतक्यांत माझ्या गांवाकडचा एक गृहस्थ भेटला. त्याला मी माझी हकीकत सांगितली. ती ऐकून त्याला हसूं आलें. मला त्याचा भयंकर राग आला, मी त्यास शिव्या देऊं लागलों. पण त्यानें १० सोल्डी काढून माझे हातावर ठेविल्या. तात्काळ त्याचे आभार मानून मी तडक एका रोटीवाल्याच्या दुकानीं गेलों. त्यानें दिलेले ते कोरड्या भाकरीचे तुकडे मी किती आधाशीपणानें खाल्ले असतील तें माझें मलाच माहित! मी ती भाकरी एकाद्या कुत्र्याप्रमाणें कचाकच चावत होतों. गेल्या २८ तासांत माझ्या पोटांत अन्नाचा एक कणहि नव्हता.!"

× × × ×

ता. २९ आक्टोबर १९२२.

"महाराजांनीं आपल्याला ताबडतोब रोमला येण्याची विनंति केली आहे. प्रधानमंडळ बनविण्याची कामगिरी तुम्हांस सांगण्याचा त्यांचा मानस आहे." (जनरल सिटॅडिनी—इटालीच्या राजेसाहेबांचे शरीर संरक्षक.)

# प्रकरण २ रें.

# युद्धोत्तर जग.

Wanted a Mussolini

—*Today's Cry.*

गेल्या प्रकरणांत " हा कोण " असा प्रश्न करून त्यांत साहसी बाल्य क्षुधेनें व्याकूळ झालेलें दारिद्र्य आणि प्रतिष्ठित राजानिमंत्रण अशा तीन, परस्परांशीं सर्वस्वीं असंबंध गोष्टी निवेदन केल्या आहेत. या तीन गोष्टींच समन्वय लावणें म्हणजेच मुसलिनीच्या जीवनक्रमाचा इतिहास होय. क्रोधानें लाल झालेला मुलगा, भुकेनें व्याकुळ झालेला भिकारी आणि प्रधानमंडळ बनविण्यासाठीं इटालीच्या राजेसाहेबांनीं निमंत्रण केलेला मुत्सद्दी ह्मणजे एकाच व्यक्तीच्या जीवनक्रमाची चढती सोपान परंपरा आहे. त्यांत मुसलिनीचें बाल्य स्पष्ट होतें, तारुण्याचा अनुभव येतो आणि परिपक्व मुत्सद्देगिरीची खात्री पटते.

महानदीचा उगम प्रायः कोठेंतरी अप्रसिद्ध ठिकाणीं होतो. पण तिच्या वाढत्या पात्राबरोबर तिचा जलसंचय आणि आक्रमशक्ती वाढत जाते. अनेक योजनें तिचा झालेला विस्तार आणि मरुप्रदेशाला तिनें दिलेली समृद्धि पाहून लोकसमाज समाधानमिश्र आश्चर्य वृत्तीनें त्या नदीचें कौतुक करतो. महाव्यक्तींच्या जीवनचरित्राचीहि गोष्ट कांहीं अंशीं अशीच असते. मराठी स्वराज्यसंस्थापक श्रीशिवाजीमहाराज यांचा आणि जगजेता नेपोलियन याचा जन्म अशा रीतीनेंच झाला होता. प्रस्तुत चरित्रनायक मुसालिनीचा जन्म तर एका अत्यंत गरिब कुटुंबांत झाला असल्याचें वाच-

कांस दिसून येईल. परंतु स्वपराक्रमाच्या जोरावर त्यानें इटालीमध्यें आज अनन्यसामान्य स्थान मिळविलें आहे. बोललेल्या शब्दाला कायद्याचें स्वरूप येणें ह्मणजे अधिकाराची परिसीमा झाली असे समजण्यांत येतें. इटालींत आज मुसलिनिचा शद्व ह्मणजे खरोखरीच कायदा झाला आहे. एवढेंच नव्हे तर त्याच्या "फॅशिस्मो" या राजकारण पंथानें राजकारणांत एवढी विलक्षण खळबळ उडवून दिली आहे कीं, आज सुधारलेल्या जगाचें लक्ष कोणत्या एका व्यक्तीकडे लागून राहिलें असेल तर ती व्यक्ती ह्मणजे मुसलिनी होय. कोणतेंहि पाश्चात्य वर्तमानपत्र घ्या त्यांत तुह्माला मुसलिनी अथवा फॅशिझम या विषयीं कांहींना कांहीं तरी उहापोह केलेला आढळल्यावांचून राहणार नाहीं.

कोणी त्यास लोकसत्ताक राज्यपद्धतीचा कट्टा शत्रू समजतात तर कोणी भावी स्वातंत्र्याचा अनन्यसामान्य मित्र ह्मणून त्याचा जयजयकार करितात. कोणाच्या मतानें फॅशिझमचा उदय भांडवलशाही चिरस्थायी करण्यासाठीं झाला आहे तर कांहींच्या मतें फॅशिझमनें भांडवलशाहीच्या मृत्यूची घंटा वाजविली आहे. कोणाला फॅशिझमच्या प्रसारानें व्यक्तीस्वातंत्र्याची गळचेपी होणार ह्मणून भीती वाटते तर कोणाला या तत्वाच्या प्रसारानें जुन्या संस्कृतीला बळकटी येणार ह्मणून आनंद वाटतो. कांहीं लोकांनीं त्याला बोल्शेव्हिक् तत्त्वाचा शत्रू ह्मणून संबोधिलें आहे तर कित्येकांनीं फॅशिझममध्यें साम्राज्य संस्थापनेच्या अघोर तृष्णेचें विक्राळ स्वरूप पाहिलें आहे. अशा अनेकविध आणि परस्पर विरोधी दृष्टीकोनानें ज्या व्यक्तीचें आणि त्याच्या विचारपद्धतीचें जगाकडून निरीक्षण चाललें आहे त्याच्या जीवनक्रमाचा आस्थापूर्वक अभ्यास केल्यास तो बोधप्रद आणि मनोरंजक ठरेल यांत संशय नाहीं.

<u>युद्धोत्तर जग</u>

मुसलिनीच्या राजकारणानें जगाच्या विचारसरणींत विलक्षण क्रांति करून सोडली आहे. याचें मुख्य कारण त्यानें आजपर्यंतच्या विचारसरणीला दिलेला जबरदस्त धक्का हें होय. १९१४ सालीं महायुद्धाचा सर्वभक्षक वणवा पेटून त्यांत जुनें जग जळून खाक झालें. १९१९ सालीं व्हर्सेलसच्या तहानें मृत जगाच्या थडग्यावर त्याचा मृत्यु लेख लिहिला व नव्या मनूचा मसुदा मुक्रर केला. अमेरिकन मुत्सद्दी प्रे. विल्सनचीं चौदा तत्त्वें ह्मणजे १८ व्या शतकापासून बद्धमूल झालेल्या समता, स्वातंत्र्य आणि बंधुभाव या कल्पनांना मूर्तस्वरूप देण्याचा शिकस्तीचा प्रयत्न होता. जर्मनीच्या साम्राज्याच्या राक्षसी महत्वाकांक्षेस हाणून पाडून समतेची ध्वजा उभारण्यांत आली; बेल्जम सर्व्हिया आदि छोट्या राष्ट्रांचें स्वातंत्र्य अबाधित करून बंधु भावनेचा जरिपटका फडकाविण्यांत आला; व रशियानें झार शाहीला मूठमाती देऊन लेनिनच्या नेतृत्वा खालीं निरुपाधिक—अनियंत्रित—स्वातंत्र्याचें निशाण रोवलें. फ्रेंच राज्यक्रांतीनें १७८९ सालीं सुरू केलेल्या तत्त्वांचा सव्वाशें वर्षांच्या अवधींत पूर्ण विजय झाल्याचा त्यावेळीं भास झाला. स्वातंत्र्य—समता—बंधुभाव या पुराण मतांना नवा उजळा मिळून तीं तत्त्वें पुनः एकवार नव्या प्रभेनें चमकूं लागलीं.

पण ही स्थिती फार वेळ टिकणारी नव्हती. वास्तविक उपरीनिर्दिष्ट उदारमतांच्या प्राणोत्क्रमणाची ती वेळा होती. दिवा जातांना मोठा होतो त्याप्रमाणें व्हर्सेलसच्या तहाच्या वेळीं या तत्वांची स्थिती झाली होती. बेल्जम फ्रान्स आदि राष्ट्रें परचक्रापासून बचावलीं, त्यांचें राजकीय स्वातंत्र्य अबाधित राहिलें, परंतु त्यापेक्षां शतपट जाचक आणि न दिसणारी ह्मणून जास्त भयंकर अशी आर्थिक गुलामगिरी त्यांनीं नकळत स्वीकारली. राज-

कीय स्वातंत्र्यासाठीं अमेरिकेच्या आर्थिक गुलामगिरींत युरोपखंड अनावं- तपणें जाऊन पडलें. युद्धकर्जाच्या अदृश्य फांसण्या युरोपियन राष्ट्रांच्या गळ्याभोंवती आवळूं लागल्या.

विजयाचा पहिला बहर ओसरून जनतेची वस्तुस्थितीशीं ओळख होऊं लागतांच यूरोपचे डोळे उघडले. विजयी राष्ट्रांच्या मुत्सद्यांनीं जर्मनींशीं केलेल्या विषम वर्तनाची जनतेला जाणीव होताच त्यांच्या विशाल पण पोकळ तत्वनिष्ठेचा तिला वीट आला. सुधारलेल्या जगाच्या नैतिक सहानभूतीच्या आधारावर दोस्त-राष्ट्रें विजयी झालीं होतीं. तो आधार मुत्सद्यांच्या दुष्ट वर्तनामुळें डळमळूं लागला. पाया खच- ल्यावर घर केव्हां कोसळेल त्याचा काय नेम ? अमेरिकेनें यूरोपच्या मद- तीसाठीं, स्वातंत्र्यतत्वाच्या रक्षणासाठीं, महायुद्धाचें सतीचें वाण उचललें होतें ! भोळ्या आणि भावनाप्रधान अमेरिकन नागरिकाला कोणाच्या स्वातंत्र्याचें अपहरण झालेलें पहावत नाहीं. त्याची ध्येयनिष्ठा अपूर्व आणि स्वातंत्र्यभक्ती उज्वल असल्यामुळें अमेरिकन शिपाई आनंदानें अग्निवर्षावाला तोंड देण्यास तयार झाला. परंतु युद्धोत्तर युरोपियन मुत्सद्देगिरीचें तें हिडीस स्वरूप पाहून त्याचा यूरोपवरील विश्वास उडाला असल्यास नवल नाहीं. प्रे. विल्सनचा पराभव आणि त्याच्या राष्ट्रसंघाला अमेरिकेनें केलेला विरोध यावरूनच अमेरिकेचा यूरोपवरील विश्वास उडाल्याचें स्पष्ट दिसून येतें. ज्या नैतिक सहानभूतीच्या पायावर दोस्तांच्या विजयाचें मंदिर उभा- रलें गेलें, त्याचा पायाच अशा रीतीनें उखडला गेल्यामुळें यूरोपच्या राज- कारणांत बखेडा माजण्यास प्रारंभ झाला. सुकाणूं नसलेल्या गलबताप्रमाणें यूरोपखंडाची स्थिती झाली.

## युद्धोत्तर जग

आर्थिक दृष्ट्या यूरोपचें दिवाळें वाजलें. बेकारी बेसुमार वाढली; उपासमारीनें उग्र स्वरूप धारण केलें; पिढिजाद अमीरउमराव भिकारी बनले आणि भिकारी व्यापारी युद्धकालीन नफेबाजीनें कोट्याधीश झाले. मजुरांच्या चळवळीनें जोर धरून रशियन राज्यक्रांती साध्य केली; इंग्लडांत मजूरपक्ष अधिकारारूढ झाला; ऑस्ट्रिया–हंगेरी आणि जर्मनीमध्यें समाजसत्तावाद्यांचीं मतें प्रभावीं ठरलीं आणि अंतरराष्ट्रीय मजूरसंघाच्या परिषदा भरूं लागल्या. स्त्रियांना समान नागरिकत्वाचे आणि मतदानांचे हक्क मिळून पारुष्यप्रधान राजकारणांत स्त्रीस्वभावसुलभ भावनेचा शिरकाव होण्यास अवसर मिळाला. लहान मुलांना सुद्धां जिनिव्हाच्या परिषदेनें स्वातंत्र्य सनद ( Charter of Freedom ) देऊन त्यांच्या हक्कांचें संरक्षण करण्याचा उपक्रम केला ! विश्वबंधुत्वाच्या अरुणप्रभेनें नव्या मनूची पहाट नटली–उषा देवीचें तें सुंदर हास्य पाहून जग क्षणभर देहभान विसरून गेलें.

युद्धपूर्वकालीन यूरोप आणि युद्धोत्तर यूरोप यांत अशा रीतीनें विलक्षण फरक पडल्यामुळें जुन्या कल्पना, जुनी समाजरचना, जुने विचार, जुनी परंपरा यांचें कोठें नांवहि दिसेनासें झालें. परंतु ही स्थिती केवळ क्षणजीवीच होती. उत्साहाच्या भरांत असल्यामुळें यूरोपला, आपल्या माने-भोंवती असलेली भूत काळची काळी फीत दिसली नाहीं. भविष्यकाळ भूतकाळाचा परिपाक असतो. नवा यूरोप कांहीं झालें तरी जुन्या यूरोपचेंच अपत्य असल्यामुळें, जुन्या युरोपच्या चुकांचें पाप त्यास एकदम झुगारून देतां येईना. युद्धकर्जाची धोंड मानेभोंवतीं सारखी जखडून राहिल्यामुळें यूरोपच्या नवजीवनाचा कोंडमारा होऊं लागला. महर्घता बेसुमार वाढली, दुष्काळ पडले, असंतोष धुमसूं लागला, संपांचें पेंव फुटलें आणि निराशा-प्रधान निष्क्रीय वृत्तीचा प्रभाव चोहीकडे दिसूं लागला.

## मुसलिनी

इटालींत समाजसत्ता वादानें धुमाकूळ घालून कोणाचा पायपोस कोणाच्या पायांत नाहीं अशी बेबंद स्थिती निर्माण केली. साहजींकच लोकांचा प्रचलित राज्यपद्धतीवरील विश्वास डळमळूं लागला. आजपर्यंत प्रातिनिधिक राज्यसत्तेच्या ( Parliamentary Government ) कार्यक्षमतेबद्दल शंका प्रदर्शित केल्यास त्याची गणना वेड्यांतच व्हावयाची. त्याच प्रातिनिधिक राज्यपद्धतीबद्दल लोकांचे मनांत आतां शंका येऊं लागली. इंग्लंडमध्यें लॉइड जार्ज प्रभृती लोकांनीं, फ्रान्समध्यें एम. क्लेमेन्को आदि मुत्सद्यांनीं आणि इटालीमध्यें सिनॉर निटी आणि गिओलिटी यांनीं लोक-लोकमताच्या नांवावर, ज्या बेताल स्वार्थबुद्धीचें आणि बेजबाबदार वृत्तीचें प्रदर्शन चालविलें त्यानें तर लोकांचा या राज्यपद्धतीवरील विश्वास पार नाहींसाच झाला. लोकांचें मत आणि या मुत्सद्यांचें मत यांत उत्तर दक्षिण ध्रुवाइतकें अंतर असलें तरी हे लोक स्वतःला, प्रातिनिधिक राज्यपद्धतीचे कट्टे पुरस्कर्ते म्हणवून मिरवित ! पण कोणत्याहि प्रश्नाचा निकाल लागेना. युद्ध खंडणी बसूल होईना, बेकारी कमी होईना, नाण्याचा भाव चढेना व व्यापार वाढेना. अशा स्थितींत, जनतेनें त्याचा सर्व दोष प्रचलित राज्यपद्धतीच्या माथीं मारला तर नवल काय ? फ्रान्स व इटालीं-तील त्याकाळच्या पार्लमेन्टचे काम पाहून एका अमेरिकन वर्तमानपत्र-कारानें, ‘ unending business of speech-making ’ असें त्याचें वर्णन केलें आहे.

लोकांना या परिस्थिताचा पुरा कंटाळा आला. सरकारचें मुख्य कर्तव्य ‘ शांतता आणि सुव्यवस्था राखण्याचें ’ पण तें जर या राज्यपद्धतीखालीं होत नसेल तर तिचा काय उपयोग ?—असें लोक विचारूं लागले, व पर्यायानें, हें कर्तव्य जी राज्यपद्धती बजावील तिला मान्यता देण्यास ते

तयार झाले. यूरोपच्या या मनस्थितींतच मुसलिनीच्या आणि त्याच्या फॅशिस्मो तत्त्वाच्या यशाचें बीज आहे. अव्यवस्थेचीं कडू फळें चाखल्यावर फॅशिस्मोच्या शिस्तीला इटालीनें मूकसंमती द्यावी व मुसलिनीच्या एकमुखी धोरणाला अविरोध दाखवावा हें मनुष्यस्वभावाला धरूनच होतें.

क्रांतिकारक परिस्थितीमुळें समाजाच्या जीवनक्रमाला अस्थिरत्व प्राप्त होतें. जुन्या विचारपद्धतीवरील विश्वास डळमळूं लागलेला असतो व नव्या पद्धतीवर तितकासा स्थिर झालेला नसतो. समाजाची चित्तवृत्ती "जुनें आणि नवें" या दोन टोकांमध्यें आंदोलित होत असते. हीच अस्थिर परिस्थिती व्यक्तीला आपल्या अंगचे गूण दाखविण्यास फार उपयोगी पडते. १६ व्या शतकांत इंग्लंडमध्यें राज्यक्रांती होऊन बखेडा माजतांच क्रॉमवेलच्या अंगचे गूण दिसण्यास अवसर मिळाला; फ्रेंच राज्यक्रांतीच्या बेबंदशाहीनें नेपोलियनच्या गुणांचा प्रभाव जगाच्या निदर्शनास येण्यास मदत केली, व महायुद्धानंतरच्या अव्यवस्थेमुळें युरोपमध्येंहि व्यक्तींच्या कर्तबगारीला वाव मिळाला. तुर्कस्थानांत मुस्ताफा केम लपाशा, स्पेनमध्यें प्रायमो डी रिव्हेरा, ग्रीसमध्यें एम. पँगेलॉस, फ्रान्समध्यें एम्. क्लेमेन्को, इंग्लंडांत लॉइड जॉर्ज, रशियांत लेनिन व इटालींत मुसलिनी अशा असामान्य व्यक्ती राजकारणक्षितिजावर चमकूं लागल्या. या व्यक्तींच्या कमी अधिक यशापयशांशीं आपल्याला या ठिकाणीं कर्तव्य नाहीं. परंतु त्यावरून तत्कालिन यूरोपची राजकीय परिस्थिती कशी अस्थिर आणि अनिश्चित झाली होती व ती मुसलीनीच्या उदयाला कशी कारणीभूत झाली एवढेंच या ठिकाणीं दाखवावयाचें आहे.

मुसलिनीच्या चरित्रचित्राचें यथार्थ ज्ञान होण्यास तें चित्र ज्या यूरोपरूपी कॅन्व्हसवर काढलें गेलें आहे त्याची व तदनुसंधित पार्श्वभागाची ( back-ground ) माहिती होणें जरूर आहे, एवढ्याचसाठीं किंचित् विस्तारानें ती येथें दिली आहे. एवढा विषयोपन्यास करून नायकाच्या चरित्रकथनाला एकदम प्रारंभ करितों.

श्री ग्रंथ संग्रहालय
अं. क्र. ३२०



श्री ग्रंथ संग्रहालय
अं. क्र. ८८७८

# प्रकरण ३ रें

## पूर्व परिचय.

—:०:—

आकाश निरभ्र होतें. सूर्यनारायणाचा सुसह्य प्रकाश लोकांची अंतःकरणें उल्हासित करित होता, प्रार्थने निमित्त वाजणाऱ्या घंटांच्या मधुर ध्वनीनें वातावरण शांत रसानें भरून गेलें होतें, अशा सकाळीं ता. २९ जुलई १८८३, बेनिटो मुसलिनीचा जन्म झाला. रविवारीं जन्मलेला पुरुष मोठा कर्तृत्ववान आणि भाग्यशाली असतो अशी खिस्ती लोकांची समजूत आहे. सुप्रसिद्ध जर्मन कवि गोएटे याचाहि जन्म रविवारींच झाला होता व त्याबद्दल त्यास विशेष अभिमान वाटत असे. ही समजूत बरोबर असो वा नसो; मुसलिनीच्या भावी चरित्रकृतीचा विचार करितां, तिला बळकटी येते एवढी गोष्ट खरी.

मुसलिनीचें बाळपण ज्या गावांत गेलें त्या गांवाविषयीं आणि त्या प्रांता विषयीं चार शब्द सांगणें जरूर आहे. लोकांचे स्वभाव-विशेष, त्यांच्या आवडी-निवडी व त्यांचे आचार-विचार, आणि आजूबाजूची निसर्गपरिस्थिती यांचा निकट संबंध असतो. महाराष्ट्रीय माणूस भावनेला वश कां होत नाहीं आणि बंगाली माणूस भावनेच्या भरांत कां वाहून जातो, याचें कारण शोधूं गेल्यास तें या दोन्ही प्रांतांच्या भिन्न निसर्ग परिस्थितींतच सांपडेल. बंगाल प्रांत सपाट आणि समृद्ध असून वनश्रीनें नटला आहे. नगाधिराज हिमाचलाच्या उत्तुंग शिखरांनीं बंगालची उत्तर सीमा सुशोभित केली आहे. पवित्र गंगामाता याच प्रांतांतून दुथडी वहात जाते. थंडी व ऊष्मा यांचा अतिरेक बंगाल प्रांतांत अनुभवास येतो. सपाटपणामुळें दळण-

वळणाला हा प्रांत सुलभ आहे. जमीन सुपिक असल्यामुळें कमी कष्टांत पुष्कळ पैदास मिळवितां येते. या सर्व गोष्टींचा परिणाम मनुष्याचें मन भावनाप्रधान, सुखलोलुप, भोळें, आणि परिणाम-सुलभ (impressionable) होण्यांत होतो. विचारापेक्षां विकाराचा पगडा मनावर जास्त पडून कार्याची प्रेरक शक्ती बुद्धी न होतां भावना होते. बुद्धीपेक्षां अंतःकरण-प्रवृत्तींना जास्त महत्व प्राप्त होतें.

याच्या उलट महाराष्ट्राची स्थिती आहे. त्याचा सर्व प्रदेश डोंगराळ, नद्या पर्जन्यावलंबी व जमीन नापिक आणि टणक; यामुळें लोकांना निसर्गाशीं तीव्र झगडा करावा लागतो. नाखूष निसर्गाला हर प्रयत्नानें वळणाला आणून त्यांना आपल्या गरजा भागवाव्या लागतात. या झगड्यामुळें साहजिकच त्यांच्या बुद्धीची बाजू जास्त वाढीस लागते. उन्हातान्हांत खपावें लागल्यामुळें प्रत्यक्षांशीं त्यांचा जास्त परिचय होतो. कविकल्पना करीत अंतरिक्षांत उंच भराऱ्या मारण्यास त्यांस फुरसतच नसते. पर्वतांचीं उत्तुंग शिखरें पाहून त्यांचें अंतःकरण स्तिमित व्हावें किंवा निसर्गाच्या इतरहि चमत्कारांनीं त्यांना भय वाटावें असे येथें कांहीं नाहीं; कारण तशीं पर्वत शिखरें किंवा तसे निसर्गचमत्कार महाराष्ट्रांत क्वचितच दृष्टीस पडतात. कृष्णा नदीला उन्हाळ्यांत महापूर आल्याचें कोणास माहित नाहीं, पण बंगाल्यांत उष्णतेनें वर बर्फ वितळल्यामुळें गंगा नदीला पूर येऊन भर उन्हाळ्यांत गांवेंच्यागांवें वाहून गेल्याचीं उदाहरणें मात्र आपण अनेकवेळां ऐकतों. असो. यावरून सृष्टिरचना आणि मनुष्याचे मनोभाव यांचा संबंध किती निकट आहे याचा उलगडा होईल. मुसलिनीच्या जीवनचरित्रांवर निसर्गसृष्टीनें बराच परिणाम केला असल्यामुळें त्याच्या चरित्राचें आकलन होण्यास, त्याच्या जन्मस्थानाजवळच्या निसर्गसृष्टीचेंहि ज्ञान होणें जरूर आहे.

मुसलिनीचें जन्मस्थान डोव्हिया, हें एक खेडेगांव असून तें रोमाग्निया प्रांतांत आहें. त्याचें ऐतिहासिक आणि वर्तमानकालीन वैशिष्ट्यहि विचार करण्यासारखें आहे. तेथील जमीन सुपिक असून तींत बहुतेक सर्व प्रकारचीं धान्यें पिकतात. हंगामाच्या दिवसांत चोहींकडे घनदाट पसरलेलीं आणि कापणीला आलेलीं शेतें पाहून हा सोनेरी गालिचाच पसरला आहे कीं काय असा भास होतो. क्षितिजापर्यंत पसरलेलें तें एकचएक पिवळेंजर्द दृश्य पाहून प्रेक्षकाचें हृदय क्षणभर आश्चर्य आणि कौतुक यांनीं भरून जात असल्यास नवल नाहीं. रोमॅग्निया प्रांतांत द्राक्षांचे मळे विपूल असल्यामुळें तेथें दारू गाळण्याच्या अनेक भट्टया आहेत. रुचि आणि स्वाद याबद्दल तेथील दारूची ख्याति आहे. त्याच्या किनाऱ्यावर माशांची शिकारहि मोठ्या प्रमाणावर सांपडते. एकंदरींत निसर्गानें रोमॅग्निया प्रांताला समृद्ध ठेविलें आहे यांत शंका नाहीं.

या समृद्धीचा परिणाम ह्मणूनच कीं काय कोण जाणें, तेथील लोक सहसा कोठेंहि बाहेर जाण्यास तयार नसतात. याचा अर्थ ते अल्पसंतुष्ट असतात असा नव्हे. उलट हा प्रांत साऱ्या इटालींत, असंतोषाचें माहेरघर ह्मणून प्रसिद्ध आहे. समाजसत्तावादासारखीं क्रांतिकारक मतें विशेष खुल्या रीतीनें आणि मनमोकळेपणानें कोठें प्रतिपादन केलीं जात असतील तर तीं रोमाग्निया प्रांतांतच. "रोमॅग्नेलो" ला विचारापेक्षां क्रियेची जास्त आवड आहे. प्रत्येक नवें तत्त्व प्रत्यक्ष व्यवहारांत आणण्याचा प्रयत्न करण्याबद्दल त्याची प्रसिद्धि आहे. त्याच्या भावनाप्रधान गुणाला कर्तृत्वाची जोड मिळाली असल्यामुळें त्याचें शत्रुत्वाचे आणि मित्रत्वाचे भाव नेहेमीच उत्कट असतात. रोमॅग्नेलो तुमचा मित्र असल्यास तो तुमच्यासाठीं प्राणार्पण करण्यासही कमी करणार नाहीं; उलट

शत्रू असल्यास, तो केव्हां तुमचे प्राण घेईल त्याचाहि नेम लागणार नाहीं ! त्याला बंधनाचा भयंकर तिटकारा असल्यामुळें त्याच्या स्वभावांत एकप्रकारचा उमदा उतावळेपणा दिसून येतो. यःकश्चित् कारणावरूनहि त्याचीं भांडणें होतात. स्त्रीपुरुष संबंध मनमोकळेपणाचे असल्यामुळें एकमेकांवर अगदीं उघड्या रीतीनें प्रेम करण्यांत त्यांस बिलकुल लज्जा वाटत नाहीं. युवयुवतींच्या मधुर चेष्टालापांनीं विहारगृहें आणि उद्यानस्थानें गजबजून गेलेलीं दिसतात. तरी लोकांची नीतिमत्ता पहिल्या दर्जाची असून सर्व गोष्टी योग्य मर्यादेंतच चालतात असें ह्मणावयास हरकत नाहीं. सौंदर्य हें सामर्थ्य आणि आरोग्य यांचें द्योतक समजलें जातें. लोक स्वभावतः शूर आणि उदार असल्यामुळें मत्सराला ते सहसा बळी पडत नाहींत. खोट्या आणि कंजुष वृत्तीचा मात्र या लोकांना भयंकर तिटकारा आहे.

या प्रांताचें ऐतिहासिक महत्व फार मोठें आहे. १६ व्या शतकांत सर्व यूरोपभर विचारपुनरज्जीवनाची ( Renaissance ) जी चळवळ झाली तीमध्यें या प्रांतांतील बोलोना विश्वविद्यालयानें केलेली कामगिरी फार मोठी आहे. तुर्क लोकांनीं बिझंटाईन साम्राज्याची १५५३ सालीं, कॉन्स्टांटिनोपल शहरांतून हकालपट्टी करितांच तेथील गुणी व विद्वान लोक समानधर्मी अशा जवळच्या इटालींतच पहिल्यानें आश्रयार्थ आले. या विद्वान् लोकांच्या स्वतंत्र शिकवणीमुळें लोकांत नव-चैतन्य खेळूं लागलें. स्वतंत्र विचार करण्याची, धर्मग्रंथांचा स्वतः अभ्यास करण्याची, हें “ असें कां व कसें ” हें समजून घेण्याची विचक्षण बुद्धि लोकांत उत्पन्न झाली.

नव्या युगाला आरंभ झाला. ठिकठिकाणीं पाठशाळा आणि विश्वविद्यालयें स्थापन होऊं लागलीं. अशाच प्रसिद्ध विश्वविद्यालयांत रोमाग्निओ प्रांतांतील बोलोना विश्वविद्यालयाची गणना केली जात असे. दूर-

दूरचे विद्यार्थी बोलोना येथें अभ्यासासाठीं येत. मन प्रसन्न करणारें सृष्टि-सौंदर्य, निरामय हवा, विपुल व समृद्ध जलाशय आणि सुपिक जमीन या गोष्टींचा या ठिकाणीं अनन्यसामान्य संयोग घडून आल्यामुळें बोलोनाला त्या काळीं एक प्रकारचें ब्रह्मतेज प्राप्त झालें होतें. तेथील विहारवासी संन्याशांचीं जीवनचरित्रें वाचत असतां आपल्याकडील ऋषिकालीन छात्राश्रमांची आणि त्यांतील विद्याविनोदपूर्ण निरागस आयुष्यक्रमाची आठवण होते. विद्यार्थीवर्गाचें तें गंभीर वेदपठण, गुरुजींचा संथा देणारा तो खण-खणीत आवाज, मृगशावकांचें तें इतस्ततः परिभ्रमण, युवतिजनांच्या त्या विलोल लीला, आणि पर्णकुटीजवळून मंदमंद वाहणारे ते ओढे यांचें रमणीय दृश्य, मनश्चक्षूपुढें नुसतें क्षणभर जरी उभें राहिलें तरी मन प्रसन्न होतें—त्या क्षणापुरतें तें शुद्ध आणि पवित्र होतें. मग ज्या लोकांनीं तें दृश्य प्रत्यक्ष पाहिलें असेल, अनुभविलें असेल, स्वतः बनाविलें असेल, त्यांचा आनंद काय वर्णावा ?

बोलोना विश्वविद्यालयांत विद्यार्थी आणि शिक्षकवर्ग यांचा अत्यंत निकट संबंध येत असल्यामुळें शिक्षणाच्या बौद्धिक संस्काराबरोबरच शुद्धा-चरणाचेहि संस्कार विद्यार्थ्याला आपोआप मिळत असत. तत्कालीन लोक तेजस्वी आणि कर्तृत्ववान निघत असत याचें मुख्य कारण त्या काळची शुद्ध शिक्षण पद्धति. बोलोना शहर विद्याध्ययनासाठीं जसें प्रसिद्ध होतें तसेंच तें तेथील उंच उंच मनोरे व मजबूत किल्ला या साठींहि विख्यात होतें. इटालीच्या पडत्या काळांतहि बोलोना शहरानें आपलें वैशिष्ट्य थोड्या बहुत प्रमाणांत राखलें होतें.

याच रोमाग्ना प्रांतात सॅन मॅरिनो हें एक स्वतंत्र संस्थान आहे. यूरोपांतील सर्वांत लहान राष्ट्र ह्मणून आणि जगांतील लोकसत्ताक

राज्यांतील सर्वांत लहान लोकसत्ताक संस्थान म्हणून याची ख्याती आहे. १३ व्या शतकांपासून आज तागाइत स्वातंत्र्याच्या या छोट्या शिलेदारानें आपलें स्वातंत्र्य कसें राखलें असेल कोण जाणें ! पण त्यानें तें राखलें आहे एवढी गोष्ट खरी. त्याचें क्षेत्रफळ २३ चौरस मैल आणि लोकसंख्या ११५०० आहे या एकाच गोष्टीवरून सॅन मॅरिनोच्या छोटेपणाची कल्पना होईल. या नवलपूर्ण स्वतंत्र राष्ट्राच्या राजधानीची लोकसंख्या १६८४ आहे !

या चिमण्या स्वातंत्र्यवीरानें आपलें स्वातंत्र्य आज पावेतों अबाधित राखिलें आहे एवढेंच नव्हे तर कांहीं विशिष्ट हक्कहि राखलें आहेत हें विशेष आहे. कोणत्याही देशांतील राजद्रोही माणसास आश्रय देण्याचा, इतर राष्ट्रांना जाचक होणारा, एक हक्क या छोट्या राष्ट्राला आहे. तो त्यानें आज तागाइत अव्याहतपणें चालविला आहे. प्रसिद्ध इटालिन देशभक्त गॅरिबॉल्डी यास सॅन मॅरिनोनें केलेलें सहाय्य इटालीच्या इतिहासांत बिनमोल ठरेल यांत शंका नाहीं.

गॅरिबॉल्डीचा रोम येथें पराभव होऊन तो व्हेनिसकडे चालला होता. पण त्याची शूर पत्नी ॲनिटा ही त्याच वेळीं मृत्युशय्येवर पडली असल्यामुळें तिला तशी सोडून जाणें त्याला कठिण झालें होतें. गॅरिबॉल्डीचा मुक्काम त्यावेळीं सॅन मॅरिनो संस्थानांत होता. त्याच्या हालचाली सर्व लोकांना माहित होत्या व त्याचा पाठलाग करीत पोपचे लोक सगळीकडे फिरत होते. त्याचा तपास लावून देणाऱ्यास पोपनें मोठें बक्षिसहि लाविलें होतें. पण तसा कोणी विश्वासघातकी नराधम रोमॅग्नोंत निघाला नाहीं. गॅरिबॉल्डीला रोमॅग्नोंत सर्व प्रकारें सहाय्यच मिळालें. पत्नीनिधनानंतर तो पुढें रवाना झाला. या एकाच गोष्टीवरून येथील लोक किती उदार वृत्तीचे आणि स्वातंत्र्येच्छु असतील त्याची कल्पना होते.

**मुसलिनी**

मुसलिनीच्या सर्व जीवनक्रमांत रोमॅग्नो प्रांतांतील लोकांच्या स्वभाव वैशिष्ट्याचें प्रतिबिंब पडलें असल्याचें स्पष्ट प्रत्ययास येतें. स्वातंत्र्येच्छु लोक स्वभावतःच मोकळ्या मनाचे, चलाख, बुद्धिमान् आणि परिणाम-सुलभ असतात. दिरंगाईचा त्यांना तिटकारा असतो. लपंडाव आणि छक्केपंजे पाहून त्यांचें रक्त उसळून जातें. मुसलिनीचा जन्म अशा तऱ्हेच्या लोकांत झाला, त्याचें सारें लहानपण याच लोकांत गेलें व जीवनकलहाचे पहिले धडेहि त्यानें याच लोकांत घेतले. अर्थातच त्यांचे स्वभावविशेष त्याच्या स्वभावांताहि प्रतिबिंबित झाले असले तर नवल काय ?

मुसलिनीच्या भावी आयुष्यक्रमाचें यथार्थ आकलन व्हावयास त्याच्या भोंवतालचें वातावरण नीट समजून घेणें जरूर होतें. एवढ्याचसाठीं रोमॅग्नो प्रांताचें, तेथील लोकांचें, व सॅन मॅरिनोसारख्या लोकविलक्षण संस्थांचें वर्णन जरा विस्तारानें केलें आहे. इतका वेळ आपण बाहेरच्या प्रदेशांत सहल केली. आतां मुसलिनीच्या खुद्द घरांत प्रवेश करून तेथील परिस्थिती व गृहशिक्षण यांचें सूक्ष्म निरीक्षण करण्यास हरकत नाहीं.

राज्यांतील सर्वांत लहान लोकसत्ताक संस्थान ह्मणून याची ख्याती आहे. १३ व्या शतकांपासून आज तागाइत स्वातंत्र्याच्या या छोट्या शिलेदारानें आपलें स्वातंत्र्य कसें राखलें असेल कोण जाणें ! पण त्यानें तें राखलें आहे एवढी गोष्ट खरी. त्याचें क्षेत्रफळ २३ चौरस मैल आणि लोकसंख्या ११५०० आहे या एकाच गोष्टीवरून सॅन मॅरिनोच्या छोटेपणाची कल्पना होईल. या नवलपूर्ण स्वतंत्र राष्ट्राच्या राजधानीची लोकसंख्या १६८४ आहे !

या चिमण्या स्वातंत्र्यवीरानें आपलें स्वातंत्र्य आज पावेतों अबाधित राखिलें आहे एवढेंच नव्हे तर कांहीं विशिष्ट हक्कहि राखलें आहेत हें विशेष आहे. कोणत्याही देशांतील राजद्रोही माणसास आश्रय देण्याचा, इतर राष्ट्रांना जाचक होणारा, एक हक्क या छोट्या राष्ट्राला आहे. तो त्यानें आज तागाइत अव्याहतपणें चालविला आहे. प्रसिद्ध इटालिन देश भक्त गॅरिबॉल्डी यास सॅन मॅरिनोनें केलेलें सहाय्य इटालीच्या इतिहासांत बिनमोल ठरेल यांत शंका नाहीं.

गॅरिबॉल्डीचा रोम येथें पराभव होऊन तो व्हेनिसकडे चालला होता. पण त्याची शूर पत्नी अॅनिटा ही त्याच वेळीं मृत्युशय्येवर पडली असल्या मुळें तिला तशी सोडून जाणें त्याला कठिण झालें होतें. गॅरिबॉल्डीचा मुक्काम त्यावेळीं सॅन मॅरिनो संस्थानांत होता. त्याच्या हालचाली सर्व लोकांना माहित होत्या व त्याचा पाठलाग करीत पोपचे लोक सगळीकडे फिरत होते. त्याचा तपास लावून देणाऱ्यास पोपनें मोठें बक्षिसहि लाविलें होतें. पण तसा कोणी विश्वासघातकी नराधम रोमॅग्नोंत निघाला नाहीं. गॅरिबॉल्डीला रोमॅग्नोंत सर्व प्रकारें सहाय्यच मिळालें. पत्नीनिधनानंतर तो पुढें रवाना झाला. या एकाच गोष्टीवरून येथील लोक किती उदार वृत्तीचे आणि स्वातंत्र्येच्छु असतील त्याची कल्पना होते.

**मुसलिनी**

मुसलिनीच्या सर्व जीवनक्रमांत रोमॅग्नो प्रांतांतील लोकांच्या स्वभाव वैशिष्ट्याचें प्रतिबिंब पडलें असल्याचें स्पष्ट प्रत्ययास येतें. स्वातंत्र्येच्छु लोक स्वभावतःच मोकळ्या मनाचे, चलाख, बुद्धिमान् आणि परिणाम-सुलभ असतात. दिरंगाईचा त्यांना तिटकारा असतो. लपंडाव आणि छक्केपंजे पाहून त्यांचें रक्त उसळून जातें. मुसलिनीचा जन्म अशा तऱ्हेच्या लोकांत झाला, त्याचें सारें लहानपण याच लोकांत गेलें व जीवनकलहाचे पहिले धडेहि त्यानें याच लोकांत घेतले. अर्थातच त्यांचे स्वभावविशेष त्याच्या स्वभावांतहि प्रतिबिंबित झाले असले तर नवल काय ?

मुसलिनीच्या भावी आयुष्यक्रमाचें यथार्थ आकलन व्हावयास त्याच्या भोंवतालचें वातावरण नीट समजून घेणें जरूर होतें. एवढ्याचसाठीं रोमॅग्नो प्रांताचें, तेथील लोकांचें, व सॅन मॅरिनोसारख्या लोकविलक्षण संस्थांचें वर्णन जरा विस्तारानें केलें आहे. इतका वेळ आपण बाहेरच्या प्रदेशांत सहल केली. आतां मुसलिनीच्या खुद्द घरांत प्रवेश करून तेथील परिस्थिती व गृहशिक्षण यांचें सूक्ष्म निरीक्षण करण्यास हरकत नाहीं.

## प्रकरण ४ थें.

# मुसलिनीचे आईबाप.

"The family–there's no such school as this."

*S. W. Partridge.*

बेनिटो मुसलिनीच्या वडिलांचें नांव ॲलेसॅन्ड्रो व आईचें नांव रोझा मॅल्टोनी होतें. या जोडप्यांचा स्वभाव सर्वस्वी परस्पर विरोधी होता. ॲलेसॅन्ड्रो हा लहानपणापासून हूड, दांडगा व रागीट म्हणून प्रसिद्ध होता. समाज-सत्तावादी म्हणून त्याला एकवार शिक्षाहि झाली होती व त्याचें घर म्हणजे समाज–सत्तावादी लोकांचा वादविवादाचा एक अड्डाच होता म्हणावयास हरकत नाहीं. उलट, रोझाचा स्वभाव इतका शांत व गरिब होता कीं, लहानपणीं, तिला लोक " देवदूतासारखी शांत " म्हणून संबोधीत असत. तिची प्रकृति साधारण अशक्तच होती. तरी तिची इच्छा-शक्ति जबरदस्त असल्यामुळें तिचा कामाचा उरक आश्चर्य करण्यासारखा असे. ॲलेसॅन्ड्रोच्या डोळ्यांत कठोर स्वभावाची झांक दिसत असली तर किंचित् स्मित वदनामुळें रोझाचे डोळे आनंद आणि शांतीचें निदर्शक वाटत. मुसलिनीचा पिंड अशा परस्पर विरोधी स्वभावांचा बनला होता.

ॲलेसॅन्ड्रोचा एक ' पथिकाश्रम ' होता. प्रवासी आणि गांवांतील लोक यांच्या खाण्याजेवणाची व निजण्याबसण्याची सोय त्याच्या खानावळींत होत असे. यूरोपांत प्रत्येक " इन् " मध्यें दारू विकण्याचीहि पद्धत अस-

त्यामुळें दारू पिणारे लोकहि त्याच्या दुकानांतच जमत असत. खेडेगांवांतून "इन्" किंवा खानावळ ही एक सार्वजनिक संस्थाच समजली जाते. बसल्या बसल्या स्थानिक त्याचप्रमाणें राष्ट्रीय व अंतर-राष्ट्रीय गोष्टींचा त्या ठिकाणीं उहापोह चालतो. प्रवाशांच्या गप्पांना स्थानिक राजकारणाची फोडणी मिळाली म्हणजे वादविवादाला येणारी चव कांहीं और असते. अशा वादविवादांत अमका एक विषय आला नाहीं असें सहसा होत नाहीं. विशेष पुस्तकी ज्ञान नसतांहि बहुश्रुतपणा अांगीं येण्यास अशा वादविवादांचा फार उपयोग होतो. मनुष्यस्वभाव समजून घेण्यास अशीं सार्वजनिक ठिकाणें फार उपयुक्त असतात. छोट्या बेनिटोच्या मनावर या वादविवादांनीं किती परिणाम केला असेल हें नक्की सांगणें कठिण असलें तरी मनुष्यस्वभावाचें शिक्षण त्यानें याच ठिकाणीं घेतलें असावें यांत संशय नाहीं.

या खानावळीला लागूनच ॲलेसँड्रोनें एक लहानसें लोहाराचें दुकान चालविलें होतें. लोखंडाच्या बारक्या सारक्या चिजा तयार करण्यांत ॲलेसँड्रो फार वाकबगार होता. एकीकडे घण ठोकित असतां दुसरीकडे, इनमध्यें चाललेल्या वादविवादांतहि तो भाग घेई. त्याच्या ठिकाणीं चांगल्या प्रकारचें वक्तृत्व होतें व तो पुष्कळवेळां विनोदहि करी त्यामुळें त्याच्या शद्बाला मंडळींत मान मिळे. शिवाय डोव्हिया गांवचा तो 'मेयर' ह्मणजे म्युनिसिपालिटीचा अध्यक्ष असल्यामुळेंहि लोक त्याला वचकून असत. त्याच्या दुकानाचा विशेष ह्मणजे तेथें मिळणारी दारू. दुकानांत ठेवावयाची दारू नेहमी चांगल्या प्रतीची ठेवण्याविषयीं तो खबरदारी घेत असे, त्यामुळें त्याला गिऱ्हाइकाची कधीं वाण पडली नाहीं. स्थानिक व पार्लमेंटच्या

निवडणुकीच्या दिवसांत तर त्याचें दुकानांत खूपच गर्दी जमे. पुष्कळ लोक पैसे न देतांहि जात. पण ॲलेसँड्रो जात्या उदार असल्यामुळें तो पैशाबद्दल विशेष घासाघीस घालत बसत नसे. त्याच्या या वृत्तीमुळें त्याच्याजवळ शिल्लक अशी कधींच राहिली नाहीं. पण त्याबद्दल त्यास कधीं वाईटहि वाटलें नाहीं. स्नेहीमंडळीबरोबर दारूचे पेले झोंकण्यांत आणि ऐरणीवर घण ठोकण्यांत तो सारखाच आनंद मानी व सुखानें कालक्रमणा करी.

त्याच्या बायकोनें तेथील लहान मुलांची शाळा चालविली होती. खालच्या बाजूला खानावळ व कारखाना आणि वरच्या बाजूला शाळा अशी व्यवस्था असे. रोझा स्वभावानें शांत व गरीब असल्यामुळें मुलांचें तिच्यावर प्रेम असे; तथापि तिची शिस्त कडक असल्यामुळें तिचा मुलांवर दाराहि असे.

अशा आईबापांच्या शिस्तीखालीं मुसालिनीच्या चरित्राला सुरवात झाली. या शिस्तीचा परिणाम उत्तम झाल्याचें त्याच्या भावी आयुष्यक्रमावरून वाचकांना दिसून येईल. आजचें मूल ह्मणजे भावी नागरिक होय. या दृष्टीनें विचार करितां मुसलिनीच्या नागरिकत्वाच्या विकासाचें आपण जसजसें निरीक्षण करीत जाऊं तसतसें त्याच्या बालपणच्या शिक्षणाची कल्पना आपल्याला येणार आहे. अपमान सहन न करण्याचें शिक्षण त्याला बापाकडून मिळालें तर आपल्या अनुयायांचें प्रेम संपादूनहि त्यांच्यावर शिस्तीचा वचक ठेवण्याची कला त्याला त्याच्या आईकडून प्राप्त झाली. " फॅशिस्मो " च्या तत्वांचें पृथःकरण केल्यास त्याच्या बुडाशीं 'अपमानाचा प्रतिकार आणि शिस्तीचें वर्तन हीं ' दोनच तत्त्वें आधारभूत असलेलीं दिसून येतील.

<u>मुसलिनी</u>

मुसलिनीचे वडील नोव्हेंबर १९१० सालीं वारले. त्या वेळीं तो La Lotta di classe नांवाचें वर्तमानपत्र चालवीत असे. आपल्या वडिलांविषयीं लिहितांना त्यानें खालील उद्गार काढिले आहेत. " माझ्या वडिलांनीं आपल्या सहकारी मित्रांचें आणि विरोधी प्रतिपक्ष्यांचेंहि पुष्कळ कल्याण केलें. अनेक बाबतींत त्यांचा [illegible] होता. आमच्या वडिलांवर मृत्यूनें अकालीं झडप घातली. त्यांचे बिनमोले विचार हीच त्यांची इस्टेट होय. "

## प्रकरण ५ वें

# बालपण आणि शिक्षण.

"Child is the father of man"

—*Wordsworth.*

लहानपणीं मुसलिनीचा स्वभाव हूड, उनाड, हेकेखोर, बेदरकार व कांहींसा एकलकोंडा असा होता. शाळेंत आपल्या आईचा डोळा चुकवून तो केव्हांच बाकांखालीं जाई व लहान मुलामुलींच्या उघड्या पोटऱ्यांना चिमटे काढी. बहुतेक मुलें त्याला भीत असत. मुसलिनीचें कपाळ रुंदच-रुंद असून गंडस्थळें प्रामुख्यानें पुढें आलेलीं आहेत. डोळे खोल व तेजस्वि असल्यामुळें त्याच्या चेहऱ्यांत करारीपणाबरोबरच थोडेसें क्रौर्यहि प्रकट होतें. त्याचें मागणें म्हणजे विनंती नसून आज्ञाच असल्यामुळें त्यानें मागणी केलेली जिन्नस मुलें त्यास मुकाट्यानें देत. त्या शाळेंत जाणारी एक मुलगी तर त्याला फारच भीत असे. बेनिटोचें वय त्यावेळीं ५ वर्षांचें आणि त्या मुलीचें ७ वर्षांचें असेल, पण ती त्याच्या आज्ञेबाहेर जाण्यास धजत नसे. तिची खोडी करून वर पुन्हां न रडण्या-बद्दल हा आडदांड पोर तिला दरडावून सांगे व तीहि बिचारी मुकाट्यानें तें ऐकून घेई. केव्हां केव्हां तिला रस्त्यांत आडवून तिचा गोड मुका घेण्यासहि हा बाल पुरुष कमी करीत नसे!

मुसलिनीनें तुरुंगांत बसल्या बसल्या आपल्या लहानपणच्या स्मृती लिहून ठेविल्या आहेत त्यापैकीं कांहीं खालीं देतों.

**मुसलिनी**

" माझ्या वडिलांचें नांव अलेसॅन्ड्रो. ते शाळेंत असे कधींच गेले नाहींत. वयाच्या १० व्या वर्षींच त्यांना एका लोहाराच्या हाताखालीं शिकाऊ ह्मणून ठेवण्यांत आलें. १८७५—८० च्या काळांत त्यांना अंतर-राष्ट्रीय-समाजसत्तावाद्यांच्या कल्पनांचे प्रथम पाठ मिळाले. थोड्याच दिवसांनीं आपल्या धंद्यांत वाकबगार बनून डोव्हिया येथें त्यांनीं आपलें स्वतःचें दुकान उघडलें. डोव्हिया गांवचे लोक भांडखोर असल्यामुळें त्या गांवाबद्दल आजूबाजूच्या लोकांना विशेष आदर नव्हता. तथापि माझ्या वडिलांना तेथें भरपूर काम मिळालें व ते तेथेंच कायमची वस्ती करून राहिले. त्यांनीं आपल्या समाजसत्तावादी तत्वांचा लोकांत प्रसार करून आपल्या मताची बरीच मंडळीं तेथें तयार केलीं. पण पुढें पोलिसांनीं त्यांचा संघ मोडून टाकला.

" मला वयाच्या १५ व्या वर्षांपर्यंत लिहितां वाचतां येत नसे. त्या सुमारास मी माझ्या आईच्या शाळेंत वाचावयास शिकूं लागलों व थोड्याच अवधींत मला उत्तम वाचतां येऊं लागलें. मी लहानपणीं अतिशय उनाड आणि खोडकर होतों. दगडाच्या मारामारींत डोकें रक्त-बंबाळ होऊन मी घरीं आल्याचें अनेक प्रसंग मला आठवतात. स्वतःचा बचाव कसा करावा हें मला चांगलें कळत असे. प्रसंगविशेषीं प्रतिपक्षाचा मारखाण्याचीहि माझी तयारी असे, ही गोष्ट नमूद करणें जरूर आहे.

एकदां फिरतां फिरतां एक जाळें सहज माझे नजरेस पडलें. पहातों तों त्यांत dawy birds पकडले गेले होते. मी तें तात्काळ उचललें व पळूं लागलों. ज्यानें जाळें पसरलें होतें त्याच्या ध्यानांत ही गोष्ट येतांच

त्यानें माझा पाठलाग करण्यास सुरवात केली. मला जीव घेऊन पळतां भुई थोडी झाली, त्यांतच वाटेवर नदी आडवी आली. मी तशीच नदींत उडी टाकून पोहत पैलतिराला गेलों पण माझी लूट कांहीं मी सोडिली नाहीं.

मला पक्षी फार आवडत, आणि त्यांतल्या त्यांत घुबडांच्या एका छोट्या जातीवर तर माझें फारच प्रेम असे. मी आई बरोबर देवळांत प्रार्थनेसाठीं जात असे पण तेथें फार वेळ बसून राहण्याचा मला कंटाळा येई."

पुढें पुढें मुसलिनीला लोहारखान्यांत बापाबरोबर काम करावें लागूं लागलें. ॲलेसॅन्ड्रोची शिस्त मोठी कडक असे. कामाकडे मुलाचें थोडेसें सुद्धां दुर्लक्ष झालें कीं त्यास एकाद दुसरी चमकावणी बसलीच ह्मणून समजावें. भाता फुंकतां फुंकतां बेनिटो पेंगूं लागला किंवा किटल्या उडून किंचित् भीतीनें त्यानें डोळे मिचकावले तरी सुद्धां एकादी श्रीमुखांत बसण्यास चुकत नसे. " अशा रीतीनें तुला तें कधींच यावयाचें नाहीं " अशी कान उघाडणी मधून मधून चालूच असावयाची. मुसलिनीचा गुन्हा तसाच विशेष स्वरूपाचा असल्यास प्रसंग विशेषीं फटक्याची शिक्षा मिळण्यासाहि कमी होत नसे !

मानवी जीवनक्रम ह्मणजे बव्हंशीं कठोर आणि निर्दय परिस्थितीशीं टक्कर मारण्यांतच असल्यामुळें आपल्या मुलानें त्यांत मागें पडूं नये व त्यासाठीं लहानपणापासूनच त्याची तयारी झाली पाहिजे या मताचा ॲले-सॅन्ड्रो होता. तिऱ्हाइताच्या चार लाथा खाण्यापेक्षां घरच्याच दोन खाऊन मुलानें शहाणें व्हावें अशी त्याची विचारसरणी होती. मुलाच्या भावी अभ्युदयावर दृष्टी ठेवून आईबाप मुलांना शिक्षण देतात. कर्तव्य ह्मटलें

कीं त्यांत कठोरपणा आलाच. पण त्याच्या बुडाशीं प्रेम असलें ह्मणजे हा कठोरपणा जाणवत नाहीं. गुलाबाच्या सुवासांत त्याच्या कांट्याची आठवण तरी होतें काय ? मुसालिनीला लहानपणीं थोडासा त्रास झाला असेल पण बापाच्या देखरेखींखालीं त्याला जें शिक्षण मिळालें, कोणतेंहिं काम शिस्तवार करण्याचें त्यास जें वळण लागलें, तेंच आज त्यास इटालीचा राज्यकारभार हांकण्यास उपयोगी पडत आहे.

हेंच लोहारीचें शिक्षण, पुढें एकेप्रसंगीं मुसलिनीस फार उपयोगी पडलें. त्याची हकीगत बरीच मनोरंजक आहे, म्हणून ती खालीं देतों.

कोणतातरी सणाचा तो दिवस होता. बहुतेक दुकानें बंद होतीं. बेनिटो मुसलिनी आपली मोटार गाडी बेदरकार रीतीनें हांकीत लॉंबर्डीच्या रस्त्यानें चालला होता. हातांत नवें खेळणें मिळालें म्हणजे तें मोडून त्याचा पुरा चुराडा उडविल्याशिवाय मुलाला जसें बरें वाटत नाहीं तीच गत मुसलिनीची होती. मोटार हांकण्यास तो नुकताच शिकला होता. नवशिक्या म्हणून जरा धीरानें गाडी हाकावी तें सोडून त्यानें गाडीला विमानच समजून ती नुसती भिंगरीसारखी चालविली होती. त्याच्या गाडींतले त्याचे स्नेही गाडी हांकण्यांत तरबेज होते तरी तेसुद्धां थोडेसे घाबरले. आतां 'हा समोरच्या गाडीवर जाऊन आदळतो, कीं पोलिसालाच गाडीखालीं लोळवितो कीं, एखाद्या लहान मुलाला किंवा म्हाताऱ्या बाईलाच अपघात करतो' असें वाटून त्यांना भीति वाटावी इतक्या जोरानें त्यानें गाडी चालविली होती. शेवटीं व्हावयाचें तेंच होऊन थोड्याच अवधींत गाडी चालेनाशी झाली. आतां गोगलगाईच्या गतीनें नेऊन ती कोठेंतरी गॅरेजमध्यें ठेवावी किंवा दुरुस्त करून घरीं न्यावी याशिवाय दुसरा मार्ग नव्हता. रिकामे गॅरेज शोधण्याचा मंडळींनीं

खूप प्रयत्न केला. पण मोकळें गॅरेज कोठेंच सांपडेना. मुसलिनी आणि त्याची सोबती मंडळी चिंतातूर झाली. मोटार चालली तर ठीक पण बंद पडली तर तें हत्तिचें मढें! आतां काय करावें अशा विचारांत भटकतां भटकतां, त्यांस लोहाराचें एक दुकान लागलें. पण सुटी निमित्त भट्टी विझवून लोहारदादा स्वस्थ बसले होते. मुसलिनीनें त्यास सर्व हकीगत सांगून स्वतः मदत करण्याचें आश्वासन दिलें तेव्हां एकदाची स्वारी उठली. मुसलिनीनें त्यास भट्टी शिलगावण्यास मदत केली व हातांत घण घेऊन सराइत लोहाराप्रमाणें काम करण्यास त्यानें सुरुवात केली. तें पाहून त्या लोहाराला सुद्धां त्याचें कौतुक आणि आश्चर्य वाटलें. "मी कोण आहे हें तुला सांगितल्यास तूं माझी तारीफच करशील" असें, ह्मणून मुसलिनीनें त्या लोहाराला आपण कोण आहोंत तें सांगितलें. मुसलिनी त्यावेळीं "पोपोलो डी इटालिया" या दैनिक पत्राचा संपादक असून इटालियन पार्लमेंटचा सभासदहि झाला होता! मुसलिनीची हकीगत ऐकून त्या लोहारास किती अचंबा वाटला असेल तें शब्दांनीं व्यक्त करणें कठिण आहे. मुसलिनीला कोणतेंहि शारीरिक श्रमाचें काम करण्यांत अजूनसुद्धां अतिशय आनंद वाटतो. तो बुद्धीनें बळकट आहे तसाच शरिरानें राकट आहे.

## प्रकरण ६ वें

# शिक्षणासाठीं प्रयाण.

I call complete and generous education that, which fits a man to perform justly, skilfully and magnanimously all the offices, both private and public of peace, and war.

—*John Milton.*

मागील प्रकरणांत सांगितल्याप्रमाणें बेनिटोच्या अभ्यासास त्याच्या आईच्या देखरेखीखालीं सुरवात झाली होती. पण त्याच्यासारख्या कुशाग्र बुद्धीच्या मुलाचें डोव्हियासारख्या खेडेगांवच्या शिक्षणानें समाधान होणें कठिण होतें. मुलाची तीव्र बुद्धिमत्ता रोझाचें लक्षांत येण्यास अवधी लागला नाहीं. परंतु नवऱ्याला शिक्षणाचें महत्व पटवून देणें तिला तितकेसें सोपें नव्हतें. ॲलासॅन्ड्रोचा उच्चशिक्षणावरील मोठा आक्षेप म्हणजे तें पाद्री लोकांच्या हातीं असतें हा. तो क्रांतिकारक समाज-सत्तावादी असल्याचें मागें सांगितलेंच आहे. या मताच्या लोकांचा धर्मावर व देवावर विश्वास नसल्यामुळें आपल्या मुलाचें शिक्षण पाद्री लोकांसारख्या केवळ देवभोळ्या आणि धर्म-प्रधान वृत्तीच्या लोकांचे देखरेखीखालीं होणें त्यास मुळींच पसंत नव्हतें. परंतु रोझाचा विशेष आग्रह पाहून त्यानें बेनिटोला पुढील शिक्षणासाठीं फाएन्झा गांवीं पाठविण्याचें कबूल केलें.

**शिक्षणासाठीं प्रयाण**

मुसलिनीला ही गोष्ट समजली तेव्हां त्यास फार वाईट वाटलें. "शाळा आणि तुरुंग यांत विशेषसा फरक नाहीं, अशी माझी कल्पना असल्यामुळें, आजपर्यंतच्या माझ्या स्वातंत्र्याला मी मुकणार म्हणून मला अतिशय दुःख झालें. ज्या ओढ्याच्या काठीं आम्ही खेळत असूं, ज्याच्या मंद गतीनें उत्पन्न झालेलें संगीत ऐकत असतां देहभान विसरून जात असूं, त्या ओढ्याच्या रम्य दृश्याला यापुढें आपण पारखे होणार या कल्पनेनें माझें अंतःकरण भरून आलें. डोव्हियाहून निघण्यापूर्वीं एक आठवडा मी सारखा फिरून काढला. मला माझ्या लहानपणच्या गांवचें इतकें प्रेम होतें कीं, तेथील तीं शेतें, त्या राई, ते डोंगर, तीं पटांगणें यांच्या प्रेमानें मी गहींवरून जाई. मी माझ्या आवडत्या ठिकाणीं पुन्हां पुन्हां फिरून आलों." निसर्गाच्या निरागस मैत्रीचा मुसलिनी यावेळीं मनमुराद अनुभव घेत होता. बालस्वभावानुसार, घर सोडण्याची कल्पना त्यास असह्य झाली असल्यास नवल काय?

जाण्याचे दिवस जवळ येऊं लागले. बेनिटोच्या आईनें त्याच्या प्रवासाची सर्व तयारी केली व बापलेकांच्या स्वाऱ्या एका खेचराच्या गाडींत बसून निघाल्या. गाडींत बसतांच बेनिटोला मातृवियोगाचें दुःख अनावर होऊन रडूं कोसळलें. परंतु इतक्यांत ॲलासॅन्ड्रोनें खेचराला इषारा देऊन गाडी हांकली व मुसलिनी मार्गस्थ झाला. थोड्याच वेळांत मुसलिनीच्या वृत्तीहि रस्त्याच्या दुतर्फा झाडांनीं आकृष्ट झाल्यामुळें ओसरल्या व तो आपल्या भावी शाळेचा विचार करूं लागला. या ठिकाणीं सांगण्यासारखी गोष्ट अशी कीं, मुसलिनीनें अगदीं निघण्याच्या आदल्या दिवशींसुद्धां आपल्या एका प्रतिस्पर्ध्याशीं भांडून बोटें फोडून घेतलीं होतीं.

तीं इतकीं कीं, निघतांना त्याचा हात बांधांचा लागला होता. दुसरी गोष्ट, गाडी वेशी बाहेर गेली न गेली तोंच गाडीचें खेचर मटकन खालीं बसलें व बराच वेळ कांहीं केल्यानें उठेना. ॲलेसन्ड्रोला हा मोठाच अपशकून झाला असें वाटलें पण इतक्यांत सुदैवानें त्या खेचराची बुद्धी पालटली व त्यानें पुन्हां सरकारी नोकराप्रमाणें बिन तक्रार चालण्याचें ठरविलें. पुढील प्रवास निर्विघ्नपणें पार पडला व बापलेकांच्या स्वाऱ्या फाएन्झा येथें एकदांच्या येऊन पोंहोंचल्या.

सुंदर नक्षी काम केलेल्या चिनी मातीच्या उपकरणाबद्दल हें गांव प्रसिद्ध आहे. या गांवच्या नांवावरून अशा वस्तूंना "फाएन्सिस" असें ह्मणतात या एकाच गोष्टीवरून त्याच्या कलाकौशल्याची महति लक्षांत येईल.

बेनिटो दुपारीं २ वाजतां शाळेच्या दरवाज्यांशीं येऊन पोहों-चला. " दार उघडून आंत येतांच तेथील व्यवस्थापकांशीं आमची ओळख करून देण्यांत आली. मला पहातांच, ' मुलगा तर चणचणित आणि हुषार दिसतो, ' असे त्यांनीं उद्गार काढले. ते ऐकून माझ्या बाबांना तर पुत्रवात्स-ल्यामुळें गंहिवरूनच आलें. माझें चुंबन घेऊन त्यांनीं मला पोटाशीं धरलें. थोड्याच वेळांत माझें नांव मुलांच्या यादींत दाखल करण्यांत येऊन बाबा परत जाण्यास निघाले. ते बाहेर पडतांच शाळेचा दरवाजा शिरस्त्याप्रमाणें धाडकन लावण्यांत आला. त्या बरोबर मला अतोनात रडूं कोसळलें " इतके दिवस " स्वतंत्र वनवृत्तीनें " राहणारा हा शुक आज पंजरबद्ध झाला !

या शाळेंत बेनिटोचा विश्वविद्यालयाच्या प्रवेश परीक्षेपर्यंत अभ्यास झाला. मूळची बुद्धी तरतरीत असून शाळेच्या शिस्तीची तिला जोड मिळा-

त्यामुळें मुसलीनीच्या आंगची उद्योगवृत्तीहि येथें वाढीस लागली. पुढें पुढें तो रोज १५।१५ तास अभ्यास करीत असल्याचें सांगतात. कोणताहि विषय हातीं घेतला कीं, त्याचा पुरा छडा लावल्याशिवाय रहावयाचें नाहीं या गुणामुळें त्याचें कोणत्याहि विषयाचें अध्ययन आमूलाग्र आणि खोल असें. शाळेंत अशा मुलाचा नंबर पहिला असे ही गोष्ट सांगण्याचें कारण नाहीं. त्याच्या बहुश्रुतपणामुळें व अनेक विषयांतील गतीमुळें शिक्षकांनाहि त्याच्याबद्दल आदर वाटे. फाएन्झाच्या शाळेंत एक " उत्तम विद्यार्थी " ह्मणून मुसालिनीची ख्याती होण्यास फार वेळ लागला नाहीं.

मुसलिनीचा शाळेंतील काल एकंदरींत शांततेनें गेला. पण मधून मधून त्याच्या " लँढाऊ वृत्तिला " जोर आला ह्मणजे मात्र त्याचे व शिक्षक मंडळीचे खटके उडाल्याशिवाय रहात नसत, ही गोष्ट नमूद करणें जरूर आहे. ' राजाचा वध करणें क्षम्य कीं, अक्षम्य ' या प्रश्नावर एकदां वाद निघाला. Divine right of Kings किंवा "ना विष्णुः पृथिवी पतिः " या जुन्या कॅथोलिक पंथाच्या तत्वाप्रमाणें, प्रजेला राजाचा वध करण्याचा हक्क नाहीं असें शिक्षकांनीं प्रतिपादिलें. याच्या उलट मुसलिनीनें " राजा हा प्रजेचा नोकर आहे. नोकर ज्याप्रमाणें चुकीला पात्र, अतएव शिक्षेलाहि पात्र त्याप्रमाणें राजाहि शिक्षेला पात्र आहे. नोकराला जर देहांत शासन होण्यास कांहीं हरकत नसते तर राजालाच तेवढें अपवादात्मक कां मानावयाचें" अशा अर्थाची विचारसरणी प्रस्थापीत केली. शिक्षकवर्गांत मुसलिनीच्या या निर्भीड विचारसरणीनें खूप गडबड उडवून दिली व "राज्यक्रांतिकारक" ह्मणून त्याची शाळेंतून हकालपट्टी करण्याचाहि बूट निघाला. पण तो प्रश्न तितकाच विझला, व आणखी कांहीं संकट न येतां मुसलिनीचा अभ्यासक्रम

सुरळीतपणें पार पडला. मनाला वाटेल तें कोणाचेंहि भय न धरतां बोलून दाखविण्याचा गूण मुसलिनीच्या ठिकाणीं पाहिल्यापासून आहे. खासगी आयुष्यांत या गुणाचें मोल मोठें असलें तरी राजकारणांत त्याला पुष्कळवेळां दुर्गुणाचें स्वरूप येतें ही गोष्ट विसरतां कामा नये. मुसलिनीबद्दल युरोपियन राजकारणी मंडळांत एक प्रकारचा गैरविश्वास असल्याचें दिसून येतें याचें मुख्य कारण त्याची निर्भीड वाणीच होय. जरा गांवढळ भाषेंत बोलावयाचें तर मुसलिनी "तोंडाचा फटकळ" आहे. पण हा दोष किंवा गूण बहुतेक मोठ्या लोकांच्या ठिकाणीं दिसून येतो असें म्हणावयास हरकत नाहीं. लो. टिळकांची प्रसिद्धी स्पष्टवक्तेपणाबद्दल जितकी आहे, तितकी सौम्य आणि सामोपचारी भाषेबद्दल नाहीं. असामान्य कर्तृत्वशक्ती बरोबर येणारा हा एक दोष आहे एवढी गोष्ट खरी.

शाळा पाद्री लोकांची असल्यामुळें तिच्यामध्यें धार्मिक विचारसरणीचें प्राबल्य असावें किंवा सर्व शिक्षणक्रम धर्मप्रधानच असावा, यांत कांहीं नवल नाहीं. मुलांच्या शीलावर त्याचा परिणाम होणें अपरिहार्य होतें, आणि तो तसा होत असला पाहिजे याविषयीं शंका नाहीं. मुसलिनी कितीहि स्वतंत्र-विचाराच्या क्रांतिकारक वातावरणांत वाढला असला तरी त्याच्या मनावरहि तेथील धर्मशिक्षणाचा परिणाम झाल्याशिवाय राहिला नाहीं. पाद्रीलोकांच्या अनेक अनाचारांचा आणि त्यांच्या प्राबल्याचा त्याला वीट येत असला तरी तो धर्माविरुद्ध नाहीं. त्याची विचारसरणी Anti-clerical म्हणजे पाद्री लोकांविरुद्ध आहे; ती Anti-religious म्हणजे धर्माविरुद्ध नाहीं, ही गोष्ट लक्षांत ठेवण्यासारखी आहे. धर्माच्या उदात्त रहस्याविषयींची आणि त्याच्या अंतःकरणावरील परिणामाविषयींची खात्री त्यास या

लहानपणच्या शिक्षणक्रमांतच झाली. परमेश्वराची अनन्यभावें प्रार्थना करून मनुष्याचें मन निर्मळ आणि निष्कलंक होतें व त्याच्या सामाजिक वर्तनावर त्याचा परिणाम होतो. अंतःशुद्धी होण्यास ईश्वराची प्रार्थना करणें हा एकच उत्तम उपाय आहे. याची अंधुक जाणिव त्यास याच काळांत झाली. मध्यंतरीच्या कालांत मनावर सोशिआलिस्ट मतांची छाप विशेष बसल्यामुळें या जाणीवेवर मालिन्य चढल्यासारखें झालें असतें तरी ती अजिबात बुजली नाहीं. लोकपक्षानें त्यास विरोध केला, तरीसुद्धां त्यानें धार्मिक शिक्षण सक्तीचें केलें आहे. धर्मांशिवाय राष्ट्राचें जीवन व्यर्थ आहे अशी त्याची खात्री झाली आहे. त्याचीं व्यक्तिविषयक मतें कांहींहि असलीं तरी त्याच्या परिपक्व बुद्धीला धर्माचें राष्ट्रीय महत्व किती वाटत असलें पाहिजे त्याची कल्पना मुसलिनीच्या खालील उद्गारावरून येईल. डौची येथें भाषण करितांना मुसलिनी म्हणतो, " मला धर्माविषयीं अतिशय आदर वाटतो. धर्मभावनेचें सामर्थ्य फार मोठें आहे; व तिचें संरक्षण आणि संवर्धन करणें आपलें कर्तव्य आहे. " फ्रेंच राज्यक्रांतिबद्दल मॅझिनीला अत्यंत आदर वाटत असे. परंतु तिची उभारणी धर्मभावनेच्या पायांवर केली नसल्यामुळें ती शेवटीं अयशस्वी ठरली असें त्याचें मत होतें. महाराष्ट्रसंतांच्या चळवळीचें तर ' मुख्य हरिकथा निरूपण ' हें ब्रीद वाक्यच होतें ही गोष्ट सुप्रसिद्ध आहे.

## प्रकरण ७ वें

# नोकरीसाठीं धडपड.

पुढें प्रतिद्धीस आलेल्या माणसांचा पूर्वेतिहास पाहूं लागल्यास त्यांना अनेक वेळां " नकारांशीं " निकराचें भांडण भांडावें लागल्याचें दिसून येतें. सुप्रसिद्ध अमेरिकन शास्त्रज्ञ एडिसन यांस कोठें नोकरी मिळेना म्हणून वर्तमानपत्रें विकावीं लागलीं; व चहावर कोट्याधीश झालेल्या लिप्टनला नोकरी शोधण्यासाठीं अमेरिकेचा रस्ता धरावा लागला. दरिद्र्याला जवळ करावयास कोणीही तयार नसतो. पण दारिद्र्यांत असतांहि थोडेसें कर्तृत्व दाखविलें कीं समाज त्याच दरिद्री व्यक्तीला मान देऊं लागतो. कोणताही समाज घ्या तो कर्तृत्वाचा चाहता असल्याचें दिसून येईल.

मुसलिनीचा शाळेंतलि अभ्यासक्रम पुरा होतांच त्यानें शिक्षकाच्या धंद्याची परीक्षा दिली व शिक्षक म्हणून तो स्वग्रामीं नोकरी शोधण्यासाठीं आला. त्यावेळीं सुदैवानें प्रिडापिओ येथील कम्युनल स्क्रिव्हेनरची ( म्युनिसिपल कारकून ) ( Communal Scrivener ) जागा रिकामी होती. मुसलिनीनें त्या जागेसाठीं अर्ज केला. त्याच्या बापाचें वजन तेथें चर्च्यापैकीं असल्यामुळें त्याला ती जागा मिळण्यास फारशी अडचण पडणार नाहीं असें वाटत होतें. परंतु मुसलिनीच्या क्रांतिकारक मतांमुळें आणि त्याच्या हट्टी स्वभावामुळें त्यास ती जागा मिळाली नाहीं. " या जागेस मुसलिनीचें वय फारच लहान आहे " असें कारण देऊन त्याच्या अर्जास

बाटाणाच्या अक्षता लावण्यांत आल्या. मुसलिनीनें जगाच्या धकाधकीच्या मामल्यांतील हा पहिला धक्का अनुभविला.

बेनिटोच्या बापाला या नकारानें फारच राग आला. त्याला आपल्या मुलाच्या बुद्धिमत्तेबद्दल सकारण अभिमान वाटत असल्यामुळें त्यानें म्युनिसिपालिटीच्या अधिकाऱ्यांचा सदर कृत्याबद्दल तीव्र भाषेंत निषेध केला, व सहज तो असेंहि बोलून गेला कीं, " लक्षांत ठेवा, तुमच्या या कृत्याबद्दल पुढें तुम्हांस पश्चात्ताप होईल. एक काल असा येईल कीं, प्रिडॅपिओच्या अधिकाऱ्यांनीं बेनिटोला नोकरी दिली नाहीं म्हणून लोक तुमची चेष्टा करतील. फ्रॅन्सिस्को क्रिस्पीलाहि त्याच्या मूळगांवच्या लोकांनीं अशीच नोकरी देण्याचें नाकारलें होतें; पण आज त्याबद्दल त्यांस वाईट वाटत आहे ! "

ॲलासॅन्ड्रोनें वरील उद्गार सहज काढले असले तरी त्यांना पुढें भविष्यवाणीचें महत्त्व आलें. मुसलिनी पुढें केवढा मोठा माणूस होणार होता याची त्या म्युनिसिपल अधिकाऱ्यांना कोठून कल्पना असणार ? त्यांनीं आपल्या बुद्धीप्रमाणें बेनिटोचा अर्ज फेटाळून लाविला. ॲलासॅन्ड्रोच्या भविष्यवाणीची सत्यता त्या अधिकाऱ्यांना आज पटली असेल. पण आतां त्याचा काय उपयोग ?

या ठिकाणीं क्रिस्पी ही व्यक्ती कोण याचा खुलासा करणें जरूर आहे. फ्रॅन्सिस्को क्रिस्पी हा केवळ स्वपराक्रमानें उदयास आलेला एक अत्यंत बुद्धिवान आणि कर्तबगार इटालियन पुढारी होऊन गेला. गॅरिबॉल्डीला सर्वतोपरी सहाय्य करण्याचें श्रेय याच्याचकडे आहे. इटालीचा मुख्य प्रधान म्हणून त्यानें गाजविलेली कर्तबगारी अलौकिक आहे. काव्हूर

नंतर नांव घेण्यासारखा मुख्य प्रधान क्रिस्पीच झाला. पण पूर्व वयांत अठराविश्वे दारिद्र्य असल्यामुळें या पुरुषाला अनेक वेळां नोकरीविना दिवस काढावे लागले होते. मुसलिनी ज्या वेळीं नोकरी शोधीत होता त्या वेळीं क्रिस्पी आजारी पडून थोड्याच कालांत हें जग सोडून जाण्याची तयारी करीत होता. क्रिस्पीविषयीं मुसलिनीच्या मनांत निरतिशय आदर आहे. कामाची धडाडी आणि राष्ट्रभक्ती या गुणांत दोघांच्या स्वभावांत बरेंच साम्य आहे ही गोष्ट लक्षांत ठेवण्यासारखी आहे.

## प्रकरण ८ वें.

# शिक्षकाची नोकरी.

"There is something of the savage in all great men."

*Carlyle.*

प्रिडॅपिओ येथेंच नोकरी शोधण्याचें मुख्य कारण मुसलिनीच्या आईची प्रकृति गेले बरेच दिवस बरी नव्हती हें होय. तिच्या शेवटच्या दिवसांत तिची कांहीं सेवाशुश्रूषा करावी अशी बेनिटोची फार इच्छा होती. पण नोकरीशिवाय राहणें अशक्य असल्यामुळें त्याला बाहेर जावें लागलें व मातृसेवेची त्याची इच्छा अपुरी राहिली. तो बाहेर पडला. त्यावेळीं शिक्षणशास्त्राचें प्रशस्तीपत्र एवढेंच काय तें त्याचें भांडबल. हातांत पैसा नाहीं किंवा मदतीला स्नेही नाहीं अशा असहाय्य स्थितींत मुसलिनीनें प्रवासाची तयारी केली.

धडपड करितां करितां एमिलिया प्रांतांत गुआल्टिरी नांवाच्या गांवांत एकदाची मुसलिनीस शिक्षकाची नोकरी मिळाली. ५६ इटालियन लीरा हा पगार ठरला व मुसलिनीनें शिक्षकाच्या आयुष्यक्रमास सुरवात केली. त्यावेळीं त्याचें वय १८ वर्षांचें असेल. मुलांमध्यें मिळून मिसळून वागण्याची हातोटी त्यास चांगली साधली असल्यामुळें तो थोड्याच अवधींत विद्यार्थीवर्गांत अतिशय प्रिय झाला.

"शाळेंत ४० विद्यार्थी असत. पण सर्व जण मनमिळाऊ व सुशील असल्यामुळें त्यांना वागविण्यास मला बिलकुल त्रास पडत नसे."

मुसलिनी रहात असे त्या ठिकाणापासून शाळा १॥ मैलावर होती व हें अंतर तो रोज चालूनच जाई. दुपारीं १ वाजतां सुटी झाली ह्मणजे मुसलिनी बिन्हार्डी येई. या ठिकाणीं रिकामा वेळ बराच मिळत असल्यामुळें मुसलिनीनें व्हायोलिन वाद्य वाजविण्याचा आणि नृत्यकलेचा अभ्यास सुरूं केला. व्हायोलिन वाजविण्यांत तो लौकरच इतका प्रवीण झाला कीं थोड्याच दिवसांत त्यास त्याच्या शिकवण्याहि मिळूं लागल्या.

पहिल्या पहिल्यानें, विशेष ओळखीदेखी नसल्यामुळें त्याचे दिवस कंटाळवाणे जात. परंतु पुढें स्नेहीसोबती वाढत जाऊन त्याचा काल एकंदरींत मजेंत जाऊं लागला. त्याला यावेळीं पत्ते खेळण्याचा भयंकर नाद लागला होता. शाळेचें काम आटपलें कीं मुसलिनीची स्वारी हॉटेलांत पत्ते खेळण्यासाठीं जाई. तेथें प्रसंगविशेषीं नाचांत भाग घेणें किंवा मजेनें दारू पिणें आदि प्रकारहि चालत.

" शाळेच्या वेळांपुरता मी स्थानिक अधिकाऱ्यांचा बांधला गेलों असलों तरी इतरवेळीं मी वाटेल तसा वागेन " अशी बेनिटोची त्याकाळीं विचारसरणी असल्यामुळें त्याचें आणि त्याच्या वरिष्ट अधिकाऱ्यांचें आणि विशेषतः मेयरचें फारसें पटत नसे. त्यांचें म्हणणें मुसलिनीनें पत्त्यासारख्या खेळांत भाग घेऊं नये. कारण तें त्याच्या शिक्षकाच्या पेशास शोभत नाहीं. व्यक्तीस्वातंत्र्याच्या तत्वानें पछाडलेल्या मुसलिनीला तें कसें पटावें? त्यानें तात्काळ, " ५६ लीरासारख्या भिकारड्या पगारांसाठीं मी स्वातंत्र्य विकण्यास तयार नाहीं " असें मेयरला रोखठोक उत्तर दिलें. एवढेंच नव्हे तर त्याच्याहि पुढें जाऊन स्वारीनें त्यास " माझ्या उठाठेवी करण्यापेक्षां जोडे शिवण्याच्या आपल्या मूळच्या धंद्याकडेच लक्ष पुरविल्यास बरें होईल " असाहि उद्दाम

## प्रकरण ८ वें.

# शिक्षकाची नोकरी.

"There is something of the savage in all great men."

*Carlyle.*

प्रिडॅपिओ येथेंच नोकरी शोधण्याचें मुख्य कारण मुसलिनीच्या आईची प्रकृति गेले बरेच दिवस बरी नव्हती हें होय. तिच्या शेवटच्या दिवसांत तिची कांहीं सेवाशुश्रूषा करावी अशी बेनिटोची फार इच्छा होती. पण नोकरीशिवाय राहणें अशक्य असल्यामुळें त्याला बाहेर जावें लागलें व मातृसेवेची त्याची इच्छा अपुरी राहिली. तो बाहेर पडला. त्यावेळीं शिक्षणशास्त्राचें प्रशस्तीपत्र एवढेंच काय तें त्याचें भांडवल. हातांत पैसा नाहीं किंवा मदतीला स्नेही नाहीं अशा असहाय्य स्थितींत मुसलिनीनें प्रवासाची तयारी केली.

धडपड करितां करितां एमिलिया प्रांतांत गुआल्टिरी नांवाच्या गांवांत एकदाची मुसलिनीस शिक्षकाची नोकरी मिळाली. ५६ इटालियन लीरा हा पगार ठरला व मुसलिनीनें शिक्षकाच्या आयुष्यक्रमास सुरवात केली. त्यावेळीं त्याचें वय १८ वर्षांचें असेल. मुलांमध्यें मिळून मिसळून वागण्याची हातोटी त्यास चांगली साधली असल्यामुळें तो थोड्याच अवधींत विद्यार्थीवर्गांत अतिशय प्रिय झाला.

" शाळेंत ४० विद्यार्थी असत. पण सर्व जण मनमिळाऊ व सुशील असल्यामुळें त्यांना वागविण्यास मला बिलकुल त्रास पडत नसे. "

मुसलिनी रहात असे त्या ठिकाणापासून शाळा १॥ मैलावर होती व हें अंतर तो रोज चालूनच जाई. दुपारीं १ वाजतां सुटी झाली ह्मणजे मुसलिनी ब्रिन्हार्डी येई. या ठिकाणीं रिकामा वेळ बराच मिळत असल्यामुळें मुसलिनीनें व्हायोलिन वाद्य वाजविण्याचा आणि नृत्यकलेचा अभ्यास सुरू केला. व्हायोलिन वाजविण्यांत तो लौकरच इतका प्रवीण झाला कीं थोड्याच दिवसांत त्यास त्याच्या शिकवण्याहि मिळूं लागल्या.

पहिल्या पहिल्यानें, विशेष ओळखीदेखी नसल्यामुळें त्याचे दिवस कंटाळवाणे जात. परंतु पुढें स्नेहीसोबती वाढत जाऊन त्याचा काल एकंदरींत मजेंत जाऊं लागला. त्याला यावेळीं पत्ते खेळण्याचा भयंकर नाद लागला होता. शाळेचें काम आटपलें कीं मुसलिनीची स्वारी हॉटेलांत पत्ते खेळण्यासाठीं जाई. तेथें प्रसंगविशेषीं नाचांत भाग घेणें किंवा मजेनें दारू पिणें आदि प्रकारहि चालत.

" शाळेच्या वेळांपुरता मी स्थानिक अधिकाऱ्यांचा बांधला गेलों असलों तरी इतरवेळीं मी वाटेल तसा वागेन " अशी बेनिटोची त्याकाळीं विचारसरणी असल्यामुळें त्याचें आणि त्याच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांचें आणि विशेषतः मेयरचें फारसें पटत नसे. त्यांचें म्हणणें मुसलिनीनें पत्यासारख्या खेळांत भाग घेऊं नये. कारण तें त्याच्या शिक्षकाच्या पेशास शोभत नाहीं. व्यक्तीस्वातंत्र्याच्या तत्वानें पछाडलेल्या मुसलिनीला तें कसें पटावें ? त्यानें तात्काळ, " ५६ लीरासारख्या भिकारड्या पगारांसाठीं मी स्वातंत्र्य विकण्यास तयार नाहीं " असें मेयरला रोखठोक उत्तर दिलें. एवढेंच नव्हे तर त्याच्याहि पुढें जाऊन स्वारीनें त्यास " माझ्या उठाठेवी करण्यापेक्षां जोडे शिवण्याच्या आपल्या मूळच्या धंद्याकडेच लक्ष पुरविल्यास बरें होईल " असाहि उद्दाम

जबाव करण्यास कमी केलें नाहीं. असल्या बेजबाबदार तरुणाची नोकरी त्यापुढें फार काल टिकली नसल्यास नवल नाहीं.

गुआल्टिरी येथें असतां, उपरीनिर्दिष्ट भांडणापेक्षांहि जास्त महत्वाची एक गोष्ट घडून आली, ती ह्मणजे मुसलिनीचें गॅरिबॉल्डीच्या चरित्रावर झालेलें भाषण. तेथील लोकांनीं गॅरीबॉल्डीचा अर्धपुतळा उभारण्याचें ठरवून एक सभा बोलाविली होती व एका वड्या वक्त्याचें व्याख्यान ठरविण्यांत आलें होतें. मेयर म्युनिसिपल मेंबर व सभाजन यांनीं नगरचौक भरून गेला. पण बराच वेळ झाला तरी नियोजित वक्त्यांचा कोठें उदय होईना. सभाजन कंटाळून गेले. मेयर आदि वडी मंडळी हतबुद्ध होऊन एकमेकांकडे पाहूं लागली. इतक्यांत कोणीतरी मुसलिनीचें नांव सुचविलें व मंडळी त्याच्या शोधार्थ तपास करूं लागली. " चुकला पीर मशीदींत " त्याप्रमाणें मुसलिनी कोठें नाहीं तर हॉटेलांत सांपडावयाचा हें सर्वांना माहीत असल्यामुळें मंडळी हॉटेलांत आली. मुसलिनी त्यावेळीं खांद्यावर कोट टाकून दारू पिण्यांत आणि नाचण्यांत रंगून गेला होता. गांवांत चाललेल्या दंगलीची त्यास दादहि नव्हती. पण गॅरीबॉल्डीचें नांव निघतांच या तरुण रंगेल दारूबाजाचे डोळे विस्फुरित झाले. "काय, गॅरीबॉल्डीवर बोलावयाचें आहे ?—तर मग मी जरूर येतों." असें ह्मणून खांद्यावरचा कोट खांद्यावरच टाकून किंचित् निशेमध्येंच स्वारी निघाली. मुसलिनीचें भाषण तास दीड तास झालें. त्याच्या भाषणाचा श्रोतृवर्गावर अतिशय परिणाम होऊन सभा तटस्थ वृत्तीनें त्याचें भाषण ऐकत होती. " अद्यापी सुद्धां गुआल्टीरी येथें त्या भाषणाची आठवण केली जाते " असें या प्रसंगाचें वर्णन करितांना सर्फाटीबाईनीं लिहिलें आहे.

**मुसलिनी**

आपल्या भाषणानें श्रोतृसमुदाय मुसलिनीनें काबीज केला असला तरी सकृद्दर्शनी बेजबाबदार आणि बेपर्वाईच्या दिसणाऱ्या वर्तनामुळें लौकरच त्याचें आणि मेयरचें उपरीनिर्दिष्ट भांडण झालें व मुसलिनीला गुआल्टिरीला रामराम ठोकावा लागला. मुसलिनीनें जनतेची तारीफ मिळविली पण भाकरीची नोकरी गमावली.

मुसलिनीची आर्थिक परिस्थिती या वेळीं फारच कठिण झाली होती. ५६ लीरा मिळत त्यापैकीं ४० लीरा त्याच्या खाण्याजेवण्यास आणि जागेसाठीं जात. बाकी राहिले १६ लीरा; ते रोजची दारू आणि पत्ते यांत सहज उडून जात. या "उद्दाम पोराजवळ" नोकरी सुटली त्या दिवशीं एक कपर्दिकाही नव्हती असें म्हटल्यास हरकत नाहीं.

ही नोकरी सुटली तर दुसरी तयार होती असें थोडेंच होतें. तथापि कांहीं तरी केलेंच पाहिजे असा विचार करून मुसलिनीनें आपल्या नाशिबाची परीक्षा पहाण्यासाठीं परदेशीं जाण्याचें ठरविलें.

गुआल्टिरी येथें त्यास विशेष असा फायदा कांहीं झाला नसला तरी एमीलीयन सोशिआलिस्टांचा त्यास तेथें सहवास घडला व त्यांच्या विचारांची त्यास ओळख झाली. त्यांच्या निष्क्रियपणाबद्दल व ऐष-आरामीबद्दल पहिल्यापासूनच त्यास तिटकारा वाटूं लागला व त्याचें व तेथील सोशिआलिस्टांचें कधींच पटलें नाहीं. पुढें 'अव्हान्टी' पत्रांतून व 'पोपोलो डी इटालियांतून' त्यानें या सोशियालिस्टांची पलंगपंडित म्हणून खूप टर उडविली आहे. असो.

मुसलिनीनें प्रयाणाची सर्व तयारी केली, परंतु जवळ भाड्यापुरतेहि पैसे नसल्यामुळें त्यास आपल्या वृद्ध मातोश्रीला तार करून ते मागवावे

**शिक्षकाची नोकरी**

लागले. तिनें तारेनें मुसलिनीस ४५ लीरा पाठविले. ते मिळतांच आपला चरित्रनायक भवितव्यतेच्या नव्या अनुभवार्थ स्वित्झर्लंड देशास जाण्यासाठीं निघाला.

जें होतें तें बऱ्यासाठींच होतें ही समजूत खरी असल्यास मुसलिनीची नोकरी गेली हें एका प्रकारें बरेंच झालें म्हणावयाचें. त्याच्या अस्थिर, साहसी आणि धडाडीच्या वृत्तीला गुओल्टिरीचें क्षेत्र फारच संकुचित होतें. त्याच्या दुर्दम आत्मविश्वासाला आणि नसांनसांतून सळसळणाऱ्या तरुण रक्ताला शिक्षकाची "मेंढपाळ" वृत्तीहि तितकीशी मानवणारी नव्हती.

भवितव्यतेनें त्याला परदेशांत ढकललें ही गोष्ट खरी. पण त्यांतहि तिचा कांहीं उद्देश नसेल असें कोणी म्हणावें? परदेशांत गेल्यामुळें त्याला जीवनार्थ कलहाची, भयंकर निकृष्टावस्थेची, रौरवसम गरीबीची कल्पना आली. इटालीमध्येंच कोठेंतरी शाळामास्तर किंवा कारकून म्हणून मुसलिनी राहिला असता तर त्याच्या बुद्धिविकासाला आणि परिस्थितीप्राप्त ज्ञानाला तो मुकला असता. संधी सांपडण्यापेक्षां ती निर्माण करण्यांत जास्त पुरुषार्थ असला तरी ती निर्माण करण्यांत मोठमोठ्या व्यक्तींच्या अमूल्य काळाचा निष्कारण किती अपव्यय होतो याचा विचार केल्यास संधी मिळणेंच जास्त श्रेयस्कर आहे असेंच कोणीहि म्हणेल. मुसलिनीला परदेशांत जाण्याची संधी मिळाली असें म्हणणेंहि चूक आहे. कारण वास्तविक त्याला ती मिळाली नाहीं. नोकरी जातांच तो परत घरीं येता तरी त्यास कोणी नको म्हटलें नसतें. उलट त्यावेळीं त्यानें घरीं जाणेंच एकाअर्थी जास्त श्रेयस्कर होतें असें वाचकांस पुढील वृत्तांत वाचून वाटण्याचा संभव आहे. तथापि मुसलिनी स्वित्झरलंडांत जाण्यास निघाला व आपल्या भावी मोठेपणाचा पाया घातला.

## प्रकरण ९ वें.

# पार्टीवाला आणि पहिला कारागृहवास.

"Have you any bread?-Give me some."

*Mussolini.*

" तुमच्याकडे कांहीं खायला असलें तर मला थोडें द्याल काय ? " अशी याचना करणारा भिकारी आज इटालींतील एक सर्वशक्तिमान पुढारी व्हावा, यापेक्षां आश्चर्यकारक तें काय असणार ? पण विधिघटनेच्य अतर्क्य लीलेला अशक्य असें जगांत कांहींच नाहीं.

गेल्या प्रकरणांत सांगितल्याप्रमाणें मुसलिनीचें आणि गिऑल्टिरीच्या मेयरचें भांडण होऊन तो परदेशीं जाण्यास निघाला. गिऑल्टिरी येथें त्याला लोकांचें बरेंच देणें झालें होतें परंतु त्याच्या सचोटीबद्दल कोणालाहि शंका नसल्यामुळें त्याला कोणी त्रास दिला नाहीं व मुसलिनीची स्वारी स्वित्झर्लंडाला जाण्यासाठीं निघाली.

मुसलिनी स्टेशनवर गाडीची वाट पहात उभा होता. गाडी येण्याला बराच वेळ होता म्हणून त्यानें सहज एक वर्तमानपत्र विकत घेतलें. पहातो तों, त्यामध्यें त्याच्या बापाला कैद केल्याचें वर्तमान प्रसिद्ध झालें आहे! पाद्रीलोकांच्या पक्षाचे सभासद निवडून येऊं नयेत म्हणून पॉप्युलर आणि सोशिआलिस्ट पक्षाच्या लोकांनीं बॅलट बॉक्स--मतांची पेटी--फोडण्याचा गुन्हा केला होता. ॲलेसॅन्ड्रो मुसलिनी पहिल्यापासून क्रांतिकारक पक्षाचा म्हणून प्रसिद्ध

असल्यामुळें त्याच्या अंगाशीं हें प्रकरण येऊन, त्यास कैद करण्यांत आलें होतें. त्याला पुढें लौकरच सोडून देण्यांत आलें, तरी तुरुंगांतिल अव्यस्थित वागणुकीमुळें, आधींच वार्धक्यानें जर्जरित झालेल्या त्याच्या प्रकृतीवर फारच वाईट परिणाम होऊन त्याचा शेवट जवळ आला.

बापाच्या कैदेची हकीकत वाचून बेनिटोच्या मनाची विलक्षण खळ-बळ उडून गेली असल्यास नवल नाहीं. एकीकडून मातृप्रेम, पितृभक्ती आणि सहोदरस्नेह त्यास परत घरीं खेंचित होता तर दुसरीकडून निष्ठुर आर्थिक परिस्थिती धक्के मारून त्यास परदेशीं हांकून देत होती. परंतु " काय करावें कसें करावें " या दशाक्षरी मंत्राचा जप करीत निष्कारण कालापव्यय कर-णारा मुसलिनी नव्हता. त्यानें क्षणार्धांत विचार कायम करून गाडी येतांच पुढचा मार्ग धरला.

एका दृष्टीनें त्यानें स्वीकारलेलें धोरणच योग्य होतें. कारण तो घरीं परत गेला असतां तरी त्याला आपल्या वडिलांना कोणत्याहि प्रकारें सहाय्य करतां आलें नसतें; व नोकरीच्या अभावीं घरीं राहणें म्हणजे आईच्या आधींच संपत चाललेल्या पैशावर आणखी भार टाकण्यासारखें झालें असतें. उलट बाहेर जाऊन चार पैसे मिळाविले तर तितकीच कुटुंबाला मदत करतां येईल, असा विचार करून मुसलिनीनें पुढचा मार्ग धरला.

मुसलिनी स्विझर्लंडला जाऊन पोहोंचला त्यावेळीं त्याच्या खिशांत २ लीरा आणि १० सेन्टीम शिल्लक होते ! गुआल्टिरी ते मिलन आणि मिलन ते किआसो या प्रवासांत प्रखर ऊष्णतेमुळें असह्य त्रास होत होता. "तहानेनें जीव जातो कीं काय असेंहि वाटूं लागलें," परंतु खिशांतील पुंजी इतकी अल्प होती कीं, कांहीं गार पेय वगैरे घेण्याचें मुसलिनीस धैर्य होईना.

अशा असह्य स्थितींतहि या तरुण प्रवाशाचें लक्ष मधून मधून बाह्य सृष्टि निरीक्षणांत गढून जाई व तेवढ्यापुरतें त्याला आजूबाजूच्या परिस्थितीचें विस्मरण पडे. या प्रवासाची हकीकत त्यानें पुढें आपल्या एका मित्रास पत्रानें कळविली. त्यांत तो ह्मणतो, " सर्व प्रवासभर मी खिडकीशीं उभा होतों. त्या रात्रीची शोभा कांहीं विलक्षण होती. आमची गाडी पर्वत-राजींमधून चालली होती. पर्वतांच्या शिखरांवर बर्फ पडल्यामुळें सृष्टिदेवी जणूं दुग्धस्नानच करीत आहे कीं काय असा भास होत होता. त्यांवर निशानाथाचे धवल किरण पसरले होते व आकाशांतील असंख्य तारागणांचें निरागस हास्य त्यांत प्रतिबिंबित झालें होतें. लुगानोचें सरोवर ह्मणजे रौप्य रसाचा लांबच लांब पसरलेला जाड थरच वाटे. त्यांवर पडलेल्या अनेकविध रंगकिरणांच्या प्रतिबिंबाची शोभा पाहणें त्यावेळीं फार मौजेचें होतें. गोथार्ड पर्वताचें उदात्तरम्य आणि प्रशांत रूप पाहून अंतःकरण क्षणभर स्तिमित होऊन जाई. त्यांवरून सर्पवक्रगतीनें जाणारी ती आगगाडी आणि भोंवळ आणणारा तो तिचा वेग यांनीं छाती दडपून जात असल्यास नवल नाहीं. "

मुसलिनीचा स्वभाव कितीहि कठोर, कर्तव्यनिष्ठुर आणि परि-स्थितिक्षम असला तरी प्रकृतीनें तो काव्यप्रधान आणि सौंदर्यानुकूल आहे. अत्यंत कष्टमय परिस्थितींत सृष्टिदेवतेच्या अनुपमेय सौंदर्यानें वेडे होणारे लोक जगांत फारसे सांपडत नाहींत याचें कारण मनाचा उल्हास आणि संकटांविषयीं बेफिकीर वृत्ति फारच थोड्या लोकांना लाभत असते. Romantic स्वभावाचें मूळ पाहूं गेल्यास तें वरील गुणांतच सांपडेल. मुसलिनीच्या स्वभावाची गुरुकिल्ली या दोन गुणांत असल्यामुळें अत्यंत बिकट प्रसंगींहि त्याला विनोद सुचतो व हताश परिस्थितीलाहि तो नव-

जविन देऊं शकतो. वरील सृष्टिशोभेचें वर्णन वाचून ‘ मुसलिनी त्यावेळीं फर्स्टक्लास सलूनमधून प्रवास करीत असावा ’ असेंच कोणासहि वाटण्याचा संभव आहे. परंतु प्रत्यक्ष परिस्थिति काय होती ती वाचकांना माहीतच आहे. बसावयाला जागा नसल्यामुळें त्याला सर्व प्रवास उभ्यानेंच करावा लागला होता, व तहानेनें जीव व्याकूळ होत होता. परंतु अखंड उत्साहाचा झरा सारखा वहात असल्यामुळें कठोर परिस्थितीचा त्रास क्षणार्धांत विसर पडला व सृष्टिनिरीक्षणांत त्याचें मन तल्लीन झालें. असो.

मुसलिनी स्वित्झर्लंडमध्यें येऊन दाखल झाला. स्वित्झर्लंड देश उमद्या स्वातंत्र्यविचाराचें माहेरघर, समतातत्त्वाचें मूलस्थान आणि बंधु-प्रेमाचें निवासस्थान ह्मणून प्रसिद्ध आहे. येथें सर्व साधारणरीत्या, मनुष्याचा दर्जा पैशावर न ठरवितां शीलावर ठरविला जात असल्यामुळें, मुसलिनीला तेथें नोकरी करतांना उच्चनीचतेची भावना आडवी आली नाहीं. शिक्षकाचें प्रशस्तीपत्र खिशांत असलें तरी परदेशीं त्याचा उपयोग होणें शक्य नसल्यामुळें मिळेल ती नोकरी करण्याचें त्यानें ठरविलें. परंतु कोण-त्याहि काळीं व कोणत्याही देशांत जा, नोकरी ह्मणजे कांहीं हुकमी एक्का नव्हे कीं जो टाकतांच हात मिळावा. मुसलिनीला आरंभीं आरंभीं भयंकर हाल सहन करावे लागले. या पुस्तकाच्या पहिल्याच प्रकरणांत एका पत्रां-तील उतारा दिला आहे, तें पत्र याच वेळची परिस्थिती वर्णन करणारें आहे. निजावयास जागा नाहीं ह्मणून एकाद्या पुलाच्या कमानीखालींच निज; भटकतां भटकतां पोलिस लोकांच्या हातीं सांपडूं या भीतीनें तासचे तास सार्वजनिक मुतारीमध्येंच काढ किंवा उभ्या दिवसांत अन्नाचा एक कणहि न मिळाल्यामुळें दीन होऊन यःकश्चित् भिकाऱ्याप्रमाणें हॉटेलच्या

दारांशीं भीक माग, या सारखे प्रसंग ओढवले असतांहि आपल्या चरित्र-नायकाचा आपल्या भविष्यकालावरील विश्वास ढळला नाहीं. निकृष्ट परिस्थितीच्या अत्यंत खोल दरींत तो प्रत्यहीं जास्त जास्त बुडत होता. तथापी यांतूनहि आपण वर येऊं अशी त्याची मनोदेवता त्याला ग्वाही देत होती. मानधनाला अपमानासारखें शल्य नाहीं. पण परिस्थितीपुढें कोणाची मान लवत नाहीं ? कोण लीन होत नाहीं ? या वेळीं मुसलिनीच्या मानी मनाच्या चिंधड्या चिंधड्या उडाल्या असतील, त्याला जीवित नकोसें झालें असेल, आणि त्यानें आत्महत्त्येचाहि विचार केला असेल ! पण अशा निष्क्रिय विचारांच्या वावटळींत न सांपडतां त्यानें आपलें जीविततारूं तसेंच पुढें ढकललें यांतच त्याचा मोठेपणा आहे. असो.

एकीकडे भीक मागून मिळेल तें खावें व दुसरीकडे नोकरीचा प्रयत्न करावा असा मुसलिनीचा कार्यक्रम कांहीं दिवस चालला होता. नोकरी शोधतां शोधतां एके दिवशीं, गवंड्याच्या हाताखालीं पाट्या टाकण्याचें काम त्यास मिळालें परंतु मजुरी फारच थोडी होती. सर्व दिवसभर शारीरिक मेहनत करावी लागत असल्यामुळें त्यास सायंकाळीं सपाटून भूक लागत असल्यास नवल नाहीं. त्यामुळें त्याला मिळणाऱ्या मजुरीपैकीं बहुतेक भाग खाण्यापायींच खर्च होऊन जाई. निजावयास जागा नसल्यामुळें मुसलिनी पुष्कळवेळां अगदीं उघड्या-वर किंवा मेंढरांच्या कळपांत निजून रात्र काढत असे ! लॉसानच्या एका पुलाखालीं त्याच्या अशा अनेक रात्री गेल्या आहेत. एके संध्याकाळीं मुसळधार पाऊस पडून नदीला पूर आला व वेनिटोची पुलाखालील निवाऱ्याची जागा पाण्यानें तुडुंब भरून गेली. पुढें काय करावें तें सुचेना.

## पाटीवाला आणि पहिला कारागृहवास

निवाऱ्याची जागा शोधीत हिंडत असतां एका छापखान्यांत कंपॉझिटराची पेटी उघडी असल्याचें त्याच्या दृष्टीस पडलें. मुसलिनीनें तात्काळ त्या पेटींत उडी मारून झांकण लावून घेतलें व तो स्वस्थपणानें झोंपीं गेला. दिवसभर श्रम करून दमल्यामुळें बिचाऱ्याला हां हां ह्मणतां गाढ झोंप लागली. सकाळीं नित्याप्रमाणें कंपॉझीटरानें पेटी उघडली तों आंत एक भटक्या भिकारी निजलेला ! कंपॉझीटराची भीतीनें बोबडीच वळली. त्याला पहिल्यानें वाटलें हें माणूस नसून भूतच असावें ! त्याच्या गडबडीमुळें थोड्याच अवधींत पोलिस शिपाई तेथें येऊन दाखल झाले व त्यांनीं मुसलिनीस " भटक्या " ह्मणून पकडून चौकीवर नेलें. एक रात्र आणि एक दिवस तुरुंगवास भोगल्यावर त्याची सुटका झाली. मुसलिनीच्या आयुष्यांतील कैदेचा पहिला प्रसंग तो हा.

## प्रकरण १० वें

# विद्यार्थी आणि चोर.

" While life lasts, hope lasts for every man."

—*Carlyle.*

मुसलिनिच्या आयुष्यांत कारागृहवासाचें महत्व फार मोठें आहे. त्याला जर्मनी, फ्रान्स, ऑस्ट्रिया, इटाली, स्वित्झर्लंड आदि देशांतून निरनिराळ्या प्रसंगीं एकंदर ११ वेळां तुरुंगवास भोगावा लागला. सर्फाटीबाईनीं त्याच्या या कैदप्रसंगांना Educational primer in eleven chapters" ह्मणजे " एकादश प्रकरणात्मक शिक्षणप्रवेशिका " असें नांव दिलें आहे. त्यांच्या मतें तुरुंगवासामुळें मुसलिनीच्या आंगीं धिमेपणा येण्यास मदत झाली आहे. पण आमच्या मतें, तुरुंगांमध्यें त्याला ग्रंथवाचन करण्यास व मनुष्यस्वभावाची पारख करण्यास जी संधी आणि सवड मिळाली ती धिमेपणापेक्षांहि जास्त महत्त्वाची आहे. तुरुंगाचीं दारें कैद्यावर लोटलीं गेलीं ह्मणजे त्याला शिस्तीबाहेर एक पाऊलहि टाकतां येत नाहीं. अशा कडक विधिनिषेधांच्या पकडींत धिमेपणाचा गूण सहजच विकास पावतो—आंगीं नसलेलाहि उत्पन्न होतो. पण मुसलिनीसारख्या अलौकिक विभूती तुरुंगांत जातात त्या वेळीं, त्या तेथें मिळणाऱ्या स्वास्थ्याचा उपयोग वाचन आणि मनन करण्याकडे करितात. लो. टिळकांनीं वेदकालाचा निर्णय करणाऱ्या ग्रंथांची रूपरेखा तुरुंगांत बसल्या बसल्या केली. गीतारहस्य ग्रंथ तर अथपासून इतिपर्यंत त्यांनीं तुरुंगांतच

लिहून काढला, या गोष्टी वाचकांच्या परिचयाच्या आहेत. मुसलिनीनेंहि आपलें वाचन वाढविलें तें तुरुंगांतच होय. मनुष्यस्वभावाचें शिक्षणहि त्यानें तेथेंच घेतलें. सुष्टदुष्ट, भल्याबुऱ्या, सर्वप्रकारच्या मनोवृत्तींचे लोक तुरुंगांत भेटतात. तुरुंग ह्मणजे मनुष्यस्वभावाचें एक अजब संग्रहालय आणि विश्वविद्यालयच होय असें म्हणावयास हरकत नाहीं. मुसलिनीनें या विद्यालयांत मनुष्यस्वभाचें शिक्षण मिळविलें व आपल्या भावी धोरणाचा कार्यक्रमहि तेथेंच आंखला.

प्रस्तुत प्रसंगीं त्याला झालेली शिक्षा औट घटकेची व अगदींच हलक्या अपराधानिमित्त झाली असल्यामुळें तिला ती पहिली शिक्षा या पलीकडे महत्त्व नाहीं. कैदेंतून सुटून येतांच त्यानें पूर्ववत् घमेली टाकण्याचा उद्योग चालविला. गवंडीकामांत आस्ते आस्ते प्रगती होऊन ५।६ महिन्यांच्या अवधींतच त्याची गणना उत्तम गवंड्यांत होऊं लागली. गलथा करण्यांत त्याचें विशेष कौशल्य दिसून येई. गलथा करणाऱ्याचा हात सफाईदार व दृष्टी चलाख असावी लागते. वीटा सरळ रेषेंत आणून त्यांच्यावरील चुन्याचा थर ठराविक जाडीचा बसवून त्याचा आकार गोल व सुंदर करण्यास कारागिराच्या ठिकाणीं एक प्रकारचें विशेष कौशल्य असावें लागतें. मुसलिनीनें हें कौशल्य संपादन केलें व त्यामुळें त्याला थोडी जास्त मजुरीहि मिळूं लागली. परंतु इतक्यांत थंडीचे दिवस आले व घरबांधणीचें काम बंद झालें !

स्वित्झरलंडांत हिवाळा अत्यंत कडक आणि दीर्घ काळ टिकणारा असल्यामुळें तेथें बांधकाम बारा महिने चालत नाहीं. मुसलिनीची गवंड्याची नोकरी जातांच त्याचेवर पुन्हां उपासमारीचा प्रसंग आला. पण सुदैवानें

त्याला लौकरच एका दारूच्या दुकानांत नोकरी मिळाली. सकाळीं लौकर उठून घरोघरीं दारूच्या बाटल्या पोंचविण्याचें काम त्याच्याकडे होतें. ते थंडीचे दिवस होते तरी जोडा घेण्याला पुरेसे पैसे नसल्यामुळें मुसलिनीला आपलें काम अनवाणीच करावें लागे. परंतु जात्या प्रकृति राकट असल्यामुळें त्याला थंडीची ह्मणण्यासारखी बाधा होत नसे. त्याचा वक्तशीरपणा व उल्हासी वृत्ती पाहून त्याच्या ग्राहक बायांना बेनिटोबद्दल एक प्रकारचा आदर वाटे. बक्षीस ह्मणून ५० सेन्टिमी त्या त्यास आनंदानें देत. या कामाच्या मोबदल्यांत त्यास रहाण्यास जागा फुकट व जेवण मोफत मिळत असे.

थंडीच्या दिवसांत हवा उत्साहवर्धक व क्षुधा वाढविणारी असल्यामुळें मुसलिनीस साहाजिकच चांगली भूक लागे. परंतु हॉटेलच्या बाईची इच्छा त्यानें कमी खाऊन पुष्कळ काम करावें अशी असल्यामुळें ती त्यास वारंवार " तुला खावयाला तरी किती लागतें ? तूं काय बकासूर आहेस ? " असें ह्मणून हिणवीत असे. पण मुसलिनी तिच्या बोलण्याकडे बिलकुल लक्ष देत नसे. पुष्कळवेळां, दुकानांतील दारूच्या मालाची मोजदाद झाली, किती आहे किती संपला याचा आढावा घेण्यांत आला किंवा नवा माल मागविला ह्मणजे मुसलिनीला त्यांतल्या त्यांत चांगल्या दारूची एकादी बाटली फुकट मिळे. अशा वेळीं अधीरेपणानें त्यानें ती घशाखालीं रिकामी केलेली पहाणें मोठें मौजेचें असे. दारिद्याला शिष्टाचार पाळण्यास सवड नसते.

दारूच्या बाटल्या पोंचविण्याचें काम प्रायः सकाळींच संपत असल्यामुळें मुसलिनीस दुपारचा वेळ बहुतेक मोकळा मिळे. हा फुरसतीचा वेळ फुकट न घालवितां त्याचा उपयोग ज्ञानार्जनाकडे करावयाचा असें

ठरवून मुसलिनीनें जिनिव्हा विश्वविद्यालयांत जाण्यास सुरवात केली. लॉसान-पासून जिनिव्हाला पोहोंचण्यास १५।२० मिनिटें पुरतात. मुसलिनी दुपारीं एखाद्या लोकल गाडीनें जिनीव्हास जाई व तेथील विश्वविद्यालयांत चालणाऱ्या अनेक विषयांवरील व्याख्यानें एकाग्र चित्तानें श्रवण करी. दाढी वगैरे करून, कोट बूट पाटलूण आणि कॉलर घालून हा "छोकरा-विद्यार्थी" विश्वविद्यालयांत येऊन दाखल झाला ह्मणजे "सकाळीं दारूच्या बाटल्या पोचविणारा बेनिटो हाच काय?" अशी कोणास शंकाहि येणार नाहीं अशा टापटिपीनें मुसलिनी व्याख्यानास जात असे. तेथें त्यानें काव्य, वाङ्मय, तत्त्वज्ञान, गणित आणि अर्थशास्त्र या विषयांचा अभ्यास केला. अर्थशास्त्राचे तेथील मार्मिक अध्यापक प्रो. विल्फ्रेडो पॅरेटो यांच्या व्याख्यानांनीं तरुण बेनिटोचें मन विशेष आकर्षित झालें. त्यांचीं तीं अभिनव विचारांनीं भरलेलीं व्याख्यानें ऐकत असतां भावना-प्रधान बेनिटोचें अंतःकरण आदरभावानें भरून जाई.

याच दिवसांत बेनिटोनें परकी भाषांचा थोडा फार अभ्यास केला. स्पॅनिश, जर्मन व इंग्रजी भाषांतून त्याची गती विशेष झाली नाहीं. फ्रेंच भाषेंत मात्र त्यानें चांगलेंच प्राविण्य मिळविलें. इंग्रजी भाषेचें महत्व त्यावेळीं त्यास विशेष वाटलें नाहीं. परंतु मुख्य प्रधान झाल्यापासून आंतरराष्ट्रीय प्रश्नांचा उहापोह करीत असतां अनेक ब्रिटिश मुत्सद्यां-बरोबर मुसलिनीचा संबंध आला व त्याची इंग्रजी भाषेविषयींची कल्पना बदलली. १९२२ च्या नोव्हेंबर महिन्यांत लॉसान येथें आंतरराष्ट्रीय परि षद भरली होती. इंग्रज प्रतिनिधी लॉर्ड कर्झन यांचेबरोबर त्यांच्या पत्नी आल्या होत्या. परिषदेचें काम संपून लेडी कर्झन परत जाऊं लागल्या

3333

तेव्हां त्यांना निरोप देतांना मुसलिनी त्यास म्हणाला, “आज मला तुम्हांला इंग्रजी पत्र लिहितां येत नाहीं. परंतु एका महिन्याच्या आंतच मी तें लिहू शकेन अशी मला उमेद आहे. एवढेंच नव्हे तर तसें पत्र पाठविण्याचें मी तुम्हांस अभिवचन देतों.” आणि सांगण्यासारखी गोष्ट अशी कीं, खरोखरीच एक महिन्याच्या आंत मुसलिनीनें “ जिनिव्हाचें अर्धकच्चें इंग्रजी ” पुन्हा इतकें ताजेंतवानें केलें कीं, त्यानें आपल्या प्रतिज्ञेप्रमाणें लेडी कर्झनला इंग्रजी भाषेंत एक सुंदर पत्र लिहिलें. कामाचा बोजा केवढाहि असला तरी मनानें घेतलेला उद्योग हरप्रयत्नानें तडीस नेण्याची मुसलिनीची चिकाटी विलक्षण आहे यांत शंका नाहीं.

जिनिव्हा विश्वविद्यालयांतच मुसलिनीच्या आंगच्या ज्या दुसऱ्या एका गुणाचा विशेष विकास झाला तो म्हणजे वादविवादपटुता. शाळेमध्यें असतांनाच हा गूण त्याचे ठिकाणीं वसत होता ही गोष्ट शिक्षकांशीं झालेल्या त्याच्या भांडणाचा जो वृत्तांत मागें दिला आहे त्यावरून वाचकांस विदितच आहे. परंतु विश्वविद्यालयीन वातावरण जरा जास्त मोकळें, व प्रगल्भ आणि उदार विचारांना जास्त पोषक असल्यामुळें वादविवाद-उत्सुक मनाचा विकास होण्यास तेथें जास्त संधी मिळते. अंतःकरणांत उद्भूत झालेले विचार निर्भीडपणानें मांडण्याचा गूण मुसलिनीच्या ठिकाणीं स्वभावतःच असल्यामुळें वादविवाद करण्यांत त्यानें तेथें चांगलेंच नांव मिळाविलें. तथापि वयानें तो फार लहान असल्यामुळें त्याची प्रसंग विशेषीं फजीतीहि होई. याच काळांत घडलेला खालील प्रसंग वाचण्या-सारखा आहे.

व्हॅंडरविल्डी नांवाच्या एका प्रसिद्ध समाजसत्तावादी पुढाऱ्याचें Christ: the First Socialist या विषयांवर जिनीव्हा येथें एक

व्याख्यान झालें. तें ऐकून त्याविरुद्ध टीका करण्याचा मुसलिनीला मोह पडला. त्यावेळीं त्यानें भगवान् बुद्धाच्या चरित्राचा आणि पौर्वात्य तत्त्व-ज्ञानाचा अभ्यास चालविला होता. बुद्धाच्या कर्तव्य-कठोर उपदेशाचा त्याच्या मनावर चांगलाच परिणाम झाला होता. त्यांतच नित्शे सोरेल आणि शॉपेनहारसारख्या कर्तव्यालाच सर्व प्राधान्य देणाऱ्या तत्त्वज्ञानांच्याग्रंथांच्या वाचनाची भर पडून मुसलिनीचें मन खिस्तोपदेशाविषयीं उदासीन झालें होतें. बुद्ध आणि खिस्त यांची तूलना करून खिस्त बुद्धाच्या पासंगासहि पुरणार नाहीं असें मुसलिनीचें मत झालें होतें व तें त्यानें व्हँडर विल्डीच्या भाषणावर टीका करितांना असंदिग्ध भाषेंत बोलून दाखविलें. "खिस्ताचा उपदेश नेभळेपणा उत्पन्न करणारा अतएव टाकाऊ आहे. रोमचें साम्राज्य नष्ट होण्याचें मुख्य कारण तेथें पसरलेलें खिस्ती धर्माचें वेड" वगैरे विधानें करण्यासहि त्यानें कमी केलें नाहीं. शेवटीं बुद्धाशीं खिस्ताची तूलना करून बुद्ध हा खिस्तापेक्षां शतपटीनें जास्त समाजसत्तावादी व क्रांतिकारक होता असा मुसलिनीनें निष्कर्ष काढून आपलें व्याख्यान संपविलें.

त्याच्या विचारसरणींत पुष्कळ सत्य व सुसंबद्धता असली तरी व्हँडरवेल्डीसारखा निष्णात वादपटू त्यास थोडाच हार जाणार होता ! त्यानें उत्तरादाखल भाषण करतांना मुसलिनीची आरंभीं बरीच तारीफ केली व शेवटीं, "क्रांतिकारक मतांमुळें त्याच्या जीवावर आकस्मिक घाला पडून खिस्ताला, त्यानें केलें त्यापेक्षां जास्त कांहीं करतां आलें नाहीं याबद्दल त्यास दोष देणें योग्य होईल काय ?" असा उत्तरगर्भ प्रश्न करून मुसलिनीच्या उंच मनोऱ्याचा पायाच उखडून टाकला ! क्षणभर सभागृह उपरोधिक टाळ्यांनीं आणि शिट्यांनीं दणाणून गेलें. बिचारा मुसलिनी

चिमणीएवढें तोंड करून मुकाट्यानें मागच्या दरवाजानें पळून गेला. त्या दिवशीं सभागृहांत उडालेल्या फजीतीची आठवण झाली ह्मणजे मुसलिनीची वृत्ती अजूनसुद्धां कावरी बावरी होते.

या भाषणप्रसंगानंतर थोड्याच दिवसांत जिनिव्हा येथून मुसलिनीची हकालपट्टी झाली. मुसलिनी कोठेंहि गेला तरी त्याचा मूळचा चळवळ्या स्वभाव त्यास थोडाच सोडणार ? जिनिव्हा येथें असतांना त्याच्या वर्तनावर पोलिसांचा डोळा होता. विशेषतः त्यानें अनेक राशियन क्रांति-कारकांशीं त्या वेळीं जो स्नेह ठेविला होता त्यामुळें तर स्विस-पोलीस लोक मुसलिनी विषयीं जास्तच साशंक झाले. व्हँडर वेल्डीशीं झालेल्या झटापटीनें पोलीसांची मुसलिनीच्या क्रांतिकारक मताविषयीं खात्रीच होऊन त्यांनीं त्यास जिनिव्हा प्रांतांतून हद्दपार केलें.

जिनिव्हा येथें अनेक राशियन स्त्रियांबरोबर मुसलिनीनें स्नेह संपादन केला होता. त्यांच्यांशीं वादविवाद करून त्याच्या क्रांतिकारक बुद्धीला पुष्कळ नवे नवे विचार सुचत. स्त्रीस्नेहामुळें उत्पन्न होणारा वर्तनाचा स्निग्धपणा मुसलिनीच्या ठिकाणीं यावेळीं स्पष्टपणें दिसूं लागला होता. त्यांच्या मैत्रीला आतां केवळ स्नेहाचेंच स्वरूप राहिलें नव्हतें. हेलिनी, एम्. अँजिलिका, बॅलाबॅनॉफ आदि अनेक स्त्रीस्नेह्यांशीं अत्यंत निकट सहवास झाल्यामुळें राशियन स्वभावाचा सूक्ष्म अभ्यास करण्याची संधी मुसलिनीस या वेळीं मिळाली. राशियन स्वभाव जात्याच अस्थिर, उतावीळ व भावनाप्रधान असल्यामुळें मुसलिनीला आपल्या स्त्रीस्नेह्यांच्या अगदीं अंतार्विचारांत शिरण्यास फारसे श्रम पडले नाहींत. १९२४ सालीं राशियन सरकारशीं इटालीनें तह केला. त्यावेळीं मुसलिनीनें जी मुत्सद्देगिरी आणि चतुराई दाखविली तिचें श्रेय

त्यानें जिनिव्हा आणि झूरिच या ठिकाणीं मिळविलेल्या रशियन स्वभावाच्या ज्ञानासच दिलें पाहिजे. " परक्या देशांतील लोकांच्या स्वभावाचें यथार्थ ज्ञान करून घ्यावयाचें असल्यास तेथील स्त्रीवर्गाशीं स्नेह संपादन करावा " असें विख्यात जर्मन कवी गोएटेचें मत असल्याचें प्रसिद्ध आहे. मुसलिनीचें स्त्रीवर्गाशीं असणारें वर्तन भ्रमरवृत्तीचें आहे असा त्याच्यावर आक्षेप आहे, व तो सर्वस्वी नाकबूल करणें सर्फाटी बाईना सुद्धां कठिण गेलें आहे. तें कांहींहि असो. मुसलिनीच्या आयुष्यक्रमांत रशियन स्त्री-स्नेहाला बरेंच प्रमुख स्थान दिलें पाहिजे एवढी गोष्ट खरी.

याच स्नेहामुळें त्याच्यावर या वेळीं ओढवलेल्या एका प्रसंगाची हकीकत मोठी मनोरंजक असल्यामुळें ती येथें देतों. जिनिव्हा येथून उचलबांगडी झाल्यापासून मुसलिनी फ्रेंच हद्दींत रहावयास गेला होता तें ठिकाण जिनिव्हापासून १० । १२ मैलापेक्षां जास्त लांब नसल्यामुळें त्याला जिनिव्हास जाणें अगदीं सोपें असे. आपल्या स्त्रीस्नेह्यांना भेटण्यासाठीं तो बऱ्याच वेळां जिनिव्हास जाई. ओळखिलें जाण्याच्या भीतीनें तो रेल्वेनें मात्र कधींहि येत नसे. डोंगरावरील रान तुडवीत ही स्वारी यावयाची व रान तुडवीतच परत जावयाची. अशाच एका सायंकाळीं मुसलिनी हेलिनीच्या खोलीशीं आला. मुसलिनीला पहातांच तिला आनंद झाला. तिच्याकडे त्या दिवशीं कांहीं विशेष बेत असल्यामुळें तर मूळच्या आनंदांत त्याच्या आगमनानें भरच पडली. हंसत खेळत मौजेनें जेवणें झालीं व थोड्याच अवधींत मुसलिनी परत जाण्यास निघाला. पण त्याच्या रशियन स्नेह्यांनीं त्यास त्या रात्रीं तेथेंच विश्रांती घेण्याचा आग्रह केला व त्याला संकोच वाटूं नये म्हणून हेलेन आपल्या मैत्रीणीकडे निजावयास

गेली. १४।१५ मैलांची चाल झाल्यामुळें मुसलिनीला अंथरुणावर पडतांच झोंप लागली असल्यास नवल नाहीं. उत्तम झोंप लागल्याचें चिन्ह म्हणजे घोरणें ही कल्पना बरोबर असल्यास मुसलिनीस त्या दिवशीं अगदीं गाढ झोंप लागली होती असें दिसतें. तो घोरत होता. त्याच्या पलीकडची खोली खानावळीच्या मालकाची होती. मुसलिनीच्या घोरण्याचा आवाज ऐकून असो किंवा इतर कसल्यातरी गडबडीनें असो खानावळवाल्याची बायको जागी झाली व तिनें आपल्या नवऱ्यास उठविलें. " पलीकडच्या खोलींत कोणीतरी आहे. त्या रशियन मुलीतर संध्याकाळींच कोठें बाहेर गेल्या, व बाहेरून कुलूपहि आहे तेव्हां खोलींत चोर शिरला असला पाहिजे. " असें ती आपल्या नवऱ्याला सांगत होती. त्या दोघांच्या गडबडीमुळें मुसलिनीहि जागा झाला. 'हा कोणीतरी चोर असला पाहिजे' हे शब्द कांनीं पडतांच त्याला दरदरून घाम सुटला. " माझी बंदूक कोठें आहे?—आण ती. मग पहातों चोर कुठें आहे तो. " हे खानावळवाल्याचे शद्ब ऐकून तर मुसलिनीची भीतीनें पांचावरच धारण बसली असल्यास नवल नाहीं. परंतु बंदूक साफ करावयास धाडली होती त्यामुळें ती सांपडेना. हें ऐकून मुसलिनीच्या जीवांत जीव आला. इतक्यांत खानावळवाला, पोलिस चौकीवर जाण्यास निघाला. एक वेळ खानावळवाल्यापुढें गयावया करून बंदुकीची गोळी चुकवितां आली असती, पण पोलिसाच्या हातीं सांपडल्यास होणाऱ्या फजीतीला पारावरच नव्हता.

हद्दपारीची शिक्षा झाली असतां बिगर परवानगीनें मुसलिनी जिनिव्हाच्या हद्दींत आला होता; हा एक गुन्हा, व रात्रीं दुसऱ्याच्या खोलींत शिरण्याचा ह्मणजे चोरीचा दुसरा गुन्हा. शिवाय परस्त्रियांच्या खोलींत निजल्याचा जो बोभाटा होईल तो निराळाच ! एकंदरींत मुस-

लिनीच्या होणाऱ्या फजीतीला अंत नव्हता एवढी गोष्ट खरी. जमादार साहेब दार कोणत्या क्षणीं ठोठावतील याचा नियम नसल्यामुळें मुठींत प्राण धरून मुसलिनी बसला होता. पण सुदैवानें त्यावेळीं पोलिस-चौकीवर कोणीच नव्हतें ! खानावळवाला गेला तसाच हात हालवीत परत आला. मुसलिनीला हायसें वाटलें. खानावळवाल्याची बायको आपल्या नवऱ्यास मधून मधून त्रास देतच होती पण त्यानें तें विशेष मनावर घेतलें नाहीं व तो पुन्हां झोंपी गेला. मुसलिनीची मात्र त्रेधातिरपीट उडाली असल्यामुळें त्याला झोंप येणें अशक्य होतें. ' कोठें केव्हां खुट होईल आणि आपण पकडलें जाऊं त्याचा नेम नसल्यामुळें ' प्रत्येक क्षण मुसलिनीस युगा-सारखा प्रदीर्घ आणि कंटाळवाणा वाटत असल्यास आश्चर्य नाहीं. पण चूप बसण्यापलकिडे कांहींच करतां येणें शक्य नसल्यामुळें मुसलिनी बिछान्यावर गप्प पडून होता.

सकाळीं त्याच्या मैत्रिणी आल्या व शिष्टाचाराप्रमाणें, " झोंप वगैरे ठीक लागली होती ना ? " ह्मणून त्यांनीं त्यास कुशल प्रश्न केला. मुसलिनीस औपचारिक " होय " म्हणणेंच जरूर होतें. पण आस्ते आस्ते, घडलेली सर्व हकीगत त्यानें त्यास निवेदन करितांच त्या दोघींना अतिशय वाईट वाटलें. तथापि " जें परिणामीं गोड तें सारेंच गोड " या न्यायानें रात्रीचा प्रकार, मनमुराद हसण्यांत आणि चहाच्या कपांत बुडवून मुसलिनीची स्वारी परत जावयास निघाली. त्या रात्रीची स्मृती होतांच मुसलिनीच्या अंगावर अद्यापीहि रोमांच उभे राहतात. त्या रात्रीं आश्चर्य, उद्वेग, भीती, निराशा, फजिती, विषाद, आनंद अशा अनेक परस्परविरोधी मनोविकारांनीं त्याचें अंतःकरण प्रत्येकक्षणीं उचंबळून जात होतें. विचारांच्या तंद्रींत वाट कशी सरली इकडे त्याचें लक्षहि नव्हतें. परत फ्रेंच हद्दींत पाऊल टाकतांच त्याला किंचित हायसें वाटलें.

## प्रकरण ११ वें

# खुनी–मुसलिनी–भिकारी.

या नंतर मुसलिनी झूरिच येथें गेला. झूरिच हें शहर स्वित्झर्लंडांतच असून महत्वाचें व्यापारी ठिकाण आहे. व्यापार आणि औद्योगिक संस्था यांची याठिकाणीं चांगली वाढ झाली असल्यामुळें तेथील लोकसंख्या सारखी वाढत आहे. झूरिच परगण्यांत जर्मन लोकांचेंच प्राबल्य विशेष आहे. त्यामुळें त्यांच्या शिस्तीचा मासला येथें पहावयास सांपडतो. आतांपर्यंत जर्मन लोकांचा आणि मुसलिनीचा विशेष संबंध आला नव्हता. तो येथें येऊन त्यांच्या मनांवर जर्मनीच्या शिस्तीचा अतिशय परिणाम झाला. फॅशिझम् तत्वाच्या यशाची गुरुकिल्ली शिस्तींत आहे. शिस्तीचें महत्त्व मुसलिनीस पहिल्यानें जर्मनींतील त्याच्या वास्तव्यांत कळून आलें; तिचा त्यानें आपल्या राजकारणांत कसा उपयोग करून घेतला तें ओघानें कळेलच. राजकारणी मुत्सद्यांना प्रवास आणि परदेशगमन यांचा लाभ घडल्यास त्यांचा कसा उपयोग होतो याचें मुसलिनीचें परदेशवास्तव्य हें एक उत्तम उदाहरण आहे.

झूरिच येथें मुसलिनीच्या उपजीविकेचें मुख्य साधन म्हणजे गवंडी-पणा. पण त्याचें लक्ष पहिल्यापासूनच राजकारणांत असल्यामुळें सोशि-आलिस्ट म्हणून तो तेथें लौकरच प्रसिद्धिस आला व त्यामुळें गवंड्याचें काम मिळविण्यास त्यास कठिण पडूं लागलें तथापि त्याचें वाचन व अभ्यास सुरूच होता. कार्ल मार्क्स या समाजसत्तावादप्रणेत्याच्या ग्रंथांचा त्यानें

झूरिच येथें विशेष आस्थापूर्वक अभ्यास केला. अनेक रशियन समाजसत्तावाद्यांचा आणि मुसलिनीचा संबंध येथेंच आला. पण झूरिच येथें त्याचें वास्तव्य फार दिवस होऊं नये असाच ईश्वरी नेमानेम होता कीं काय कोण जाणे !

एके दिवशीं त्याचा व दुसऱ्या एका समाजसत्तावाद्याचा सहज वाद सुरू झाला. वास्तविक तात्त्विक वादाला पिस्तुल-वादाचें स्वरूप यावयास नको होतें. पण दोघांची कांहीं खासगी चुरस होती, तिनें पेट घेऊन अनर्थ माजविला. ज्या खानावळींत वेनिटो रहात असे त्या खानावळीच्या मालकिणीशीं मुसलिनीची दाट मैत्री होती. तिच्याशीं इतर कोणीहि सलगीनें वागूं लागल्यास तें मुसलिनीस कसें खपावें ? त्यांतल्यात्यांत उपरीनिर्दिष्ट समाजसत्तावादी गृहस्थ तिच्याशीं जरा जास्तच आपुलकीच्या भावनेनें वागत असे, तें पाहून मुसलिनीस अतिशय संताप येई. पण निर्वीच्य निषेधापलीकडे त्याला कांहींच करितां येणें शक्य नव्हतें. हें त्यांच्या चुरशीचें कारण. मुसलिनीनें वादविवादाची संधी साधून आपल्या प्रतिपक्षाची टर उडविण्याचा प्रयत्न केला व भांडणाला तोंड लागलें. थोड्याच वेळांत एकमेकाला युद्धाचें आव्हान करण्यापर्यंत पाळी आली व एका निर्जन ठिकाणीं जाऊन दोघांनीं आंपापलीं पिस्तुलें काढलीं आणि एकमेकांवर गोळ्या झाडल्या. सुदैवानें कोणालाच गोळी लागली नाहीं. परंतु त्यांच्या गडबडींमुळें लोक व पोलीस गोळा झाले व मुसलिनीस पकडण्यांत आलें.

मुसलिनीची क्रांतिकारक चळवळ्या ह्मणून प्रसिद्धी होतीच. त्यांत वरील प्रकाराची भर पडून त्याला स्वित्झर्लंडांमधून हांकून देण्याची शिक्षा फर्मावण्यांत आली. यापूर्वी त्याला विशिष्ट प्रांतांपुरतीच हद्दपारीची शिक्षा

झाली होती, पण या खेपेस त्याची साऱ्या स्विस देशांतूनच हकालपट्टी होऊन त्यास परत इटालीस पाठविण्याचें ठरलें. परंतु तो दिवस ईस्टरच्या सुटीचा असल्यामुळें मुसलिनीस तो तुरुंगांतच काढावा लागला. ईस्टरचे दिवस ह्मणजे आनंदांत, मजेंत, कुटुंबसौख्यांत, मित्रसमागमांत जावयाचें व तसे ते कित्येकांचे जातहि असतील परंतु बेनिटो मुसलिनीला मात्र ते दिवस अत्यंत कष्टाचे, अपमानाचे आणि हालाचे गेले, यांत शंका नाहीं.

त्याला ठेवण्यांत आलें होतें त्या कोठडींतच एक जर्मन भिकारी व एक खुनी इटालीयन असे दुसरे दोघेजण होते. जर्मन भिकाऱ्याचा तो किड्यांनीं बुजबुजलेला पोषाख पाहून ओकारीच यावी इतका तो घाण होता. इटालियन माणूस मूळचा खिसेकापू असून एका भांडणांत त्यानें आपल्या प्रतिपक्ष्याचा खून केला होता, व त्या झटापटींत त्याच्या मांडीवर एक मोठी जखम झाली होती. तीमधून सारखा रक्तस्राव चालला होता. कोठडींत पाऊल टाकतांच मुसलिनीला तेथील घाणीच्या भपकाऱ्यासरशीं घेरीच आली परंतु थोड्याच अवधींत तेथील वातावरणाशीं तो रुळून गेला व आपल्या सोबत्यांशीं बोलूं लागला. त्या इटालियन माणसाचें नांव अँड्री सी. असें होतें. त्यानें आपली कर्मकहाणी मुसलिनीस सांगून आपल्या स्रवणाऱ्या जखमेवर पट्टी मारण्याची विनंती केली. मुसलिनीनें तात्काळ आपल्या आंगावरील शर्ट फाडून त्याची जखम बांधली. पण ती एवढी मोठी होती कीं, या पट्टीचा विशेष उपयोग होईल असें दिसेना. अँड्रीला त्या प्राणांतिक वेदना सहन करतांना पाहून मुसलिनीला सुद्धां त्याच्या सोशिकपणाचें आश्चर्य वाटलें. त्यानें आतांपर्यंत ही जखम पोलिसांपासून कशी लपविली असेल तें एका अँड्रीलाच माहित! जखमेचा

सुगावा लागला तर संशय येऊन नसतें कुलंगडें उपस्थित व्हावयाचें व खरें कारण उघडकीस आल्यास फांशी जावें लागावयाचें, अशी स्थिति असल्यामुळें तो ती जखम सारखी लपवीत होता. रक्तस्रावामुळें त्यास त्या दुपारीं भयंकर ताप भरला व तो बडबडूं लागला. शोष पडल्यामुळें पाण्यासाठीं त्याचे प्राण कासाविस होऊं लागले. तो पाणी पाणी करून ओरडूं लागला व रखवालदाराचे त्याच्याकडे लक्ष वेधलें म्हणजे मुसलिनीच्याहि तोंडाला कोरड पडल्याचा भास होई. कारण त्याच्या जखमेचा प्रकार केव्हां उघडकीस येईल कोण जाणे ही भीती मुसलिनीस प्रत्येक क्षणीं वाटे.

त्या रात्रीं त्यांना सूप—मांसाचा रस्सा—देण्यांत आले व त्याचवेळीं आणखी एक कैदी त्या कोठडींत आणून सोडण्यांत आला. मुसलिनीची निरीक्षणशक्ती आणि स्मरणशक्ती कशी तीव्र असावी याचा थोडासा मासला या प्रसंगीं अनुभवास आला. त्या नव्या कैद्यानें आंत पाऊल टाकतांच मुसलिनीस त्याच्याबद्दल संशय आला व त्यानें तात्काळ अँड्रीसला तसा इषाराहि दिला. हा नवा आलेला माणूस वास्तविक कैदी नसून गुप्त हेर होता. मुसलिनी व त्याचा साथिदार यांच्यावर नजर ठेवण्यासाठीं त्यास त्या ठिकाणीं पाठविण्यांत आलें होतें. या नव्या संकटानें अँड्रीच्या अंगाला तर दरदरून घाम सुटला.

मुसलिनीनें एकवार त्या नवागत माणसाकडे आपल्या भेदकदृष्टीनें पाहिलें व एकदम त्यास "तुला कशासाठीं परत स्वदेशीं पाठविण्यांत येत आहे ? तूं तर इटालियन दिसतोस. एरोलचा तूं रहाणारा ना ? अरे मी तुला ओळखतों !" असा रोकडा जबाब केला ! मुसलिनीच्या त्या

तीव्र नेत्रकटाक्षांनीं तो आधींच गोंधळून गेला होता. वरील प्रश्नांच्या सरबत्तीनें तर त्याची पुरीच त्रेधा उडाली व त्याचें तोंड गोरें मोरें झालें. त्याची ती गडबडलेली वृत्ती पाहून मुसलिनीस जास्तच धीर आला, व तेथें आपल्या ज्ञातिबांधवां विरुद्ध हेराचें काम पत्करल्याबद्दल त्यानें त्याची चांगलीच निर्भर्त्सना केली.

दुसऱ्या दिवशीं सकाळीं, तुरुंगाच्या मुख्याधिकाऱ्याची भेट घेऊन आपल्याला व आपल्या स्नेह्याला तुरुंगांत कैदी म्हणून ठेवण्याविरुद्ध मुसलिनीनें तक्रार केली. " कायदेशीररीत्या फार तर आम्हाला स्वदेशी परत पाठवा, पण आमच्यावर हेर ठेवण्याचें काय कारण ? " असा त्यानें त्या अधिकाऱ्यास प्रश्न टाकला. त्याला त्याचें समाधानकारक उत्तर देतां आलें नाहीं. तथापी त्यानें मुसलिनीचें म्हणणें कबूल केलें व त्या हेराला दूर करण्यांत आलें. दुसऱ्या दिवशीं मुसलिनी व अँड्री सी. यांच्या स्वाऱ्या परत इटालीस जाण्यास निघाल्या.

अन्यायाचा निषेध करणें प्रत्येक व्यक्तीचें कर्तव्य आहे. मनुष्य अगदीं असहाय्य स्थितींत असला तरी सुद्धां अन्यायाला त्यानें मान वांकवितां कामा नये, अशी म. गांधी व लो. टिळक यांची शिकवण आहे. निषेधाला तात्काल फळ येतेंच असें नाहीं. परंतु त्यामुळें त्या व्यक्तीचे किंवा त्या राष्ट्राचें पौरुष व्यक्त होतें. ज्या राष्ट्रांतील पुरुष अन्यायाचा प्रतिकार करण्यास तत्पर असतात तेंच राष्ट्र उदयास येतें. अन्याय सहन करणें ह्मणजे आत्मस्वातंत्र्यरूपी वैश्वानरावर राख टाकण्यासारखें आहे. राखेखालीं अग्नी विझावा त्याप्रमाणें निषेधाशिवाय सहन केलेल्या अन्यायानें

स्वातंत्र्याग्नी आस्ते आस्ते अस्तंगत होतो. आणि राष्ट्र पारतंत्र्याच्या गर्तेत जाऊन पडतें. मुसलिनीनें उपरीनिर्दिष्ट प्रसंगीं आपला तेजस्वी स्वभाव प्रगट केला व इष्ट हेतु तडीस नेला, ही गोष्ट ध्यानांत ठेवण्यासारखी आहे. असो.

दुसऱ्या दिवशीं, ठरल्याप्रमाणें मुसलिनी व त्याचा खुनी स्नेही यांच्या प्रवासास सुरवात झाली. जर्मन भिकाऱ्याची रवानगी त्यांच्याहि पूर्वीं झाली होती. तुरुंगांत एका बाजूला खुनी इसम, दुसऱ्या बाजूला जर्मन भिकारी आणि मध्यें मुसलिनी–इटालीचा भावी मुख्य प्रधान !! हें दृश्य नुसतें कल्पना चक्षूपुढें उभें केलें तरीसुद्धां तें किती असंभाव्य वाटतें. पण सकृद्दर्शनीं असंभाव्य वाटणाऱ्या अनेक गोष्टी या जगांत संभवनीय ठरतात हेंहि तितकेंच खरें आहे. नवल कथानाहि मागें टाकणाऱ्या अद्भुत गोष्टी या संसारांत नित्यशः घडून येतात. पण त्या पहाण्याची दृष्टी मात्र पाहिजे.

या खेपेस मुसलिनीला एका मालगाडींत बसविण्यांत आलें होतें. त्या डब्यांत आणखी नऊ असामी असल्यामुळें तेथें इतकी गर्दी झाली होती कीं, नुसतें बसावयासहि जागा नव्हती मग पाय सोडण्याची तर गोष्टच नको. अँड्री सी. ची जखम सारखी वहातच होती. त्याचा बूट रक्तानें भरून गेला होता व वेदनांनीं त्याचे जीव व्याकूळ होत होते. अँड्रीला आतां "आपण फारवेळ जगत नाहीं." याची खात्री झाली. त्यानें मुसलिनीला जवळ बोलावून "माझ्या आईला भेटून तिला माझा शेवटचा प्रणाम सांगा" असा गहिंवरून येऊन निरोप सांगितला. गाडी कोमो येथें येऊन पोहोंचण्यापूर्वींच अँड्री सी. नें राम म्हटलें होतें ! अँड्री सी. चें आयुष्य म्हणजे चोऱ्या, मारामाऱ्या, खून, व्यभिचार आदि सर्व प्रकारच्या

पापांनीं दूषित होतें; तरीसुद्धां त्याचें मातृप्रेम अचळ राहिलेलें पाहून आश्चर्य वाटल्याशिवाय रहात नाहीं. मातेच्या प्रेमाचा निर्झर इतका विशुद्ध, इतका निर्लेप आणि इतका निस्वार्थ असतो कीं, त्याच्यापुढें अत्यंत पापी माणूसहि पुनीत व्हावा. पोलीस अधिकाऱ्यांनीं अँड्रीचें प्रेत मुसलिनीस दाखविलें त्यावेळीं त्याच्या अंगावर कांटाच उभा राहिला. तो भयानक देखावा त्याला पाहवेना. एक दीर्घ निश्वास टाकून मुसलिनीनें अत्यंत जड अंतःकरणानें आपल्या खुनी मित्राचा निरोप घेतला.

समाजसत्तावादी ह्मणून मुसलिनीचें नांव कोमो येथें लोकांच्या बऱ्याच परिचयाचें झालें होतें. त्यांना मुसलिनीच्या आगमनाची बातमी समजतांच अतिशय आनंद झाला. प्रो. रेन्सी या विद्वान गृहस्थांनीं मुसलिनीस अत्यंत आग्रह करून आपल्या घरीं नेलें व त्याचा सत्कार केला. मुसलिनीच्या सन्मानार्थ संध्याकाळीं एका लहानशा मेजवानीचाहि बेत करण्यांत आला. प्रोफेसर मजकूर आणि मुसलिनी यांचा समाजसत्तावादावर बराच वेळ विचारविनिमय झाल्यानंतर मंडळी घरोघर परत गेली.

सकाळीं खुनी आणि बेकार लोकांच्या संगतींत असलेला मुसलिनी सायंकाळीं विद्वान् प्रोफेसरांशीं गंभीर चर्चा करतांना पाहून वाचकांचें मन आश्चर्यानें व्याप्त होत असेल. पण अलौकिक व्यक्तींचा जीवनक्रम असाच अद्भुत रम्य असतो. मुसलिनीलाहि हा फरक जाणवला असल्यास नवल नाहीं. त्याच्या निजण्याची व्यवस्था एका स्व ... ला.
बिछान्यावरील प्रत्येक वस्तू ... सॉरेल व नीत्शे
होती. जवळच एका टेब ... ग झ ... त्यांचें तत्वज्ञान ह्मणजे गीतेंतील

<u>शिक्षक आणि प्रोफेसर</u>

त्या आरशाकडे गेली व तात्काळ त्याला स्वतःच्या मळक्या आणि घाणेरड्या कपड्यांची कल्पना आली. आणि "या कपड्यांनीं या स्वच्छ चादर पसरलेल्या बिछान्याला मी कसा मलिन करूं" असा विचार त्याच्या मनांत उभा राहिला. त्या बिछान्यावर निजण्याचें त्यास धैर्य झालें नाहीं! त्यानें ती रात्र एका आराम खुर्चींतच पडून काढली!!

# प्रकरण १२ वें

# शिक्षक आणि प्रोफेसर.

कोमो येथील प्रोफेसराच्या आदरातिथ्याचा अनुभव घेऊन मुसलिनीची स्वारी घरीं जाण्यास निघाली. मुलाचें बाहेर कोठेंच जमेना म्हणजे तो परत वडिलांकडेच जावयाचा या सार्वत्रिक नियमानुसार मुसलिनी घरीं परत आला व बापाच्या धंद्यांत त्याला मदत करूं लागला. केव्हां गिऱ्हाइकांना चहापाणी, दारू, भोजन आदि दे, तर केव्हां लोहाराचा घण हातीं घेऊन वडिलांस मदत कर, असा त्याचा तेथील जीवनक्रम असे.

सायंकाळीं बापलेक "मॅकिव्हेली"च्या राजनैतिक ग्रंथांचा अभ्यास करीत किंवा कार्डुसो कवीच्या कविता वाचीत. स्वदेशाभिमानी, ज्वलज्जहाल, क्रांतिकारक कवि म्हणून कार्डुसीची प्रसिद्धी आहे. स्फूर्तिदायक कवनांचा आस्वाद घेत असतां मुसलिनी तल्लीन होऊन जात असल्यास नवल नाहीं. मॅकिव्हेलीच्या राजनीतिचा मुसलिनीनें यावेळीं केलेला अभ्यास त्यास पुढें एका प्रसंगीं चांगला उपयोगी पडला. मुख्य प्रधान म्हणून मुसलिनी अधिकारारूढ झाला तेव्हां बोलोना विश्वविद्यालयानें त्यास डॉक्टर (विशारद) ही बहुमानाची पदवी देण्याचें ठरविलें. ही पदवी 'ऑनररी' केवळ सन्मानार्थक—होऊं नये म्हणून मुसलिनीनें "मॅकेव्हिलीचें राजकारण" या विषयांवर एक प्रबंध लिहिला व त्याबद्दल सदर पदवी त्यास देण्यात आली. मुसलिनीच्या विचारांना स्थैर्य आणण्याचे कामीं मॅकेव्हिली सॉरेल व नीत्शे यांच्या ग्रंथाचा फार उपयोग झाला आहे. नीत्शेचें तत्वज्ञान म्हणजे गीतेंतील

कर्मयोगाचाच कमी अधिक प्रमाणांत अनुवाद असल्यामुळें पर्यायानें मुसलिनीची विचारसरणी गीतोपदिष्ट कर्मयोगानुवर्तीच आहे असें ह्मणावयास हरकत नाहीं. स्वतः मुसलिनींनींहि पौर्वात्य तत्त्वज्ञानाचा चांगला अभ्यास केला असल्यामुळें त्याच्या वाचनांत वेदांतग्रंथशिरोमणि गीता आली असण्याचा संभव आहे. असो. प्रस्तुतकाळीं तो मॅकिव्हेलीचा अभ्यास करीत असे एवढी गोष्ट खरी.

डोव्हियासारख्या कुग्रामांत राहण्याचा मुसलिनीसारख्या जात्या अशांततापप्रधान वृत्तीच्या माणसास लवकरच कंटाळा आला असल्यास नवल नाहीं. पुन्हां एकवार बाहेर जाण्याविषयीं त्याच्या मनानें उचल खाल्ली. कंटाळा हें एक कारण आणि त्याच वेळीं लष्करी नोकरीचा लागलेला तगादा हें दुसरें कारण. या दोन्हीं कारणांमुळें स्वग्राम सोडून जाण्याचें मुसलिनीनें ठरविलें.

लष्करी अधिकाऱ्यांमध्यें मुसलिनीची थोडी ओळख असल्यामुळें त्यानें सक्तीच्या लष्करी नोकरीची माफी मिळविली व शिक्षक म्हणून नोकरी मिळविण्यासाठीं तो घराबाहेर पडला. सुदैवानें या खेपेस विशेष दगदग न पडतां मुसलिनीस टॉल्मेझो जिल्ह्यांतील कॅनेव्हा शहरीं शिक्षकाची नोकरी मिळाली.

१९०५–६ मधले ते दिवस होते. मुसलिनीनें प्राथमिक शिक्षक म्हणून आपल्या जीवनक्रमाला तेथें सुरवात केली. राष्ट्रियदृष्ट्या शिक्षकाची नोकरी अत्यंत श्रेष्ठ यांत शंका नाहीं. जगांत ज्ञानाइतकें पवित्र दुसरें काय आहे ? सर व्हॅलेन्टाइन चिरोल यानीं "इजिप्शियन प्रॉब्लेम" या नांवाचा एक सुंदर ग्रंथ लिहिला आहे. त्यांत त्यांनीं कैरोच्या विश्वविद्यालयाचें ध्येय वाक्य दिलें आहे तें असेः—"By the breath of the school-children shall the state be saved." 'विद्यार्थ्यांच्या (तरुण)

निश्वासांनींच राष्ट्र तरून जाईल.' असा त्याचा अर्थ आहे. पण तो विश्वास इतका तेजस्वी आणि पराक्रमी करण्याचें सामर्थ्य फक्त एका शिक्षकाचेंच ठिकाणीं असतें. राष्ट्राचे विचारप्रवर्तक म्हणून शिक्षकांची योग्यता फार मोठी आहे. त्यांनीं मनांत आणल्यास त्यांना आपल्या छात्रवर्गापैकीं प्रत्येकाला स्वातंत्र्याचा निस्सीम भक्त बनवितां येईल. स्वदेशासाठीं आज जो अट्टाहास करावा लागतो, टाहो फोडावा लागतो, किंवा व्यायामासारख्या सहज गोष्टींसाठींहि प्रॉपगँडा करावा लागतो तो, शिक्षकांनीं या गोष्टींचा भार स्वतःवर घेतल्यास करावा लागणार नाहीं. मुलांच्या कोंवळ्या अंतःकरणावर "जननी जन्म भूमिश्च स्वर्गादपि गरीयसि" हें तत्त्व बिंबविणें फक्त शिक्षकांनाच शक्य आहे. आज आपण पारतंत्र्याच्या नर्कमय गर्तेंत रुतून पडलों आहों. तींमधून वर यावयाचें असल्यास आपण आपला तरुणवर्ग स्वदेशनिष्ठ, स्वातंत्र्यप्रेमी, उत्साही, साहसी आणि वीर्यवान् बनविला पाहिजे. आपल्या मायभूमीच्या उद्धारार्थ हा भार उचलण्यास आमचा शिक्षकवर्ग तयार होईल काय ? होय, त्यांना त्यांत कष्ट—असंख्य कष्ट—पडतील. पण खिंडीवरचा माणूस मरणासाठींच जन्माला आलेला असतो हें त्यांनीं लक्षांत ठेवावें. मृत्यू हीच प्रकृति अशी त्याची भावना असते. आपण मरून तो दुसऱ्याला जीवन देतो. आमचा शिक्षकवर्गाहि राष्ट्रासाठीं कष्ट करावयास, खिंडीवर मरावयास तयार होणार नाहीं काय ? 'होईल, निःसशय होईल.' अशी ग्वाही आमची मनोदेवता आम्हांस देत आहे.

मुसलिनीची बुद्धी फारच उच्च दर्जाची असल्यामुळें त्याला लहान मुलांच्या प्राथमिक शिक्षणक्रमाशीं समरस होणें फार कठिण गेलें. मधून मधून तो मुलांवर चिडून प्रसंगविशेषीं छडीचा प्रयोग करण्यासहि कमी करीत नसे. मुसलिनी रागावून समोरच्या टेबलावर हात आपटूं लागला किंवा मोठ-

**शिक्षक आणि प्रोफेसर**

मोठ्यानें ओरडूं लागला ह्मणजे त्याचे डोळे इतके विस्फुरित होत कीं, मुलांना त्याचें भयच वाटावें. शाळेंत त्याचा अतिशय दरारा असे. आपल्या खासगी परिभाषेंत मुलें त्यांस Tyrant किंवा "जुलमी राजा" ह्मणून संबोधित असत. तथापि त्याच्याबद्दल सर्व मुलांना अतिशय आदर वाटत असे ही गोष्ट नमूद करणें जरूर आहे.

शाळेपासून त्याचें राहण्याचें ठिकाण २॥-३ मैल दूर होतें. हिंवाळ्याचे दिवसांत धड अंगावर ओव्हरकोट नाहीं, कीं डोक्याला टोपी नाहीं असा मुसलिनी भटकत असे. अंगाला झोंबणारा वारा आणि प्रसंगविशेषीं पडणारें बर्फ यांचा या तामसी तरुणाला पत्ता सुद्धां नसे. भराभर पावलें टाकीत दिवसांतून २ वेळां मुसलिनीची स्वारी या रस्त्यानें जात येत असे. सर्व रस्ताभर तो कांहींना कांहीं पुस्तक वाचत जाई. लेखक व वक्ता म्हणून मुसलिनीनें तेथें बरेंच नांव मिळविलें असल्यामुळें त्याच्या या असल्या विक्षिप्त वर्तनाला त्यास कोणी हंसत नसे एवढेंच.

मुसलिनी मधून मधून टॉल्मेझो प्रांतांत ठिकठिकाणीं जाऊन भाषणें करी. त्याच्या भाषणांत बुद्धीपेक्षां भावनेचा प्रभावच विशेष असल्यामुळें लोकांचें मनावर त्याच्या भाषणांचा अतिशय परिणाम होई. टॉल्मेझो प्रांतांतील लोकांना मुसलिनीच्या वक्तृत्वाची अद्यापीहि आठवण होते या वरूनच त्याच्या परिणामकारक भाषण शैलीची कल्पना होईल. पण कांहीं कांहीं वेळां गूणच नडतो असें ह्मणतात त्याप्रमाणें मुसलिनीच्या या वक्तृत्व गुणामुळेंच त्याची तेथील नोकरी गेली. एकदां तेथें एका प्रसिद्ध वक्त्याचें व्याख्यान चाललें होतें. पण तो बोलतां बोलतां अडखळला. श्रोतृसमुदायाला त्याची फजिती करण्यास ती संधी योग्य वाटून त्याला त्यांनीं "हूट आऊट" करण्यास सुरवात केली. त्या बरोबर तो जास्तच

घाबरला व गोरें मोरें तोंड करून खालीं बसला. इतक्यांत सभागृहांतून "मुसलिनी मुसलिनी–Let the master speak." अशा आरोळ्या सुरू झाल्या. मुसलिनी सभागृहाच्या एका कोपऱ्यांत बसला होता. त्याला लोकांनीं आग्रहानें पुढें ढकलून बोलवयास भाग पाडलें. पूर्व तयारी कांहीं नसतां या तरुण शिक्षकानें आपल्या वक्तृत्वानें १–१॥ तास सभागृह दणाणून टाकलें. त्याचा तो त्या वेळचा आवेश आणि उत्साह आठवून त्याला धन्यवाद देणारे गृहस्थ आज तागाईतहि अनेक आहेत. भाषणाच्या शेवटीं अभिनंदनाच्या आरोळ्यांनीं सभास्थान निनादून गेलें. मुसलिनीनें एका वर्षांत तेथें चांगलाच लौकिक व लोकप्रियता मिळविली होती. परंतु या लोकप्रियतेमुळेंच त्याचा हेवा करणारीं मंडळीहि तेथे निर्माण झालीं व त्यांनीं कांहीतरी खुसपट काढून वर्षाच्या अखेरीस, मुसलिनीस शाळेंत कायम करण्याचें नाकारिलें. मुसलिनी पुन्हां एकवार बेकार म्हणून जगाच्या पेठेंत नोकरी शोधूं लागला.

मुसलिनीच्या टाल्मेझा येथील वास्तव्यांत विशेष सांगण्यासारखी गोष्ट म्हणजे तेथील खानावळवाल्या मुलीचें मुसलिनीवर बसलेलें प्रेम होय. मुसलिनीच्या ठिकाणीं एकप्रकारचा उमदा आकर्षकपणा आहे म्हणून म्हणा किंवा आरंभींच्या प्रकरणांत सांगितल्याप्रमाणें रोमॅग्नोलो लोकांचे स्त्रीपुरुषसंबंध मनमोकळेपणाचे असल्यामुळें म्हणा, मुसलिनी ज्या ज्या ठिकाणीं राहिला त्या त्या ठिकाणीं त्याचेवर कोणत्याना कोणत्यातरी मुलीचें प्रेम बसल्याचें दिसून येतें. टॉल्मेझो येथील खानावळवाल्या तरुण मुलीचो या तरुणावर बरीच भक्ती बसली होती. १९१५ सालीं लढाईवर जातांना त्याचा मुक्काम टॉल्मेझो येथें पडला असतां त्या मुलीनें मुसलिनीची मुद्दाम गांठ घेऊन एक रात्रतरी आपला पाहुणचार घ्यावा अशी त्यास विनंति

केली. परंतु इतर सैनिकांची संगती सोडून एकट्यानेंच ऐषआराम उपभोगणें मुसलिनीस पसत पडलें नाहीं, व त्यानें हा पाहुणचार घेण्याचें नाकारिलें. "......तथापि तूं जी फीत धारण केली आहेस ती तेवढी मला दे. तुझ्या प्रेमाची खूण म्हणून ती मी सदैव माझ्या वक्षःस्थळावर वागवीन." अशी त्यानें तिची समजूत केली व तिला रजा दिली.

या गोष्टीवरून इतर अनेक गोष्टींचा बोध होत असला तरी मुसलिनीच्या स्वभावावरहि चांगलाच प्रकाश पडतो. चालून आलेल्या स्त्री-रत्नाचा, एकावेळीं आपलें प्रणयस्थान असलेल्या स्त्रीचा अव्हेर करणें, मनावर कर्तव्यनिष्ठेचा तसाच दाब असल्याशिवाय शक्य नाहीं. मुसलिनीनें आपण होऊन तिची फीत मागून घेतली व ती आपल्या छातीवर नेहमीची धारण केली यांवरूनच त्याचें त्या स्त्रीवर प्रेम होतें ही गोष्ट सिद्ध होते. असें असूनहि त्यानें तिच्या विनंतीला मान दिला नाहीं व ती रात्र आनंदानें आपल्या सहचर सैनिकाबरोबर काढली ! मनावर ताबा असणें हीच सामर्थ्याची गुरुकिल्ली समजली जाते. जगांत कांहीं कार्य करावयाचें असेल तर ही गुरुकिल्ली माणसानें आत्मवश केली पाहिजे.—' मन एव मनुष्याणां कारणं बंध-मोक्षयोः ' हीच गोष्ट खरी.

मुसलिनी टाल्मेझो येथून निघाला तो ओनेग्लिया गांवीं आला. त्याच्या विद्वत्तेबद्दल या वेळपावेतों बराच बोलबाला झाला असल्यामुळें मुसलिनीस तेथें फ्रेंच भाषेच्या प्रोफेसराची जागा मिळाली. परंतु प्रोफेसरीचा हा मान फारच अल्पजीवि ठरला. सुटीच्या दिवसांत मुसलिनी घरीं गेला होता. तेथें रिपब्लिकन आणि सोशिआलिस्ट पक्षांत धान्य मळण्याचें यंत्र वापरावें कीं नाहीं या प्रश्नावर दुमत होऊन भांडण जुंपलें व त्या भांडणांत मुसलिनीस १० दिवसांची शिक्षा झाली व तेथेंच त्याची प्रोफेसरी संपली !

वर्षं सहामहिने प्रोफेसरी करून जन्मभर " प्रो. " अशी पदवी लावणाऱ्या आमच्याइकडील शिराळशेटी प्रोफेसरींतलाच मुसलिनीचा हा प्रकार झाला. परंतु इकडील प्रोफेसर्स आणि मुसलिनी यांच्यांत फरक असा कीं, ही नोकरी गेल्यानंतर त्यानें पुढें केव्हांहि आपल्या नांवामागें प्रोफेसर ही पदवी लाविली नाहीं. दहापांच वर्षें प्रोफेसरी करून ती सोडली आणि मग कोणी स्वतःला प्रोफेसर ह्मणवूं लागला तर तें एक वेळ क्षम्य होईल. पण ज्यांच्या प्रोफेसरीची मुदत एकदोन टर्म्सच्या पलीकडे गेली नाहीं त्यांनींसुद्धां आपल्या मागें त्या पदवीची उपाधि लावून घेणें ह्मणजे प्रोफेसर या विद्वत्तादर्शक अतएव आदरपूर्ण शब्दाची थट्टा करण्यासारखें आहे. लो. टिळकांनीं प्रोफेसरीचा संन्यास केल्यापासून पुन्हां ती पदवी कधीं लाविल्याचें आह्मास माहित नाहीं. " स्वयमेव मृगेंद्रता " अशी ज्यांची योग्यता त्यांना लटक्या पदव्यांच्या उपाधीची काय जरूरी ? असो.

याच सुमारास मुसलिनीनें Il Pensiero Romagnolo या स्थानिक पत्रांत आपले विचार निबंधरूपानें प्रदर्शित करण्यास सुरवात केली. नीत्शेच्या कर्मप्रधान शिकवणुकीचा ठसा त्याच्या मनावर पहिल्या-पासूनच बसला असल्याचें या लेखांवरून दिसून येतें. शिस्त आणि सत्ता यांच्या जोरावर राष्ट्राचा उदय होतो, या नीत्शेच्या मताचा मुसलिनीनें त्याच्या लेखांतून अनेक वेळां अनुवाद केला आहे. असो.

शिक्षेमुळें त्याची नोकरी गेली, परंतु त्यामुळेंच सोशिआलिस्ट पक्षांत त्याचें वजन वाढून त्यास ट्रेंट येथील लेबर चेंबरच्या सेक्रेटरीची जागा देण्यांत आली. त्यानंतर तो लौकरच ट्रेंट येथें गेला. त्याची हकीकत पुढील प्रकरणांत वाचावयास मिळेल.

## प्रकरण १३ वें.

# ट्रेंट येथें.

It is adult already in the infant man.

—*Emerson*.

प्रत्यक्ष परिस्थितीसारखें शिक्षण–साधन दुसरें कोणतें असेल ? विशिष्ट परिस्थितीचा अनुभव आला ह्मणजे विचारांत कित्येक वेळां कल्पनेबाहेर क्रांति घडून येते. म. गांधींना दक्षिण आफ्रिकेंत जाऊन, तेथील स्वज्ञातिबांधवांच्या हालअपेष्टा स्वतः सहन कराव्या लागल्या नसत्या तर आज त्यांची जी विचारसरणी आहे ती तशीच असती कीं नाहीं याबद्दल प्रस्तुत लेखकास शंका आहे. " ज्याला स्वतःच्या घरांत मान नाहीं त्याला जगांतहि मान नाहीं " याचा अनुभव गांधीजींना दक्षिण आफ्रिकेंत आला ह्मणूनच त्यांनीं आपल्या चळवळींचें क्षेत्र, आफ्रिका सोडून हिंदुस्थान केलें असावें, असा आमचा तर्क आहे. मुसलिनीच्याहि आयुष्यांत १९०७–८ सालच्या सुमारास परदेशांत जाण्याचा प्रसंग आला; व तेथें त्यास, म. गांधीप्रमाणेंच, परकी सत्तेखालीं स्वदेश बांधवांच्या आकांक्षांची कशी गळचेपी होते, तें प्रत्यक्ष पाहण्यास व अनुभवण्यास मिळालें.

गेल्या प्रकरणांत सांगितल्याप्रमाणें मुसलिनीस ट्रेंट येथें लेबर चेंबरच्या सेक्रेटरीची जागा मिळाली. त्यावेळीं ट्रेंट ऑस्ट्रियाच्या ताब्यांत होतें. तथापी बहुसंख्याक वस्ती इटालियन असल्यामुळें

संस्कृति आणि परंपरा या दृष्टीनें ट्रेंट शहर इटालियनच होतें असें म्हणावयास हरकत नाहीं. तेथील इटालियन लोकांची साहजिक इच्छा परत इटालीस मिळण्याची होती व त्या दृष्टीनें सिसारी बॅटिस्टीच्या पुढारीपणाखालीं त्यांनीं थोडी फार चळवळहि चालविली होती. या बॅटिस्टीचें 'पोपोलो' म्हणून पत्र होतें व त्यांतून तेथील इटालियनांच्या राष्ट्रीय आकांक्षांचें व्यक्तीकरण चालत असे.

मुसलिनीची आणि बॅटिस्टीची लौकरच ओळख झाली व मुसलिनी पोपोलो पत्रांत लिहूं लागला. लेबर चेंबरचा सेक्रेटरी म्हणून त्यास १५० क्रोनेन म्हणजे अदमासें ८०।९० रुपये पगार मिळे. त्या दिवसांत स्वस्ताई असल्यामुळें मुसलिनीस तेवढ्या थोड्या पगारावरहि आपला संसार चालवितां येत असे. फावल्या वेळांत फ्रेंच शिकवण्या कराव्यात व इतर वेळीं व्हायोलिन वाजवावी असा त्याचा तेथील दिनक्रम असे.

ट्रेंट येथें असलेल्या मुदतींत मुसलिनीनें हिंदी गणितशास्त्र, स्पॅनिश व जर्मन भाषा आणि त्यांचें वाङ्मय, यांचा अभ्यास केला. क्लॉप स्टॉक या जर्मन कवीच्या काव्यावर त्यानें यावेळीं एक निबंध लिहिला होता. क्लॉप स्टॉकचें 'मेसाया' हें काव्य कल्पनेच्या बाहेर मोठें आहे. "मिल्टनचें महाकाव्य पॅरडाइज लॉस्ट हें फार मोठें समजण्यांत येतें परंतु तें मेसायाच्याया पासंगासहि पुरणार नाहीं. खुद्द जर्मनींत हें काव्य समग्र वाचलेले असे २०।२५ लोक तरी सांपडतील कीं नाहीं याची शंकाच आहे, एवढें तें मोठें आहे. इटालींत तर एका मुसलिनी शिवाय दुसऱ्या कोणी तें 'अथ पासून इति पर्यंत' वाचलेंच नाहीं, अशी माझी खात्री आहे" असें अत्युक्तीपूर्ण विधान सर्फाटी बाईनीं केलें आहे. त्यांतील अतिशयोक्तीचा भाग वगळल्यास एक

गोष्ट स्पष्ट दिसून येतें ती ही कीं, एकाद्या विषयाचा सुदीर्घ कालपर्यंत करावा लागणारा व्यासंग मुसलिनीच्या अंगीं आहे. त्याच्या स्वभावाला मेसायासारखें लांबच लांब काव्य शेवटपर्यंत वाचवलें तरी कसें याचें सुद्धां आश्चर्य वाटतें. त्याच्या नेहमीच्या वृत्तीनुसार त्यानें तें अर्ध्यांच तासांत फेंकून द्यावयाचें. परंतु तें त्यानें समग्र वाचलें एवढेंच नव्हें तर त्यांवर एक प्रबंधहि लिहिला ! मनांत आणल्यास मुसलिनीस वाटेल तितका दम काढवेल नाहीं तर त्याच्यासारख्या उतावीळ माणूस जगांत दुसरा सांपडणें शक्य नाहीं.

याच कालांत त्यानें जर्मन कवि शिलर याच्या " विल्यम टेल नाटकांतील स्त्री पात्रें " व " प्लाटेन आणि इटालि " हे दोन निबंध लिहून प्रसिद्ध केले. याच सुमारास त्यानें " तत्वज्ञानाचा इतिहास " नांवाचाहि एक ग्रंथ लिहिला जगांत आतांपर्यंत उदयास आलेल्या जुन्या नव्या सर्व तत्वज्ञान पद्धतींचा तूलनात्मक आणि विवेचक दृष्टीनें त्यांत विचार केला होता. परंतु या ग्रंथानें सूर्यप्रकाशांत येऊं नये असा ईश्वरी संकेत होता कीं काय नकळे. कार्लाइलचें " फ्रेंच राज्यक्रांती " हें पुस्तक ज्याप्रमाणें अग्नीमुखीं पडून एकवार नामशेष झालें होतें त्याचप्रमाणें मुसलिनीच्या तत्वज्ञानाची गत झाली. " फ्रेंच राज्यक्रांती"च्या बाबतींत केवळ आकस्मिक अपघात घडून ग्रंथ जळाला. पण मुसलिनीच्या ग्रंथाला भस्मसात् करण्याला अनंग कारणीभूत झाला हें वाचून वाचकांस आश्चर्य वाटल्या शिवाय राहणार नाहीं. शंकराच्या तृतीय नेत्रोद्भव अग्नीनें एकदां मदनाला जाळून टाकिलें होतें. प्रस्तुत प्रसंगीं ज्ञानस्वरूप शंकराला जाळण्याचें श्रेय घेऊन मदनानें आपल्या मृत्यूचा सूड घेतला ! या प्रसंगाची हकीकत मनोरंजक असल्यामुळें ती खालीं दिली आहे.

मुसलिनीचें तेथील एका मुलीवर प्रेम बसलें होतें. परंतु तिला कांहीं कारणामुळें त्याच्याबद्दल संशय येऊन तिनें एके दिवशीं त्याचे कागदपत्र चाळण्यास सुरवात केली. त्यांतच तिच्या हातीं सदर इतिहास लागला. त्याचीं पानें ती चाळून पहात असतां, त्यांत तिला अनेक अपरिचित नांवें आढळून आलीं. झालें; तिच्या मनानें, तीं सर्व नावें कोणा स्त्रियांचीं असावींत असें घेतलें. प्रेमाची जागा आतां मत्सरानें पटकावली व तो "प्रेमपत्रव्यवहार" तिनें रागानें, जवळच जळत असलेल्या शेगडींत फेंकून दिला ! मुसलिनीच्या इतक्या दिवसांच्या श्रमांची एका क्षणांत राखरांगोळी होऊन गेली !

या ग्रंथाच्या योग्यायोग्यतेबद्दल कांहींच लिहितां येत नाहीं. परंतु मुसलिनीसारख्या सर्वस्वी कर्मप्रधान वृत्तिच्या माणसाचे तत्वज्ञानासारख्या वैश्या विषयांवरील विचार या दृष्टीनें त्या ग्रंथाचें महत्व अतिशय होतें. कार्लाइलनें आपला ग्रंथ पुनः लिहून जगाला ऋणी करून ठेविलें. मुसलिनीनेंहि आपला ग्रंथ पुनः लिहिला तर केवढी खळबळ उडून जाईल! परंतु ही गोष्ट, त्याला पुनः कारागृहवास किंवा देशांतर झाल्याशिवाय होणें, सध्यांतरी अशक्य वाटतें. आजकाल, इटालीच्या राज्यव्यवस्थेंत तो इतका गढून गेला आहे कीं, त्याला दुसऱ्या कोणत्याहि विषयाचा विचार करण्यास फुरसत नाहीं. सध्यांतरी जग त्या ग्रंथाला पारखें झालें आहे एवढी गोष्ट खरी.

बॅटिस्टीच्या पोपोलो पत्रांतून मुसलिनी लेख लिहीत असे असें मागें सांगितलेंच आहे. त्याची लेखणी सर्व साधारण रीत्या गंभीर विषयालाच अनुकूल असली तरी कादंबरी, काव्य, लघुकथा या सारख्या ललित वाङ्मयाला ती सर्वस्वी पराङ्गमुख नाहीं असें त्यानें त्यावेळीं

**ट्रेंट येथें**

" ला व्हिटा ट्रेंटिना " या पत्रांत वेळोवेळीं ज्या छोट्या गोष्टी आणि कादंबरी वजा नवलकथा लिहिल्या त्यांवरून दिसून येतें. लेखकाचा भावनाप्रधान तारुण्योत्साह आणि अनुभवाचा अभाव या गोष्टींतून स्पष्ट दिसून येतो, व कित्येक प्रसंगीं त्याच्या लेखन धाष्टर्याबद्दल थोडेसें हंसूंहि येतें. भीमानें गदा टाकून टिपरी घ्यावी तसें तें वाटतें. त्याच्या गोष्टी पैकीं " Cardinal's Love " या गोष्टीनें त्या काळीं बरेंच नांव मिळविलें होतें ही गोष्ट नमूद करणें जरूर आहे. " नायिकेला मारून टाकून वाढत जाणारी गोष्ट संपवून टाकावी असें मुसलिनीस पुष्कळवेळां वाटे. पण बॅटिस्टीच्या विनंतीला मान देऊन त्यानें तिला जिवंत ठेविलें होतें. अर्थातच अशा प्रसंगीं नायिकेसाठीं बिचाऱ्या दुय्यम दर्जाच्या पात्रांना मात्र मरावें लागे," असे विनोदपूर्ण उद्गार सर्फाटीबाईनीं या गोष्टी-विषयीं काढले आहेत. असो.

ट्रेंट येथील वास्तव्य बुद्धिविकासाच्या दृष्टीनें मुसलिनीस अतिशय उपयोगी पडलें. त्याची बुद्धि विशाल आहे तशीच त्याची वृत्ती तडफदार आहे. विशालबुद्धीला तडफदार वृत्तीची जोड मिळाली ह्मणजे कर्तबगार माणूस कसा पुढें येतो हें पुढील प्रकरणांत पहावयास मिळेल. ट्रेंट येथील मुसलिनीच्या अनुभवाचा इति-हासहि त्या प्रकरणांतच दिला आहे. त्यांवरून तेथील वास्तव्य त्याच्या ध्येयांना निश्चितता आणि विचारांना स्थिरता आणण्याचे कामीं कसें उप-योगीं पडलें त्याचाहि उलगडा होईल.

# प्रकरण १४ वें

# आस्ट्रियांतून हकालपट्टी.

**फुलतो अग्नि हलवितां नाग डिवचितां फडा उभारीतो ।**
**बहुधा निजतेजाला संतापानेंच कोणीहि चढतो ॥**

**—महाराष्ट्र शाकुंतल.**

If it gives us deep grief, to him it brings honour, if for us it is a great loss, for him it is a triumph.

—*Battesti.*

तेजस्वी व्यक्तींचे अधिकारी वर्गांशीं खटके उडण्यांतच राष्ट्राची तयारी होत असते. लोकांचें विचारस्वातंत्र्य हिरावून घेण्याचा प्रयत्न होऊं लागला म्हणजे त्या देशांतील राज्यव्यवस्थेंत कोठेंना कोठें घाण वाढली आहे असें खास समजावें. विचार ही ईश्वरदत्त देणगी आहे. त्याचें स्फुटीकरण म्हणजे अंतःकरणांतील अत्युच्च ध्येयांची भाषा. तिची मुस्कटदाबी म्हणजे परमेश्वर शक्तीचीच मुस्कटदाबी होय. समर्याद रज्जूनें अमर्याद सागराला जखडूं पाहण्यासारखें तें हास्यास्पद असतें. पण अधिकारमदानें अंध झालेल्या राजसंस्थांना ही सूर्यप्रकाशा इतकी स्पष्ट असणारी गोष्ट दिसत नाहीं. इतिहासकालापासून तों आज घटकेपर्यंत, विचाराचें नियंत्रण करण्याचा प्रयत्न सारखा चालूं आहे. परंतु अद्यापी त्यांत कोणीहि यशस्वी झाल्याचें दिसून येत नाहीं. प्रल्हादाला कड्यावरून खालीं लोटलें, सॉक्रेटिसाला वीष दिलें, ख्रिस्ताला सुळावर चढविलें, गुरु गोविंदाची जिव्हा छाटली, संभाजी महाराजांना

लाल सांडसांनीं भाजून काढलें किंवा मॅक्स्विनचा अन्नाविणें प्राण घेतला, तरी त्या त्या विभूतींनीं उपदेशिलेलीं तत्त्वें मुसंडी मारून समाजांत पसरलींच पसरलीं. " Blood of the myrter is the seed of the Church " अशी इंग्रजींत एक म्हण आहे. तिची सत्यता जगाच्या इतिहासांत आजवर अनेकवेळां आली आहे. पण आस्ट्रियन नोकरशाहीला ती पटली नसावी असें मुसलिनीशीं तिचें त्याकाळीं जें वर्तन घडलें त्यांवरून दिसून येतें.

मागच्या प्रकरणांत सांगितल्याप्रमाणें मुसलिनीची नोकरी कामकरी संघाच्या कार्यवाहाची असल्यामुळें त्याला ठिकाठिकाणीं जाऊन वारंवार व्याख्यानें द्यावीं लागत. कामकरीसंघ ही संस्था कामकऱ्यांच्या हितसंबंधाचें रक्षण करणारी व सोशिआलिस्ट मतांची असल्यामुळें ती ऑस्ट्रियन नोकरशाहीला अप्रिय असली तर नवल नाहीं. मुसलिनीसारखा सेक्रेटरी मिळाल्यामुळें सदर संघ चांगलाच कार्यक्षम व जोमदार झाला व त्यामुळें तो अधिकाऱ्यांना जास्तच अप्रिय झाला. या सर्वांवर कळस करणारी गोष्ट ह्मणजे मुसलिनीनें बॅटिस्टीच्या 'पोपोलो' पत्रांतून आणि मासिकांतून इटालियन कामकऱ्यांचें चालविलेलें संघटन होय. इटालियन प्रजेला आस्ट्रियन सरकार वाटेल तसें वागवितांना पाहून मुसलिनीचा संताप होऊन जाई. परंतु अन्यायाचा प्रतिकार करण्याचें साधन जवळ कांहीं नसल्यामुळें त्याचा नाइलाज होत असे. त्यानें इटालियन प्रजेला तिच्या न्याय्य हक्कांची जाणिव करून देण्याचें ठरविलें व त्या अनुरोधानें त्यानें आपली जोमदार लेखणी चालविली. इटालियन लोकांनीं संघटन करून आपल्या न्याय्य हक्कांचें संरक्षण तर केलेंच पाहिजे परंतु त्यांनीं परत आपल्या प्रिय मातृभूमीला जाऊन मिळण्याचीहि धडपड केली पाहिजे

असा मुसलिनीच्या उपदेशाचा निष्कर्ष होता. जो इटालियन भाग त्यावेळीं ऑस्ट्रियन सत्तेखालीं होता त्यास Unredeemed Italy ह्मणजे 'परक्या सत्तेखालील इटाली,' 'परत मिळवावयाचा इटाली' 'किंवा पराधीन इटाली' असें संबोधण्यांत येत असे. खुद्द इटालींत सुद्धां ट्रेंट आदि प्रांत इटालीचे इटालीस मिळाले पाहिजेत या मताचे पुष्कळ लोक होते. आपलीच भाषा बोलणारे, आपल्याच संस्कृतिनें इटालीस बद्ध असलेले आपले बांधव परकीय सत्तेखालीं असलेले त्यांना पाहवत नव्हते. परंतु झाल्या गेल्या तहनाम्यापुढें त्यांचें त्या वेळीं कांहीं चालत नसे. तथापि त्यांनीं आपली चळवळ थोड्या फार प्रमाणांत सुरू ठेविली होती. मुसलिनीनेंहि याच स्वदेशाभिमानप्रधान चळवळीचा पुरस्कार केलेला पाहून अनेक इटालियन पत्रांनीं आणि मुत्सद्यांनीं त्यास पाठिंबा दिला. इतक्यांत त्याचा "The frontier of Italy must not be drawn at Ala" या मथळया खालीं एक झणझणीत लेख प्रसिद्ध झाला. त्यांतील विचारसरणी राजकारणी मुत्सद्दी मंडळांस पसंत पडली असती कीं नाहीं हा प्रश्न निराळा. परंतु ट्रेंट येथील इटालियन प्रजा व राष्ट्रीय पक्ष यांना ती पटणारी होती यांत शंका नाही. या लेखानें ऑस्ट्रियन सरकारला मुसलिनीचा अतिशय राग आला, व त्यास हद्दपार करण्याचें ठरलें. या वेळीं मुसलिनी विषयीं ऑस्ट्रियाचा राग किती अनावर झाला होता याचें गमक ह्मणजे त्याला उद्देशून एका जबाबदार अधिकाऱ्यानें This scondral of a Mussolini! असे काढलेले उद्गार होत. हाच 'स्कॉन्ड्रल' ह्मणजे 'पाजी' माणूस उद्यां इटालीचा सर्वाधिकारी होऊन आपल्या छातीवर बसेल ही गोष्ट त्या ऑस्ट्रियन अधिकाऱ्याला काय माहीत ?

## ऑस्ट्रियांतून हकालपट्टी

ऑस्ट्रियांतून निघतां निघतां जी एक मजेदार गोष्ट घडली ती या ठिकाणीं देण्यासारखी आहे. ती अशी:—

ट्रेंटहून आला येथें मुसलिनीस पाठविण्यांत आलें. त्याच्याबरोबर दोन शिपाई असून विशेष बंदोबस्तासाठीं त्यास हातकड्याहि घातल्या होत्या! ही मंडळी आला येथें येऊन पोहोंचली त्यावेळीं पोलिस-कचेरी बंद झाली होती ह्मणून मुसलिनीला कचेरी जवळच असलेल्या अधिकाऱ्याच्या खासगी बंगल्यांत नेण्यांत आलें. त्यावेळीं तेथील पोलिस-अधिकारी जेवावयास बसला होता. तेव्हां दार उघडण्यासाठीं त्याची बायको पुढें झाली. मुसलिनीला पाहतांच तिच्या मनांत अकारण स्नेहोद्भव होऊन तिनें त्याच्याबद्दल आपल्या यजमानापाशीं कांहीं रदबदली केली असावी असें वाटतें. कारण, त्याची आणि मुसलिनीची गांठ पडतांच त्यानें आपल्या पेशाप्रमाणें नारासिंह रूप धारण करण्याऐवजीं, एकाद्या अत्यंत सभ्य गृहस्थाप्रमाणें बोलण्यास सुरवात केली. "गाडी यावयाला अद्यापि ६ तास आहेत. तुह्माला त्या मुदतींत मी मोकळे सोडलें तर पळून जाण्याचा आपण प्रयत्न करणार नाहीं, असें तुम्ही मला वचन द्याल काय?" असा त्यानें मुसलिनीस अगदीं अनपेक्षित प्रश्न केला. ऑस्ट्रियन अधिकाऱ्याकडून मनाचा इतका उदारपणा क्वचित्च कोणाच्या वाट्यास येत असेल. मुसलिनीनें सदर अधिकाऱ्याचें आभार मानून त्यास तसें वचन दिलें. तात्काळ मुसलिनीस मोकळे करण्यांत आलें.

गाडी येण्यापूर्वीं अर्धापाऊणतास मुसलिनी परत स्टेशनवर आला. तेथें तो अधिकारी, किंचित चिंतातूर असा, प्लॅटफॉर्मवर येरझारा करीत होता. मुसलिनीस पाहतांच प्रणामदर्शक पद्धतीनें त्यानें आपली टोपी



बादशहा पांचवे जॉर्ज आणि मुसलिनी
हस्तांदोलन करीत आहेत.

किंचित् वर केली, व आपलें समाधान व्यक्त केलें. या गोष्टीचें मुसलिनीस अद्यापीहि स्मरण होतें. त्या ऑस्ट्रियन अधिकाऱ्याचा कृतज्ञतापूर्वक उल्लेख करितांना मुसलिनीला आनंद वाटत असल्यास नवल नाहीं.

मुसलिनीचा एकंदर रुबाब आणि शरीराची ठेवण मनावर परिणाम करणारी आहे. त्याचें तें विशाल भाल, खोल पण तेजस्वी डोळे आणि बुद्धिमत्तादर्शक मोठें नाक पाहून कोणाच्याहि मनांत मुसलिनीविषयीं एक प्रकारचा भीतियुक्त आदरभाव उत्पन्न होतो. त्याची दृष्टी इतकी भेदक असते कीं, तो तुमचे कडे पाहूं लागला ह्मणजे तुमच्या हृदयांचा जणूं ठावच घेत आहे असा तुम्हांस भास व्हावा. आपल्या मनांतील अत्यंत गूढ भावसुद्धां त्याला समजत असावेत अशी तुम्हास क्षणभर भीतीसुद्धां वाटेल इतकी त्याची दृष्टी तीव्र आणि भेदक आहे. तो शरीरानें उंच आणि कांहींसा धिप्पाड असमुळें पाहणाराच्या मनांत त्याच्याविषयीं आदरवृत्तीच निर्माण झाली पाहिजे अशी निसर्गानें त्याला देणगी दिली आहे. १९२५ सालीं इंग्लंडचे राजेसाहेब इटालींत गेले होते. त्यावेळीं त्यांची व मुसलिनीची भेट झाली. तो प्रसंग या पुस्तकांत चित्ररूपानें दिला आहे. त्यांवरून आम्ही त्याच्या स्वरूपाचें जें वर्णन केलें आहे त्याची सत्यता वाचकांस पटेल. असो.

इटालींत परत येतांच मुसलिनींनें "The Trentino seen by a Socialist" म्हणजे "एका सोशिआलिस्टाचे ट्रेंटिनो येथील अनुभव" नांवाचें एक लहानसें चोपडें लिहून प्रसिद्ध केलें. या पुस्तकांत त्यानें ट्रेंटिनो मधील लोकांचे विचार आपल्या परिणामकारक आणि गंभीर भाषेंत प्रकट केलें आहेत. इटालीचा ट्रेंटिनोसारखा भाग तिचा तिला परत

मिळाल्या शिवाय यूरोपला खरी शांतता मिळणें कठिण आहे व तो परत मिळविण्याचा प्रयत्न करणें हें इटालियन लोकांचें कर्तव्य आहे अशी विचार सरणी त्यांत प्रतिपादिली आहे. पॅन जरमॅनिझमच्या तत्त्वांवर सदर पुस्तकांत कडक टीका केली असून इटालियन राष्ट्राचा स्वभाव आणि शील यांची प्रशंसा केली आहे.

या पुस्तकांत मुसलिनीनें जर्मनीच्या अघोर साम्राज्यतृष्णेचा जसा निषेध केला आहे तसाच ट्रेंटिनो मधील इटालियन प्रजेच्या आळशी आणि निष्क्रीय आयुष्य क्रमाबद्दल अत्यंत तीव्र भाषेंत तिरस्कार व्यक्त केला आहे. विशेषतः तेथील श्रीमान वर्गाची स्वदेशाभिमान शून्य नादानपणाची विचार सरणी पाहून तर मुसलिनीचें अंतःकरण शतधा विदीर्ण होत असल्याचें या पुस्तकावरून दिसून येते तेथील इटालियन समाजानें काय वाटेल तें करून आपली मातृभाषा जिवंत ठेवण्याचा प्रयत्न करावा असा त्यानें त्यांना उपदेश केला आहे. राष्ट्रियत्व आणि भाषा यांचा अत्यंत जिव्हाळ्याचा संबंध आहे अशी मुसलिनीची दृढ समजूत आहे.

वाङ्मयाच्या जिवंतपणावर राष्ट्राचें जिवंतपण अनुमानितां येतें. कोणत्याहि देशांतील जागृतीच्या मूळाशीं तद्देशीय भाषेचा उत्कर्षच असतो. श्री शिवाजी महाराजांनीं स्वराज्य संस्थापनेची कोणशिला बसविली त्याकाळीं महाराष्ट्रभर श्रीरामदासांचा दासबोध लोकांना स्वधर्माची आणि स्वदेश कर्तव्याची जाणीव करून. देत होता. श्री तुकोबांनीं पंढरीच्या वारकरी पंथाला आपल्या अनुपमेय अभंग वाणीनें नवें तेज आणून अप्रत्यक्षरीत्या जातिभेद नष्ट करण्यास सुरवात केली होती. त्यांच्यापूर्वी एकनाथ, मुक्ताबाई, जनाबाई व त्यांच्याहि पूर्वी श्री ज्ञानेश्वर महाराजानीं आपल्या

अतूलनीय वाणीनें महाराष्ट्रभाषेला उत्कर्षाच्या अत्युच्च पदवीला नेऊन सोडलें होतें. महाराष्ट्राच्या उत्कर्षाला श्री शिवाजीमहाराजांची मर्दानी मुत्सद्देगिरी जितकी कारणीभूत झाली तितकीच संतांची महाराष्ट्रभाषा उत्कर्षाची चळवळहि कारणीभूत झाली असली पाहिजे.

हिंदुस्थानच्या प्रस्तुत जागृतीचा विचार केला तरीसुद्धां तिच्या मूळाशीं स्वभाषा उत्कर्षाची चळवळच असल्याचें दिसून येईल. महाराष्ट्रांत विष्णुशास्त्री चिपळूणकर, बंगाल्यांत बंकीमचंद्र चटोपाध्याय आणि पंजाबांत स्वामी दयानंद यांनीं जी वाङ्मयसेवा केली व तदनुरोधानें त्यांचे हातून जी स्वभाषा उत्कर्षाची चळवळ झाली तीच आजच्या जागृतीचें मूळ आहे. यापुढें जाऊन, कोणत्याहि देशाचा उत्कर्ष त्याच्या वाङ्मयावर अवलंबून असतो असें सर्व साधारण विधान केल्यास तें चुकीचें होईल असें वाटत नाहीं. असो. मुसलिनीसारख्या कुशाग्र बुद्धीच्या माणसाच्या स्वदेश आणि स्वभाषा यांचा अन्योन्य सापेक्ष संबंध लक्षांत आला असल्यास नवल नाहीं. आणि म्हणूनच त्यानें ट्रेंटिनोमधील आपल्या इटालियन बांधवांना स्वभाषेची विस्मृति पडूं न देण्याबद्दल कळकळीची विनंति केली आहे.

अनेक लोकांनीं मुसलिनीला त्याच्या परस्पर विरोधी मतांबद्दल दोष दिला आहे. त्याच्या लेखांचें आणि भाषणांचें केवळ वरवरच अवलोकन केलें तर तीं परस्पर विरोधी उद्गारांनीं भरून गेलीं आहेत असें दिसतें. परंतु जरा सूक्ष्म दृष्टीनें पाहिल्यास कोणालाहि एक गोष्ट त्यांत स्पष्ट दिसून येईल ती म्हणजे त्याचा ज्वलत् देशाभिमान. ज्या काळचा सध्यां आपण विचार करीत आहों त्याकाळीं मुसलिनी स्वतःला कट्टर सोशिआलिस्ट म्हणवीत असे. परंतु त्याच्या आणि इतरांच्या सोशिआलिझममध्यें तत्वतःच

**आस्ट्रियांतून हकालपट्टी**

मोठा फरक होता. इटालींतील इतर सोशिआलिस्ट लोकांना स्वदेशाभिमानाचें जवळ जवळ वावडें होतें. त्यांचा सोशिआलिझम विश्वबंधुत्वाच्या विशाल कल्पनेवर उभारला होता तर मुसलिनीचा सोशिआलिझम स्वदेशभक्तीवर अधिष्ठित झाला होता. १९०० ते १९१० या कालांत विश्वबंधुत्व–प्रधान सोशिआलिझमचा विलक्षण बोलबाला चालला होता. त्याकाळीं कोणाहि सुशिक्षिताला स्वतःला सोशिआलिस्ट म्हणवून घेण्यांत एकप्रकारचा अभिमान वाटे. कोणत्याहि नव्या मताला कांहीं दिवस त्याच्या नाविन्यामुळें महत्त्व येत असतें. त्याकाळीं जो तो स्वतःला त्या मताचा अनुयायी म्हणवून घेत असतो. याचा अर्थ तें मत त्याला सर्वस्वी पटलेलेंच असतें असें नाहीं. तथापि आपल्या प्रगल्भ आणि उदार वृत्तीचें प्रदर्शन करण्यास त्या मताचा पुरस्कार करणें उपयोगीं पडत असल्यामुळेंच कोणीहि तसें करतो. "That general approval of a new doctrine goes to show the mental attitude of the public and nothing more" मुसलिनी त्याकाळीं स्वतःला सोशिआलिस्ट म्हणवीत असे, याचा अर्थ तरी तोच. कोणतीहि व्यक्ती केवढीहि मोठी असली, स्वतंत्र विचाराची असली, तरी तिच्यावर आजूबाजूच्या परिस्थितीचा आणि प्रचलित विचारांचा परिणाम होणें अगदीं अपरिहार्य असतें.

मुसलिनीच्या विचारांचा विकास कसकसा होत गेला याचा विचार करतांना " ट्रेंटिनोमधील एका सोशिआलिस्टाचे अनुभव " हें चोपडें अतिशय महत्वाचें ठरेल. त्यांत त्याचा सोशिअलिझम पहिल्यापासूनच राष्ट्रीय आकांक्षांनीं कसा बद्ध होता याचें उत्कृष्ट ज्ञान होतें. विश्वबंधुत्वाच्या नांवाखालीं स्वदेशाचें नुकसान झालेलें त्यास पसंत नव्हतें. मुसलिनीच्या सोशिआलिस्ट विचारांना राष्ट्रीय स्वरूप येण्यास ट्रेंट येथील वास्तव्य बरेंच

कारणीभूत झालें. आंतरराष्ट्रीयसमतेच्या तत्वावर मजुरवर्गाची संघटना करण्याचा कितीहि प्रयत्न झाला तरी प्रत्येक मजुराला स्वदेशाचा स्वतंत्र अभिमान हा राहणारच ही मनुष्यस्वभावाची गुरुकिल्ली मुसलिनीनें २० वर्षांपूर्वींच ओळखिली होती. महायुद्धाला सुरवात होतांच बेल्जियन् मजुरांनीं एक दिलानें आपल्या सरकारास मदत करण्याचें ठरविलें व फ्रेंच मजुरांनींहि आपल्या मायदेशासाठीं रक्त सांडण्यास कमी केलें नाहीं या दोन्ही उदाहरणावरून मुसलिनीची विचारसरणीच कशी बरोबर होती तें दिसून येईल.

ऑस्ट्रियन सरकारनें मुसलिनीस हद्दपार करून कांहीं मिळविलें नाहीं. पण त्यामुळें त्याची मात्र प्रसिद्धी झाली. मुसलिनीचें अंतःकरण आस्ट्रियाविरुद्ध आधींच जळत होतें त्यांत, हद्दपारीचें तेल पडून त्याच्या ज्वाळा जास्तच भडकण्यास मदत झाली. मार्गांत येणाऱ्या अडथळ्यांनीं आणि संकटांनींच कोणतीहि चळवळ वाढत असते. मुसलिनीच्या ट्रेंट येथिल चळवळीला ऑस्ट्रियानें विरोध करून एकप्रकारें त्यास उपकृतच केलें. कारण त्याच्या हद्दपारीनें इटालीच्या 'पराधीन प्रदेशाचा' प्रश्न जास्तच प्रामुख्यानें इटालीपुढें आला. हा प्रदेश परत इटालीच्या आधिराज्याखालीं आणण्याची मुसलिनीनें त्याकाळीं प्रतिज्ञा केली व ती त्यानें यथाकाल पुरीहि केली. त्या विषयीं सविस्तर वर्णन पुढें ओघानें येईलच.

## प्रकरण १५ वें

# नवें पत्र—'क्लास वॉर.'

" Let me make a newspaper & I care not who makes the religion or the laws "

—*Wendell Phillips.*

गेल्या प्रकरणांत सांगितल्याप्रमाणें मुसलिनी परत इटालीस आला. यावेळपावेतों वर्तमानपत्रकार, लेखक, वक्ता आणि राजकीय चळवळ्या म्हणून त्याची इटालींत चांगलीच प्रसिद्धी झाली होती. आतां त्याला आत्मविश्वासहि वाटूं लागला होता. परत स्वदेशीं येतांच, सोशिआलिस्ट पक्षाला आलेलें मालिन्य नाहींसें करून त्यांत नवजीवन उत्पन्न करण्याचें त्यानें ठरविलें.

ते दिवस १९१० सालचे होते. समाज-सत्तावादी लोकांची दिवसें दिवस सरशी होत होती. तरी त्यांच्या पुढारी वर्गांत कार्याविषयीं औदासीन्य पसरलें असून एक प्रकारचा निष्क्रीय मिजासखोरपणा वाढला होता. म्हातारपणामुळें व्यक्तीच्या ठिकाणीं जसें शैथिल्य येतें तद्वतच त्या काळच्या समाजसत्तावादी पक्षाची स्थिती झाली होती. मुसलिनीला अर्थातच ही स्थिती आवडणें शक्य नव्हतें. त्याच्या प्रखर भावना प्रधान वीरवृत्तीला समाजसत्तावादाच्या नांवाखालीं चाललेला खेळखंडोबा असह्य वाटला. त्यानें कार्याला लागण्याचें ठरवून La Lotta classe म्हणजे 'क्लास वार' नांवाचें साप्ताहिक सुरूं केलें. फोर्लीच्या

स्थानिक सोशिआलिस्ट असोसिएशनचा तो यावेळीं कार्यवाह झाला. या जागेचे त्यास दरमहा १२० लीरा म्हणजे ८०।९० रुपये मिळत त्यावर सर्व कुटुंबासह तो आपला उदरनिर्वाह करीत असे. हें उत्पन्न वास्तविक कांहींच नव्हतें. परंतु तेवढ्याच आधारावर मुसलिनीनें आपल्या नव्या पत्राची उभारणी केली. पत्राची विक्री झाल्यास नफा व्हावयाचा नाहीं पेक्षां पदरचेच पैसे गमाविण्याचा प्रसंग ! असें असतांहि ध्येयबुद्धीनें त्यानें या पत्राची स्थापना केली; व जोरानें कार्यास प्रारंभ केला.

१९१० च्या जानेवारी महिन्यांत या पत्राचा पहिला अंक बाहेर पडला. मोडक्या तोडक्या छापखान्यांत कसेंतरी छापून हें पत्र निघत असे. परंतु मुसलिनीचा जोम आणि आवेश पाहिला ह्मणजे या,—त्यावेळीं केवळ २८ वर्षें वयाच्या—तरुण संपादकाचें कौतुक करावेंसें वाटतें. लो. टिळकांनीं केसरी सुरूं केला त्यावेळीं त्याची जी स्थिती होती तीच "क्लास वॉर"ची या वेळीं होती. परंतु या दोन्ही पत्रांच्या मागें दुर्दमनीय आत्मविश्वास उभा असल्यामुळें अत्यंत प्रतिकूल परिस्थिती असूनहि परिणामीं त्यांना एवढें श्रेष्ठ स्थान प्राप्त झालें.

मुसलिनीला आपल्या भोंवतालची निरुत्साहि परिस्थिती पाहून अनेक वेळां निराशा वाटे. परंतु स्वीकृत कार्यावरील त्याची निष्ठा अढळ असल्यामुळें ही निराशेची छटा त्याचें मनावर फार काळ रहात नसे. क्लास वॉरच्या एका अंकांत त्यानें खालील उद्गार काढिले आहेत. तो म्हणतो, " ध्येयाचें नांव निघतांच आजकाल लोक नाकें मुरडूं लागतात. ध्येयाबद्दल कुणाला आस्था आहे ? जर कोणी स्वतःला ध्येयवादी ह्मणवून घेतलेंच तर लोक त्याची गणना मूर्खांत किंवा वेड्यांत करतात. असें आहे

तरी ' आह्मी स्वतःमात्र अशाच वेड्यापिरापैकीं एक आहों ' असें सांगण्यास आह्मास बिलकुल लाज वाटत नाहीं. " या उद्गारावरून त्यावेळीं मुसलिनीच्या मनाची कशी तळमळ होत होती त्याची बरोबर कल्पना होते. हा उत्साही कार्यवाह दर आठवड्यास कांहींतरी झणझणित लिहून सोशिआलिस्ट पक्षाच्या पुढाऱ्यांना जागे आणि कार्यप्रवण करण्याचा प्रयत्न करीत होता.

मुसलिनीचा आणि इतर सोशिआलिस्टांचा मुख्य मतभेद समाजसत्तावादाच्या ध्येयाविषयीं होता. इटालींतील त्या काळच्या सर्वसाधारण समाजसत्तावाद्याला सोशिआलिझम ह्मणजे केवळ भौतिक सुखाचें साधन वाटत असे. ' पोट कसें भरेल ' हा प्रश्न सोडविण्यास सोशिआलिझमचा उपयोग होतो ह्मणून ते लोक सोशिआलिस्ट होत असत याच्या उलट मुसलिनीची दृष्टी होती. त्याला सोशिआलिझम् ह्मणजे कांही विशिष्ट ध्येय आणि उदात्त उद्दिष्ट वाटत असे. त्याला सोशिआलिझमच्या तत्त्वांत आत्मिक उन्नती आणि उच्च मानवविकास दिसत होता. विश्वबंधुत्वाचें निशाण सोशिआलिझमनें उभारलें आहे, तें आपण मलिन होऊं देतां कामा नये अशी मुसलिनीची प्रामाणिक समजुत होती. मुसलिनीला स्वदेश-प्रेम आणि सोशिआलिझम यांतलि भेद नाहींसा करावयाचा होता. अशा स्थितींत, दोन्ही पक्षांनीं एकमेकांवर हल्ले प्रतिहल्ले करावे यांत नवल काय ? परंतु आस्ते आस्ते मुसलिनीच्या लेखनाचा परिणाम होऊं लागला. " अव्हान्टी " पत्र सोशिआलिस्ट पक्षाचें मुखपत्र होतें, त्यांत मधून मधून मुसलिनीच्या विचारसरणीचा कधीं अनुवाद तर कधीं प्रतिवाद केला जाऊं लागला.

अनाटोली फ्रान्स या सुविख्यात फ्रेंच ग्रंथकाराला कोणी विचारिलें कीं, "तुम्हांला लेखन कलेंत एवढें अभूतपूर्व यश आलें त्याची गुरुकिल्ली काय आहे ? " त्यांवर त्यानें उत्तर दिलें, "याचें कारण, मी जें लिहितों तें अगदीं अंतःकरणापासून लिहितों. अंतःकरणपूर्वकता आणि कळकळ या शिवाय माझ्या लेखनांत तुम्हाला दुसरें कांहीं मिळणार नाहीं. आणि यांतच माझ्या यशाचें बीज आहे. "

मुसलिनीची लेखन शैलीहि बरोबर याच मासल्याची आहे. त्याला ज्या वेळीं जें वाटेल तें, अत्यंत सडेतोड आणि बेर्भीकपणानें लिहिण्यांत त्याचा हातखंडा आहे. मुसलिनीनें क्लास वॉरमध्यें खुशाल चेंडू सोशिआलिस्टांचे असे वाभाडे काढण्यास सुरवात केली कीं, थोड्याच काळांत त्यांना त्यानें सळो कीं पळो करून सोडलें. त्या निष्क्रीय सोशिआलिस्टांचें वर्णन करितांना तो त्यांना "इटालीच्या राजकीय रंगभूमीवर चाललेल्या नाटकांतील प्रेताची" किंवा "दिवाळखोर बनलेल्या व्यापारी मंडळीची" उपमा देत असे. या दिवाळखोर कंपनीला आपलें हें वर्णन पसंत पडणें शक्य नव्हतें. तिनें उलट मुसलिनीस 'लुच्चा चोर,' 'वेडा पीर' 'हलकट,' 'पाजी,' आणि "किळसवाणा बांडगुळ" म्हणून शेलक्या पदव्यांचा प्रत्याहार करणें स्वाभाविक होतें. असे अनेक प्रसंग त्याकाळीं नमूद आहेत. १९१० ते १९१२ साल अखेर ही शाब्दिक लढाई मोठ्या जोरांत चालली होती.

त्या वेळच्या त्याच्या लेखांचा अभ्यास केल्यास असें दिसून येतें कीं समाजसत्तावाद्यांचा आद्य गुरू जो कार्ल मार्क्स त्याची शिकवणसुद्धां मुसलिनीस फारशी पसंत नव्हती. केवळ भौतिक अभ्युदयाच्या आणि भरभराटीच्या दृष्टीनेंच कामकरी वर्गाच्या हक्कांचें संरक्षण करणें, व त्यांना

आत्मिक उन्नतीची विश्वबंधुत्वाची आणि समतेची ओळख करून न देणें, ह्मणजे शरिराच्या एका अंगाची वाढ करून दुसरें अंग कृश ठेवण्यासारखेंच हास्यास्पद आहे असें त्याचें मत होतें. प्रत्येक व्यक्तीला पोटभर अन्न व अंगभर वस्त्रमिळालेंच पाहिजे याबद्दल कोणाचाच मतभेद नाहीं. परंतु अन्नवस्त्र एवढेंच ध्येय ठेऊन त्या काळचे इटालींतील समाजसत्तावादी पुढारी वागत होते तें मुसलिनीस पटत नसे. त्याची वृत्ती या बाबतींत कांहीं अंशीं रस्किन कार्लाइल प्रमाणें ध्येयवादी होती. समाजांत निर्भेळ समता नांदण्याचें उद्दिष्ट कितीहि उदात्त असलें तरी समाजाच्या जीवितास तें कितपत उपयोगी पडेल या विषयीं त्याचें मन साशंक होतें. संपत्ती--उत्पादन वर्गाचें, कामकरी लोकांचें, जीवित कष्टमय असतें याची त्यास तीव्र जाणिव होती. परंतु तें सुधारण्यास, समाजांतील संपत्तिमान वर्ग नष्ट करणें हा उपाय नव्हे असें त्याचें मत होतें. एवढेंच नव्हे तर कॅपिटॅलिस्ट किंवा भांडवलवाला वर्ग समाजांत जरूर पाहिजे असेंहि त्यानें प्रतिपादिलें आहे. याचा अर्थ तो कॅपिटॅलिस्ट वर्गाचा पुरस्कर्ता होता असा नाहीं. उलट या वर्गावर तत्कालीन कोणत्याहि समाजसत्तावाद्यांपेक्षां जास्त कडक टीका मुसलिनीनेंच केली होती. परंतु ती टीका, तो वर्ग नामशेष करण्यासाठीं नसून त्या वर्गाला त्याच्या जबाबदाऱ्या समजावून देण्यासाठींच होती, ही गोष्ट लक्षांत ठेवणें जरूर आहे. "डायरेक्ट ॲक्शन–" प्रत्यक्ष शारीरिक प्रतिकार–करून शक्य असल्यास राज्यक्रांती करावी असेंहि प्रतिपादन करण्यास त्यानें कमी केलेलें नाहीं.

१९१२ सालीं रेगिओ एमीलिया येथें सोशिआलिस्ट परिषद भरली होती. मुसलिनीनें आपलीं उपरी निर्दिष्ट मतें तेथें उघड उघड रीतीनें

बोलून दाखविली. एवढेंच नव्हे तर बुढ्या बुढ्या पुढाऱ्यांना "डायरेक्ट ॲक्शन" साठीं आव्हान करून त्यांची फजीती करण्यासहि त्यानें कमी केलें नाहीं. या चढाओढीच्या सामन्यांत मुसलिनीच्या उत्साही तारुण्याचा विजय झाला व 'अव्हान्टी' पत्र त्याच्या कबजांत आलें. या परिषदेंत त्याला त्याच्या कल्पनेबाहेर यश आलें. सभेस जमलेल्या प्रतिनिधींपैकीं फारच थोड्या लोकांना मुसलिनिची ओळख होती. असें असूनहि त्यानें जुन्या मताच्या सोशिआलिस्टावर विजय मिळविला. याचें मुख्य कारण त्याची विलक्षण वक्तृत्त्वशैली व विचार मांडण्याची सर्वस्वी अभिनवपद्धति हें होय. या परिषदेंत त्यानें वक्तृत्वाचा नुसता पाऊस पाडला. इटालीचा तरूण वर्ग या भावना प्रधान वक्त्यानें हां हां म्हणतां सर्वस्वी आपला करून टाकला. केवळ वक्तृत्वगुणावर एवढा मोठा विजय मिळविल्याचें दुसरें उदाहरण क्वचितच दिसून येईल ! सोशिआलिस्ट पक्षाचें अधिकृत मुखपत्र अव्हान्टी हातीं येतांच मुसलिनिस अतिशय आनंद झाला व उत्साहाच्या भरांत त्यानें त्या पत्राचें जुनें स्वरूप पार बदलून टाकलें.

याकाळीं त्याचा उत्साह दुथडी वाहत होता. त्यानें डायरेक्ट अक्शनचें तत्व प्रत्यक्ष व्यवहारांत आणून दाखविण्याचें ठरविलें. तो प्रसंग असाः—फोर्ली येथें दुधाचा अतिशय तुटवडा पडून त्याची किंमत बेसुमार वाढली. गोरगरिबांनाच काय पण मध्यम स्थितींतील लोकांना सुद्धां दुधासारखा अत्यावश्यक पदार्थ दुर्मीळ झाला. लहान मुलांचे दुधाविना हाल होऊं लागले. दुधाच्या प्रश्नाचा विचार करण्यासाठीं नागरिकांची सभा भरली. परंतु अर्थशास्त्रांतील "मागणी आणि पुरवठा" या तत्वाचा अनुवाद करून बहुतेक वक्त्यांनीं निराशा व्यक्त करण्यापलिकडे कांहींच

केलें नाहीं. मुसलिनीला अर्थशास्त्राच्या या नियमाची पुरी ओळख होती, त्याचप्रमाणें दुधाच्या व्यापारांतील नफेबाजीहि त्याच्या परिचयाची होती. फ्लोरेंसचा मेयरच दुधाच्या व्यापारांत असल्यामुळें दूध बेसुमार चढलें होतें. अर्थातच केवळ शास्त्रीय आणि तात्विक वादविवादानें हा प्रश्न समाधानकारक रीतीनें सुटणें अशक्य होतें. अनेक वक्त्यांचीं मामुली पद्धतीचीं भाषणें झाल्यावर मुसलिनी धूमकेतू प्रमाणें अवचित व्यास पीठावर उभा राहिला व त्यानें आपलें मत जाहीर केलें. मत जाहीर केलें असें म्हणण्याचें कारण त्यानें भाषणाचा आव मुळींच आणला नाहीं। सरकार आपलें वटहुकुम प्रसिद्ध करतें तसा हा मुसलिनीचा आडदांड वटहुकूम होता. " आबाल वृद्धांना, आजारीं मुलांना आणि म्हाताऱ्याकोताऱ्यांना दूध ही अत्यंत जरुरीची वस्तू असल्यामुळें ती प्रत्येकाला घेतां आली पाहिजे. याविषयीं यापुढें निष्कारण उहापोह करण्याचें कारण नाहीं. चला; माझ्या-बरोबर या. " असें म्हणून मुसलिनी तीरासारखा निघाला.

क्षणार्धांत मुसलिनीची स्वारी मेयरच्या टेबलावर हात आपटीत उभी राहिली. सदर सभा तशीच महत्वाची असल्यामुळें बंदोबस्ता-साठीं सैन्यहि आणण्यांत आलें होतें. पण मुसलिनीचा तो आवेश पाहून त्याला आडविण्याचें कोणासहि धैर्य झालें नाहीं. हजारों लोक टाऊन-हॉलच्या बाहेर आश्चर्यानें आ पसरून मुसलिनीची वाट पहात उभे होते. मुसलिनीनें मेयरला बजावलें कीं, दुधाची किंमत तात्काळ उतरण्याची व्यवस्था न झाल्यास त्याची आणि त्याच्यासह इतर सभासदांचीहि गठडी वळून खिडकींतून त्यांना खालीं फेकून देण्यांत येईल. मुसलिनी आणि त्याचे साथीदार यांचा तो भयंकर आवेश पाहून मेयरनें मुकाट्यानें त्यांच्या

ह्मणण्यास रुकार दिला! अशारीतीनें मुसलिनीनें डायरेक्ट ॲक्शनच्या अभिनव अस्त्राचा उपक्रम करून तो यशस्वी करून दाखविला. बाहेर येतांच जनतेनें त्याचा प्रचंड जयजयकार करून सन्मान केला. "मागणी आणि पुरवठ्याचें" अर्थशास्त्र त्या जयजयकारांत कुठें उडून गेलें कोणास माहित! अर्थशास्त्र समाजाठीं आहे, समाज अर्थशास्त्रासाठीं नाहीं ही गोष्ट मुसलिनीनें फोर्ली येथें सिद्ध केली.

आमच्याइकडील राजकीय पुढाऱ्यांनीं वरील गोष्टींचा जरूर विचार करावा. एका पक्षाला कौंसिलांत जाण्यांतच मोक्ष वाटतो तर दुसऱ्याला त्यावर बहिष्कार घालण्यांतच हिंदुस्थानचें अंतिम हित वाटतें. कॉंग्रेसच्या मॅंडेटच्या नांवाखालीं हिंदी राजकारणाची जेवढी हानी झाली आहे तेवढी सरकारच्या अरेरावी वटहुकुमांनीं तरी झाली असेल कीं नाहीं कोण जाणे! कॉंग्रेस ही लोकांनीं स्थापिलेली संस्था आहे म्हणजे ती लोकांची नोकर आहे. पण एककाळ असा येऊन गेला कीं या नोकरानें मालकावरच अधिकार गाजविला. सेव्यसेवक भाव नाहींसा होऊन सेवकानें धुमाकूळ घालण्यास सुरवात केली. राजकारणांत तत्वांना किती मान द्यावयाचा व तपशिलाला किती द्यावयाचा त्याला प्रमाण आहे. केवळ तत्वाच्या शुष्क पायावरच मुसलिनी उभा राहिला असता तर फोर्लीच्या नागरिकांची दुधाच्या अभावीं आधींच सुकलेलीं तोंडें आणखीं सुकली असतीं. पण तसें न करितां, त्यानें तपशिलाचा ओलावा उत्पन्न करून नागरिकांना भरपूर दूध दिलें आणि जिवंत राजकारण कसें असतें याचा अनुभव जगास आणून दिला.

वर्ष दीड वर्षाच्या अवधींतच मुसलिनीच्या क्लास वॉर पत्राची गणना इटालींतील प्रमुख वर्तमान पत्रांत होऊं लागली. मुसलिनी आळशी सोशि-

आलिस्ट पुढाऱ्यांवर जशी आग पाखडे त्याचप्रमाणें संधी आली तर सरकारच्या धोरणालाहि कसून विरोध करी. १९११ सालचे सप्टेंबर महिन्याचे ते दिवस होते. त्या वेळच्या इटालीच्या मुख्य प्रधानानें, सिनॉर-गिओलिटी यानें लिबिया सर करण्यासाठीं ट्रिपोलीस सैन्य उतरविलें. सरकार व लोकपक्ष यांचें एकमत न झाल्यामुळें सरकारवर चोहोंकडून टीकेचा मारा सुरू झाला सोशिआलिस्ट पक्षानें तर तत्त्वतःच या मोहिमेला हरकत घेतली. मुसलिनींनेंहि सरकारी धोरणास विरोधच केला. परंतु तो वृत्तांत बराच मनोरंजक असल्यामुळें तो पुढच्या प्रकरणांत दिला आहे.

# प्रकरण १६ वें.

## "मनोराज्य"

Nature magically suits the man to his fortunes by making them the fruit of his character.

—*Emerson.*

असामान्य व्यक्ती बुद्धीनेंच केवळ श्रेष्ठ असतात असें नव्हे तर त्यांचा उरकहि तसाच दांडगा असतो. "दांडगेश्वरपणा" हा शब्द आपण आडदांडपणाला समानार्थी म्हणून वापरतो. पण त्याचा मूळ अर्थानें उपयोग केला तर त्यांतील आडदांडपणा नष्ट होईल असें वाटतें. आणि त्या अर्थानें लोकविलक्षण व्यक्ति कमी अधिक प्रमाणांत दांडगेश्वरच असतात यांत शंका नाहीं. लो० टिळक, नेपोलियन, अमेरिकन कोट्याधिश फोर्ड किंवा कै० विश्वनाथ काशिनाथ राजवाडे यांचा व्याप पाहिला म्हणजे मन आश्चर्यानें थक्क होऊन जातें. त्यांना एकाच वेळीं अनेक गोष्टी करितां येतात याचें कारण त्यांच्या अलौकिक बुद्धीला उरक शक्तीची जोड असतें हेंच होय. समयज्ञ बुद्धि आणि प्रचंड उरक शक्ती यांच्या जोरावर लोकविलक्षण व्यक्ती शेतकऱ्याच्या खोपट्याचा भव्य प्रासाद बनवितात आणि मोगल शाहीसारख्या बद्ध मूल झालेल्या वैभवशाली साम्राज्याच्या ठिकऱ्या ठिकऱ्या उडवून तें नामशेष करितात.

"मनोराज्य"

मुसलिनीची उरकशक्ती एवढी दांडगी आहे कीं, एकाचवेळीं अनेक गोष्टी करूनहि ती खंडित होत नाहीं. एकीकडे अव्हान्टीसारखें दैनिक पत्र चालववयाचें दुसरीकडे क्लासवार पत्रांत लिहावयाचें व तिसरीकडे सार्वजनिक चळवळ करीत असतां प्रसंग विशेषीं कारावासाची हवाहि खाऊन यावयाचें असा विविधस्वरूपाचा त्याचा कार्यक्रम त्याकाळीं सुरू होता. तथापी त्याच गर्दींत "युटोपिया" म्हणजे "मनोराज्य" नांवाचें मासिक काढण्याचें मुसलिनी ठरविलें एवढेंच नव्हे तर त्याप्रमाणें तें लौकरच सुरूंहि केलें!

या मासिकाची वर्गणी १० लीरा होती. कोणी वर्गणी भरून पावती मागूं लागला कीं मुसलिनीस चमत्कारिक वाटे. तो क्वचित् चिडूनहि जाई. "पावतीचा हा काय त्रास आहे?–माझ्या जवळ तर पावती पुस्तकेंहि नाहींत. हें मासिक कांहीं कोणा कंपनीचें नाहीं कीं तेथें नोकरशाही चालेल. त्याच्या लेखनापासून तों तें छापून प्रसिद्ध होईपर्यंत सर्व गोष्टी मी जातीनें पहाणार आहे. मग तुम्ही उगीच पावतीची एवढी काळजी कां करितां?" असें बोलूनहि मुसलिनी पावती देण्यास चुकत नसे ही गोष्ट नमूद करणें जरूर आहे.

स्वतःच्या बुद्धि सामर्थ्यावर आणि कर्तृत्वशक्तीवर असामान्य विश्वास असल्याशिवाय मोठ मोठीं कार्यें तडीस जात नसतात. विभूतिव्यक्तींच्या ठिकाणीं तर हा विश्वास फारच मोठ्या प्रमाणावर असतो. "माझी बुद्धी जोपर्यंत नष्ट झाली नाहीं तोंपर्यंत मला भिण्याचें कारण नाहीं" असें मुद्राराक्षसांत चाणक्यानें म्हटलें आहे तें उगाच नाहीं. हाच आत्मविश्वास मुसलिनीस अहर्निश वाटत असतो. "The Desperate Adventure" या मथळ्याखालीं या मासिकाच्या धोरणाविषयीं त्यानें प्रदर्शित केलेले विचार वाचकांस मनोरंजक वाटतील. तो म्हणतो, "विशेष उल्लेख करण्यासारखी गोष्ट

म्हणजे या मासिकांत मला प्रथम पुरुषांत लिहितां बोलतां येईल ही होय. इतर ठिकाणीं ( अव्हान्टी पत्रांत ) लिहितांना मला माझ्या पक्षांतर्फें बोलावयाचें असल्यामुळें मला नेहमीं "आम्ही" अशा सामुदायिक भाषेंत लिहावें बोलावें लागतें. सामुदायिक भाषा केव्हांही तिऱ्हाइतपणा-चीच राहणार. पण या मासिकांतील प्रत्येक मत आणि प्रत्येक विचार माझा, सर्वस्वी माझा असल्यामुळें, तो माझ्या पक्षाच्या मताशीं पटतो किंवा नाहीं याची काळजी करण्याचें मला कारण नाहीं."

याच मासिकांतून त्यानें सोशिआलिझम कार्यक्षम आणि उठावदार कसा करितां येईल याची चर्चा चालविली. कार्ल मार्क्सला सोशिआलिस्ट लोक आपल्या मताचा आद्यसंस्थापक आणि गुरु समजतात. त्याचा 'कॅपिटल' ग्रंथ ह्मणजे सोशिआलिस्टांचा तो ग्रंथसाहेबच ह्मणावयाचा ! पण मुसलिनीनें आपल्या "मनोराज्य" मासिकांत कॅपिटल मधील विचारसरणीची अतिशय मुद्देसूद चर्चा करून, "बदललेल्या परिस्थितीप्रमाणें सोशिआलिस्टांनीं आपली विचारसरणी बदलली पाहिजे; केवळ अमक्या एका प्रश्नावर कार्लमार्क्स 'असें असें' म्हणतो म्हणून तें खरें असें अंधभक्ति—आचरण त्यांनीं करूं नये;" अशा अर्थाचा निष्कर्ष काढला आहे. कार्ल मार्क्सच्या अनेक चुकीच्या मतांची थोडीफार टर उडविण्यासहि मुसलिनीनें कमी केलेलें नाहीं.

असें करण्यांत सोशिआलिझमच्या तत्वांचा बोजवारा उडविण्याचा मात्र मुसलिनीचा उद्देश नव्हता. उलट त्याचें गेलेलें तेज त्याला पुनः प्राप्त व्हावें तो अधिक कार्यक्षम व्हावा, त्याला जिवंतपणा यावा, एवढ्याच इच्छेनें मुसलिनीनें त्यावेळीं सोशिआलिझमचा विचक्षण बुद्धीनें विचार चालविला होता. त्याकाळच्या एकां भाषणांत त्यानें, भांडवल-

बालावर्ग समूळ नाहींसा करण्यापेक्षां जिवंत ठेवण्यांतच राष्ट्राचें हित आहे असें, प्रचलित सोशिआलिस्ट मताविरुद्ध आपलें मत व्यक्त केलें होतें. " भांडवलवाला वर्ग आणि मजूर वर्ग यांच्या नित्य घर्षणानेंच राष्ट्राची प्रगती होते. दोन दगडांचें घर्षण होईल तेव्हांच विद्युत्शलाका बाहेर पडेल. भांडवलवालापक्ष आणि मजूरपक्ष यांचे हितसंबंध एकमेका-विरुद्ध आहेत ह्मणून ते भांडतात. उद्यां ते एक केले तर समाजाची प्रगती थांबेल हें लक्षांत ठेवा. युद्धाच्या भीतीनें हे दोन्ही पक्ष स्वतःला नेहमीं कार्यक्षम ठेवण्याचा प्रयत्न करितात आणि त्यांतच राष्ट्राची प्रगती होत असते. माझेंतर असें ह्मणणें आहे कीं, या दोन पक्षांची चढाओढ सारखी कायम कशी राहील याचा आपण विचार केला पाहिजे. या चढाओढींत दोन्ही पक्षांची डोकेफोड झाली तरी हरकत नाहीं. इटालियन जनतेला, कामकरी वर्गाला, जागृत करण्यास तशा एकाद्या रुधिरस्नानाची जरूरीच आहे. "

या भाषणानें इटालींतच काय पण इटाली बाहेरसुद्धां त्यावेळीं भयंकर वादळ उत्पन्न झालें. मुसलिनीची क्रांतिकारक विचारसरणी रुधिर-स्नानापर्यंत गेलेली पाहून अनेक सोशिआलिस्ट लोक गांगरून गेले. त्यांना कामकऱ्यांची क्रांती पाहिजे होती; पण त्यासाठीं रक्तपात करण्याची त्यांची तयारी नव्हती. मुसलिनीचें म्हणणें असे कीं, लढावयाचेंच तर तें जीवांवर उदार होऊन लढावें—मरूं किंवा मारूं. मानवी जीविताला नसतें महत्व देऊन निष्क्रिय बनण्यापेक्षां आपल्या उद्दीष्टासाठीं मरावें किंवा मारावें लागलें तरी पर्वा नाहीं अशी मुसलिनीची समजूत आहे. सँडॉर पॉटिफीनें ह्मटल्याप्रमाणें " Life is dear to me, love dearer still, but I will give them both for liberty " प्राण

कोणाला प्रिय नाहींत ? प्रेमासाठीं माणूस प्राणावरहि उदार होईल. पण स्वातंत्र्यासाठीं या दोहोंवरहि तिलांजली देण्यास तयार होतो तोच खरा मर्द. मुसलिनीची वृत्ती अशा मर्दासारखी आहे. मुसलिनीनें आपल्या क्रांतीचें निशाण १९१९ सालीं उभारलें अशी कित्येकांची समजूत आहे. परंतु 'युटोपिया' मासिकांतील त्याचें :धोरण काळजीपूर्वक पाहिल्यास क्रांतीचें बीज १९१३।१४ सालींच मुसलिनीच्या अंतःकरणांत पुरें रुजलें असून लेख व भाषणांच्या द्वारें तें व्यक्त होत होतें असें दिसून येईल.

मुसलिनीच्या यशस्वी आयुष्यक्रमाची गुरू किल्ली त्याच्या लढाऊ वृत्तींत आहे. Direct Action केवळ तात्विक चर्चेचा विषय नसून, व्यवहारांतलि अत्यंत परिणामकारक असें तें एक तत्त्व आहे ही गोष्ट मुसलिनीनेंच पहिल्यानें जगाच्या निदर्शनास आणून दिली. कवी जसा बनवून होत नाहीं तसाच 'डायरेक्ट ॲक्शनिस्ट' हि बनून बनत नाहीं. तो जन्मत,: प्रकृतितःच, तसा असावा लागतो. मुसलिनीचें कोणतेंहि कृत्य घ्या, त्याला डायरेक्ट ॲक्शनचा वास आल्या शिवाय राहणार नाहीं. लहानपणीं प्रतिपक्षाला दगडानें ठेंचण्यांत, शाळेंत मास्तरांशीं भांडण्यांत, फोर्लीच्या मेयरला खिडकींतून खालीं फेंकून देण्याची धमकी देण्यांत आणि न्यायाधीशाला, 'तुम्ही शिक्षा दिलीत तरी पुनः मी तोच गुन्हा करणार" असें छातीठोकपणानें सांगण्यांत, मुसलिनीची जी लढाऊ वृत्ती होती तीच लढाऊ वृत्ती परिणत स्वरूपांत १९२२ सालीं फाशिस्ट दळानें रोमवर चाल करून राज्ययंत्र काबीज करतांना दिसून आली. आज युरोपियन राजकारणांत डायरेक्ट ॲक्शन आणि मुसलिनी हे शब्द जवळ जवळ समानार्थी बनले आहेत.

"मनोराज्य"

प्रत्येक विभूती कांहीं एका विशिष्ट गुणाच्या पूर्ण विकासासाठीं जन्माला आलेली असते. तिच्या ठिकाणीं इतर अनेक गुण असले तरी त्या विशिष्ट गुणावरूनच तिची जगाला कायमची ओळख राहते. कालिदास ह्मणतांच काव्य-ललितकलांची आठवण होते; श्री शिवाजी महाराजांचें नांव निघतांच स्वधर्म रक्षणाचा इतिहास आपल्या डोळ्यापुढें उभा राहतो; बुद्धाचें नांव दयाधर्माशीं एकजीव झालें आहे; स्वामिभक्तिचा उल्लेख होतांच पन्नादाई आणि वीररत्न बाजी प्रभूचें पुण्य स्मरण झाल्याशिवाय राहत नाहीं. पातिव्रत्याचें नांव निघतांच सावित्रीची स्मृति हटकून व्हावयाचीच. अशा रीतीनें प्रत्येक गुणाचा अत्युत्कट उत्कर्ष त्या त्या विभूतीच्या ठिकाणीं झाला असल्याचें कोणासहि दिसून येईल. या परिगणनेंत बाहेरच्या देशांतील विभूतींचा अंतर्भाव केला नाहीं; याचा अर्थ इतर देशांत विभूतिपुरूष जन्माला येतच नाहींत असा नव्हे. प्रत्येक राष्ट्राची genius स्वतंत्र असते व त्या त्या प्रमाणें तेथें विभूतिअवतार होत असतो.

कार्लाइल्चा "विभूती आणि विभूतिपूजा-" Heroes & Hero-Worship–नांवाचा ग्रंथ अनेक वाचकांच्या परिचयाचा असेल. त्याचें " Hero is a hero at all points " ह्मणजे " विभूतिव्यक्ती कोण त्याहि स्थितींत असली तरी, तिचें विभूतीमत्व सर्व ठिकाणीं सारखेंच प्रत्ययास येतें " असें एक मत आहे. शेक्स्पिअर कवी ह्मणून विभूतीमत्वाला पोहोंचला. परंतु काव्य विनोद करण्या ऐवजीं त्याला लढावें लागलें असतें तरी रणांगणावरहि तो अनन्यसामान्यच ठरला असता, असा कार्लाइल्च्या सिद्धान्ताचा निष्कर्ष आहे. आम्हाला ही विचारसरणी पटत नाहीं. क्रॉमवेलला कविता लिहितां आली नसती किंवा जॉन्सनला क्रॉमवेलचें राजकारण चालवितां आलें नसतें. क्रॉमवेल आपल्या गुणांत श्रेष्ठ आहे,

दा. क्र. 3333



शेक्स्पिअर अतुलनीय आहे किंवा जॉन्सनच्या लिहिण्याची पद्धत अनुकरणानुकूल नाहीं या गोष्टी आम्हाला कबूल आहेत. पण या व्यक्तींच्या स्थानांची उलटापालट केली तरी जगाच्या इतिहासांत कांहींच फरक पडणार नाहीं अशी जी कार्लाइलची विचारसरणी आहे ती मात्र मान्य होण्यासारखी नाहीं.

मुसलिनीच्या विभूतिमत्वाबद्दल मतभेद असण्याचें कारण नाहीं. पण सध्यां फॅशिस्ट वर्तमानपत्रें त्याला कार्लाइलच्या सार्वत्रिक विभूतिमत्वाला नेऊन ठेवीत आहेत तें बरोबर नाहीं. मुसलिनीचें विभूतिमत्व त्याच्या लेखनांत किंवा भाषणांत नसून तें त्याच्या धडाडीच्या कार्यक्रमांत आहे. डायरेक्ट ॲक्शनमध्यें आहे. मुसलिनीला पाहतांच " He must be all active " असे सहजोद्गार बाहेर पडतात. आणि तेवढ्यापुरता तो विभूतिपदाला योग्य आहे. असो.

पुढील प्रकरणांत त्याच्या ॲक्शनिस्ट वृत्तीचा मनोरंजक मासला दिला आहे तो मननीय आहे. त्यांवरून मुसलिनी महायुद्धांत पडण्याला कां उद्युक्त झाला असेल त्याचीहि मीमांसा लावतां येतें. मुसलिनीला सोशिआलिस्ट पक्षाप्रमाणें लढाईचें वावडें नव्हतें. परंतु लीबियन मोहिम करण्याला तो योग्य काल नव्हता असें त्याचें मत होतें. युद्धा नंतर इटालींत साम्राज्य विस्ताराची जी लाट पसरली ती लक्षांत घेतां मुसलिनीच्या तत्कालिन विचार सरणींत कांहींच अर्थ नव्हता, असें दिसून येईल. यांवरून एकच गोष्ट सिद्ध होते; ती म्हणजे मुसलिनीच्या विचारांना अद्यापि स्थैर्य आलें नव्हतें—विचारांची बाल्यदशा अद्यापि संपली नव्हती.

# प्रकरण १७ वें

## मुसलिनीची राष्ट्रीय दृष्टी.

" Between us socialists and the Nationalists, there is this difference of view they want a vast Italy; what I want is an Italy well cultivated, rich and free. "

*Mussolini.*

लीबियन मोहिमेविरुद्ध लिहून, तिचा शक्य तितक्या तीव्र भाषेंत निषेध करून, जुना सोशिआलिस्ट पक्ष स्वस्थ बसला. थोड्याफार सभा होऊन ज्वलज्जहाल भाषणें झालीं व सोशिआलिस्ट पक्षाला " आपण आपलें कर्तव्य केलें " असें वाटूं लागलें. परंतु मुसलिनीच्या निषेधाची तऱ्हा कांहीं वेगळीच होती. त्यानें प्रत्यक्ष शारीरिक प्रतिकाराची–डायरेक्ट अॅक्शनची–लज्जत स्थानिक लढ्यांत अनुभाविली होती. तेथील उत्तेजक अनुभवामुळें, त्याचा प्रयोग राष्ट्रीय राजकारणांत करून पाहण्याची त्यास अनिवार इच्छा झाली असल्यास नवल नाहीं.

आरंभीं आरंभीं त्याचा त्यालासुद्धां भरंसा वाटेना; कारण, इटालींतील किंवा जगांतील कोणत्याहि राष्ट्रांतील बहुजन–समाजाची गोष्ट अशी आहे कीं, त्याच्या उत्साहाला भरती येण्यास आणि तो ओसरण्यास फारसा काळ लागत नाहीं. बहुजन–समाज स्वभावतः, भावनाप्रधान असतो. देशाभिमानाचें स्फुरण त्याला हां हां ह्मणतां चढतें. परंतु त्या भाव-

नेला बुद्धिप्रधान निश्चयाची बैठक नसल्यामुळें ती टिकाऊ होत नाहीं. खाली दिलेली गोष्ट महाराष्ट्रांतील एका सुप्रसिद्ध ठिकाणीं प्रत्यक्ष पडलेली आहे तीवरून आम्ही म्हणतो त्याची सत्यता पटेल.

१९२०।२१ सालचे, ऐन असहकारितेचे, ते दिवस होते. देशभक्त ×× चें अत्यंत आवेशयुक्त भाषण चाललें होते. प्रत्येक हिंदू मुसलमान अंतःकरण मातृभूमीच्या सेवेसाठीं तळमळत होतें. इतक्यांत वक्त्यानें "स्वदेशके वास्ते मरनेकू कोन कोन तयार है ?" असा निर्वाणीचा प्रश्न केला. "सबहि है !" असा एकच ध्वनी सभास्थानांतून ऐकूं आला. देशभक्ताचें अंतःकरण नव्या आशेनें स्फुरण पावूं लागले. नव्या उत्साहानें तो बोलूं लागला. पण, हाय हाय ! त्याच वेळीं एक खोंड उधळत उधळत सभेच्या रोखानें येत होता–खोंडाला धुळ्याकडे गोऱ्हा म्हणतात. त्याची मुसडी पाहून लोक घाबरून गेले व त्यांनीं 'गोऱ्हा आला गोऱ्हा आला' म्हणून ओरडण्यास सुरवात केली. गर्दींत 'गोऱ्हा' याचें 'गोरा' झालें व क्षणार्धांत ५।६ हजार लोकांनीं गजबजून गेलेली बखळ निर्मक्षिकवत् झाली ! रात्रीच्या त्या निस्तब्ध वातावरणांत, 'स्वदेशके वास्ते मरनेकू कोन कोन तय्यार है ?–सबहि है" याचा विकट पडसाद मात्र उठत होता. दुसऱ्या दिवशीं सकाळीं पहातात तों सभेच्या ठिकाणीं हजारों पादत्राणें आणि शेकडों शिरस्त्राणें, रुमाल पागोटीं बेवारशी होऊन पडली आहेत ! तेथील शहरवासीयांनीं जशी हकीगत सांगितली व प्रत्यक्ष अनुभविली तशीच ती येथें निवेदन केली आहे.

मुसलिनीलाहि प्रस्तुत प्रसंगीं असाच अनुभव आला. त्याच्या भाषणामुळें जनसमाज Viva la Revoluzione "राज्यक्रांतीचा

जयजयकार " करण्यासाठीं जमला होता. इतक्यांत बंदोबस्तासाठीं म्हणून पाठविण्यांत आलेल्या घोडेस्वारांचें पथक सभेच्या ठिकाणीं येऊन दाखल झालें. तत्काळ श्रोतृसमुदायानें पाठीस पाय लावून घरचा मार्ग सुधारला. बहुजन समाजाचें हें अचाट धैर्य पाहून मुसलिनीसारख्या माणसालाहि क्षणभर खचून गेल्यासारखें झालें असेल. त्वेषानें तो लाल झाला, पण लोकांना " भेकड भागूबाई " म्हणून शिव्या देण्यापलीकडे त्याला कांहींच करतां येणें शक्य नव्हतें !

तथापि या अनुभवानें त्यानें माघार न घेतां सरकार वरील हल्ला दुप्पट जोरानें सुरू केला. आपल्यासारखेच आणखी चार साहसी लोक जमवून त्यानें फोर्ली येथें वरीच दंगल उडवून दिली. ता. २४ सप्टेंबर १९११ रोजीं एका सभेंत राजद्रोही भाषण करून लोकांना सरकारा-विरुद्ध चिथविण्याचा त्यानें उपक्रम केला. तारायंत्राच्या तारा तोडून, वाटेंत झाडें पाडून रस्ता अडवून व वेळ पडल्यास सार्वत्रिक संप पुकारून सर्व रहदारी व वाहतुक बंद करून ट्रिपोलीची मोहिम हाणून पाडण्याचा मुसलिनीचा बेत होता. पोलिसांनीं मुसलिनीस तात्काळ पकडून त्याच्यावर खालील आठ गुन्हे केल्याचा आरोप केला.

( १ ) सरकारी अधिकाऱ्यांना, ते आपलें कर्तव्य बजावीत असतां अडथळा करणें.

( २ ) लष्करी लोकांच्या हालचालींत अडथळा आणणें व सरकारी अधिकाऱ्यांवर हल्ले करणें.

( ३ ) बळजबरीनें कारखाने व गिरण्या बंद पाडणें.

(४) ट्रॅम गाड्या रोखून धरणें व गाड्यांतील माल जबरदस्तीनें ओतून टाकणें.

(५) टेलिफोनच्या तारांचें नुकसान करणें.

(६) सरकारी तारखात्याचें, तारा तोडून व खांब उपटून नुकसान करणें.

(७) आगगाडीचें इंजीन बळेंच थांबवून तें बंद पाडणें.

(८) आगगाडीच्या रुळावर तारेचा खांब टाकून एका उतारूगाडीला धोका उत्पन्न करणें.

असे आठ गुन्हे मुसलिनीवर लादण्यांत आले. सर्फाटी बाईंनीं म्हटल्या प्रमाणें, दुसऱ्या कोणत्याहि देशांतील मुख्य प्रधानाला इतके गुन्हे केल्याचा मान आजपर्यंत मिळाला नसेल!

या गुन्ह्यापैकीं शेवटचा गुन्हा मात्र मुसलिनीस कबूल नव्हता. "तसला गुन्हा करणें भागूबाईचें काम होय. उतारूंची गाडी उलथून पाडण्याचा आपला कधींच उद्देश नव्हता. इतर गुन्हे केल्याबद्दल मला वाईट वाटत नसून उलट अभिमानच वाटत असल्याचें" त्यानें त्यावेळीं कोर्टास सांगितलें. "माझें माझ्या मातृभूमीवर प्रेम आहे म्हणूनच मी सरकारला हरप्रयत्नानें ट्रिपोलीच्या मोहिमेपासून परावृत्त करण्याची खटपट केली. मी सोशिआलिस्ट असून स्वदेशभक्त आहे याबद्दल मला लाज वाटत नाहीं. वास्तविक वरील गुन्ह्यापैकीं बहुतेक सर्व गुन्हे तेथें जमलेल्या जमावानें (Crowd) केले आहेत त्याबद्दल मी जबाबदार नाहीं. मला तुम्ही सोडून दिल्यास मला आनंद होईल, कारण मोकळा होतांच मला माझे लोकजागृतीचें कार्य

पुनः हातीं घेतां येईल. त्या ऐवजीं मला शिक्षा दिलीत तर तुम्ही माझा सन्मान केला असें मी समजेन. मला माझ्या ध्येयाबद्दल, उज्वल भविष्यत्कालाबद्दल आणि सत्याबद्दल पूर्ण खात्री असल्यामुळें तुमची शिक्षा मी प्रशस्तीपत्र म्हणून आनंदानें स्वीकारीन. "

शेवटीं ज्यूरीनें व जजानें मुसलिनीस दोषी ठरवून ५ महिन्याची शिक्षा दिली. मोकळेपणीं भयंकर चळवळ करणारा मुसलिनी शिक्षा ऐकतांना बिलक्षण शांत असलेला पाहून लोकांना आश्चर्य वाटलें. या शांत वृत्तींतच त्याचा मोठेपणा आहे. लो० टिळकांना १९०८ सालीं शिक्षा झाली. शिक्षा सांगण्याच्या क्षणापर्यंत ते सिंहासारखे गर्जत होते पण शिक्षा सांगितली गेल्या बरोबर त्याच उग्रमूर्ती टिळकांनीं इतकी शांत वृत्ती धारण केली कीं, स्पेशल ट्रेनमध्यें नेऊन बसवितांच त्यांना पांच मिनिटांत गाढ झोंप लागली ! बुद्धीची साम्यावस्था प्राप्त झालेल्या कर्मयोग्यासच असली स्वर्गीय शांतता लाभावयाची !

तुरुंगांत विशेष सांगण्यासारखें कांहीं झालें नाहीं. राजकीय कैद्यांना सर्वतऱ्हेच्या सवलती देण्याची सर्व पाश्चात्य देशांत वहिवाट असल्यामुळें तिकडे राजकीय गुन्ह्याबद्दल शिक्षा झाल्यास, कैद्याला तसा विशेष त्रास होत नाहीं. सुप्रसिद्ध लेखक मरहूम वुइल्यम स्टेड 'रिव्हयू ऑफ रिव्हयूज' मासिकाचे संस्थापक—यांना बोअर वॉरच्या वेळीं शिक्षा झाली होती. तथापि आपल्या पालमाल गॅझेटला लेख धाडविण्याची त्यास मोकळीक होती. आपल्या इकडे मात्र साराच प्रकार और आहे. ब्रिटिश सरकार स्वतःला सुधारलेलें म्हणवीत असलें तरी राजकीय गुन्हेगारांच्या बाबतींतील त्याचें धोरण अत्यंत गर्हणीय आहे. राजकीय बंदिवानाविषयीं हिंदुस्थानांत व्हावी तितकी

चळवळ झाली नाहीं. अलीकडे दरवर्षी Political Sufferers Conferance भरत असते. परंतु तींमध्यें झालेल्या भाषणांचा किंवा ठरावांचा जनतेला कधीं मागमूसहि लागत नाहीं. बहुतेक वृत्तपत्रें या कान्फरन्सची माहिती वर्तमान सारांत देतात. या राजकीय बंदिवानाचें आपण फार मोठें ऋण लागतो ही गोष्ट आपल्या अद्यापि ध्यानीं आलेली नाहीं, :ही अत्यंत दुःखाची गोष्ट आहे. बंगालच्या राजकीय कैद्यांची गाऱ्हाणीं राष्ट्रसंघापुढें ठेवण्याची कांहीं तजवीज कॉंग्रेस यंदा करील काय ? असो.

अशा रीतीनें ट्रिपोलीच्या मोहिमेविरुद्ध लढाई पुकारून मुसलिनी कारागृहांत विश्रांती घेण्यास निघून गेला.

१९१२ साल उजाडलें व शिक्षा संपून मुसलिनी बाहेर आला. त्या-वेळीं, बाहेर रेगिओ एमिलीआच्या कॉंग्रेसची तयारी चालली होती. सर-कारशीं झालेल्या झगड्यांत मुसलिनीचें धैर्य जनतेच्या अनुभवास आलें होते व तिची त्याच्या पुढारीपणाबद्दल खात्री पटली होती. मुसलिनीनें कॉंग्रेसमध्यें, तत्कालिन सोशिआलिस्ट पुढारी, लिओनिडो बिसोलाटी याचा पराभव करून सोशिआलिस्ट पक्षाची अधिकारसूत्रें आपल्या हातांत घेतली. त्याच्या प्रथम दर्शनानेंच अनेक सुविद्य लोकांवर सुद्धां एकदम परिणाम झाला. मुस-लिनीविषयीं लिहितांना एका गृहस्थानें खालील उद्गार काढले आहेत. "अंगानें सडपातळ, वृत्तीनें भावना प्रधान, बुद्धीनें चलाख आणि वाणीनें तेजस्वी अशा एका नव्या पुरुषाचें मला आज दर्शन घडलें. त्याच्या काम करण्याच्या पद्धतीचा विचार करितां तो लौकरच सोशिआलिस्ट पक्षांत अत्यंत प्रभावी ठरणार असें दिसतें." याच्या अगदीं उलट

**मुसलिनीची राष्ट्रीय दृष्टी**

अभिप्राय आना कुलिस्किऑफ या रशियन सोशियालिस्ट बाईचा पडला असल्याचें तिच्या खालीं दिलेल्या उद्गारांवरून दिसून येईल. ती ह्मणत्ये, " त्याला ( मुसलिनीला ) मार्क्सच्या तत्त्वांचा गंध नाहीं, किंवा तो खरा सोशिआलिस्टहि नाहीं. शास्त्रीय सोशिआलिस्टाची विचारसरणी कशाशी खातात याची त्यास कल्पनाहि नसेल. एवढेंच नव्हे तर त्याला राजकारण तरी कितपत कळते याविषयींहि मला शंकाच आहे. कसल्यातरी चार भिकार कविता खरडणारा आणि नित्शेचे ग्रंथ वाचलेला हा कोणीतरी बहकलेला तरुण आहे एवढेंच. ". एकाच व्यक्तीविषयीं किती परस्पर विरोधी मतें असूं शकतात याचा हा एक मासला आहे. असामान्य व्यक्तींच्या बाबतींत असें होणें अगदीं साहाजिक आहे. कारण त्यांची योग्यता साकल्यानें लक्षांत येण्यास त्याच योग्यतेचें प्रगल्भ अंतःकरण पाहिजे. लो. टिळकांची योग्यता म. गांधींना जितकी समजली असेल तितकी ती उभ्या हिंदुस्थानांत दुसऱ्या कोणास समजली असेल कीं नाहीं, याबद्दल आम्हाला तरी संशय आहे. आगरकरांची योग्यता टिळकांनाच उत्तम तऱ्हेनें समजली असावी; कारण त्यांची बुद्धी आणि अंतःकरण–प्रवृत्ती आगरकरांप्रमाणेंच उदार आणि उमदी होती. प्रतिबिंब ' लाइफ साइझ ' दिसावयास आरसाहि ' लाइफ साइजच ' पाहिजे.

मुसलिनीनें या परिषदेंत अपूर्व विजय संपादून सोशिआलिस्टपक्षाचें धुरीणत्व पटकावलें असलें तरी ' अव्हान्टी ' पत्राची पूर्ण मालकी अद्यापि त्याचेकडे आली नव्हती. ती गेल्या प्रकरणांत सांगितल्याप्रमाणें १९१२ सालच्या अखेरी अखेरीस आली. अव्हान्टी पत्राची पूर्ण मालकी मुसलिनीकडे येतांच त्यानें त्यांत विलक्षण सुधारणा करण्यास सुरुवात केली. त्याच्या

लेखनांत सगळीकडे आग्रही निश्चयपूर्ण भाषा पहावयास सांपडते. त्याला संकेतार्थ जवळ जवळ माहितच नाहीं असें ह्मटलें तरी हरकत नाहीं. त्यानें पहिल्यापासून फ्री मेसन्रीवर तडाखे ओढण्याचा क्रम ठेवला. त्याला फ्री मेसन्रींत सगळीकडे दिसून येणारा गुतपणा, बिलकूल पटत नसे. इटालींत तर त्याकाळीं गुतपणाच्या नांवाखालीं फ्री मेसन लोकांत वाटेल ते अनाचार चालत. मुसलिनीनें या संस्थेविरुद्ध एवढी भयंकर चळवळ केली कीं १९१३।१४ सालीं अंकोना येथें सोशिआलिस्टांची जी प्रतिवार्षिक कॉंग्रेस भरली तींत त्यानें "कोणाहि सोशिआलिस्टानें फ्री मेसन असतां कामा नये" असा ठराव पास करून घेतला. फॅशिस्टांनाहि हाच नियम लागू करण्यांत आल्यामुळें इटाली पुरतेंच बोलावयाचें तर फ्री मेसन पंथ तेथें जवळ जवळ नामशेष होण्याच्या पंथास लागला आहे असें म्हणावयास हरकत नाहीं.

अव्हान्टी पत्राचा खप, तें मुसलिनीच्या ताब्यांत आल्याबरोबर, ४० हजारावरून १ लाखावर गेला. मुसलिनीची वर्तमानपत्रकार म्हणून योग्यता फार मोठी आहे. कोणतेंहि पत्र हातीं आलें किंवा नवें काढलें कीं, त्याचा प्रसार लोकांत कसा करावयाचा याचा तो पहिल्यानें विचार करूं लागतो. अभूतपूर्व प्रसार करूनहि "खपेल आणि रुचेल तेंच लिहावें" या मताचा तो नाहीं ही गोष्ट लक्षांत ठेवण्यासारखी आहे. पुष्कळ वेळां जनतेला न आवडणारे विचार सडेतोड भाषेंत मुसलिनीनें सांगितले आहेत. लोकांना ते आवडणार नाहींत याची त्यास जाणिव असते. परंतु त्याच्या विचारांचा अभिनवपणा इतका आकर्षक असतो कीं, प्रतिपक्षालाहि क्षणभर त्यांचें कौतुक केल्याशिवाय राहवत नाहीं.

**मुसलिनीची राष्ट्रीय दृष्टी**

१९१२ पूर्वी सोशिआलिझमचा प्रसार उत्तर इटाली पुरताच मर्यादित होता असें ह्मणावयास हरकत नाहीं. दक्षिण इटाली ह्मणजे शेतीचा प्रदेश; तेव्हां तो सुधारणेच्या शर्यतींत औद्योगिक उत्तरेच्या मागें पडला असला तर नवल नाहीं. सोशिआलिस्ट पुढाऱ्यांची दृष्टी औद्योगिक शहरापलीकडे जात नसल्यामुळें दक्षिण इटाली राजकारणाच्या दृष्टीनें अगदींच मागें पडला होता. अर्थातच तेथें आर्थिक व राजकीय स्वरूपाचे वाटेल ते अत्याचार चालत असले तर आश्चर्य काय ? पुष्कळ वेळां अडचणी असह्य झाल्या म्हणजे शेतकरी लोक दंगा करीत व जमिनदारांना पुष्कळ त्रास देत. प्रत्याघात न्यायानें जमिनदारहि शेतकऱ्यांना पुष्कळ छळत. असा क्रम किती दिवस तरी तेथें चालला होता. अनेक वेळां गोळीबार करावा लागून शेतकरी लोक मृत्यूमुखींहि पडत, परंतु तिकडे कोणाचेंहि लक्ष जात नसे.

मुसलिनीला ही स्थिती पाहून अतिशय वाईट वाटलें व त्यानें दक्षिण इटालीचा प्रश्न हातीं घेतला. गोळीबारासारखे प्रकार तेथें कोठें झाल्यास त्याची साद्यंत हकीगत देण्याची पद्धत पहिल्यानें मुसलिनीनेंच सुरू केली. त्यामुळें तिकडच्या दंग्याधोप्याकडे लोकांचें लक्ष वेधूं लागलें. दक्षिण इटालींत असें वरचेवर दंगे आणि गोळीबार कां होतात याविषयीं लोक विचार करूं लागले. आणि आस्तेआस्ते दक्षिण इटालीविषयीं देशभर एक प्रकारचें सहानुभूतीचें वातावरण तयार झालें. मुसलिनीनें अशारीतीनें बातम्या देण्याचा आणि लोकमत जागृत आणि तयार करण्याचा उपक्रम सुरू ठेविला होता.

कर्मधर्मसंयोगानें १९१३ च्या जानेवारींतच अशा तऱ्हेचा कांहीं दंगा होऊन गोळीबार करण्यापर्यंत पाळी आली. त्यासंबंधानें लिहितांना

तर मुसलिनीची लेखणी फारच कडक झाली. तो म्हणतो, "वृद्ध माणसांवर गोळ्या झाडण्यांत व गरोदर स्त्रिया आणि लहान अर्भकें यांचा नाश करण्यांतच इटालीची सुधारणा आहे काय? ड्रेनेज–डॉक्टरांची रयतेनें मागणी केली असतां सरकारनें तिचेवर शिपाई पाठवून त्यांना रक्ताचें स्नान घालणें कोणत्या सुधारणेला शोभा आणणारें आहे? जनता आज नाहीं उद्यां या गोष्टीचा सूड घेतल्याशिवाय राहणार नाहीं. सरकारनें दंग्याच्या कारणांचा शोध करून तीं दूर केली पाहिजेत. त्याऐवजीं त्यानें केवळ दडपशाही चालविली आहे. या गोष्टीचा परिणाम चांगला होणार नाहीं. निःशस्त्र जनतेवर गोळीबार करून दंगा शांत करण्यांत काय पुरुषार्थ आहे?"

लौकरच मुसलिनी व त्याचे सहविचारी लोक यांचेवर रोकें गोर्का प्रकरणीं त्यांनीं जें लिहिलें किंवा केलें असेल त्यासंबंधीं सरकारनें खटला भरला. तो मिलन येथें चालावयाचा असल्यामुळें मुसलिनीस त्यांतल्या त्यांत आनंद झाला. कारण मिलानवर त्याची विलक्षण भक्ती आहे. तो त्या शहरास Brain of Italy ह्मणजे इटालीचें बुद्धिसर्वस्व समजतो. मुसलिनीच्या बहुतेक सर्व महत्वाच्या चळवळी याच शहरांत झाल्या. लो. टिळकांचें जसें पुणें शहर तसें मुसलिनीचें मिलान होय.

मुसलिनीनें या प्रसंगीं आपल्या बचावाचें ह्मणून जें भाषण केलें तें अत्यंत ओजस्वी व बाणेदार असल्याळें तें खालीं उध्दृत केलें आहे. मुसलिनी ह्मणाला " रोकागोर्का प्रकरणीं मी जें लिहिलें आहे त्याबद्दल मला बिलकुल खेद होत नाहीं. रोकागोर्काच्या अभागी लोकांना, त्यांच्या दुःखांत त्यांचे देशबांधवहि सहभागी आहेत हें कळावें अशी माझी इच्छा होती. आम्हांला त्यांच्या दुःखांची आणि नडीअडचणींची जाणीव आहे ही गोष्ट

त्यांना कळणें जरूर होतें व याच उद्देशानें मी रोकागोकांच्या प्रकरणीं लिहिण्यास प्रवृत्त झालों. या खटल्याचे प्रसंगीं जीं भाषणें होतील व जी विचारसरणी प्रतिपादिली जाईल तिकडे जनतेनें आणि सरकारनें जरूर लक्ष द्यावें, या गोष्टीकडेहि मी सर्वांचें लक्ष वेधित आहे." सदर गुन्हा मुसलिनीनें केला होता एवढेंच नव्हे तर प्रसंग घडल्यास तोच पुनः करण्याची त्याची तयारी होती. त्यानें तसें कोर्टाला पुनः पुनः बजाऊन सांगितलें. "आम्हाला तुम्ही सोडून द्या अशी मी तुम्हांस विनंति करतों. याचें कारण, आम्ही निरपराधी आहोंत हें नसून आम्ही अपराधी आहोंत हें होय. आम्ही हा गुन्हा केला आहे व पुनः तोच गुन्हा करण्याचें मी कोर्टाला आश्वासन देत आहे आणि याचसाठीं आम्हाला तुम्ही सोडून दिलें पाहिजे. इटालीची लोकसंख्या ३ कोटी ६० लक्ष आहे. इतक्या लोकांनीं जणूं त्यांचे मेंदू अगदीं एकाच सांच्यांतून बाहेर पडल्याप्रमाणें बोलावें व वागावें असें तुम्हांस वाटतें काय ? कल्पनेला सुद्धां तसला विचार असह्य वाटतो. असल्या तऱ्हेच्या परिस्थितींत जीवित नकोसें होईल. खुद्द राजेसाहेबांना सुद्धां, आपली सारी प्रजा केवळ मॉनार्कीस्ट ( राजपक्षीय ) झाल्याचें दिसून आल्यास कससेंच वाटून रिपब्लिकन ( लोकसत्ताक ) पक्षाची आवश्यकता त्यांना वाटूं लागेल. पक्षभेद असणें अत्यंत जरूर आहे. 'नाहीं–नको' म्हणणाऱ्यांप्रमाणेंच 'होय–हवें' म्हणणारेहि पाहिजेत; लष्कराची निंदा करणारे व स्तुति करणारे या दोघांचीहि आपल्याला जरूरी आहे. धनाढ्य वर्गाला उचलून धरणारा वर्ग आम्हांला पाहिजे आहे तसाच त्या वर्गाचा उच्छेद करणारा वर्गहि आम्हांला पाहिजे आहे.

**मुसलिनी**

आज आपल्याला जर कोणत्या गोष्टीची अत्यंत जरूरी असेल तर ती मतभेद, पक्षभेद, मतवैचित्र्य वाद आणि कलह यांची. एकसूत्रीपणा आणि घोटीव एकवाक्यता म्हणजे मूर्तिमंत विचारदुर्भिक्ष्य आणि मृत्यूच. ज्यूरींतील सभ्यगृहस्थहो ! हिरॅक्लिटसच्या "सर्व वस्तूंचें बीज असंतोषांत आहे" या सुप्रसिद्ध सूत्रवाक्याचा विचार करा, आणि आमच्या नित्यनैमित्तिक लढाया लढावयास आम्हांला मोकळें करा. आम्हांला सोडून देण्यांत तुम्ही एका मोठ्या तत्त्ववेत्त्याच्या उदात्त तत्त्वाचा, स्वातंत्र्यतत्त्वाचा, सन्मानच कराल."

मुसलिनीच्या आंगच्या अनेक गुणांवर या व्याख्यानानें प्रकाश पडतो. इतर सोशिआलिस्टांचें लक्ष औद्योगिक शहरांपलीकडे जाऊं शकलें नाहीं. पण मुसलिनीचें अंतःकरण खेड्यापाड्यांतील मागसलेल्या शेतकऱ्यासाठीं सुद्धां तळमळत होतें. सरकारचें कर्तव्य देशांतील लहान मोठ्या हितसंबंधांचें योग्य परिपालन आणि संरक्षण करण्याचें आहे. पण सरकार ती गोष्ट करीत नसल्यास त्याचा रोष सहन करूनहि ती त्याच्या निदर्शनास आणून देण्याचें कठिण काम जनतेच्या पुढाऱ्यांनीं केलें पाहिजे. इटालियन राजकारणांत त्याकाळीं शेतकरी किंवा मागसलेला, आणि औद्योगिक किंवा सुधारलेला असे दोन पक्ष असत. मागसलेल्यांची बाजू धडाडीने मांडण्याचें कार्य मुसलिनीपुर्वीं कोणी केलें नव्हतें. रोकागोर्गाच्या गोळीबाराचा प्रसंग साधून मुसलिनीनें आपली राष्ट्रीय भावना इटालियन जनतेच्या प्रत्ययास आणून दिली. इटालियन राष्ट्र केवळ औद्योगिक संघांचेंच बनलेलें नसून शेतकरी वर्गाचेंहि, राष्ट्रधारणेच्या कामीं अतिशय महत्व आहे ही गोष्ट मुसलिनीनें या प्रसंगीं प्रामुख्यानें जनतेच्या नजरेस आणून देऊन इटालियन राजकारणांत एक नवा विचारप्रवाह सुरू केला.

# प्रकरण १८ वें

## सतीचें वाण.

It is necessary to act, to move, to fight, and if necessary, to die. Neutrals have never dominated events. They have always gone under. It is blood which moves the wheels of history.

—Mussolini : (Speech at Milan Dec. 1914)

रोकागोर्का प्रकरणाची शिक्षा भोगून मुसलिनी बाहेर आला त्यावेळीं कामकरी वर्गांत असंतोषानें चांगलीच उचल खाल्ली होती. औद्योगिक इटालीचें वातावरण, संप आणि अडवणुकी यांनीं भरून गेलें होतें. सोशिआलिस्टांपैकीं अगदींच पुढें गेलेले पुढारी संपाबरोबरच राज्यक्रांतीचीहि भाषा बोलूं लागले होते. परंतु आंगीं तितकें धैर्य नसल्यामुळें प्रत्यक्ष बंडाचें निशाण उभारण्याचें मात्र कोणाचेच हातून होत नव्हतें. असंतोषाचें वारें एमीलिआ, मर्शिस अँकोना रेव्हेना रिमिनी आणि फोर्ली या ठिकाणीं विशेष जोरानें वाहत होतें.

मुसलिनीच्या लढाऊ वृत्तीला गडबड, अशांतता, मारामारी, या सारख्या गोष्टी जात्याच प्रिय आहेत. त्यांतहि सरकारच्या फुकट पाहुणचाराचा नुकताच लाभ घेऊन आल्यामुळें तर अधिकारीवर्गावर आणखी कांहीं अकल्पित संकट आणतां आल्यास त्याला आनंदच होणार होता.

तेव्हां या असंतोषाचा फायदा घेऊन इटालीभर संपांची वावटळ उडवून देतां आली तर बरेंच झालें असा विचार करून मुसलिनीनें या चळवळीचें पुढारीपण स्वीकारण्याचें ठरविलें.

१९१४ सालचे जून महिन्याचे ते दिवस होते. ७ जून ते १४ जून पर्यंत म्हणजे १ आठवडा मुसलिनीनें संपांच्या रूपानें इटालीभर भयंकर चळवळ उडवून दिली. सदर आठवड्यास "रेड वीक" म्हणजे तांबडा आठवडा असें नांव देण्यांत आलें. तांबडा हा राज्यक्रांतीचा रंग म्हणून समजण्याचा प्रघात आहे. या आठवड्यांत 'कामकऱ्यांची राज्यक्रांती' व्हावयाची असल्यामुळें त्यांस तांबडा आठवडा हें नांव मिळालें.

मुसलिनी आणि मजुरवर्ग यांचा पहिला बेत, इटालीभर सार्वत्रिक हरताळ पाडून आणि रेल्वेआदि वाहतुकीचीं साधनें, संप करून बंद पाडून राज्यक्रांती घडवून आणावयाची असा होता. अव्हांटी पत्रांतून तशा अर्थाचा संदेश मुसलिनीनें सर्व कामकरी वर्गास दिला. परंतु बोलल्याप्रमाणेंच सर्व गोष्टी होतात असें थोडेंच आहे! मुसलिनीची इच्छा साऱ्या देशभर एकाच वेळीं संप पुकारले जावेत अशी होती. परंतु मजुरवर्गांत, वर्तमानपत्रांतील जोरदार भाषे पलीकडे विशेष जोम नसल्यामुळें म्हणा किंवा या चळवळीला यावें तितकें व्यवस्थेशीर स्वरूप आलें नव्हतें म्हणून म्हणा, पण संपांचा व्हावा तसा उठाव झाला नाहीं. कांहीं कांहीं ठिकाणीं संप झाले, कित्येक ठिकाणीं मजुरांनीं कारखाने आपल्या ताब्यांत घेतले तर कांहीं ठिकाणीं राजसत्ताहि मजुरांच्या हातीं आल्याचा भास झाला. संपवाल्यांनीं कांहीं डेअरी फार्म्स लुटलीं, कोंबड्या पळविल्या व कांहीं प्रार्थनामंदिरांची दारें जाळलीं. त्यांच्या या शौर्याबद्दल त्यांचें कोण अभिनंदन करणार

नाहीं ? " कित्येकांना वाटलें कीं सोशिआलिस्ट सुवर्ण युगाचा उदय झाला. तेव्हां सर्व जिनसा स्वस्त होणार या कल्पनेनें त्यांनीं कोंबडी दोन दिड-क्रूंला; अर्ध्या फ्र[illegible] एक अशा भावानें विकण्यास सुरवात केली ! तत्पूर्वी [illegible] कोंबडीलि अर्दमीसें १२ आणे पडत ! बहुजन समाज भोळा असतो तो असा." ( **डेली मेल१९२३.** ) एका ठिकाणीं सैन्यांतील एक जनरल या संपवाल्यांच्या तावडींत सांपडला. त्याची एका मोटारींतून गांवभर धिंड काढून " पुढील हुकूम होईपर्यंत " त्यास एका हॉटेलमध्यें कोंडून ठेवण्यांत आलें. " रोम येथून राज्यक्रांती झाल्याची तार येईल व मग आपण या जनरलाला चांगलीच शिक्षा देऊं " असें संपवाले मनांत मांडे खात होते. परंतु तसा संदेश येण्या ऐवजीं बंडाचा पुरा मोड झाल्याचें मात्र प्रसिद्ध झालें ! तात्काळ, त्या जनरलास सोडून देण्यांत आलें हें सांगणें नलगे !

या 'रेड वीकचा' बाहेर असा बोजवारा उडाला. खुद्द मिलान येथें—या बंडाचें केंद्रस्थान—मात्र मुसलिनीनें आपल्या शद्वाप्रमाणें वागण्याची शिकस्त केली. त्यानें आपल्या अनुयायांकडून शहरांतील चौक आपल्या ताब्यांत घेतले व सर्व शहरभर जातीनें हिंडून ठिकठिकाणीं भाषणें करून बंड वाल्यांचा उत्साह कायम ठेवण्याचा प्रयत्न केला. सरकारनें घोडेस्वारांची व पोलिसांची, तशीच आणिबाणीची वेळ आली तर उपयोगी पडावी म्हणून, जय्यत तयारी ठेविली होती. परंतु विशेष कांहीं न घडल्यामुळें त्यांनीं संपवाल्यांना फारसा त्रास दिला नाहीं. सरकारला पक्कें माहित होतें कीं, नुसत्या बाष्कळ भाषेनें कांहीं राज्यक्रांत्या होत नसतात. मुसलिनी प्रभृति लोकांची फजीती उडालेली पाहून लोक सावध होतील व असल्या फंदांत पुनः पडणार नाहींत, अशीहि सरकारची अटकळ असावी. देशांतील दंगे आस्ते आस्ते आपोआपच शमले व या फार्सावर पडदा पडला.

**मुसलिनी**

परंतु त्याचवेळीं, इटालीबाहेर जगाच्या रंगभूमीवर येणाऱ्या एका दुःखपर्यावसायी मोठ्या नाटकाची रंगी तालीम चालली होती. जर्मनीच्या पॅन जरमॅनिझमच्या तत्त्वाचा कळस होऊन, जर्मन राष्ट्र [illegible] मदानें धुंद होऊन युद्धाची वाट पहात होतें. जर्मनीनें ऑस्ट्रिया–हंगेरीला विचा-रानें आणि संस्कृतीनें केव्हांच आपल्या बगलेंत मारलें असल्यामुळें व्हिए-न्नाचें सरकार जर्मनीच्या शब्दाबाहेर जाणें अशक्य होतें. अशा स्थितींत ऑस्ट्रियाच्या राजपुत्राचा एका सर्व्हियन क्रांतिकारकानें खून केला व युद्धाची ठिणगी उडाली! पिस्तुलाच्या दोनच गोळ्या, पण त्यांनीं उभ्या यूरोपला आग लावून दिली. सारें यूरोपखंड दारूच्या कोठाराप्रमाणें हां हां ह्मणतां भडकून गेलें. क्षणभर शत्रुमित्र ओळखणें सुद्धां कठिण झालें.

इटालीनें ऑस्ट्रो–जर्मनीबरोबर ‘ ट्रिपल अलायन्स ’–राष्ट्रत्रय मैत्री–चा तह १८८२ सालापासून केला होता. त्या तहाप्रमाणें तिला जर्मनीचा दोस्त म्हणून युद्धांत पडणें, भाग होतें. परंतु ‘ आपण तटस्थ राहणार ’ असें जाहिर करून इटालीनें युद्धाच्या जबाबदारींतून निसटण्याचें ठरविलें. ऑस्ट्रियानें इटालीस न विचारतां सर्व्हियावर युद्ध पुकारलें होतें व मैत्रीच्या तहांतील ७ व्या कलमाप्रमाणें “ आपल्या दोस्ताला न विचारतां युद्ध पुकारणें ” अयोग्य ठरत होतें. गिऑलिटीनें–त्या वेळचा इटालीचा मुख्य प्रधान–हा आक्षेप काढून ऑस्ट्रियाला गप्प बसविलें. सरकारचें सदर धोरण इटालियन जनतेलाहि एकंदरींत मान्य झालें असावें असें दिसतें. सोशिआलिस्ट लोकांना तत्वतःच युद्ध निषिद्ध होतें, अर्थात त्यांचे-कडून तटस्थपणाला विरोध येण्याचा संभवच नव्हता. राष्ट्रीय पक्षाला जर्म-नीचे दोस्त म्हणून लढण्यास मुळींच नको होतें. मैत्रीच्या तहामुळें तशी

आपत्ती आलीच तर त्यांतून इटालीस निसटून कसें जातां येईल या विचारांत तो पक्ष होता. सरकारच्या तटस्थ धोरणामुळें त्याचेंहि समाधान झालें. मुसलिनीनें तटस्थपणाबद्दल सरकारचें अभिनंदन केलें, एवढेंच नव्हे तर 'सदर ताटस्थ्य निर्भेळ आणि निरपवाद राखावें' असा वर सरकारास उपदेशाचा एक वळसाहि दिला!

परंतु मुसलिनीची ही विचारसरणी फार दिवस टिकली नाहीं. ट्रेंट येथें बॅटिस्टीच्या सहवासांत असतांना, 'पराधीन इटाली' विषयीं मनांत उद्भूत झालेल्या विचारांनीं पुनः उचल खाल्ली. डानान्झिओच्या लेखांनीं आणि भाषणांनीं, इटालींत जो युद्धानुकूल उत्साह उत्पन्न केला त्याची बाधा मुसलिनीस झाल्या शिवाय राहिली नाहीं. अशा रीतीनें, विचारांचें संक्रमण होतां होतां १९१४ साल संपण्यापूर्वींच मुसलिनी 'इटालीनें महायुद्धांत पडावें' या मताच्या पुरस्कारार्थ चळवळ करूं लागला. त्याच्या मतानें इटालीनें युद्धांत पडावयाचें म्हणजे इंग्लंड व फ्रान्स या दोस्तांच्या वतीनें. या प्रकरणाच्या शिरोभागीं मुसलिनीच्या भाषणांतील एक अवतरण दिलें आहे, तें त्याच्या पहिल्या युद्धानुकूल भाषणापैकीं आहे. सदर भाषण १३ डिसेंबर १९१४ रोजीं मिलान येथें झालें.

मुसलिनीच्या विचारांत कशी झपाट्यानें क्रांती घडून येत होती त्याचें वर दिग्दर्शन केलेंच आहे. युद्धाला प्रारंभ झाला, त्यापूर्वीं "रेड वीक" ची चळवळ नुकतीच झाली होती; व मुसलिनीला सोशिआलिस्ट लोकांच्या शौर्यधैर्याचा चांगलाच अनुभव आला होता! रेड वीकमध्यें आलेल्या अपयशाची त्यानें त्यावेळीं मीमांसा चालविली होती, परंतु निश्चित कारण त्यांस अद्यापि मिळालें नव्हतें. इटालियन समाज

भावना प्रधान असल्यामुळें, त्यानें मनावर घेतल्यास त्याला वाटेल तें करितां येईल याबद्दल मुसलिनीची खात्री होती. परंतु सोशिआलिस्ट विचारसरणी-मुळें, देशांत जी एकप्रकारची निष्क्रीयता पसरूं लागली होती तिला आळा कसा घालावा हा विचार करण्यासारखा प्रश्न होता. दोन तपाहूनहि जास्त कालपर्यंत ज्या विचारसरणीनें समाजाच्या मनावर आपला पगडा बसविला आहे, तिला एका चुटकीसरसें हुसकून लावणें अशक्य होतें; तर उलटपक्षीं अशक्य वाटणारी ही गोष्ट शक्य करून दाखविणेंहि तितकेंच जरूर होतें.

इटालियन जनतेला आलेलें शैथिल्य घालविण्यास 'रुधिर स्नानाची जरूरी' असल्याचें मुसलिनीनें या पूर्वींच प्रतिपादिलें होतें, तें वाचकांच्या स्मरणांत असेलच. त्या विचारसरणीला मूर्त स्वरूप देण्यास महायुद्धाची पर्वणी एक उत्तम संधी आहे असें पाहून, मुसलिनीनें तिचा फायदा घेण्याचें ठरविलें. "पराधीन इटालीचा" प्रश्नहि त्याच्या मनांत डांचत होताच. असें असूनहि त्याला आपले निश्चयात्मक धोरण जाहीर करणें जरा धोक्याचें वाटत होतें. त्याच्या मनाची तयारी झाली होती; परंतु बहुजन समाज कसा तयार करावा हा त्याच्यापुढें महत्वाचा प्रश्न होता. सर्व यूरोपभर सोशिआलिस्ट विचारांचा एवढा मोठा पगडा बसून गेला होता कीं, एका प्रसिद्ध लेखकानें म्हटल्याप्रमाणें 'बहुतेक लोकांना लढाईची नुसती कल्पनासुद्धां असंभाव्य' वाटूं लागली होती. विशेषतः इटालियन कामकरी वर्ग तर या विचारसरणीनें जवळ जवळ वेडाच झाला होता. त्याला युद्धाच्या विचाराचें नांव काढलें तरी राग येई. युद्ध करणें तत्त्वतःच सोशिआलिस्ट विचारांना अमान्य असल्यामुळें त्यांनीं आपली अयुद्ध विचारसरणी साऱ्या इटालीभर अगदीं बद्धमूल केली होती. एकंदरींत इटालींत त्यावेळीं युद्ध विष-

यक उत्साह अगदीं तळच्या बिंदूस जाऊन पोहोंचला होता असें म्हणावयास हरकत नाहीं.

जनतेच्या मनाची ही स्थिति होती. सरकारकडे पहावें तर तेथेंहि युद्ध विषयक उत्साह बेताचाच होता! त्या वेळचा मुख्य प्रधान सिनॉर सॅलान्ड्रा हा गुऑलिटीच्या हातांतील एक बाहुलें असल्यामुळें त्याच्याकडून धडाडीचें एकादें कार्य अपेक्षणें वेडेपणाचें ठरलें असतें. लीबियन युद्धामुळें सरकारचा खजिना रिकामा झाला होता व सैन्याची शिस्त आणि तयारी जेमतेमच होती. कोणत्याहि दिशेकडे दृष्टि फिरविली तरी दारुण निराशा आणि निबिड अंधःकार या शिवाय कांहीं दिसत नव्हतें. या विवेचनावरून इटालियन राष्ट्राला युद्धास उभें करण्याचें काम किती कठिण असेल त्याची कल्पना होईल. पण प्रतिकूल परिस्थितीवर मात करून आपलें मत प्रभावी करील तोच पुढारी होण्यास लायक. मुसलिनीनें देशाला आपल्या मताला आणलें एवढेंच नव्हे तर विजयहि मिळवून दाखविला यांतच त्याचा मोठेपणा आहे.

मुसलिनीनें आपलें धोरण एकदम जाहीर केलें नाहीं. आस्ते आस्ते मुक्काम करीत करीत त्यानें आपलें ध्येय गांठलें. महायुद्धास प्रारंभ झाल्या-वेळीं, त्यानें निरपवाद ताटस्थ्याचा ( absolute neutrality ) पुरस्कार केला असल्याचें वाचकांस माहितच आहे. पुढें बेल्जमवरील अत्याचाराचा आणि ऑस्ट्रो–जर्मन साम्राज्यतृष्णेचा बहाणा करून, मुसलिनीनें, ‘ इटा-लीनें आपलें ताटस्थ्य कायम ठेवावें पण तसें तें ठेवणें अशक्यच झाल्यास निदान ऑस्ट्रियाच्या बाजूनें तरी युद्धांत पडूं नये ’ असा उपदेश करण्यास प्रारंभ केला. व मधून मधून जर्मनीच्या अत्याचारांचा निषेध करण्याचाहि

क्रम सुरू ठेवला. त्याच्या या कृत्यानें सोशिआलिस्ट पुढाऱ्यांना राग येणें साहजिक होतें. कारण त्यांचा बौद्धिक पिंड सर्वस्वी जर्मन सोशिआलिझम-वर वाढला असल्यामुळें व त्यांचे हितसंबंध ऑस्ट्रो-जर्मन सोशिआलिस्ट पक्षांशीं निगडीत झाले असल्यामुळें, त्यांना जर्मनी विरुद्ध लिहिलेलें खपत नसे. तसें लिहिल्यास राष्ट्रत्रय दोस्तीच्या तहाला बाध येतो व कामकरी वर्गाच्या एकोप्याला धक्का बसतो अशी त्यांची समजूत होती.

इटालियन सोशिआलिस्ट पक्षाला, मुसलिनीच्या उपरीनिर्दिष्ट विचा-रांमुळें त्याला आपल्या पक्षांत राहूं देणें योग्य आहे किंवा नाहीं या प्रश्नाचा विचार करण्याची जरूरी भासूं लागली. त्यांनीं मिलान येथें २५ नोव्हेंबर १९१४ रोजीं आपल्या पक्षाची सभा बोलाविली व मुसलिनीस सोशि-आलिस्ट पक्षांतून काढून टाकण्याबद्दल बहुमतानें ठराव पास केला. सदर सभेंत मुसलिनीनें आपल्या बचावाप्रीत्यर्थ केलेलें भाषण इटालियन वक्तृ-त्वाचा एक बहुमोल नमुना म्हणून त्या भाषेंत कायम राहील. मुसलिनी त्यावेळीं अगदीं अंतःकरणापासून बोलत होता. सोशिआलिझम त्याला प्रिय होता; त्याच्या कार्यक्षमतेबद्दल व त्याच्या उदात्त-गंभीर तत्त्वज्ञानाबद्दल त्याची खात्री झाली होती. परंतु त्याच्या उपदेशामुळें इटालियन समाजास येऊं पहाणारें क्लैब्य आणि शैथिल्य त्याला सहन होत नव्हतें. सोशिआलि-झम आणि राष्ट्रीयत्व या गोष्टी सहगामी असण्यास हरकत नाहीं असें त्यास वाटत होतें. आणि म्हणूनच त्यानें इटालीस जर्मनीविरुद्ध लढण्याचा सल्ला दिला होता. "आज बारा वर्षे सोशिआलिझम सतत आचरल्यामुळें मी आतां त्याच्यांशीं एकजीव झालों आहे. तुम्ही मला तुमच्या पक्षांतून काढून टाकलें तरी सोशिआलिझमच्या सेवेंत माझ्याकडून काडीइतकेंहि अंतर पडणार

नाहीं याबद्दल खात्री बाळगा. इटालीनें महायुद्धाचें सतीचें वाण घ्यावें व स्वातंत्र्यवीरांच्या खांद्याला खांदा लावून लढावें असें माझें मत आहे व तें मी कोणाचीहि क्षिति न बाळगतां जनतेपुढें ठेवीत आहे. आज या प्रसंगीं, आपल्याला कोण काय म्हणेल या भीतीनें, जर कोणी आपले विचार बोलून दाखविण्यास कचरत असेल तर या पुढें मी त्याची गय करणार नाहीं. माझी बाजू पंचापुढें ठेवण्यास मी केव्हांहि तयार आहे. आपल्या पक्षाच्या शिस्तीविरुद्ध मी गेलों असा माझ्यावर आरोप आहे. परंतु तसें करण्यास मला पूर्वींच्या लोकांच्या वर्तनाचे अनेक आधार आहेत व ते मी प्रसंग पड-ल्यास जरूर पुढें करीन. माझी मतें मी बदललीं याबद्दल मला बिलकुल वाईट वाटत नाहीं किंवा त्याबद्दल माझी सदसद्विवेक बुद्धी मला टोंचत नाहीं."

मुसलिनीचें हें भाषण ओज तेजानें भरलेलें तसेंच कळकळीनें ओथं-बलेलें नाहीं असें कोण म्हणेल ? त्याला सोशिआलिस्ट पक्षांतून निघून जातांना अत्यंत वाईट वाटत होतें ही गोष्ट या भाषणावरून उघड दिसते. त्या पक्षांत राहतां यावें म्हणून आपली बाजू पंचापुढें मांडण्यास तो तयार होता. परंतु त्याच्या कळकळीचा, आवेशाचा किंवा वक्तृत्वाचा सभा-सदावर यत्किंचिताहि परिणाम झाला नाहीं. सभेला सुमारें ३ हजार सोशि-आलिस्ट मेंबर हजर होते; त्यापैकीं ५० लोकांनींच फक्त मुसलिनी विरुद्ध मत दिलें नाहीं. बाकीच्या २९५० लोकांनीं मुसलिनीवर अविश्वासाचा आणि निंदाव्यंजक ठराव पास करून त्यास आपल्या पक्षांतून हांकून लावलें !

एका मोठ्या पक्षाचा, इटालींतील एका सुसंघटित आणि बलवान पक्षाचा, मुसलिनी गेलीं दोन वर्षें अधिकृत पुढारी होता. त्या पक्षाचें मुख-

पत्र त्याच्या हातीं होतें. आज त्याचें त्या पक्षांतील पुढारीपण नाहीसें झालें. अव्हांटी पत्राचा राजीनामा त्यानें यापूर्वींच दिला होता. मुसलिनीचा राजकीय आयुष्यक्रम आतां संपला असेंच त्या वेळीं कोणासहि वाटलें असेल—क्षणभर त्यालासुद्धां वाटलें असेल! पण नाहीं. असामान्य व्यक्ती प्रतिकूल परिस्थितीनें मरत नाहींत. मुसलिनीला असामान्य कोटीं-तलि व्यक्ती मानावयाचें कीं नाहीं याबद्दल कांहीं लोकांना शंका आहे. त्यांनीं प्रस्तुत परिस्थितीला मुसलिनीनें कसें तोंड दिलें व तींमधून यशस्वी रीतीनें तो कसा बाहेर पडला, या गोष्टीचा जरूर विचार करावा. देशांतील सारें लोकमत विरुद्ध बाजूला असतांहि ज्याचा आपल्या ध्येयांवरील विश्वास काडीइतकाहि ढळला नाहीं किंवा आपलें मत व्यक्त करतांना ज्यानें यत्किंचितहि भाषेचीं किंवा विचारांची नरमाई दाखविली नाहीं, त्याची योग्यता काय सामान्य समजावयाची? एवढेंच नव्हें तर त्यानें आपलें मत प्रभावी करून दाखविलें; यापेक्षां त्याच्या असामान्यतेचा आणखी पुरावा तो काय पाहिजे? असो.

मुसलिनीनें महायुद्धाचें सतीचें वाण स्वतः उचललें व राष्ट्रानेंहि तें उचलावें ह्मणून चळवळ करण्यास प्रारंभ केला. या कामीं, सुप्रसिद्ध इटालि-यन कवि डानन्झिओ आणि 'सिंडिकाली' पत्राचा संपादक फिलिपो कारिडोनी यांचा त्यास अतिशय उपयोग झाला ही गोष्ट नमूद करणें जरूर आहे. इटालींत युद्धाला अनुकूल लोकमत निर्माण करण्याचें सारें श्रेय, मुसलिनी डा'नन्झिओ आणि कारिडोनी या त्रिकुटालाच देणें जरूर आहे. यापैकीं प्रत्येकानें प्रत्यक्ष रणभूमीवर काम केलें, एवढेंच नव्हे तर कारिडोनीनें आपले प्राणहि अर्पण केले! आपल्या आवडत्या ध्येयासाठीं

आपले प्यारे प्राण अर्पण करावे लागले तरी ते आनंदानें अर्पण करणारे हुतात्मे ज्या देशांत निर्माण होतात तोच देश स्वातंत्र्य मिळवितो आणि मिळविलेलें राखतो.

मिलानच्या सोशिआलिस्ट सभेनें, मुसलिनीचा तत्पक्षीय पाठिंबा नाहींसा केला व तेवढ्यापुरता तो हतबल झाला. परंतु दुसऱ्या एका दृष्टीनें त्याचा फायदा झाला. त्याला आतां आपले विचार, त्याला स्वतःला कोणताच पक्ष नसल्यामुळें, अगदीं मोकळ्या मनानें उपदेशितां येऊं लागले. कोणतेंहि कार्य करावयाचें म्हणतांच मुसलिनीची दिसून येणारी तडफ याहि प्रसंगीं दिसून आली. या प्रकरणाच्या शिरोभागीं दिलेल्या अवतरणांवरून, त्यानें यावेळीं आपल्या नव्या कार्याची सुरवात किती धडाडीनें आणि उत्साहानें केली असेल त्याची खात्री होते.

पुढील प्रकरणांत मुसलिनीच्या नव्या पत्राची माहिती दिली आहे.

# प्रकरण १९ वें.

# पोपोलो डी इटालिया.

**प्रत्यये बोलोन उठोन गेला । चटक लागली लोकांला ।**
**नाना मार्ग सांडून त्याला । शरण येती ॥**

—श्रीमत् दासबोध :—दशक १६ समास २

" Revolution is an idea that has found bayonets to support it."

—*Napolion.*

महायुद्धाच्या सुरवातीस इटालीचें लोकमत काय होतें याचा उहापोह गेल्या प्रकरणांत केला. त्यांवरून इटालीला युद्धोन्मुख करणाऱ्यांचें काम किती बिकट, नव्हें अशक्य प्राय असेल याची सहज कल्पना होईल. पण हेंच अशक्य प्राय दिसणारें काम मुसलिनी प्रभृति मंडळींनीं हातीं घेतलें. वेळ आणिबाणीची, आणि विरोध पराकाष्टेचा अशी स्थिती होती. अर्थातच अशाप्रसंगीं उपयोगांत आणावें लागणारे उपायहि तसेच पराकाष्टेचे असावेत यांत नवल नाहीं. गॅब्रिली डानन्झिओ फ्रान्समधून १९१५ च्या वसंत ऋतूंत परत इटालीस आला व आपल्या भावनापूर्ण आणि वक्तृत्व प्रधान भाषणांनीं त्यानें सारा इटाली हां हां म्हणतां दणाणून सोडला. " इटालीनें यावेळीं आपला तटस्थपणा सोडून महायुद्धांत भाग घ्यावा. फ्रान्स, बेल्जम, इंग्लंड, आदि राष्ट्रें मानव जातीच्या स्वातंत्र्यासाठीं लढत आहेत. त्यांच्या खांद्याला खांदा लावून लढून, इटालीनें आपलें नांव जगाच्या

इतिहासांत अजरामर करावें. हा क्षण सोन्याचा आहे. मनुष्याच्या मूलभूत हक्कासाठीं, स्वातंत्र्यासाठीं, बंधुभावनेसाठीं, इटालीनें या होमकुंडांत उडी मारून आपल्या धवल संस्कृतीचें उज्वल निशाण उज्वलतर केलें पाहिजे. तरुण इटालीचें आजचें, या क्षणाचें, पहिलें आणि शेवटचें कर्तव्य एकच आहे, तें म्हणजे मनुष्यजातीच्या स्वातंत्र्यासाठीं युद्धाला तयार होणें." अशाप्रकारची त्याची विचारसरणी होती. डानान्झिओच्या भाषणांचा लोकांवर आस्ते आस्ते परिणाम होऊं लागून इटालियन तरुणांत लष्करी वारें संचारूं लागलें. इटालीचे बाहू स्फुरण पाऊं लागले.

मुसलिनीनें अव्हांटी पत्राचा राजिनामा दिला होता. त्यानंतर लौकरच त्यानें एका नव्या पत्राची तयारी केली व १४ नोव्हेंबर १९१४रोजीं आपल्या या पत्राचा पहिला अंक प्रसिद्ध केला. पत्राचें नांव Popolo d' Italia हें जंगी टायपांत दोन्हीं बाजूला पसरून दिलें होतें. त्याचा आकार, त्याचा टाइप, त्याची विचारसरणी, त्याची बातम्या देण्याची पद्धत हीं सारीं प्रचलित रूढ पद्धती विरुद्ध जणूं बंडच करावयास उठलीं आहेत असा पोपोलो हातीं घेतांच भास होई. अग्रलेखाचें नांवसुद्धां पत्राच्या एकंदर स्वरूपाला साजेसें, म्हणजे Audacio किंवा "साहस" असें दिलें होतें. या लेखांत मुसलिनीनें आपलें व आपल्या पत्राचें धोरण खालील शब्दांत व्यक्त केलें आहे. तो म्हणतो, "कांहीं सोशिआलिस्ट लोकांना माझे विचार पटत नाहींत म्हणून मी घरीं हरी हरी म्हणत स्वस्थ बसावें किंवा नव्या साधनांनीं सिद्ध होऊन पुनः लढाईला तयार व्हावें, असा प्रश्न माझ्या पुढें उभा राहिला. त्याचें उत्तर 'पोपोलोच्या' रूपानें मी आज देत आहे. निरपवाद ताटस्थ्याच्या क्रीडला चिकटून राहण्यांत अर्थ नाहीं अशी माझी

खात्री झाली आहे. माझा सोशिआलिस्टांना व कामकरी लोकांना असा प्रश्न आहे कीं, मिळेल त्या ओल्याकोरड्या भाकरीवर कसें तरी जगण्यांत भूषण आहे कीं, परिस्थितीशीं टक्कर मारून राजसत्तेच्या नांवाखालीं चाललेले पोरखेळ बंद करण्यांत भूषण आहे? कामकरी वर्गानें मनांत आणल्यास त्याला आपल्या इच्छेप्रमाणे राज्यक्रांती घडवून आणतां येईल, आणि त्यासाठीं युद्धाची संधी आपण फुकट दवडतां कामा नये. आज आपण एका मोठ्या दिव्यकालांतून चाललों आहों. त्याचें महत्व ओळखून त्याला साजेसें आपण वागणार नाहीं तर या जगांत आपल्यासारखे दुर्भागी आपणच म्हणावें लागेल. कालाच्या ओघांत वाहत जाऊन बुडून मरण्यापेक्षां त्याच्यावर आपल्या कर्तबगारीचा शिक्का उठविण्याचा प्रयत्न करण्यांतच पौरुष आहे. स्वस्थ बसण्याची ही वेळ नाहीं. युद्धाची आरोळी ऐकून आपले बाहू स्फुरण पावले पाहिजेत. या आरोळीला ओ देण्यांतच आपलें हित आहे.


. माझें हें पत्र म्हणजे माझ्या व्यक्तिगत विचारांचें मूर्तस्वरूप होय. त्यांत वाचकांस फक्त माझे विचार वाचावयास मिळतील. हें पत्र सर्वस्वी उदारमतवादी, स्वतंत्र आणि एक जात व्यक्तिप्रधान राहील. त्याच्या बऱ्या-वाईट विचाराबद्दल मी एकटा जबाबदार आहे. सोशिआलिस्ट पक्षाला विरोध करण्याची माझी इच्छा नाहीं. परंतु कोणी राष्ट्रघातकी विचार प्रदर्शित करूं लागला तर मात्र त्याची गय केली जाणार नाहीं. राष्ट्रकल्याणाच्या आड कोणी आल्यास त्यास कांपून काढण्यास पोपोलो कधींहि कचरणार नाहीं.

पोपोलो डी इटालिया

माझा हा जाहीर संदेश माझ्या तरुण मित्रांना, इटालीच्या तरुण पिढीला, मी करीत आहे. हीच तरुण पिढी उद्याचा इतिहास निर्माण करणार, अशी माझी खात्री आहे. तिला माझा हा संदेश आहे. या संदेशांत संकटें असतील, अडचणी असतील; पण त्याला कर्तव्याचा मधुर सुवास आहे ही गोष्ट विसरू नका. 'युद्धाला तयार व्हा' 'युद्धाला तयार व्हा' 'युद्धाला तयार व्हा' एवढी एकच घोषणा मी करीत राहणार. माझा हा कंठरव फुकट जाणार नाहीं अशी मला खात्री आहे."

इतक्या कळकळीनें केलेला उपदेश इटालियन तरुणांच्या अंतःकरणावर तात्काळ परिणमकारक झाला असल्यास काय नवल? हृदयाची भाषा हृदयाला समजते. तिला उपमा—अलंकारांची जरूर नाहीं. पोपोलोची भाषा सडेतोड आणि मुद्देसूद असे. अशाच नमुन्याचे, इटालीला युद्धानुकूल करणारे, तरुणांना स्फूर्ती देणारे आणि मुत्सद्यांना कार्यप्रवण करणारे लेख लिहिण्याचा या कालांत मुसलिनीनें सारखा तडाखा सुरूं ठेवला होता. त्याच्या लेखांत देशाभिमानाची जागती ज्योत तेवत असते, आणि आत्मविश्वासाचा झरा अखंड वहात असतो. त्यामुळें त्याचे लेख विलक्षण परिणामकारक ठरतात. लोहाराचा भाता फुंकणाऱ्या बेनिटोनें, थोड्याच अवधींत, इटालियन तरुणांच्या अंतःकरणांत देशाभिमानाचें वारें इतकें भरून सोडलें कीं, प्रधानमंडळाला आस्टोजर्मनी विरुद्ध युद्ध पुकारणें भागच पडावें.

मुसलिनी जसा लेखणीचा बळकट आहे तसाच कृतीनें तडफदार आणि जोरकस आहे. विचार—जागृति झाली तरी त्या विचारांना तात्काळ आचारांत येण्याची संधी न मिळाल्यास ते विचार जेथल्या तेथें मरतात. मुसलिनीला ही गोष्ट माहित होती. युद्धविचारांचा उत्साह फुकट




मुसलिनीचें हस्ताक्षर.

गेलेला त्याला पाहवला नसता. त्यानें एके दिवशीं हजारों तरुणांना एकत्र जमवून मिलान शहरभर त्यांची एक जंगी मिरवणूक काढली. युद्धोत्साह वर्धक कवनें म्हणत, राष्ट्र गीतें गात किंवा 'स्वदेशाच्या उद्धारासाठीं, आस्ट्रियासारख्या पिढीजाद शत्रूचा निःपात करण्यासाठीं, युद्धाला सज्ज व्हा' अशी घोषणा करीत ही मिरवणूक सर्व शहरभर चालली होती. तरुण इटालीचा तो उत्साह सांसर्गिक ठरून गांवातील इतरहि हजारो लोक त्या मिरवणुकीस येऊन मिळाले. तरुणांचा तो उत्साह आणि आवेश पाहून, तो उमदा उतावळेपणा पाहून, कोणा सहृदय माणसाचें अंतःकरण स्वदेशाभिमानानें भरून येणार नाहीं ? याच उत्साही तरुणांच्या रक्तानें थोड्याच अवधींत खंदकांच्या रांगा भरून जावयाच्या होत्या ! भावी राज्यक्रांतीचा वृक्ष जोमानें फोंफावण्यास या तरुण रक्ताचें त्यास खत मिळणें जरूर होतें, म्हणूनच कीं काय, पण तरुण इटाली एकादिलानें त्यावेळीं युद्धासाठीं पुढें झाला.

'पोपोलो डी इटालियानें' धडाक्यानें कामास सुरवात केली खरी. परंतु त्याची आर्थिक बाजू फारच लंगडी होती ही गोष्ट लक्षांत ठेवण्यासारखी आहे. अव्हान्टी पत्राचा मुसलिनीनें राजीनामा दिला त्यावेळीं त्याचे खिसे बहुतांशीं रिकामेच होते. त्याची मुख्य संपत्ती म्हणजे विचार आणि धडाडी. "साहसे श्रीः प्रतिवसति" हें तत्त्व त्याच्या आंगवळणी पडून गेलें आहे. अमूक एक कार्य करावयाचें म्हणून ठरविल्यावर, मग त्यांत अडचणी काय येतील हा प्रश्न मुसलिनी समोर उभाच रहात नाहीं. 'कार्याच्या धडाडी पुढें असतील नसतील त्या अडचणी आपोआप नाहींशा होतात' अशा मताचा तो आहे. आणि सुदैवानें या मताबद्दल पस्तावण्याचा प्रसंग त्याच्यावर अद्यापि

आलेला नाहीं. त्यानें या नव्या पत्राची प्राणप्रतिष्ठा केली त्यावेळीं त्याचें सारें भांडवल ४००० लीराचें आणि तेंहि एका जाहिरात दारानें आपल्या जाहिराती साठीं आगाऊ दिलेलें! दोन सहकारी आणि स्वतः मुसलिनी यांचें संपादक मंडळ बनलें होतें. ऑफिसचा थाट म्हणजे बसावयास एकेक मोडकी खुर्ची व लिहावयास, खिळखिळें झालेलें लटपटणारें एक जीर्ण टेबल! या एकंदर वर्णनावरून पोपोलाचा जन्म किती गरीबींत झाला असेल त्याची वाचकांस कल्पना येईल. परंतु याच पत्राकडून पुढें अपूर्व राष्ट्रसेवा व्हावयाची होती. सांपत्तिक दृष्ट्या पोपोलो पत्र कितीहि गरीब असलें तरी विचारांच्या बाबतींत, त्याच्या इतकें श्रीमंत पत्र साऱ्या इटालींत दुसरें नव्हतें.

पोपोलो पत्रानें आरंभापासूनच वर्तमान पत्राच्या शास्त्रांत अभूतपूर्व क्रांती घडवून आणली. खूप मोठ्या आणि जाड्या टायपांत बातम्या देण्याची पद्धत इटालींत तरी त्या वेळेपर्यंत अपूर्वच होती. बातमीला मथळा द्यावयाचा तो सुद्धां थोडासा तऱ्हेवाईक अतएव लोकांचें लक्ष वेधणारा असा देण्याविषयीं मुसलिनी काळजी घेई. कित्येक वेळां सबंध पानच्यापान एकाच बातमीनें भरून देण्याची पोपोलोची पद्धत तर सर्वस्वीं अपूर्वच म्हटली पाहिजे. संपादकीय विचार अगदीं त्रुटित पण निश्चयपूर्ण, आटपशीर आणि परिणामकारक भाषेंत मांडलेले असत. प्रत्येक स्फुटाखालीं मुसलिनीची सही असे. वर्तमानपत्रांत संपादकानें स्वतःची सही करून स्फुट लिहिण्याची पद्धत नसते; परंतु आपलें पत्र म्हणजे केवळ आपल्या विचारांचें व्यतीकरण होय हें दाखविण्यासाठींच मुसलिनीनें ही सहीची अभिनव पद्धत पाडली असावी.

लोकांना नव्या कल्पना पटवून द्यावयाच्या, त्यांच्या विचारसरणींत क्रांती घडवून आणावयाची म्हणजे तशाच जाज्वल्य साधनांचा उपयोग

करावा लागतो. बहुजनसमाजाला शांतपणें विचार करीत बसण्यास वेळ नसतो. मुसलिनीनें आपल्या पत्रांत वरील सारखे क्रांतिकारक फेरफार केले व ते परिणामीं अत्यंत यशस्वी ठरले. "लोकमताची जागृति करणें किंवा तें उत्पन्न करणें अशीं जीं वर्तमानपत्रकारांचीं दोन मुख्य कामें आहेत तीं चांगल्या रीतीनें बजावण्यास निस्पृह व कडक लेख लिहिणें अत्यंत जरूरीचें आहे." असें लो. टिळकांचें मत असे. मुसलिनीचे १९१४ ते १९१५ या सालचे लेख किंवा भाषणें पाहिलीं तर त्याची व लोकमान्यांची लोकमत तयार करण्याची पद्धत किती तंतोतंत एक होती त्याची कल्पना होते. कोणत्याहि चळवळीचा पूर्वेतिहास पाहूं गेल्यास याच विचारसरणीनें लोकजागृतीचें कार्य केलें असल्याचें दिसून येईल. सुप्रसिद्ध कवि केशवसुत यांनीं रूढ आचारविचाराविरुद्ध बंड पुकारलें त्यावेळीं त्यांनीं सतार, बीन यांसारखीं मंजुळ वाद्यें फेंकून दिलीं. आणि—

**फुंकिन मी जी स्वप्राणानें,**
**भेदुन टाकिन सगळीं गगनें,**
**दीर्घ जिच्या त्या किंकाळीनें,**

अशा तुतारीच्या सहाय्यानें आपल्या नवविचारांची घोषणा सुरू केली. लोकविलक्षण कार्य करावयाचें असल्यास लोकविलक्षण साधनांचाच उपयोग केला पाहिजे.

थोड्याच अवधींत मुसलिनीनें एवढें प्रचंड लोकमत तयार केलें कीं, वर सांगितल्याप्रमाणें इटालियन सरकारास ऑस्ट्रियाविरुद्ध युद्ध पुकारणें भाग पडलें.

पोपोलो डी इटालिया.

मुसलिनीच्या हातांत वर्तमानपत्र आणि वक्तृत्व हीं दोनच साधनें होतीं. त्यांचा पराकाष्ठेचा उपयोग करून त्यानें इटालीस युद्धोन्मुख केलें. विचारांची क्रांती तीच खरी क्रांती. युद्धाला पराङ्मुख झालेल्या राष्ट्राला युद्धसन्मुख बनविलें यापेक्षां जगांत क्रांतिकारक कामगिरी दुसरी कोणती असूं शकेल !

वर्तमानपत्र आणि वक्तृत्व हीं दोन्हीं वाङ्मयाचीं साधनें आहेत. या वाङ्मयसाधनांनीं मुसलिनीनें विचारक्रांती घडवून आणली; आणि याच विचारक्रांतीच्या पायावर त्याच्या भावी राज्यक्रांतीचा प्रचंड प्रासाद उठला. वाङ्मयाच्या बळावर राज्यक्रांती घडवून आणतां येते ती अशी.

## प्रकरण २० वें.

# खांद्यावर बंदूक टाकून

To-day it is war, it will be Revolution to-morrow.

—*Mussolini.*

इटालीनें ता. २४ मे १९१५ रोजीं दोस्तांच्या बाजूनें लढाईचा " हरहर महादेव " केला. केलेल्या श्रमांचें चीज झालें, इटालीनें स्वातंत्र्य युद्धाला, मानवी मूलभूत आकांक्षाना, ओ दिली, याबद्दल मुसलिनीला त्यावेळीं किती आनंद वाटला असेल, किती धन्यता वाटली असेल याची कल्पना आणून देणें शब्दसामर्थ्याबाहेर आहे.

त्या दिवशींच्या पोपोलो डी इटालीयामध्यें, " आज आपल्या राष्ट्रानें युद्धाचें सतीचें वाण उचललें. आजपासून आपण सर्व इटालियन एकमेकाला फक्त इटालियन या एकाच नात्यानें ओळखूं या. भेदाभेदांची पक्षोपपक्षांची केव्हांच राख झाली आहे. आतां तरवारीची तरवारीशीं गांठ पडणार, यावेळीं इटालीच्या जयजयकारानें राष्ट्र दुमदुमून गेलें पाहिजे. इटाली, इटाली........जय इटाली. " असा उत्साहसंदेश प्रसिद्ध झाला होता.

इटालीचा युद्धोत्साह अवर्णनीय होता. मुसलिनीनें तिला महायुद्धांत भाग घेण्यांस लावण्यांत जसे अविश्रांत श्रम घेतले तसेच युद्ध विषयक उत्साह सर्व राष्ट्रभर प्रसृत करण्यासाठींहि त्यानें जीवापाड धडपड केली.

मुसलिनीचें जीवनचरित्र म्हणजे मूर्तिमंत विरोध आणि झगडा आहे. त्यानें हातीं घेतलेल्या कामाला अडथळे आले नाहींत, कट्टा विरोध झाला नाहीं, वाग्युद्ध जुंपलें नाहीं, असा एकहि प्रसंग सांपडणें कठिण. मुसलिनी आणि विरोध हे समानार्थी शब्द आहेत असें कोणी म्हटल्यास त्यांत बिलकुल अतिशयोक्ती होणार नाहीं. या बाबतींत लो. टिळकांच्या व मुसलिनीच्या चरित्रांत दिसून येणारें साम्य आश्चर्यकारक आहे. टिळक–मुसलिनीसारख्या अतिमानुष व्यक्तींच्या कृत्यांना विरोध होण्याचें मुख्य कारण म्हणजे त्यांच्या उद्दिष्टाविषयीं अदूरदृष्टींच्या लोकांना वाटणारा गैर विश्वास. अतिमानुष व्यक्ती, मंत्रद्रष्टया ऋषीप्रमाणें दिव्यदृष्टीनें युक्त असतात. त्यांना त्यांचें ध्येय स्पष्ट दिसत असतें; भाविष्यकाल वर्तमानकालाइतकाच त्यांना सुस्पष्ट दिसत असतो; व साध्यसाधनांविषयीं त्यांचे विचार ठाम आणि निश्चित झालेले असतात. त्यांचें आकलन सर्व साधारण बुद्धीला कसें होणार? "आपल्याला ज्या गोष्टी सूर्यप्रकाशासारख्या स्पष्ट दिसतात त्या या लोकांना कां दिसूं नयेत" याचें कोडें अशा पुरुषांना उकलत नाहीं आणि उलट "हा पुरुष काय म्हणत आहे कोण जाणे?–पुढें काय होणार, दैवगति काय असेल, तें ब्रह्मदेवालाहि सांगतां येणार नाहीं मग याची ती गोष्ट काय" अशा विचारानें सर्वसाधारण लोक त्याच्या ध्येयाविषयीं साशंक असतात. विरोधाचें मूळ यांत असलें पाहिजे. पण लोकविलक्षण विभूतीचें श्रेष्ठत्व यांतच कीं, विरोध सहन करूनहि शेवटीं आपलें मत प्रभावी करावयाचें, व आपल्या विचारांची सत्यता सर्वसाधारण लोकांना पटवून द्यावयाची.

मुसलिनीनें इटालीला महायुद्धाचें महत्व समजाऊन दिलें व त्याचा इष्ट तोच परिणाम झाला. याकामीं त्याच्या कल्पनेपेक्षांहि जास्त यश त्याला

आले. थोड्याच अवधींत स्वयंसैनिकांच्या चळवळीस त्यानें प्रारंभ केला, व हजारों स्वयंसैनिक मिळविले. वयोवृद्ध म्हाताऱ्यापासून तो अर्धस्फुट मिसरुटा-पर्यंत सर्व दर्जाचीं वयोमानें स्वयंसेवक–संघांत समाविष्ट झालीं होतीं. आपल्या वयाच्या १६ व्या वर्षी ज्यानें गॅरीबॉल्डीच्या निशाणाखालीं काम केलें होतें अशा एका वृद्धानेंहि आपलें नांव स्वयंसेवक पटांत दाखल केलें ! त्यावेळीं इटालियन राष्ट्राला जणूं नवें तारुण्य प्राप्त होऊन तरुण-वृद्ध हा फरक नाहींसाच झाला.

थोड्याच अवधींत खुद्द मुसलिनीनेंहि खांद्यावर बंदुक टाकून खाकी पोषाख चढविला. त्यानें आपल्या सहकारी स्नेह्यांना उद्देशून खालील जाहीर पत्र पोपोलोंत लिहिलें आहे. तो म्हणतो, "युद्धप्रांत कक्षेंतून आपण आतां प्रत्यक्ष अग्निप्रांतांत प्रवेश करीत आहों. लोकांनीं हें पत्र वाचण्या-पूर्वींच मी सरहद्दीपार गेलों असेन. आमच्या मातृभूमीची सरहद्द दुष्ट बुद्धीनें ठरवून तिचा अपमान करण्यांत आला आहे. हें शल्य आपण या पुढें सहन करितां कामा नये. या प्रसंगाची मी किती आतुरतेनें वाट पहात होतों तें तुम्हाला आज नव्यानें सांगितलें पाहिजे असें नाहीं. मला होणारा आनंदहि तुम्ही सहज जाणूं शकाल. 'स्वातंत्र्य युद्धा" च्या कालीं लोकांत दिसून येणारें चैतन्य आज पुनः अवतीर्ण झालेलें पाहून माझा आनंद द्विगुणित झाला आहे.

"इटालियन समाजाचें अंतःकरण शाबूद आहे. लढाईच्या प्रसंगीं पडेल तो स्वार्थत्याग करावयाला जनता तयार आहे अशी माझी खात्री झाली आहे. विजयश्री शेवटीं आम्हांलाच माळ घालणार याबद्दल मला बिलकुल शंका नाहीं. इटालीच्या उज्वल भविष्यकालावर माझा पूर्ण विश्वास आहे. इटालीचा विजय ठरलेला आहे. तो मिळेल आणि तो मिळालाच पाहिजे.

**खांद्यावर बंदूक टाकून.**

" आम्ही तिकडे लढाईवर, थंडीनें कुडकुडत आणि प्रतिक्षणीं मृत्यूशीं झुंजत असतां, मागें रहाणाऱ्या तुम्हां लोकांवरहि एक जबाबदारी आहे. ती म्हणजे, मागील व्यवस्था पाहणें. ती उत्कृष्टपणें राखली गेली तरच आम्हाला निश्चिंतपणें लढतां येईल ही गोष्ट लक्षांत ठेवा. त्यासाठीं तुम्हाला डोळ्यांत तेल घालून अहर्निश जपलें पाहिजे. दुर्बल विचारांना एका क्षणाचाहि थारा देऊं नका. आपल्यापैकीं दोघांनाहि लढावयाचेंच आहे. माझ्या कार्याचें यापुढें वारसदार तुम्ही आहांत. ' इटालीमनुस्मर युध्यच ' एवढाच माझा राष्ट्राला संदेश आहे.

" मला स्वतःविषयीं कांहींच म्हणावयाचें नाहीं. भवितव्यतेच्या बऱ्या वाईट प्रसंगाला आनंदानें तोंड देण्यास मी सदैव तयार आहे. मला अशा प्रसंगांची यत्किंचितहि क्षिती वाटत नाहीं. "

सहकाऱ्यांना उद्देशून लिहिलेल्या या पत्रांत मुसलिनीचा युद्धविषयक उत्साह व तडफदार शिपाईबाणा जितक्या स्पष्ट रीतीनें व्यक्त होतो तितक्याच स्पष्ट रीतीनें त्याचे मुत्सद्देगिरी आणि सावधानता हे गुणहि दिसून येतात. आपल्यामागें सोशिआलिस्ट लोक तहाची ओरड करतील, युद्धोत्साह शिथिल करण्याचा प्रयत्न होईल, व प्रसंग विशेषीं राजकीय पक्षांतील कलह विकोपास जाऊन मोठी आणीबाणीची परिस्थिती निर्माण होईल याची कल्पना मुसोलिनीला होती आणि ह्मणूनच त्यानें आपल्या सहकारी स्नेह्यांना अशा परिस्थितीला नेटानें तोंड देण्याचा आणि ' डोळ्यांत तेल घालून जपण्याचा ' इषारा दिला आहे. दूर दृष्टीची राजकारणपटुता आणि धडाडीची क्षात्रवृत्ती यांचा सुंदर मेळ ह्मणजेच मुसलिनीचें जविनचरित्र होय.

# प्रकरण २१ वें

# जखमी शिपाई.

"A nation is great when its spiritual force is transferred into reality"

—*Mussolini*

" शत्रुपक्षाकडील गोळ्यांचा वर्षाव चालूं असतांहि आपण निधड्या छातीनें पुढें जाण्याचें शौर्य गाजविलेत व आम्हालाहि बरोबर नेऊन त्या यशाचें वाटेकरी केलेत. यापुढें नेहमीच आम्हाला तुमच्या अधिकाराखालीं काम करावें अशी माझी व माझ्या तुकडीची इच्छा आहे. " अशा अर्थाचे उद्गार मुसलिनीला उद्देशून एका सैनिकानें पहिल्याच दिवशीं काढल्याचें सर्फाटीबाईनीं नमूद केलें आहे.

१९१५ ते १९१७ पर्यंत मुसलिनीनें लष्करी नोकरी केली, आणि प्रायः ती सर्व आघाडीवरच. या अवधींत त्यानें एक त्रोटक रोजनिशी ठेविली होती; व ती पुढें War Diary म्हणून प्रसिद्धहि करण्यांत आली. रणधुमाळीच्या ऐन भाऊगर्दींत ती लिहिली असल्यामुळें त्यांतील वाक्यरचना असंबध, त्रुटित आणि केवळ कल्पनावाही आहे. सर्व गोष्टींचें उल्लेख अगदीं मोजक्या शब्दांत केलेले आढळतात. या डायरीवरून तत्कालीन युद्धपरिस्थितीवर आणि लोकमतावर बराच प्रकाश पडतो. सदर रोजनिशींतील कांहीं भाग मुद्दाम खालीं उद्धृत केला आहे.

**जखमी शिपाई.**

"१९१५ चा पावसाळा अल्टोइसोन्झोच्या खंदकांत गेला. मी केवळ साधा सैनिक होतों. आमच्या बरोबर गेलेल्या किंवा मागून आलेल्या प्रत्येक सैनिकाला येथील हिंवाळ्याचें आजन्म स्मरण राहील, इतका तो कडक होता. सैनिकांना सहन कराव्या लागणाऱ्या हालांचे वर्णन करण्यास शब्द अपुरे पडतात."

"सूर्य प्रकाश मंद असून वरून गोळ्यांचा मुसळधार पाऊस पडत होता. आमचा खंदक डोंगरांत आहे. साऱ्या दिवसांत काडीचेंहि काम नव्हतें. जखमी शिपायांची नेआण चालली होती तेवढीच काय ती हालचाल. डावी उजवीकडे घोडदळ आणि मध्यें आम्ही ! एकंदरींत मजा आहे."

"दुपारची वेळ. आकाश भरून येत आहे......मधून मधून पावसाच्या सरीहि पडत आहेत...... जवळच रिझाटी, मसारी आणि सान्ड्री यांचें ताग, दलाली, बाजारभाव आदि विषयावर वाद विवाद चालला आहे. यावेळीं सुद्धां त्यांना याविषया शिवाय दुसरे विषय सूचूं नयेत ना ?"

"एका कारखान्याच्या अंगणांत बसून घाईघाईनें या चार ओळी मी खरडीत आहे. माझा एक सोबती झोंपी गेला आहे. दुसरा एकजण कांहींसें लिहीत आहे; पलीकडे, कांहीं लोक 'मोरा' खेळ खेळत आहेत. मधून मधून तोफेच्या गोळ्यांचा 'सूं सूं' आवाज ऐकूं येत आहे. मला हा जीवनक्रम फार आवडतो. अगदीं साध्या आणि अत्यंत उदात्त गोष्टींचा सुंदर संयोग या ठिकाणीं अनुभवास येतो."

"खंदकांतील जीवनक्रम थोडासा कंटाळवाणा असला तरी एकंदरींत तो निसर्गाला धरून आहे. सकाळी लौकर उठावें लागतें. बाकीच्या वेळीं तुम्ही केव्हांहि झोंपीं गेलांत तरी हरकत नाहीं ! दुपारीं आम्हाला

कांहीं एक उद्योग नसतो. वाटल्यास दुसऱ्या तुकडींत कोणी स्नेही सोबती असल्यास त्याला भेटून यावयास हरकत नाहीं मात्र जातां येतां गोळी लागून केव्हां कपाळमोक्ष होईल त्याचा नेम नाहीं. वेळ जाईना तर आम्ही पत्ते खेळतों आणि तोफा सुरूं झाल्या म्हणजे गोळ्यांचे बार मोजित बसतो. सैनिकांना खाणें पिणें देताना जो गोंधळ उडेल तेवढचि काय ती करमणूक. ''

एक वर्षभर सैनिकांत मिळून मिसळून काम करण्याची संधी मिळाल्यामुळें मुसलिनीला त्यांच्या विचारांची, आणि आशा-आकांक्षांची उत्तम कल्पना आली. आणि धैर्य धडाडी आदि गुणांत इटालियन सैनिकाचा नैतिक जोम पहिल्या प्रतीचा असल्याबद्दल त्याची खात्री झाली.

सैनिकांच्या नैतिक जोमावर ( morale ) लढाईचें यशापयश अवलंबून असतें. या नैतिक जोमाचा पाठिंबा होता म्हणूनच श्रीशिवाजी महाराजांना हिंदुपदपातशाही स्थापितां आली. मावळ्यांची ती खुजी, बावळट, भाबडी दिसणारी मूर्ती कोणीकडे आणि मोंगलांची ती दरारा बसविणारी रुबाबदार देहयष्टी कोणीकडे ! केवळ जड देहापुरतेंच बोलावयाचें तर मोंगल लोक मराठ्यांपेक्षां निःसंशय श्रेष्ठ होते. पण शेवटीं रणक्षेत्रावर मराठेच सरस ठरले याचें कारण मराठ्यांच्या अंगचा नैतिक जोम. त्यांच्या त्या छोट्या वक्षस्थळांना आणि बारक्या बाहूंना सहस्त्रार्जुनाचें सामर्थ्य देणारा जागता स्व-देश--धर्माभिमान त्यांच्या अंतःकरणांत अहर्निश जागृत होता म्हणून त्यांना यश आलें. एका दृष्टीनें महाराष्ट्राच्या इतिहासाला आंतरराष्ट्रीय लष्करी महत्व आहे. विनासहाय एका मोठ्या साम्राज्याची स्थापना करणें म्हणजे केवढें अघटित काम ! पण मराठ्यांनीं तें करून दाखविलें. आणि तें केवळ नैतिक जोमाच्या बळावर. या दृष्टीनें विचार करतां मराठ्यांची कर्तबगारी

जगाच्या इतिहासांत अपूर्व आणि अनन्यसामान्य म्हणून गाजत राहील अशी प्रस्तुत लेखकाची खात्री आहे.

अशाच नैतिक जोमानें त्या काळचा इटालियन सैनिक लढत होता. कमी अधिक प्रमाणांत मुसलिनीचाच आवेश साऱ्या देशभर पसरला होता असेंहि म्हणावयास हरकत नाहीं. त्याकाळीं इटालियन सैनिकांनीं हालअपेष्टांची पर्वा केली नाहीं. राष्ट्र प्रत्यक्ष मृत्यूंशीं लीलेनें खेळूं लागलें म्हणजेच तें उदयाला येतें. याचा अनुभव त्याकाळीं इटालीस आला. मुसलिनीनें सैनिकांच्या नैतिक जोमांविषयीं लिहितांना खालील उद्गार काढले आहेत. तो ह्मणतो, " जबाबदारीची जाणीव, कर्तव्य पालनाची हौस, आणि प्रतिकाराची तयारी या गुणांचा मिलाफ म्हणजेच व्यक्तिगत नैतिम जोम होय. परिस्थितीप्रमाणें यांत फरक झाला तरी या तीन गुणांच्या समुच्चयाला नैतिक जोम हें नांव देण्यास हरकत नाहीं. ज्यावेळीं, शत्रू शास्त्रीय कौशल्य आणि शिस्त यांनीं युक्त असतो त्यावेळीं तर विजय मिळविण्यास या नैतिक जोमासारखें दुसरें साधन नाहीं. नुसत्या तोफा बंदुका असून भागत नाहीं. तोफांच्या सरबत्तीबरोबरच, छातीचा कोट करून मृत्यूवर तुटून पडणारी वीर सेना असावी लागते."

मुसलिनीविषयीं त्याच्या अधिकाऱ्यांनीं उत्तम अभिप्राय व्यक्त केला होता. " स्पृहणीय चलाखी, उत्कृष्ट प्रसंगावधान आणि मनाचा गंभीरपणा मुसलिनीच्या ठिकाणीं दिसून येतो " असें त्याच्या वरिष्ठांनीं लिहिलें आहे. लष्करी अधिकाऱ्याकडून इतकें चांगलें प्रशंसापत्र फारच थोड्या लोकांना मिळत असेल. यानंतर त्यास १०० लोकांवरील मुख्य म्हणजे कार्पोरल करण्यांत आलें, व कांहीं दिवसांनीं त्यास सार्जंटची बढती मिळाली. परंतु

ऑफिसरचा हुद्दा त्यास केव्हांच मिळाला नाहीं. याचें कारण मुसलिनी-विषयीं सरकारला वाटणारी भीती. त्यांच्या मतानें मुसलिनी म्हणजे सोंचि-आलिस्ट क्रांतिकारक माणूस ! "त्याला ऑफिसर केलें आणि त्यानें आपल्या सत्तेचा उपयोग सरकारविरुद्ध बंड पुकारण्यांत केला तर काय करा "! मुसलिनीविषयीं तत्कालीन प्रधानमंडळांत अतिशय अविश्वास असे हेंच त्याला ऑफिसर न करण्याचें मुख्य कारण होतें. असो.

अशा रीतीनें त्याची सैन्यांतील नोकरी चालली होती. इतक्यांत एके दिवशीं एक तोफ फुटून मुसलिनी भयंकर रीतीनें जखमी झाला. २३ फेब्रुवारी १९१७ चा तो दिवस होता. शत्रूवर तोफा डागण्याच्या कामावर मुसलिनीची योजना करण्यांत आली होती. गोळ्यांचा वर्षाव इतका चालला होता कीं, तोफासुद्धां तापून लाल झाल्या. त्यापुढें तोफा डागणें सुरूं ठेविल्यास अपघात होण्यांचा संभव होता व या गोष्टीकडे त्यानें आपल्या ऑफि-सराचें लक्ष वेधण्याचा प्रयत्न केला. परंतु उत्साहाच्या भरांत ऑफिसरानें तिकडे लक्ष दिलें नाहीं व तोफ फुटली. आणि आजूबाजूचे लोक ठार किंवा जखमी झाले. मुसलिनी तोफेच्या धक्यासरशीं बेशुद्ध होऊन कोठच्याकोठें जाऊन आदळला. त्याच्या सर्व आंगावर भयंकर जखमा झाल्या. ताबडतोब त्यांस इस्पितळांत नेण्यांत आलें. लहानमोठ्या मिळून त्याला ४२ जखमा झाल्या होत्या.

मुसलिनीची सहनशक्ती यावेळीं लोकांच्या चांगलीच प्रत्ययास आली. त्याला क्लोरोफॉर्म देण्यास हरकत नव्हती परंतु मुसलिनीनें क्लोरो-फॉर्म घेण्याचें नाकारून, शरीरावर मनाचा ताबा किती चालूं शकतो याची कल्पना आणून दिली. ४०।४२ जखमा रोज धुवून बांधाव्या लागत; त्यावेळीं होणाऱ्या यमयातनांचें वर्णन कोण करूं शकेल ? पण मुसलिनी जात्याच

सशक्त आणि कंटक प्रकृतीचा असल्यामुळें त्यानें या यातना अत्यंत धीरानें सहन केल्या. हॉस्पिटल मध्यें खुद्द इटालीचे राजेसाहेब मुसलिनीच्या समाचारार्थ गेले होते. मुसलिनीची ती शांतवृत्ती पाहून त्यांनासुद्धां आश्चर्य वाटल्याशिवाय राहिलें नाहीं.

आपल्या 'पोपोलो' पत्राला त्यानें या प्रसंगीं दिलेला संदेश त्याच्या नेहमीच्या वृत्तीला साजेसाच होता; तो ह्मणतो, "आज मी कृतार्थ झालों असें मला वाटतें. ज्या न्याय्य आणि उज्वल ध्येयाप्रीत्यर्थ दोस्त राष्ट्रें लढत आहेत त्यांच्या विजयासाठीं यापेक्षांहि जास्त खडतर दिव्यांतून जावें लागलें तरी जाण्यास मी आनंदानें तयार होईन. इटाली आणि स्ट्रीस्ट, यांना जोडणारा मार्ग माझ्या रक्तानें शिंपला गेला याबद्दल मला अभिमान वाटतो."

मुसलिनीवर दुसरीएक आपत्ती आली होती. परंतु ईश्वरकृपेनें तो त्यांतून बचावला म्हणावयाचा मुसलिनीच्या जखमीपणाची वार्ता हां हां म्हणतां चोहींकडे पसरली. एका पत्रानें तर मुसलिनीचा फोटो देऊन त्याला कोणत्या हॉस्पिटलमध्यें कोठें ठेविलें आहे वगैरे इत्थंभूत हकीगत प्रसिद्ध केली. शत्रुराष्ट्राला ही हकीगत समजतांच थोड्याच अवधींत ऑस्ट्रियाच्या विमानांनीं त्या हॉस्पिटलवर बांबगोळ्यांचा वर्षाव करण्यास सुरवात केली. क्षणार्धांत एकच गोंधळ उडून गेला. इतर सर्व जखमी लोकांना दुसऱ्या ठिकाणीं नेण्यांत आलें. परंतु मुसलिनीस हालवितां येणें शक्य नसल्यामुळें 'शत्रूच्या बॉंबगोळ्यांना तोंड देण्यास मी एकटाच त्या हॉस्पिटलमध्यें शिल्लक राहिलों.' यानंतर थोड्याच दिवसांत त्याला बरें वाटलें व त्याची रवानगी मिलान येथें करण्यांत आली.

# प्रकरण २२ वें

# पुनश्च हरी:ॐ.

स्वसुख न गणितां तूं कष्टसी लोककार्यीं
प्रतिदिनिं, अथवा ही बाणली वृत्तिठायीं ॥

—महाराष्ट्र शाकुंतल

हॉस्पिटलमधून मुसलिनीची घरीं रवानगी झाली असली तरी त्याच्या प्रकृतीला अद्यापि पूर्ण आराम वाटला नव्हता. जखमांतून सारखें रक्त जाऊन जाऊन तो क्षीण झाला होता. त्याला फारवेळ एकसारखें बोलत बसण्याचेसुद्धां श्रम होत नसत. डॉक्टरांनीं त्यास पूर्ण विश्रांति घेण्याचा सल्ला दिला होता. परंतु मुसलिनीच्या चळवळ्या, कार्यप्रधान, तडफदार वृत्तीला तो न पटून त्यानें मिलानला येतांच आपल्या पत्राचा 'चार्ज' घेतला.

मुसलिनीनें खांद्यावर बंदुक टाकल्याला २ च वर्षें झालीं होतीं. परंतु तेवढ्या अवधींत इटालीमध्यें महदंतर पडलें होतें. १९१७ सालाच्या प्रारंभापासून समाजसत्तावाद्यांनीं तहाविषयीं ओरड करण्यास प्रारंभ केला होता. त्याची अस्पष्ट कल्पना मुसलिनीस खंदकांमध्यें आली होती परंतु प्रत्यक्ष स्वदेशीं परत आल्यावर त्याच्या नजरेस जो प्रकार पडला त्यानें त्याचें अंतःकरण विदीर्णच झालें. ज्या क्लैब्य वृत्तीची मुसलिनीस भीती वाटत होती तिचा प्रभाव चोहोकिडे झाला होता. 'ऑफिसर लोकांत निरुत्साहाचें वारें शिरूं लागलें असून शिपायांना तर लढाई संपलीच असें वाटून कित्येकांनीं घरीं परत जाण्याची तयारी केली.' होती.

इटालियन पार्लमेंटांत सोशिआलिस्टांचें विशेष वजन असल्यामुळें त्यांनीं तेथें तहाविषयीं गडबड चालविली होती. राशियांत झारशाही नामशेष होऊन सगळीकडे लेनीनच्या समता–तत्त्वाचा उदोउदो होऊं लागला. त्या मतांची झळ इटालीसहि लागून समाजसत्तावाद्यांचीं अंतःकरणें बोल्शेव्हिक कल्पनांनीं वेडावून गेलीं. त्यांनीं लहानमोठीं चोपडीं प्रसिद्ध करून, वर्तमानपत्रांत लेख लिहून, हस्तपत्रकें वाटून, आणि सभाभाषणांची गर्दी उसळून देऊन बोल्शेव्हिक मतांचा जयजयकार चालविला होता. एकंदरींत बहुजनसमाज युद्धांविषयीं उदासीन झाल्यासारखा दिसत होता.

मुसलिनीच्या लक्षांत ही परिस्थिती येण्यास वेळ लागला नाहीं. इटालीची अशी हीनदीन स्थिती झालेली पाहून त्याच्या अंतःकरणाची काय स्थिती झाली असेल ती सांगणें कठिण आहे. परंतु निराशेनें खचून जाणारा तो नसल्यामुळें, त्यानें आपल्या प्रकृतीकडे दुर्लक्ष करून प्रस्तुत परिस्थितीला निश्चयानें तोंड देण्याचें ठरविलें.

इटालीला बेनसीझा येथें थोडासा विजय मिळाला होता. त्याचा फायदा घेऊन मुसलिनीनें, प्रधान मंडळास, लोकांना धीर आणि उत्साह देण्याचा सल्ला दिला. " परस्परांतील द्वेषाला मूठ माती द्या. पक्षभेदांना जाळून खाक करा आणि मातृभूमीच्या उद्धारार्थ एकदिलानें कार्यास लागा. तरुण इटालीनें आपलें सार सर्वस्व मायभूच्या सेवेसाठीं अर्पण केलें आहे. असा अमोल ठेवा, सद्गृहस्थहो, हातचा फुकट घालवूं नका. शत्रूला ठेंचण्याची आलेली ही सुवर्णवेळां वायां दवडूं नका. प्राचीनकाळच्या वीरांना शत्रूच्या जमिनी देण्याची पद्धत असे. इंग्लंडालाही या पद्धतीची उपयुक्तता पटूं लागली आहे. इटालीनेंसुद्धां या तत्वाचा अवलंब कां करूं नयें?

द्या. शत्रूच्या राष्ट्राची संपत्ती आपल्या शूर शिपायांना मुक्त हस्तानें द्या. जित राष्ट्राच्या जमिनी आमच्या शेतकऱ्यांना मिळूं द्या. रणांगणावर आत्मयज्ञ करणाऱ्या लोकांच्या सामर्थ्यावरच कोणत्याही सुधारणांचा विजय अवलंबून असतो. त्यांना विसरून चालणार नाहीं. त्यांच्या अंतःकरणांत आशेचा अंकूर फुटूं द्या. विजयश्री मिळविण्याचा त्यांचा निश्चय आहे. ते ती खास मिळावितलि याबद्दल बिलकूल शंका नको." असा मुसलिनीच्या या उत्साह-वर्धक संदेशाचा मतितार्थ होता. पण व्यर्थ. कार्य–कर्तृत्वाची ज्यांना माहिती नाहीं त्यांना या संदेशांतील भावना कशी कळावी ? बृहन्नडेनें उत्तराला स्फूर्तिदायक अशा पुष्कळ गोष्टी सांगितल्या, पण ज्याचें आयुष्य जनानखान्यांत गाद्या गिरद्यांवर लोळण्यांत गेलें त्याच्या बाहूंना स्फूरण कसें चढणार ? तीच स्थिती त्या काळच्या प्रधानमंडळाची होती. इटालीसाठीं आत्मार्पण करणाऱ्या वीरांच्या उच्च आकांक्षांचें आकलन करण्याचें सामर्थ्य तत्कालीन इटालियन सरकारचें ठिकाणीं नव्हतें. त्यानें चढाईचें धोरण स्वीकारलें नाहीं व बेनसीझाच्या विजयानें प्राप्त झालेला मोका फुकट दवडला.

मुसलिनीच्या आक्रोशाकडे त्यावेळीं इटालियन सरकारनें पूर्ण कानाडोळा केला असला तरी परिस्थितीपुढें त्याचा इलाज चालला नाहीं. कित्येक वेळां ज्या गोष्टी मानवी प्रयत्नांनीं होत नाहींत त्या विधिघटनेनें घडून येतात. असाच प्रकार इटालीच्या इतिहासांत या वेळीं घडून आला व त्याचा कॅपोरेटो येथें पराभव झाला. 'मॉडर्न रिव्ह्यू' च्या सुप्र-सिद्ध संपादकांनीं–रामानंद चतर्जी यांनीं–एका ठिकाणीं म्हटल्याप्रमाणें, 'A nationwide movement can be produced only by a nationwide disgrace." इटालीनें कॅपेरेटोचा पराभव अनु-भाविला नसतां तर मुसलिनीच्या लेखनाकडे इतक्या लौकर कोणाचेंहि लक्ष

 पुनश्च हरिःॐ

गेलें नसतें. पण या पराभवानें इटालियन जनता आणि सरकार यांचे डोळे उघडले. इटालीच्या यशोमंदिराचा कळसच ढांसळला अशी इटालियन राष्ट्राची कल्पना झाली. तात्काळ सरकारनें सैन्याची शिस्त सुधारली, दारू गोळा भरपूर भरला, आणि शत्रूवर एकदम जोरानें हल्ले करण्यास सुरवात केली. इकडे पोपोलो पत्रांतून मुसलिनीची विजयघोषणा चालूच होती.

"राष्ट्रघातकी विचारांची गय करण्याची ही वेळ नव्हे. बोल्शेव्हिक मतांना यावेळीं आपण एका क्षणाचाहि थारा देतां कामा नये. आज आपल्याला शिस्तिची अतिशय जरूरी आहे. स्वातंत्र्याची थोरवी मोठी आहे, पण सध्यां कांहीं दिवस आपण त्या उदात्त तत्वाला रजा दिली पाहिजे. शिस्त हें आपलें ध्येय असलें पाहिजे." प्रत्यक्ष सैन्यांत दाखल न झालेल्या लोकांच्या कर्तव्याविषयीं लिहितांना मुसलिनी म्हणतो, "त्यांनीं आपल्या आत्म्याच्या आणि अंतःकरणाच्या सर्व शक्ती एकवटून शत्रूचा प्रतिकार करण्याची इच्छा करावी." हें वाक्य वाचून म. गांधींच्या आत्मिक बळाचीच भाषा आपण वाचीत आहों असा भास होतो. पण कुठें महात्माजी आणि कुठें मुसलिनी !

२५ आक्टोबर तों १ नोव्हेंबर हा आठवडा इटालीच्या इतिहासांत चिरस्मरणीय होऊन राहील. त्या काळीं आबालवृद्ध लोकांचे बाहू स्फुरण पावूं लागून प्रत्येकाला कॅपोरेटोच्या सूडाशिवाय दुसरें कांहीं दिसत नव्हतें. त्यांच्या त्वेषाला आणि उत्साहाला स्पष्ट स्वरूप देण्याचें काम पोपोलो पत्रांतून केलें जात होतें. त्या काळीं असा एकहि दिवस गेला नाहीं कीं, ज्या दिवशीं मुसलिनीचे तप्त शब्दगोल पोपोलोच्या तोफेंतून उडाले नाहींत. मुसलिनीचे तत्कालीन लेख व भाषणें पाहिलीं म्हणजे नेपोलियनाच्या War Addresses ची आठवण होते.

## मुसलिनी

कॅपोरेटोच्या पराभवानें असो किंवा मुसलिनीच्या अविश्रांत लेखनामुळें असो, पण इटालीचा युद्धविषयक उत्साह पुनः ताजातवाना झाला व त्यानें लौकरच ऑस्ट्रियाचा पराभव करून आपलें मलिन झालेलें यशोनिशाण पुनरपि उज्वल केलें. व्हिटोरिओ व्हेनेटोच्या लढाईत आस्ट्रियाची इतकी वाताहत झाली कीं त्यानंतर लौकरच त्यानें तहाचें बोलणें सुरू केलें.

व्हिटोरियाच्या विजयाची बातमी पोपोलो पत्रानें जादा अंक काढून सर्व मिलानभर प्रसृत केली. इटालीचें अंतःकरण विजयाच्या आनंदानें भरून आलें. त्यादिवशीं लिहितांना मुसलिनीनें खालील उद्गार काढले आहेत. तो म्हणतो, “ आज आनंदानें हृदय भरून येऊन वृत्ती शब्दातीत होतात. दुःखानें रडलेल्या डोळ्यांतून आज आनंदाश्रू वाहूं लागले. डान्टेला हा आनंदाचा प्रसंग स्वर्गांत दिसत असेल काय ? दिसत असल्यास त्याचे डोळे आनंदानें आणि अभिमानानें वाहूं लागतील. या यशःसिद्धीसाठीं ज्या हुतात्म्यांनीं आपले प्राण खर्ची घातले त्यांना आज स्वर्गांत धन्य वाटत असेल ! त्यांनींच आपल्याला मार्ग दाखविला व त्यांची कृपादृष्टी बिनीवर होती म्हणूनच आज आपल्याला विजय मिळाला. प्रबळ इच्छा, दृढ श्रद्धा, आणि अपूर्व स्वार्थत्याग अशा सोपान पंक्तीनें आपण यशोमंदिराचा कळस गांठला आहे. आज विजयाच्या अत्युच्च पायरीवर उभे राहून आपण एकसुरानें आपल्या मातृभूमीचा जयजयकार करूं या. ” मुसलिनीचे वरील शब्द वाचून, ‘ माझ्या भारतवर्षाचा जयजयकार करण्याची अशीच संधी मलाहि केव्हां मिळेल, ती सुवर्ण वेळा केव्हां येईल—” असेंच कोणाहि हिंदी तरुणाला वाटेल अशी आमची खात्री आहे. भारतमातेच्या जयजयकाराचा आनंद प्रस्तुत पिढीला मिळणार नसला तर नसूं द्या. पुढील पिढीला तरी तो उपभोगितां यावा म्हणून आपण शिकस्तीचे प्रयत्न करूं या.

पुनश्च हरिःॐ

रस्किननें एका ठिकाणीं म्हटल्याप्रमाणें, " The duty of all these men is on due occassion, to die for it (the nation) ...... for truly, the man who does not know when to die, does not know how to live ," जगांत तेंच राष्ट्र स्वतंत्र होण्यास आणि स्वतंत्र राहण्यास लायख ठरते कीं जें प्रसंग पडला असतां मृत्यूशींहि झुंजण्यास कमी करीत नाहीं. मुसलिनीनें इटालीस स्वदेशासाठीं मरणाच्या योग्य कालाची महती समजावून दिली आणि राष्ट्रानेंहि त्याच्या हांकेस ओ देऊन आपली स्वातंत्र्याची लायकी सिद्ध केली.

# प्रकरण २३ वें

## फॅशिझम.

We are an army, and it is just because we have special organization that we must make discipline the surpreme point of our life and action.

—*Mussolini*

गेल्या प्रकरणांत महायुद्धांतील इटालीच्या विजयापर्यंत येऊन आपण मुक्काम केला. त्या ठिकाणीं मुसलिनीच्या चरित्र कथेच्या दुसऱ्या भागाची सीमा संपते व तिसऱ्या भागाला सुरवात होते. गेल्या भागांत Mussolini as man of War 'युद्ध पुरस्कर्ता मुसलिनी' याचें आपण चरित्र पाहिलें; यापुढें Mussolini as Fascist किंवा 'फॅशिस्ट मुसलिनी' च्या चरित्राला प्रारंभ होतो. आपल्या वयाच्या ३१ व्या वर्षापर्यंत मुसलिनी क्रांतिकारक सोशिआलिस्ट होता; पुढें महायुद्धाला सुरवात झाली व मुसलिनी युद्धाचा पुरस्कार करूं लागला; युद्ध समाप्तीनंतर इटालींत त्याला जी अव्यवस्था आढळून आली तिला तोंड देण्यासाठीं त्यानें फॅशिस्मोची चळवळ सुरूं केली. तेव्हांपासून आजतागाइत तो फॅशिस्ट म्हणून प्रसिद्ध आहे. मुसलिनीचा आतांपर्यंतचा जीवनक्रम एकाद्या नवलकथेप्रमाणें अद्भुत रम्य रसानें भरून गेला आहे. "तुमच्या कादंबरीचा शेवट कसा करण्याचा तुमचा विचार आहे" असें सर वॉल्टर स्कॉट, प्रसिद्ध इंग्रज कादंबरीकार, यांस विचारलें असतां त्यानें, "माझें मलाच माहित नाहीं" असें उत्तर

दिल्याचें प्रसिद्ध आहे. तीच गोष्ट मुसलिनीच्या चरित्रग्रंथाची आहे. त्याला कोणी स्कॉटप्रमाणें प्रश्न केला तर त्याचें उत्तर देणें मुसलिनीस सुद्धां कठिण जाईल. भविष्य कालानें काय ठरविलें आहे तें कोणी सांगावें ? मुसलिनीच्या महत्वपूर्ण आयुष्यक्रमाला फॅशिस्ट काळापासूनच खरी सुरवात होत असल्यामुळें या पुढील त्याचें चरित्र जास्त काळजीपूर्वक अवलोकन केलें पाहिजे.

विजयश्रीच्या आनंदाचा पहिला बहर ओसरून गेला. परचक्रानें उत्पन्न केलेलें मनावरील दडपण दूर झालें त्याबरोबर इटालीच्या अव्यवस्थेला आणि कमकुवत राजकारणाला पुनः सुरवात झाली. इटालिच्या तत्कालीन प्रधानमंडळाचे प्रमुख, सिनॉर सॅलान्ड्रा, यांना परराष्ट्रीय राजकारण विशेषसें समजत नसल्यामुळें तह परिषदेंत त्यांचें तेज पडूं शकलें नाहीं. फ्रान्स, इंग्लंड आणि अमेरिका यांच्याकडेच त्याकाळीं युरोपियन राजकारणाचा मक्ता आला होता. फ्रान्स व इंग्लंड या दोस्तांनीं आपल्याला अनुकूल अशा अनेक गोष्टी करून घेतल्या पण इटालीस ट्रीस्टी पलीकडे कांहींसुद्धां मिळणार नाहीं असें प्रे. विल्सननें इटालियन प्रतिनिधीस बजाविलें. फ्यूम बंदर इटालीस मिळणें जरूर होतें, कारण सांस्कृतिक दृष्ट्या तें इटालियन आहे असें म्हणावयास हरकत नाहीं. परंतु प्रे. विल्सनला युरोपियन राजकारणाची बरोबर माहिती नव्हती म्हणून असो किंवा त्यास आत्यंतिक समतेच्या तत्वाचा पुरस्कार करावयाचा होता म्हणून असो, पण फ्यूम बंदर इटालीस देण्याचें त्यानें साफ नाकारिलें. त्या वेळीं फ्यूम जुगोस्लाव्हियाकडे होतें. इटालियन राजकारणांत फ्यूम प्रकरणामुळें दोन तट पडले. डानन्झिओ आणि त्याचा राष्ट्रीय पक्ष

नं.

यांच्या मतानें ' फ्यूम बंदर इटालीस मिळणें जरूर व तें आपण हर प्रयत्नानें त्याला मिळवून देणार. ' दुसरा पक्ष सॅलान्ड्रा व निटीप्रभृति लिबरल लोकांचा. त्यांना फ्यूम नको होतें असें नाहीं. परंतु तें मिळालें नाहीं तर बेसनदशीर मार्गानें जाण्याची त्यांची तयारी नव्हती. मुसलिनी डानन्झिओच्या पक्षाचा होता.

इटालींतील अव्यवस्थेला सुरूवात झाली ती या परराष्ट्रीय राजकारणांतील बखेड्यामुळें. तिला उग्र व भेसूर स्वरूप आलें तें बोल्शेव्हिक मतांमुळें. या दोन्ही कारणांचा इटालीच्या भावी राजकारणांवर भयंकर परिणाम झाला आहे. त्याविषयीं उहापोह पुढील म्हणजे '**फॅशिस्मो**' या भागांत सविस्तर केला आहे. याठिकाणीं या दोन्ही कारणांचा नामनिर्देश करून मुसलिनीकडे वळूं.

मुसलिनीनें प्रत्यक्ष रणांगणावर नोकरी करून व सैनिकांबरोबर विचारविनिमय करून इटालियन राष्ट्राच्या नाडीचे ठोके, विचार आणि आकांक्षा यांच्या दृष्टीनें, कसे काय पडत आहेत त्याचा नीट अभ्यास केला होता. त्या मुदतींत त्याची खात्री होऊन चुकली कीं, इटालीच्या अव्यवस्थेचें आणि मानहानीचें मुख्य कारण म्हणजे प्रबल मध्यवर्ती राजसंस्थेचा अभाव. गुऑलिटी उत्कृष्ट पार्लमेंटरी प्रधान म्हणून प्रसिद्ध होता. सॅलान्ड्रा उत्तम वकील होता व निटीची प्रसिद्धी आंतरराष्ट्रीय अर्थशास्त्रज्ञ म्हणून चांगली होती. परंतु त्यापैकीं एकाचेंहि ठिकाणीं, अधिकार चालविण्याची धमक किंवा प्रतिकूल परिस्थितीला नेटानें तोंड देण्याचें धैर्य नव्हतें. मुसलिनीनें या सर्व गोष्टींचा विचार करून अधिकारसूत्रें आपल्या हातीं घेण्याचें ठरविलें.

कोणत्याही काळीं आणि कोणत्याहि देशांत, केवळ एकट्या व्यक्तीला कांहींच करतां येणें शक्य नसतें. त्या व्यक्तीनें आपल्या विचारांची छाप दुसऱ्या लोकांवर बसवून, त्यांना आपल्या विचारांना अनुकूल करून घ्यावें; व अशा रीतीनें लोकमत आपल्या बाजूचें तयार करून त्याच्या जोरावर मूळ कल्पनेप्रमाणें आपलें उदिष्ट साध्य करावें असा क्रम सगळीकडे दिसून येतो. मूळ कल्पना एका व्यक्तीचीच असली तरी तिला मूर्तस्वरूप येण्यास लोकमताची जरूरी असते ती अशी.

मुसलिनीनें त्या दृष्टीनें लोकमत तयार करण्यास सुरवात केली. पहिल्यानें त्यानें मिलान शहरीं आपल्या मताच्या लोकांची, ता. २३ मार्च १९१९ रोजीं सभा बोलाविली व आपल्या नूतन राजकारण विचारांची दिशा व कामाची पद्धत याविषयीं त्यांच्याबरोबर उहापोह करून आपल्या विशिष्ट चळवळीची प्राणप्रतिष्ठा केली. **'फॅशिस्ट'** हें त्या चळवळीचें नांव ठेवण्यांत आलें. सदर सभेस सुमारें ४०।४५ लोक हजर होते. त्यांत वर्तमानपत्रांचे संपादक, माजी लष्करी अधिकारी, मध्यम वर्गांतील पुढारी, आणि 'रेड वीक' मधील अग्रणी यांचाच विशेष भरणा होता. थोडेबहुत तरुण विद्यार्थीहि या सभेला हजर राहिले होते. सभा मिलान येथील एका व्यापारी संघाच्या जागेंत भरली होती. या सभेंत तीन ठराव पास झाले. १ ल्या ठरावानें "ज्या सैनिकांनीं इटालीसाठीं आपले प्राण वेंचले आणि जे जखमी आणि कैदी झाले त्यांच्याविषयीं कृतज्ञताबुद्धी प्रदर्शित करून 'माजी सैनिकांच्या हक्कांचें संरक्षण' करण्याचें ठरलें. २ ऱ्या ठरावानें 'फ्यूम व डाल्मेशिया इटालीस मिळवून' देण्याची अवश्यकता प्रतिपादन केली; व ३ ऱ्या ठरावानें, 'पार्लमेंटच्या निवडणुकींत भाग घेण्याचें' निश्चित करण्यांत आलें.

<u>**मुसलिनी**</u>

सभेंत मुख्य भाषण मुसलिनीचें झालें. निष्कारण कालापव्यय न करण्याचें पाहिल्यापासून ठरविलें असल्यामुळें विशेष वादविवाद न होतां सदर ठराव एक मतानें पास करण्यांत आले. या ४५ सभासदांनीं स्थापिलेल्या फॅशिस्ट चळवळींत आज ३,०००.००० वर सभासद आहेत या एकाच गोष्टिवरून तिनें इटालियन अंतःकरण कसें पूर्णपणें काबीज केलें आहे त्याची कल्पना होते.

मुसलिनीनें आपल्या ' पोपोलो ' पत्रांत या सभेची आणि चळवळीची साद्यंत हकीगत प्रसिद्ध केली. इटालीभर फॅशिस्ट संघ स्थापण्याच्या इराद्यानें चळवळीस प्रारंभ झाला. आरंभीं फॅशिस्ट आणि सोशिआलिस्ट यांच्या विचारांत फरक कोठें आहे हें बरोबर ओळखणें कठिण झालें असतें इतका त्या काळचा फॅशिस्ट कार्यक्रम समाजसत्तावादी कार्यक्रमासारखा भासत असे. " कामकरी शेतकरी आणि शस्त्रधारी यांच्या हितसंबंधांचें आणि न्याय्य हक्कांचें संरक्षण करणें " हें फॅशिझमच्या मूलभूत तत्वापैकीं एक तत्व असल्यामुळें मुसलिनीच्या चळवळीला या तिन्ही वर्गांतील लोक येऊन मिळूं लागले व फॅशिस्ट चळवळीचें बळ वाढूं लागलें. लढाईवरून परत आलेल्या सैनिकांचे बाबतींत मुसलिनी इतकी कळकळीची चळवळ दुसऱ्या कोणीहि केली नसेल. फॅशिझमची स्थापना होण्यापूर्वींच Associations of Fighters and Ex-soldiers म्हणजे सैनिक संघ स्थापून लढाऊ शिपायांच्या चळवळीला संघटित स्वरूप देण्याचा प्रयत्न त्यानें केला होता. त्यामुळें मुसलिनीनें नव्या चळवळीस प्रारंभ करतांच हजारो सैनिक त्याला येऊन मिळाले. या सैनिकांसाठीं त्यानें प्रसंग विशेषीं अतिशय झीज सोसली होती ही गोष्ट नमूद करणें जरूर आहे. राष्ट्राला स्वार्थत्यागाचा उपदेश

करणाऱ्याला स्वतःलासुद्धां पुष्कळ वेळां स्वार्थत्याग करावा लागतो. उपदेशकाचा स्वार्थत्याग ज्या मानानें मोठा आणि मनापासूनचा असतो त्या मानानें त्याच्या शब्दाला समाजात किंमत येते.

महायुद्ध संपून शिपाई लोक घरोघरीं परत फिरले. परंतु त्यांना काम मिळण्याची पंचाईत पडूं लागली व बेकारी बेसुमार वाढली. असे शेंकडों बेकार शिपाई मुसलिनीकडे मदतीसाठीं येत असत. त्यानें आपल्या सेक्रेटरीला प्रत्येक शिपायास १० लीरा देण्याचा हुकूम देऊन ठेवला होता. शिवाय जवळच्या दोघां हॉटेलवाल्यांना, " कोणा सैनिकाला खाण्यापिण्यास लागलें तर तें देऊन त्याचे पैसे आपणाकडून घ्यावे. " असेंहि सांगून ठेविलें होतें. त्यामुळें शेंकडो शिपाई त्याच्या पोपोलो पत्राभोंवतीं सर्वकाळ जमा झालेले आढळून येत. पत्राच्या व्यवस्थापकानें, 'उद्याला बँकेंत शिल्लक नाहीं' असें मुसलिनीस सांगितलें तरी त्याचें त्यास कांहीं वाटत नसे! मधून मधून या सैनिकांच्या मदतीसाठीं पोपोलो पत्रांतून विनंति करण्यांत येई. तिचा थोडाबहुत उपयोग होई. परंतु मुख्य भार मुसलिनीवरच पडत असे. असो.

यानंतर थोड्याच दिवसांत निवडणुकीची वेळ आली. मुसलिनीनें मिलान, ट्रीस्टी, फ्लॉरेन्स, बोलोना, उडाइन, क्रेमोना, नेपल्स आदि ठिकाणीं व्याख्यानांचा दौरा काढून आपल्या पक्षाच्या सभासदांना मतें देण्यांबद्दल मतदारांना कळकळीची विनंती केली. पोपोलो पत्रांतून फॅशिस्मोच्या तत्वांचें स्पष्टीकरण आणि उद्‌घाटन चालूंच होतें. फॅशिस्ट पक्षाचा इटालीच्या राजकारण—क्षितिजावर उदय होतांच त्याला इतर पक्षांकडून विरोध होऊं लागला. सोशिआलिस्टांकडून तो विशेष झाला. दोन पक्षांत

विरोध उत्पन्न झाला म्हणजे जनता साहजिकपणें साशंक होते. ही साशंक वृत्ती दूर करून तिला आपल्या मताचें बनविणें यालाच लोकमत तयार करणें असें म्हणतां येईल. लोकमत तयार करीत असतां मुसलिनीस अमर्याद श्रम पडत असत तथापि तो ते आनंदानें करीत असे. कोणत्याहि नव्या मताच्या संस्थापकाला असेच अश्रांत श्रम करावे लागतात. मुसलिनीच्या लिहिण्या बोलण्यांत आर्जवापेक्षां आवेश जास्त असल्यामुळें कांहीं कांहीं वेळां त्याच्या कार्याचा विघातहि होतो. असाच प्रकार या निवडणुकींत झाला. १९१९ सालच्या पार्लमेंटच्या निवडणुकीस फॅशिस्ट पक्षाचे म्हणून बरेच उमेदवार उभे राहिले होते. परंतु त्यापैकीं एकहि निवडून आला नाहीं ! मुसलिनीचाहि पराभवच झाला. त्याची टर उडवितांना अव्हान्टी पत्रानें तर त्याला ‘ प्रेताची ’ उपमा दिली होती !

मुसलिनीचा निवडणुकींत पराभव होण्यास मुख्यतः त्याचें मिलान येथील भाषण कारण झालें. या भाषणांत त्यानें जनतेला जवळ जवळ मूर्खांतच काढलें. “ जनतेला कांहीं कळत नाहीं. सोशिआलिस्ट करतात त्याप्रमाणें तिला गोंजारीत बसण्यांत अर्थ नाहीं. तिला कर्तव्यक्षम करावयाचें असल्यास तिची आर्जवें करण्यापेक्षां तिला शिक्षण दिलें पाहिजे. फॅशिस्ट पक्ष जनतेकडे जी जी करीत येणार नाहीं तर तो शिक्षक म्हणून येणार आहे, हें सोशिआलिस्टांनीं लक्षांत ठेवावें. ” अशा अर्थाचें तें भाषण होतें. मुसलिनीचा तो आवेश, त्याच्यापुढें त्याच्या अनुयायांनीं धरलेल्या त्या मशाली आणि सभेंत दिसून येणारी ती विलक्षण शांतता पाहून कोणाच्याहि मनांत दरारा उत्पन्न झाला असता. मिलानच्या लोकांना सुद्धां तें भाषण ऐकून थोडेसें दचकल्या सारखेंच झालें. मुसलिनीच्या धारीष्ट्याबद्दल

सर्वांनीं त्याचें कौतुक केलें असलें तरी त्याच वेळीं, "अशा उमेदवाराला आपण केव्हांहि मतें देणार नाहीं." असाहि कदाचित् आपल्या मनाशीं विचार केला असेल.

या भाषणानें जर कोणती एक गोष्ट सिद्ध केली असेल तर ती ही कीं, फॅशिस्ट लोक प्रसंग पडल्यास समाजापुढें येण्यास बिलकुल भीत नाहींत. यापूर्वी फॅशिस्टावर असा आरोप करण्यांत येई कीं, "त्यांना जनतेपुढें येण्यास भीती वाटते. फॅशिस्ट म्हणजे चार भित्र्या लोकांची पण भरमसाट बोलणाऱ्या उडाणटप्पूंची टोळी आहे. मिलान येथें तर सभेंत बोलण्याची त्यांची छातीच होणार नाहीं." पण मुसलिनीनें त्या ठिकाणीं नुसतें भाषण केलें एवढेंच नव्हे तर त्या भाषणांत साऱ्या सोशिआलिस्टांना आणि तन्मार्गगामी जनतेला उघड उघड मूर्खहि म्हटलें! त्याच्या या भाषणानें फॅशिस्ट लोकांच्या नीतिधैर्याबद्दल लोकांची खात्री झाली.

या भाषणाचा परिणाम मात्र अत्यंत प्रतिकूल होऊन मुसलिनीचा आणि त्याच्या फॅशिस्ट उमेदवारांचा निवडणुकींत पुरा धुव्वा उडाला. सोशिआलिस्टांनीं सदर भाषणाचा फायदा घेऊन मुसलिनीचें आणि फॅशिस्मोचें चित्र जितकें काळेंकुट्ट रंगवितां आलें तितकें रंगविलें. मिलानच्या सोशिआलिस्ट नागरिकांनीं तर मुसलिनीच्या घरापुढें प्रेतयात्रेचा फार्स केला व दफन विधीच्या वेळच्या लटक्या प्रार्थनाहि म्हटल्या! प्रमुख फॅशिस्टांच्या घरापुढें जाऊन शंख करण्यासहि लोकसमुदायानें कमी केलें नाहीं!

तोच मुसलिनी आणि तीच फॅशिस्ट मंडळी, या निवडणुकीला उणीपुरीं ३ वर्षें लोटलीं असतील नसतील तोंच, इटालीमध्यें सर्व शक्तिमान ठरलीं. याच मिलान शहरांत, १९२४ सालीं, मुसलिनीची जंगी मिरवणूक निघून त्यांस मानपत्र देण्यांत आलें. १९१९ सालीं मुसलिनी

अयशस्वी होता;--आणि अयशस्वी माणसाची विटंबना करावयाची हा जगाचा नियमच आहे! १९२४ सालीं हाच मुसलिनी यशस्वी ठरला;--मग त्याचा सन्मान व्हावा हेंहि साहजिक होतें. संसारांत एकंदरींत, यश ही चीज फार दुर्मिळ असली पाहिजे. कारण ज्या मानानें एकादी वस्तू प्राप्त होण्यास दुर्मिळ त्या मानानें तिची किंमत जास्त हा व्यवहारांतील सिद्धांतच आहे. असो.

निवडणुकींतील पराभवामुळें मुसलिनीस साहाजिकच अत्यंत वाईट वाटलें. कित्येक दिवस घरांबाहेर पडण्याचें सुद्धां त्यांस धैर्य होत नसे, इतकी त्याला यावेळीं विमनस्कता आली होती. पण असें किती दिवस चालणार? थोड्याच दिवसांत विवेक करून त्यानें पुनः आपल्या फॅशिस्ट पक्षाच्या संघटनेला आणि प्रसाराला सुरवात केली. फॅशिझमचा प्रसार झाल्याशिवाय आपल्याला यश मिळणार नाहीं हें ओळखून त्यानें प्रचंड चळवळीचा चंग बांधला.

# प्रकरण २४ वें.

## मध्यंतरीचीं दोन वर्षें.

१९१९ सालच्या निवडणुकी संपून मुसलिनीचा पराभव झाला होता. प्रतिपक्षाच्या पत्रांनीं त्याची टर उडविण्यास सुरवात केली होती. सोशिआलिस्ट लोकांच्या झुंडीच्या झुंडी त्याच्या घरापुढें, मुसलिनीची विटंबना करण्याच्या हेतूनें, नाचत होत्या. आणि 'मृतासाठीं म्हणावयाच्या प्रार्थना' त्याच्या घरासमोर म्हटल्या जात होत्या; आदि प्रकार आपण गेल्या प्रकरणांत पाहिले. मुसलिनीवर हात टांकण्यास ही संधी बरी आहे असें वाटून सरकारनें एकाएकी पकड वॉरंट काढून त्यास गिरफदार केलें. त्यावेळीं तो आपल्या पत्राच्या कचेरींत होता. या संकटाची सूचना त्यांस त्याच्या स्नेह्यांनीं आगाऊं दिली होती. परंतु भागुबाईसारखें पळून जाण्याचें त्यानें साफ नाकारलें. "They know me where I am; let them come and find me; I shan't run away." पोलीस लोक येतांच त्यांच्या बरोबर मुसलिनी शांतपणानें कचेरी बाहेर पडला. त्याच्या चित्ताची ती विलक्षण स्थिरता आणि आपल्या कार्यावरील अढळ निष्ठा पाहून सर्व लोक आश्चर्यानें थक्क झाले. मिलान येथें जरी मुसलिनीचा बोजवारा उडाला असला तरी तो सोशिआलिस्टांनीं उडविला होता. इतर लोकांच्या मनांत त्यांच्या विषयीं आदरच वसत होता. सर्व देशभर पसरलेले फॅशिस्ट तर मुसलिनीस आपला अधिकृत नेताच समजत असत. तेव्हां त्याला पकतांच सर्व देशभर संतापाची एकच लाट उसळली

असली तर नवल नाहीं. फ्यूमच्या बाबतींत सरकार विरुद्ध स्वीकारलेल्या धोरणाचा सूड घेण्यासाठीं मुसलिनीस पकडलें होतें. त्याच्या गुन्ह्यास 'सरकार विरुद्ध केलेला सशस्त्र कट' असें गंभीर नांव दिलें होतें पण त्यास पकडून चार तासहि झाले नाहींत तोंच 'याचें पुढें काय करावयाचें' असा प्रश्न प्रधान मंडळापुढें आला. त्याला पकडल्याच्या नुसत्या बातमीनेंच जेथें भयंकर चळवळ होण्याचा संभव तेथें त्याच्यावर खटला केल्यास आणि त्यांतहिं त्यास शिक्षा दिल्यास काय अनर्थ होतील कोण जाणें! असा पोक्त विचार करून निटीनें त्यास दुसरेच दिवशीं बंधमुक्त केलें.

एकाचा तोटा तो दुसऱ्याचा फायदा या न्यायानें विचार करितां मुसलिनीचा मात्र या क्षौट घटकेच्या अटकेमुळें फायदा झाला. सरकारची इभ्रत गेली तर मुसलिनीची लोकप्रियता वाढली. आणि सरकारच्या कमकुवत पणाची आणि अनिश्चित धोरणाची लोकांस आणखी एकवार खात्री पटली. फॅशिस्ट पक्षाची चळवळ सर्व देशभर पसरविण्याच्या कामीं मुसलिनीनें आपल्या वाढत्या लोकप्रियतेचा फायदा करून घेतला असल्यास नवल नाहीं. या काळांतच त्यानें इतरहि अनेक उद्योग चालविले होते. दांडपट्ट्याचे हात करण्याच्या शिक्षणाला याच वेळीं त्यानें प्रारंभ केला. त्या काळीं प्रत्यहीं त्याच्या घराच्या आवारांत तलवारींचा खणखणाट ऐकूं येत असे. मोटार गाडी हांकण्याचें वेडहि त्यास याच वेळीं सुचलें, व लौकरच गाडी हांकण्याचा परवाना त्यानें मिळविला. मोटारीच्या चाकांवरील हात सुटतो न सुटतो तोंच विमान चालविण्याची मुसलिनीस घाई झाली!

मोटारीच्या अपघाताची आणि त्याच्या लोहारकलानैपुण्याची गोष्ट

मागील एका प्रकरणांत सांगितली आहे ती याच कालांत घडून आली. त्याच्या वैमानिक शिक्षणाचा इतिहास तर फारच मजेदार आहे.

कोणतीहि गोष्ट हातीं घेतली म्हणजे ती शेवटास जाईपर्यंत तिचा पिच्छा पुरवावयाचा या त्याच्या नियमाप्रमाणें मुसलिनीनें वैमानिक कलेच्या अभ्यासास सुरवात केली. थोड्याच दिवसांत मोटारप्रमाणें विमान चालविण्याचाहि परवाना त्यानें मिळविला असता, इतकी त्याची त्यांत प्रगती झाली होती. परंतु खालीं दिलेल्या अपघातामुळें त्याचा विमानाचा नाद सुटला. नेहमीप्रमाणें मुसलिनी विमानांत बसून चालला असतां एकाएकीं त्यास कांहीं अपघात होऊन तें खालीं आलें. मुसलिनी व त्याचा शिक्षक यांना बरेंच लागलें; परंतु सुदैवानें विशेष दुखापत कोणासहि झाली नाहीं. पुढें हा अपघात कसा घडला या विषयीं वाद उत्पन्न झाला. शिक्षकाचें म्हणणें, 'आपला विद्यार्थी फाजील धीट पडल्यामुळें' तो झाला; तर उलट, विद्यार्थ्याचें म्हणणें कीं, 'गुरूजी फाजील सावध किंवा भित्रे' म्हणून, तो झाला! तें कांहींहि असलें तरी या अपघातामुळें मुसलिनीचें विमानाचें वेड सुटलें एवढी गोष्ट खरी.

किंचित् बरें वाटतांच, मुसलिनी पूर्ववत आपलें कामकाज पाहूं लागला. "Live dangerously"—साहसपूर्ण जीवित—हें त्याचें एक आवडतें ब्रीदवाक्य आहे. "मनुष्याचें जीवित नितांत सुंदर आहे परंतु साहसा शिवाय त्याला मजा नाहीं" असें त्याचें मत आहे.

या सगळ्या खटाटोपी चालूं असतां फॅशिझमच्या चळवळीला मात्र त्यानें यत्किंचितही खंड पडूं दिला नाहीं. तिचें व पत्राचें काम अव्याहत सुरूं होतें. या वेळीं पोपोलोंत दर आठवड्यांस ५ लेख लिहिण्याचा त्याचा

क्रम असे. निवडणुकींत अपयश आल्यामुळें त्याच्या मनाला एक प्रकारची नाउमेद आल्याप्रमाणें झालें असलें तरी उपरिनिर्दिष्ट व्यवसायांत मन गुंतल्यामुळें तें लौकरच ताजेंतवानें होण्यास मदत झाली. शिवाय इच्छा शक्ति जबरदस्त असल्यामुळें त्यानें निष्क्रियतेला बिलकुल थारा दिला नाहीं. उलट नेहमीपेक्षांहि जास्त काम तो या वेळीं करीत असे. त्याच्या हिरमुसलेल्या मनाला कामांतच विरंगुळा वाटे. प्रत्यहीं आपल्या पत्रांत कांहीं नव्या सुधारणा करव्यात नवीं सदरें घालावींत असा त्याचा क्रम या वेळीं चालला होता. पुष्कळ वेळां शारीरिक श्रमानें थकवा आल्यास मानासिक श्रम करून तो घालविण्याची त्याची पद्धत आहे. त्याला त्यानें Rest cure म्हणजे विश्रांतीचा उपाय असें नांव दिलें आहे.

या कालांत भयंकर काम पडत असल्यामुळें त्याला मधून मधून अतिशय थकल्यासारखें होई. या थकल्या वेळच्या विश्रांतीसाठीं म्हणून "Myth and Heresy" या नांवाचा एक ग्रंथ लिहिण्याच्या विचारांत मुसलिनी होता. त्याचें टिप्पणहि त्यानें केलें होतें. पण पुढें इतर व्यवसायांत त्याला मूर्तस्वरूप येऊं शकलें नाहीं. याहिपेक्षां मौजेची गोष्ट म्हणजे मुसलिनीनें मनांत योजिलेलीं एक दोन नाटकें होत! मनांत आलें कीं बोलून दाखवावयाचें या त्याच्या स्वभावानुसार त्यानें आपल्या नाटकांतील पात्रें, प्रसंग, देखावे वगैरे अनेक बाबतींत आपल्या स्नेह्यांशीं वादविवादहि केला होता. त्यापैकीं एक नाटक दुःखपर्यावसायी व्हावयाचें ठरलें होतें! मुसलिनीचा स्वभाव जात्या गंभीर आणि खोल विचारांना अनुकुल आहे. अर्थातच त्याला ललितकलांमध्यें विशेष कांहीं करतां येणार नाहीं असें वाटण्याचा संभव आहे. परंतु संगीत हा त्याचा आव-

डता विषय असून तो बीन फारच उत्तम वाजवितो अशी त्याची ख्याती आहे. त्याच्या कादंबरी व स्फुट गोष्टींच्या लेखनाची ओळख आपण मागें करून घेतलीच आहे. नाटकांना विचारापलकिडे स्वरूप येऊं शकलें नाहीं. परंतु मुसलिनीच्या बुद्धीचा विचार करितां तो प्रांत त्याला सर्वस्वीच अप्राप्य राहील असें वाटत नाहीं. पुढें मागें थोडीशी फुरसत मिळाल्यास मुसलिनी आपल्या नाटकांच्या कल्पनेला मूर्तस्वरूप खास देईल इतकी त्याला नाटक लिहिण्याची हौस आहे. असो.

याच काळांत म्हणजे १९२० च्या अखेरी अखेरीस मुसलिनीनें Gerachia म्हणजे Hierachy नांवाचें एक नवें मासिक काढलें. त्याच्या वाढत्या वयानुसार त्याची विचारसंपत्तीहि वाढत होती. तिच्या स्फुटीकरणाला पोपोलोसारखे दैनिक पत्र तितकेसें उपयोगीं नव्हतें. दैनिक पत्राचा उपयोग गंभीर विचारांना विशेष होत नाहीं. त्याला मासिकासारखेंच साधन लागत असतें. जनतेस विशेष कांहीं तरी सांगण्याची अवश्यकता मुसलीनीस आतां भासूं लागली व म्हणूनच त्यानें या मासिकाची तयारी केली असावी. त्याचें Utopia ( मनोराज्य ) मासिक मागेंच बंद पडलें होतें. गेराचिया मात्र अद्यापि निघत असून त्यांमधून त्याचे लेखहि मधून मधून प्रसिद्ध होतात. सध्यां सर्फाटीबाईकडे या मासिकाचें संपादकत्व आहे.

व्यक्तीच्या भौतिक आयुष्यक्रमांत ज्याप्रमाणें बाल्य, तारुण्य आणि वार्धक्य अशा तीन अवस्था असतात त्याप्रमाणेंच त्याच्या विचार जीवनक्रमांतहि असतात असें म्हणावयास हरकत नाहीं. मुसलिनीच्या—विचार विकासाचें पृथक्करण केल्यास स्थूलरूपानें त्याचे वरील सारखे तीन विभाग

पडतात असें दिसून येईल. मुसलिनीच्या विचारांना स्थैर्य १९१९ सालीं आलें. तोंपर्यंत तो कमी अधिक प्रमाणांत सोशिआलिस्टच होता; महायुद्धाची अवश्यकता त्यानें स्वदेशासाठीं त्याचप्रमाणें कामकरी वर्गासाठींहि प्रतिपादन केली. " कामकरी वर्गानें महायुद्धांत सामील होणें त्याच्या हिताचें आहे; त्याला आपल्या न्याय्य हक्कासाठीं झगडावयाचें असल्यास त्यानें महायुद्धांत एकदिलानें पडणें जरूर आहे. " अशी मुसलिनीची त्या काळची घोषणा होती. त्याच्या विचारांच्या प्रौढ बाल्यावस्थेचा तो काल होता. बाल्य संपून तारुण्याच्या सीमेवर उभे राहून मुसलिनी त्या वेळीं बोलत होता. १९१८ सालीं महायुद्ध संपलें व सोशिआलिस्टांच्या बेजबाबदार वर्तनाला प्रारंभ झाला. त्या वेळीं मुसलिनीचें विचारसंक्रमण चाललें होतें; परंतु अद्यापि त्याच्या मतांना स्थैर्य आलें' नव्हतें; ठाम निश्चय झाला नव्हता. १९१९ सालीं फॅशिझमची प्राणप्रतिष्ठा करून त्यानें तारुण्यांत प्रवेश केला व त्याच्या धडाडीच्या कार्यक्रमाला सुरवात तेव्हांपासूनच झाली असें म्हणावयास हरकत नाहीं. कोणत्याहि व्यक्तीच्या विचार–जीवनक्रमामध्यें ही तारुण्यावस्थाच अत्यंत महत्त्वाची असते. या कालांतील विचार वीर्यवान आणि तेजस्वी असतात. नव्या कल्पना सुचण्याचा आणि त्या व्यवहारांत आणून दाखविण्याचा काल हाच असतो. तारुण्य कालांत व्यक्तीच्या ठिकाणीं जसें वीर्य आणि तेज रसरसून गेलेलें असतें तसेंच या मानसिक तारुण्य कालांतील विचारांमध्येंहि विलक्षण ओज आणि तेज व्यक्त होतें. १९१९ साला पुढचीं त्याचीं भाषणें किंवा गेराचिया मासिकांतील लेख पाहिले असतां त्यांत त्याच्या विचारांचें तारुण्य पदोपदीं अनुभवास येतें. फॅशिस्ट चळवळच नुसती विचारांत घेतली तरी सुद्धां ती सर्वस्वी तरुणांची चळवळ आहे असें दिसून येईल. या चळवळीचीं

**मध्यंतरीचीं दोन वर्षे.**

अभिनव कल्पना, ती व्यवहारक्षम करण्याचें कामीं उपयोगांत आणिलेलीं नवीं नवीं साधनें आणि तिचा आश्चर्यकारक प्रसार या गोष्टी पाहिल्या म्हणजे मुसलिनीच्या चरित्रांतील विचारांच्या तारुण्याचा हा काल आहे असें आम्हीं कां म्हणतों याचा उलगडा होईल. असो.

मुसलिनीनें अशाप्रकारें वर्ष दीड वर्ष घालविलें व त्या अवधींत फॅशिस्ट पक्षाला त्यानें चांगलीच बळकटी आणली. त्याचा उपयोग त्याला १९२१ च्या निवडणुकींत कसा झाला तें पुढील प्रकरणीं दिसून येईल.

# प्रकरण २५ वें.

## विरोध–विजय.

हेम्नः संलक्ष्यतेह्यग्नौ विशुद्धिः श्यामिकापिवा।

—कालिदास.

" A body of men that has the enthusiasm and energy of fanaticism always possesses a greater momentum than its mere numbers would give it."

—*Lowell.*

कौमुदीच्या शीतल प्रकाशाचें सौख्य अंशुमालीच्या प्रखर तापानंतर, आणि शांततेची महती युद्धानंतर कळते. त्याचप्रमाणें विजयाला महत्व विरोधानें प्राप्त होतें. दारिद्र्याशीं झगडून ज्यानें लक्ष्मिला जिंकिलें त्याची जशी वाहवा होते तशी एकाद्या ऐदोबा लक्ष्मी-पुत्राची होत नाहीं याचें कारण तरी हेंच कीं, आणि त्याच्या संपत्तीला विरोधाचें अधिष्ठान नसतें. फॅशिझमच्या यशाचें बीजहि त्याला सहन कराव्या लागलेल्या विरोधांतच आहे.

स्त्रीजन निसर्गतः परावलंबी असतो; त्याला कोणाचा ना कोणाचा तरी आश्रय लागतो. पराक्रमाला अबलाजन सहज वश होतो त्याचें मर्महि त्याच्या परावलंबीपणांतच आहे. सर्वसाधारण जनतेच्या सहज प्रवृत्तीची छाननी केल्यास स्त्रीस्वभावांशीं तिचें बरेंच साम्य असल्याचें दिसून येईल. बहुजनसमाजाला आपल्या हक्कांविषयीं कितीहि कळकळ वाटत असली

तरी त्यांचें रक्षण करण्याचें काम त्यास झेंपत नाहीं. त्यासाठीं कोणातरी बलिष्ट व्यक्तीचा किंवा संस्थेचा आश्रय त्यास करावा लागतो. अशी संस्था म्हणजे सरकार किंवा शासन-संस्था होय. ही शासनसंस्था बहुजनसमाजाचें ज्या कमी अधिक प्रमाणांत परिपालन करील त्यांवर त्या शासन संस्थेचें यशापयश ठरत असतें. राजसंस्था लोकमतानुवर्ती असूनहि तिला राज्य शकट व्यवस्थेशीर हाकतां येत नसेल तर बहुजनसमाज बलिष्ठ व्यक्तीच्या नियंत्रणाखालीं जाण्यास तयार होतो. "जीवित आणि मालमत्ता यांचें संरक्षण झालें म्हणजे बहुजन समाज तीन चतुर्थांश सुखी असतो" असें एका पाश्चात्य ग्रंथकाराचें मत आहे. मग हें संरक्षणाचें काम एकादी व्यक्ती करीत आहे किंवा पार्लमेंटासारखी लोकनियुक्त संस्था करित आहे इकडे जनता फारसें लक्ष देत नाहीं.

इटालीमध्यें १९२० सालीं जनतेच्या जीवित आणि मालमत्तेच्या सुराक्षित पणास जबरदस्त धक्का बसला होता. सोशिआलिस्टांनीं जनतेच्या नांवाखालीं वाटेल तसा धुमाकूळ माजविला होता. त्यांच्या गुंडगिरीला तोंड देण्यास त्या काळचें प्रधानमंडळ असमर्थ होतें. त्याला प्रजापरिपालनाचें कर्तव्य होत नव्हतें. त्या वेळीं इटालींत कोणताही राजकीय पक्ष इतका बलिष्ट नव्हता कीं, जो आपल्या वजनानें देशांत शांतता प्रस्थापित करूं शकेल. पण देशाला तर शांततेची अत्यंत अवश्यकता होती—बहुजन समाज हा जात्याच शांतताप्रिय असतो. अशा वेळीं मुसलिनीनें आपल्या फॅशीस्ट मताची चळवळ जोरानें सुरूं केल्यास त्याला यश हटकून आलें तर नवल नाहीं. सोशिआलिस्ट ह्मणजे अव्यवस्था, बेजबाबदारपणा आणि विध्वंस यांची मूर्ती कल्पिल्यास फॅशिस्ट ह्मणजे व्यवस्था, घटना आणि शिस्त

यांचा पुतळा वाटावा इतकी विलक्षण संघटना मुसलिनीनें आपल्या स्वयंसैनिकांत उत्पन्न केली होती. सोशिआलिस्टांनीं संप करून ट्रॅमगाड्या आणि रेल्वे बंद पाडली तर फॅशिस्टी लोकांनीं रात्रीचा दिवस करून गाड्या चालू ठेवल्या. कामकऱ्यांनीं गिरण्या बंद पाडून त्यांचा विध्वंस करण्याचें ठरवितांच फॅशिस्टांनीं त्यांचें संरक्षण केलें. कोणत्याहि बाईचा कोणी अपमान केला तर तिच्या अब्रूचें संरक्षण करण्यास फॅशिस्टी तरुण तयार असत अशा रीतीनें शांतता आणि सुव्यवस्था राखण्याच्या कामीं फॅशिस्टांनीं त्या काळीं अत्यंत श्रम घेतल्यामुळें जनतेमध्यें त्यांच्या विषयीं एक प्रकारचा आदर आणि दरारा वाटूं लागला. पोलिस लोकांचे हातून जें होत नाहीं तें या "काळ्या आंगरखे" वाल्याकडून होतें असें पाहून आश्रयेच्छु प्रजा फॅशिस्ट लोकांच्या बाजूला वळूं लागली.

या धामधुमीच्या काळांत प्रसंग विशेषीं फॅशिस्ट लोकांना आपल्या प्रियप्राणावरहि तिलांजलि द्यावी लागे ही गोष्ट विसरतां कामा नये. बोलोना येथील १९२० च्या म्युनिसिपल इलेक्शनमध्यें ४ फॅशिस्ट लोक निवडून आले. परंतु म्युनिसिपालिटीच्या पहिल्याच बैठकींत त्यापैकीं एक जण मारला गेला. त्यानंतर थोड्याच अवधींत फेरारा येथेंहि असाच कांहीं दंगा होऊन सात आठ तरुण फॅसिस्टांना प्राणास मुकावें लागलें. असे प्रकार त्या वेळीं सर्व इटालीभर चालत असल्यामुळें स्वपक्षाचें समर्थन करीत असतां किती फॅशिस्टी तरुण कामास आले असतील कोण जाणे ! रणदेवतेला नरमांसाची क्षुधा लागली ह्मणजे युद्धें होतात अशी एक भोळी कल्पना असल्याचें सांगतात. इटालींत त्याकाळीं नव्या जुन्या विचारांचें तुंबळ युद्ध सुरू झालें होतें. व तरुण इटाली आपल्या प्राणांचें बलिदान करून तें जिंकीत होता. असो.

## विरोध-विजय.

अशा प्रकारें विरोधाशीं झगडत झगडत फॅशिझम एक एक पाऊल पुढें टाकीत चालला होता. इतके दिवस त्याचें धोरण कांहींसें बचावाचें ( defensive ) होतें तें आस्ते आस्ते चढाईचें ( Offensive ) होऊं लागलें. फॅशिस्टांना आतां सामर्थ्याचा आत्मविश्वास वाटूं लागला. या आत्मविश्वासाचें निदर्शक म्हणजे त्या सालीं मुसलिनीनें मिलान येथें फॅशीस्टी स्वयंसेवकांची काढिलेली मिरवणूक होय.

**दी नाझारिओ सावरो, दी सिसारी बॅटिस्टी, दी मुसलिनी दी इन्ट्रेपिड ( बेडर ), दी एन्टिको टॉटी, दी कंपनी ऑफ दी करोशिओ, दी कंपनी ऑफ दी डेड ( मृतांची सेना )** अशीं निशाणें धारण केलेल्या निरनिराळ्या सेना विभागांची ती मिरवणूक होती. सोशिआलिस्टांच्या अत्याचारामुळें लोकांत एक प्रकारची उदासिनता आणि भेसूर शांतता पसरली असली तरी त्या दिवशीं आकाश निरभ्र असून सूर्यप्रकाश स्वच्छ पडला होता, त्यामुळें उपरी निर्दिष्ट मिरवणुकीला एक प्रकारची उग्र शोभा आली होती.

फॅशिस्टी दळाच्या अग्रभागीं मुसलिनी अगदीं एकाकी व पायीं चालला होता. त्याचा चेहरा विलक्षण गंभीर व लष्करी बाण्यामुळें थोडासा क्रूर दिसत होता. त्याच्यामागून त्याचें तरुण फॅशिस्टी स्वयंसेवक चालले होते. फॅशिस्ट सैनिकांची ती विलक्षण शिस्त, तो गंभीरपणा आणि त्यांच्या चेहऱ्यांवर प्रतिबिंबित होणारा तो निश्चय पाहून लोक आश्चर्यचकित झालें असल्यास नवल नाहीं. "सोशिआलिस्टांच्या जुलुमापासून आपलें रक्षण करण्यासाठींच फॅशिस्ट पक्ष अवतीर्ण झाला आहे " असें लोकांना अंतःस्फूर्तीनें वाटूं लागलें. आणि लोकांनीं या नव्या सैनिकांचा

टाळ्या वाजवून जयघोष सुरू केला. मुसलिनीच्या या नव्या उपक्रमानें हजारो लोक फॅशिस्ट झाले. १९१९ सालीं, याच लोकांनीं मुसलिनीच्या घरापुढें त्याची लटकी प्रेतयात्रा काढली होती ! 'कालाय तस्मै नमः'

मुसलिनीनें आपल्या मनाशीं खूण गांठ बांधल्याप्रमाणें या मिरवणुकीचा जनतेच्या मनावर विलक्षण परिणाम झाला. १९२१ च्या मे महिन्यांत पार्लमेंटची नवी निवडणूक झाली. १९१९ सालीं फॅशिस्ट पक्षाचा निवडणूकींत कसा धुव्वा उडाला होता तें आपण पाहिलेंच आहे. पण दोन वर्षांच्या अनुभवानें शहाणें होऊन मुसलिनीनें आपली "इलेक्शन कँपेन" सुरू केल्यामुळें त्याला या नव्या निवडणूकींत चांगलेंच यश आलें. मुसलिनी प्रचंड बहुमतानें निवडून आला, व त्याच्या पक्षाचे ३३ लोक या खेपेस निवडून आले. इटालीच्या पार्लमेन्टांत फॅशिझमचा शिरकाव झाला. विरोधाच्या धुक्यांतून विजयश्रीचें प्रथम किरण दिसूं लागलें.

"दिल्ली तो बहोत धूर है" या म्हणीप्रमाणें प्रत्यक्ष कार्याच्या दृष्टीनें मुसलिनीच्या यशाचा हा केवळ प्रारंभ होता. रोमचीं राज्यसूत्रें हातीं यावयास अद्यापि अवकाश होता; पण निवडणूकींतील विजयामुळें त्याचा पुढील मार्ग सुकर झाला.

संख्याबलाच्या दृष्टीनें विचार करतां फॅशिस्ट सभासद पार्लमेंटच्या सभागृहांत दिसले सुद्धां नसते, इतके ते कमी होते! इटालियन पार्लमेंटांतील एकंदर सभासदांची संख्या ५३५ आहे; ह्मणजे फॅशिस्टांच्या वाट्यास अवघ्या शेंकडा ६·१६ जागा आल्या होत्या पण याच भिकार संख्या—बलावर मुसलिनीची

**विरोध-विजय.**

सारी भिस्त होती. याचें कारण, या सभासदांपैकीं प्रत्येकाचा आपल्या अंगीकृत कार्यावर आणि तत्वावर पुरेपूर विश्वास होता. आपल्या तत्वासाठीं आणि कार्यक्रमासाठीं मरावें लागलें तरी मरण्यास त्यापैकीं प्रत्येक जण तयार होता. या प्रकरणाच्या शिरोभागीं लोवेलचें एक अवतरण दिलें आहे. त्यांत म्हटल्याप्रमाणें फॅशिस्ट लोक संख्या–बलानें कमकुवत असले तरी त्यांच्या जवळ भावनेचा, उत्साहाचा आणि तत्वनिष्ठेचा भरभक्कम सांठा असल्यामुळें परिणामीं तेच प्रभावी ठरले.

इटालियन चेंबरच्या बैटकीस सुरवात २१ जून १९२१ रोजीं झाली. ( इटालिअन पार्लमेंटास चेंबर अशी संज्ञा आहे. ) मुसलिनी आणि त्याचे फॅशिस्ट अनुयायी यांनीं अध्यक्षाच्या 'उजव्या बाजूच्या' खुर्च्या सुशोभित करून, आपण सोशिआलिस्ट आणि क्रांतिकारक पक्षांविरुद्ध आहों असें दर्शित केलें. 'स्पीकर' च्या डाव्या बाजूस बसणारी मंडळी क्रांतिकारक मताची समजण्याचा पाश्चात्य राजकारणांत प्रघात आहे. उजवी ( Right wing ) कडे बसणारा पक्ष साधारणतः प्रचलित राज्यपद्धतीचा पुरस्कर्ता समजला जातो. याच्या उलट डाव्या बाजूकडे बसणारा सभासद ( Left wing ) प्रचलित राज्यपद्धती विरुद्ध असणारा म्हणून गणला जातो. हा केवळ स्थूल फरक झाला. त्यांत अनेक लहान मोठे पक्ष आणि उपपक्ष असतात ते निराळेच. मुसलिनीनें जरी स्पीकरच्या उजव्या बाजूकडील खुर्च्या घेतल्या होत्या तरी तो तत्कालीन प्रधानमंडळाच्या बाजूचा होता असें मात्र नाहीं. 'प्रचलित राज्यपद्धतीला आपण धक्का लावणार नाहीं' एवढेंच त्यानें आपल्या बसण्याच्या पद्धतीनें ध्वनित केलें. तो प्रधानमंडळा विरुद्ध होता ही गोष्ट त्यानें त्याच दिवशीं असंदिग्ध भाषेंत चेंबरमध्यें बोलून दाखविली.

चेंबरमध्यें फॅशिस्ट पक्षाला आतां स्वतंत्र स्थान मिळालें असल्यामुळें त्या पक्षाचा इतर पक्षांशीं येणारा संबंध कोणत्या स्वरूपाचा असणार किंवा असावा त्याचा खुलासा करणें जरूर होतें. मुसलिनीनें सरकारपक्षांविषयीं जसें आपलें धोरण स्पष्ट केलें, त्याचप्रमाणें कम्युनिस्ट, सोशिआलिस्ट आणि पॉप्युलर या पक्षांच्या बाबतींतील धोरणहि जाहीर केलें. कम्युनिस्टांना त्यानें बजावलें कीं, “जोंपर्यंत तुम्ही रशियांतील सोव्हिएटच्या धर्तीवर केवळ कामकरी आणि शेतकरी यांच्या एकमुखी सत्तेचा पुरस्कार करीत आहां तोंपर्यंत तुमचे आम्ही कट्टे शत्रू आहों असें समजा.”

सोशिआलिस्टांच्या बाबतींत त्याची भाषा यापेक्षां जरा नरम होती, पण धोरणांत विशेष फरक नव्हता. मुसलिनी ह्मणतो, “तुम्हांला ८ तासांचा दिवस किंवा सहकारी पतपेढ्यासारख्या सामाजिक हिताच्या गोष्टी करावयाच्या असल्या तर आम्ही फॅशिस्ट तुमच्या विरुद्ध जाणार नाहीं. परंतु समुदायसत्तावादासारखीं (State Socialism or Collectivism) नसतीं खुळें तुम्ही प्रतिपादन करूं लागल्यास मात्र आम्ही तुमचें चालूं देणार नाहीं. स्टेट सोशिआलिझमचे झाले तेवढे प्रयोग बस्स झाले.”

“पोप्यूलर पक्षाला प्रथमारंभींच मी सांगून टाकतों कीं, फॅशिझमचें आणि पाद्री मंडळीचें वांकडें नाहीं. शाळा आणि शिक्षण या बाबतींत आमचें या पक्षांशीं पूर्ण मतैक्य आहे. शेतकरी व शेतकी संबंधांत पॉप्युलर पक्षाचीं व आमचीं मतें बहुतांशीं जुळतात असें सांगण्यास मला आनंद वाटतो. या उपर पॉप्युलर पक्षानें आमच्याशीं कसें वागावें हा त्याचा प्रश्न आहे. वाटल्यास त्यानें सहकारी मित्र म्हणून वागावें किंवा प्रतिस्पर्धी शत्रू म्हणून वागावें. दोन्ही गोष्टींना आमची तयारी आहे.”

**विरोध-विजय**

राजसत्तेबद्दल मुसालिनीनें पहिल्यापासूनच सावधगिरीचें धोरण ठेविलें होतें. इटालींत राजसत्तेला विशेष महत्व असण्याचें कारण तिच्यामुळेंच १८७६ सालीं इटालीचें राजकीय एकीकरण होऊं शकलें. अशा संस्थेविषयीं सर्वसाधारण जनतेच्या मनांत अत्यंत पूज्यभाव वसत असल्यास नवल नाहीं. मुसलिनीनें ही गोष्ट लक्षांत घेऊन पहिल्यापासूनच, "आम्ही राजसत्तेविरुद्ध नाहीं, एवढेंच नव्हें तर सदर संस्थेबद्दल आम्हांला अत्यंत आदर आहे. इटालीच्या एकीकरणाला ज्या राजघराण्याचा इतका उपयोग झाला त्याचें महत्व तसेंच श्रेष्ठ असलें पाहिजे यांत शंका नाहीं." अशा तऱ्हेची भाषा ठेविली होती.

पार्लमेंटांत असतांना मुसलिनीनें अनेक विषयांवर आपले विचार निर्भीडपणानें चेंबरपुढें मांडले. त्याच्या भाषणांत आवेशाबरोबरच तर्कशुद्ध विचारसरणी अनुभवण्यास मिळत असल्यामुळें श्रोतृवर्गावर त्यांचा विलक्षण परिणाम होतो. त्याच्या भाषणांचा विशेष म्हणजे इटालीच्या इतिहासांतील आणि महायुद्धांतील प्रसंगांचे वीरश्रीयुक्त उल्लेख. मुसालिनीच्या भाषणांत पेएव्ह, व्हिटोरिओ व्हेनिटो आदि विजयस्थानें आलीं नाहींत असें सहसा व्हावयाचें नाहीं.

पार्लमेंटांतील तत्कालीन राजकारणाचा त्यास लौकरच अनुभव आला. तेथील तें कानाकानाशीं लागून बोलणें, पडद्याआड करार करणें, प्रधानमंडळाचा कमकुवतपणा, आदि प्रकार पाहून मुसलिनीला पार्लमेंटाचा पुरा वीट आला. तो पार्लमेंटाच्याबाहेर होता तोंपर्यंत त्यास या सभेंत चालणारी कुलंगडी प्रत्यक्ष दिसणें शक्य नव्हतें. चित्र जवळ जाऊन पाहिलें म्हणजे तें जसें वाईट दिसूं लागतें, त्याप्रमाणेंच मुसलिनीची

चेंबरच्या बाबतींत स्थिती झाली. त्याच वेळीं, 'इटालीच्या राजकारणाची घडी पुनः व्यवस्थित बसविण्यास अधिकारसूत्रें आतां आपल्या हातींच घेणें जरूर आहे' अशीहि त्याची खात्री झाली.

पार्लमेंटाची बैठक संपतांच आपल्या फॅशिस्ट चळवळीला एकदम व्यापक आणि जगडव्याळ स्वरूप देण्याचें ठरवून त्यानें व्याख्यानांचा एक जंगी दौरा काढला. त्याचें पहिलें व्याख्यान उडाइन येथें झालें.

बॉंबगोळा पडावा त्याप्रमाणें या भाषणामुळें इटालियन राजकारणांत भयंकर खळबळ उडवून दिली. मुसलिनीनें त्यांत आपल्या फॅशिस्ट पक्षाच्या मागण्या आणि धोरण यांचें असंदिग्ध भाषेंत विवरण केलें होतें. या भाषणांवरून, त्या काळीं फॅशीझमची प्रगती किती झाली होती त्याचा अंदाज होतो, मुसलिनीच्या बेडर वृत्तीची खात्री पटते आणि त्याच्या अत्युत्कृष्ट वक्तृत्वाचा अनुभव येतो. हें व या नंतर क्रेमोना, मिलान, आणि नेपल्स या ठिकाणीं झालेलीं व्याख्यानें म्हणजे फॅशीझमची चतुःसूत्रीच होय. हीं भाषणें विचारांनीं भरलेलीं, भावनांनीं ओथंबलेलीं, आणि अंतःकरण थरारून सोडणारीं आहेत. त्यांत, अमक्या एका प्रश्नावर या फॅशिस्ट पुढाऱ्यानें आपलें मत दिलें नाहीं असें नाहीं.

मुसलिनीनें या भाषणांत शिस्तीचें महत्व आपल्या अनुयायांना समजावून सांगितलें आहे. तो म्हणतो 'मला पहिल्या प्रतीची करडी शिस्त पाहिजे. स्वतःल शिस्त लाविल्याशिवाय दुसऱ्याला शिस्त लावण्याचा अधिकार आपल्याला पोंचत नाहीं—नव्हे तशी शिस्त लागतहि नाहीं. राष्ट्राला शिस्त लावण्याची जबाबदारी फॅशिस्टांवर आहे. शिस्तीशिवाय त्याचें पुनरुज्जीवन होणार नाहीं

व इतर राष्ट्रांत त्याला योग्य मान मिळणार नाहीं. राष्ट्रानें शिस्त स्वीकारणें जरूर आहे, तिचा खुषीनें स्वीकार होत नसल्यास त्याच्यावर ती बळानें लादली पाहिजे. याचा अर्थ शिस्त म्हणजे 'जी हूकूम' वृत्ती नव्हे. आपल्या शिस्तीला कर्तव्याचें तेज आहे, मातृभूमीचा अभिमान आहे आणि संघटनाचें अधिष्ठान आहे."

यानंतर मुसलिनीनें अत्याचाराविषयीं खुलासा केला आहे. तो म्हणतो, 'अत्याचाराला केवळ अत्याचार म्हणून दोष देणें योग्य नाहीं. तो नेहमींच नीतिबाह्य असतो असें नाहीं. उलटपक्षीं कांहीं प्रसंगीं तो पूर्णपणें नीतिसिद्ध असतो. आमच्या शत्रूंना तर अत्याचारांविरुद्ध बोलण्याला तोंडच नाहीं. १९१९ आणि '२० सालीं सोशिआलिस्टांनीं इटालींत आणि बोल्शेव्हिकांनीं रशियांत केलेले अत्याचार पाहिले म्हणजे अंगावर शहारे येतात. रशियांत २० लाख लोकांची कत्तल करण्यांत आली असून आणखी २० लाख लोक तुरुंगांत कुजत आहेत. या अत्याचारांपुढें फॅशिस्ट अत्याचार अगदींच फिके पडतात;—तो मुलांचा खेळ वाटतो. कित्येक वेळां अत्याचाराचा अतिशय इष्ट परिणाम होतो. गेल्या जुलै आणि ऑगस्ट महिन्यांत अत्यंत व्यवस्थेशीर रीतीनें उपयोगांत आणलेल्या अत्याचारामुळें आपल्याला ४८ तासांत ( २ दिवसांत ) जो इष्ट परिणाम घडवून आणतां आला तो त्याच्या अभावीं ४८ वर्षांत सुद्धां घडवून आणतां आला नसता! नुसत्या व्याख्यानांना आणि सभांना कोण विचारतो ? सडणाऱ्या रोगाचें उच्चाटण करावयाचें असल्यास शस्त्रप्रयोगासारख्या अत्याचारा शिवाय दुसरा उपाय नाहीं; त्या वेळीं तो नैतिक दृष्ट्या युक्त आणि जरूरहि असतो.

**मुसलिनी**

"या ठिकाणीं माझ्या फॅशिस्ट मित्रांना मी एक इषारा देऊन ठेवितों कीं, त्यांनीं अत्याचाराचा अतिरेक करतां कामा नये. अत्याचाराचे दोन प्रकार आहेत: एक नीतिदृष्ट्या युक्त आणि इष्ट असा व दुसरा मूर्खपणाचा, नितीविरुद्ध, अशुद्ध असा. आपण जरूरी पुरताच अत्याचाराचा अवलंब केला पाहिजे. उठल्या सुटल्या अत्याचार करूं लागल्यास त्याला पोरखेळाचें स्वरूप येईल आणि आपल्या कार्याचा नाश होईल. अशी चूक न होऊं देण्याची प्रत्येक फॅशिस्टानें काळजी घेतली पाहिजे." असो.

मुसलिनीचा अशा रीतीनें लोकमत स्वपक्षानुकूल करण्याचा प्रचंड उद्योग चालू असतांच चेंबरमध्यें, प्रधान मंडळाची स्थिती डळमळीत होऊं लागली व निटी सॅलान्ड्रा गिऑलिटी आदि जुन्या मुत्सद्यांपैकीं कोणाचे गळ्यांत प्रधानकीचीं वस्त्रें पडतात इकडे लोकांचें लक्ष लागलें. इतक्यांत मुसलिनीनें "या पुढें राज्याधिकार आपल्या हातीं घेण्याचा फॅशिस्टांचा निश्चय झाला असल्याचें" प्रसिद्ध केले. इटालियन राजकारणांत फॅशिस्ट पक्षाचा हा बॉंब गोळाच उडाला व क्षणभर दिशा धुंद झाल्या. "मुख्य प्रधान मुसलिनी होणार कीं, दुसरा कोणी होणार? फॅशिस्ट पुढें काय करणार" या प्रश्नांनीं वातावरण दुमदुमून गेलें. 'धनुष्याची दोरी इतकी ताणली गेली आहे कीं आतां तीर सोडला नाहीं तर दोरी तुटल्या शिवाय राहणार नाहीं' मुसलिनीनें जाहीर केलें.

त्या चार दिवसांत इटालींत उडालेल्या खळबळीचें वर्णन करणें शब्द सामर्थ्याबाहेरचें आहे. आशा-निराशा, संताप--समाधान, शांती-अशांती निश्चय-अनिश्चय, उत्साह-निरुत्साह, प्रतीक्षा-वंचना अशा परस्पर विरोधी भावनांनीं इटाली त्या काळीं हदरून गेला होता. अस्थिरतेची परिसीमा झाली होती.

# प्रकरण २६ वें.

# हरहर महादेव.

"Not by words are States maintained."

—*Machiavelli*

मुसलिनीच्या फॅशिस्मोनें त्याकाळीं लोकांत केवढी प्रचंड चळवळ उडवून दिली होती तें आपण पाहिलें. प्रत्येक खेड्यांतून आणि शहरांतून भराभर फॅशिस्टांचीं स्वयंसेवक पथकें उभारूं लागली. त्यांच्या कवायती आणि मिरवणुकी यांनीं शहरांतील रस्ते भरून जाऊं लागले. तरुण इटालीचें अंतःकरण नव्या संदेशानें उद्दीप्त झालें. कार्य करण्यासाठीं इटालियन बाहू स्फुरण पावूं लागले. उत्साहाला सिमा राहिली नाहीं. नवचैतन्य इटालीच्या नसांनसांतून सळसळूं लागलें. उज्वल भविष्यत्कालाचीं सुखस्वप्नें पडूं लागलीं. निराशेच्या कृष्णमेघांचा कोठें मागमूसहि उरला नाहीं. आशेचा बालार्क इटालियन हृदयक्षितिजांवर उदय पावला. थोडक्यांत सांगावयाचें तर मुसलिनीनें आपल्या फॅशिस्ट विचारांनीं, इटालींतील वातावरण रस-रसवून सोडलें. २ लाख ५० हजार तरुण, 'काळ्या आंगरख्याचा' अभिमान धरून फॅशिस्मो प्रीत्यर्थ आपल्या प्रिय प्राणांवर तिलांजली देण्यास तयार झाले !

गेल्या प्रकरणांत, तत्कालीन प्रधान मंडळाच्या अस्थिरतेमुळें इटालियन राजकारणांत उडालेला बखेडा आणि राज्ययंत्र प्रत्यक्ष हातीं घेण्याची फॅशिस्ट पक्षानें केलेली तयारी याचें दिग्दर्शन केलें. शरीरबळावर राज्ययंत्र काबीज करण्याची मुसलिनीची सर्व तयारी पूर्ण झाली असली तरी त्याचा

शक्य तोंवर उपयोग करूं नये असें त्यानें ठरविलें होतें. नेपल्स येथें फॅशिस्टांचा मोठा जमाव करून अनुयायांना उत्तेजन देण्याचा व त्याच वेळीं सरकारच्या धोरणाचा अंदाज घेऊन पुढें पाऊल टाकण्याचा डाव या वेळीं मुसलिनीनें मोठ्या शिताफीनें जिंकला. ता. २४ आक्टोबर रोजीं नेपल्स येथें त्यानें फॅशिस्ट काँग्रेस भरवून आपले अनुयायी एकत्रित केले. या काँग्रेससाठीं सर्व इटालीमधून प्रतिनिधी आणि स्वयंसेवक मिळून २ लाखांवर फॅशिस्ट जमा झाले होते. एवढा मोठा समाज ज्या व्यक्तीच्या मागें एकमतानें उभा आहे तिच्या शब्दाकडे कोणतेंहि सरकार कानाडोळा करूं शकणार नाहीं याबद्दल मुसलिनीची खात्री होती. आणि ह्मणूनच त्याच्या वतीनें कांहीं लोकांनीं तत्कालीन मुख्य प्रधान फॅक्टा यास राजिनामा देण्याची सूचना केली. ता. २६ रोजीं फॅक्टानें जरूरीच्या कामानिमित्त म्हणून आपल्या प्रधानमंडळाची बैठक भरवून सर्व प्रधानांचे राजिनामे घेऊन ठेविले, व अशा रीतीनें मुसलिनीस प्रधान-मंडळांत येण्यास अवसर देण्याचें ठरविलें. फॅक्टाला मुसलिनीच्या स्वभावाची पारख झाली नव्हती असें दिसतें. कारण प्रचंड उद्योगानें फॅशिस्ट पक्षाची उभारणी करून मुसलिनी देशापुढें आला, तो कांहीं प्रधान मंडळांत अशा चोरवाटेनें 'खिडक्या दिंड्यांतून' येण्यासाठीं नव्हे ही गोष्ट फॅक्टाला समजावयास पाहिजे होती. यापुढें मुसलिनी कोणाच्या हाता-खालीं दुय्यम प्रधान ह्मणून काम करण्यास येणार नसून त्याच्या हाताखालीं इतरांनीं कामें करण्याचे दिवस आले होते ही गोष्ट तत्कालीन पुढाऱ्यांच्या लक्षांत आली नाहीं. फॅक्टाच्या उपरीनिर्दिष्ट कृतीनें मुसलिनीचें समाधान झालें नाहीं ही गोष्ट सांगितली पाहिजे असें नाहीं. अर्थातच त्यानंतर फॅक्टापुढें दोनच मार्ग शिल्लक होते. ( १ ) राजिनामा देऊन फॅशिस्टांचा मार्ग मोकळा करून देणें किंवा ( २ ) फॅशिस्टांना भीक न घालतां राज्यकारभार

सुरू ठेवून येईल त्या प्रसंगाला तोंड देणें. दुसरा मार्ग स्वीकारण्यास लागणारा मनाचा खंबिरपणा आंगीं नसल्यामुळें फॅक्टानें पहिलाच मार्ग स्वीकारला असला तर नवल नाहीं. व्यवहारांत पुष्कळ वेळां शौर्यापेक्षां विवेकाचा मार्ग धरणेंच इष्ट असतें व याच मार्गाचा फॅक्टानें अवलंब केला.

अशा रीतीनें, मुसलिनीनें आपल्या मार्गातील प्रथम अडथळा दूर केला. पहिला प्रधान गेल्याशिवाय दुसऱ्याची स्थापना होणें शक्य नाहीं या दृष्टीनें फॅशिस्ट पक्षानें फॅक्टाला हुसकून लावलें तें योग्यच होतें. परंतु त्यापुढें पाऊल टाकणें मात्र तितकेसें सोपें नव्हतें. कारण चेंबरमध्यें संख्याबलाच्या दृष्टीनें, फॅशिस्ट पक्ष अगदींच उपेक्षणीय होता—त्याचे मुसलिनीसुद्धां अवघे ३४ सभासद होते. अशा उपेक्षणीय पक्षाला प्रधानमंडळ बनविण्याची संधी देणें पार्लमेंटाच्या परंपरेला सोडून झालें असतें. यासाठीं, ऑर्लैंडो, गुआलिटी, सॅलान्ड्रा आदि जुन्या मंत्र्यांपैकीं कोणी प्रधानमंडळ बनविण्यास तयार आहे काय याची चवकशी करण्यांत आली.

इकडे या जुन्या लोकांची 'भवती न भवती' चालली होती, अटी प्रति अटी घालून, कोणत्या पक्षानें कोणत्या पक्षाला सहाय्य करणें योग्य वा उचित आहे याचा खल होत होता व तिकडे मुसलिनीचे 'काळे आंगरखे' रोमवर चाल करून जाण्याची तयारी करीत होते. नेपल्स येथें जमलेल्या फॅशिस्टांची मुसलिनीनें एकवार लष्करी पाहणी केली. त्यांवरून फॅशिस्टांवरील त्याचा विश्वास दुणावला व त्यानें त्यांना रोमवर चालून जाण्याची आज्ञा दिली. फॅशिस्ट पक्षानें ' हरहर महादेव ' केला.

पुढील भविष्य ओळखून मुसलिनीनें फॅशिस्ट पक्षाची तयारी जय्यत ठेविली होती. पेरूगिआ हें ठिकाण इटालीच्या जवळ जवळ मध्यबिंदूवर

येत असल्यामुळें तेंच फॅशिस्ट सैनिकांच्या चळवळीचें मध्यवर्ती मुख्य ठिकाण ( Head-quarters ) ठरविण्यांत आलें. तेथें हजारों फॅशिस्ट तरुण लष्करी शिस्तीनें जमा झाले. फॅशिस्ट सैनिकांच्या हालचाली करण्याचें काम एका स्वतंत्र कौन्सिलाकडे देण्यांत आलें होतें, व त्यांवर जनरल एमिलि डी बोनोची नेमणूक करण्यांत आली होती. सदर जनरल बोनोनें महायुद्धांत प्रत्यक्ष रणांगणावर काम केलें असून सैन्याच्या हालचाली करण्याबद्दल उत्तम लौकिक मिळविला होता. तीन बाजूंनीं नाकेबंदी करून रोमवर चालून जाण्याचें काम जनरल फॅराकडे दिलें होतें. त्यानें ठिकठिकाणीं शिलकी फौज ठेवून पिछाडीचें संरक्षण करण्याची उत्तम व्यवस्था केली व आघाडीच्या सैनिकांनीं पुढें कसें जावयाचें तें सर्व ठरविलें. या एकंदर वर्णनावरून मुसलिनीची तयारी किती भक्कम होती याची वाचकांस कल्पना येईल. "सोमवार ता. ३० आक्टोबर १९२२ रोजीं सूर्योदयापूर्वीं फॅशिस्ट सैन्य रोमवर चाल करून जाईल." असा जनरल फॅरानें जाहीरनामा काढला व 'क्विक मार्च' करीत फॅशिस्ट सेना सर्व बाजूंनीं रोमवर चाल करून निघाली. मुसलिनी मात्र मागें मिलान येथें राहिला होता.

२७ तारीख उजाडली. इटालीच्या राजेसाहेबांपुढें प्रश्न येऊन पडला. कारण त्याच दिवशीं आपला राजिनामा फॅक्टानें त्यांच्या हातीं दिला. यापुढें आपण कसें वागावें याविषयीं राजेसाहेबांनीं त्यास सल्ला विचारला असतां, "इटालीभर लष्करी कायदा पुकारण्याचा" सल्ला त्यानें त्यांना दिला. परंतु इटालीचे राजेसाहेब शहाणे असल्यामुळें त्यांनीं त्यास तात्काळ, "माझ्या लोकांचें मन मला चांगलें कळतें. मी लष्करी हुकुमावर कधींहि सही करणार नाहीं" असा उलट जबाब देऊन त्याची बोळवण केली!

<u>हरहर महादेव.</u>

रोमवर चाल करून जाणें म्हणजे तळहातांवर प्राण घेऊन जाण्यासारखें होतें. फॅशिस्मोच्या आणि मुसलिनीच्या आयुष्यांतील तो अत्यंत आणीबाणीचा प्रसंग होता. यश आलें तर अधिकाराच्या सर्वोच्च शिखरावर विराजमान व्हावें, आणि अपयश आलें, रोमवरचा हल्ला फसला, तर ?—अपयशाची नुसती कल्पनासुद्धां अंगावर काटा उभा करील असा तो प्रसंग होता. अपयश आलें तर मुसलिनीच्या शब्दाला कुत्रासुद्धां विचारणार नव्हता; एवढेंच नव्हे तर कदाचित लोकांनीं त्यास उभें फाडलें असतें ! खानाला चीत केलें तर शिवाजी श्रीमान्‌महाराज होणार, दक्षिणेश्वर होणार, आणि त्याच्या उलट प्रकार घडल्यास ?—कल्पनेला चित्र नाहीं, वर्णनाला शब्द नाहींत ! जनता यशस्वी कर्तबगारीची भुकेली असते, एवढीच गोष्ट खरी.

इतक्या दिवसांचा मुसलिनीचा मानस आज सफळ झाला. ता. २८ आक्टोबर १९२२ पासून फॅशिस्ट शकाला इटालींत प्रारंभ झाला. मुसलिनीच्या हातीं रोमचीं राज्यसूत्रें आलीं. लहानपणीं ज्या रोमच्या उज्वल इतिहासाचीं उदात्तरम्य वर्णनें वाचीत असतां मुसलिनीचें बाल अंतःकरण ' पर्युत्सुको भवति यत्सुखितोपि जंतुः ' यांत वर्णन केलेल्या कसल्या तरी मूकसंवेदनांनीं अस्वस्थ आणि उत्सुक होऊन जात असे, त्याच रोममध्यें आज तो इटालीचा अनाभिषिक्त राजा म्हणून प्रवेश करीत होता. इटालीचें एकीकरण करून तिला अबाधित स्वातंत्र्याच्या सिंहासनावर अधिष्ठित करण्याचें श्रेय मॅझिनी, गॅरीबॉल्डी आणि काव्हूर, या त्रयमूर्तींकडे आहेत. मॅझिनी उदात्त तत्ववेत्ता म्हणून, गॅरीबॉल्डी कुशल सेनानी म्हणून आणि काव्हूर दक्ष मुत्सद्दी म्हणून इटालीच्या अर्वाचीन इतिहासांत प्रसिद्ध आहे. त्यांच्याच पंक्तीला बसण्याचा मान मुसलिनीस लाभेल किंवा नाहीं हें आज ठरविणें कठिण आहे. तो भविष्यकालाचा अधिकार आहे; आपण प्रस्तुत-कालीन लोकांनीं तो चालवून कालपुरुषाचा अवमान करणें योग्य नाहीं, तेव्हां त्याविषयीं कांहीं न लिहिणेंच बरें.

## प्रकरण २७ वें

# राज–निमंत्रण.

नाभिषेको न संस्कारः सिंहस्य क्रियते वने ।
विक्रमार्जित सत्वस्य स्वयमेव मृगेंद्रता ॥

'फॅशिस्ट रोमवर निघालें' या बातमीनें इटालीच काय पण सारें सुधारलेलें जग क्षणभर आश्चर्यचकित झालें. राज्याचीं अधिकारसूत्रें यापुढें कोणाकडे असावींत हा प्रश्नच उरला नव्हता. गिऑलिटी, सॅलान्ड्रा, ऑर्लॅन्डो, निटी प्रभृती बहुभाष भाट पुढाऱ्यांची कसोटी पाहून झाली होती. यापुढें मुसलिनीला पाचारण करण्याशिवाय दुसरा मार्ग नव्हता.

त्यावेळीं इटालीच्या राजेसाहेबांनीं दाखविलेली मुत्सद्देगिरी खरो-खरच कौतुकास्पद होती. त्यांनीं पाहिलें कीं, 'गोष्टी इतक्या थराला गेल्यानंतर, फॅशिस्ट स्वयंसेवक राज्ययंत्र काबीज केल्याशिवाय राहणार नाहींत. मुसलिनीच्या सैनिकांनीं स्वतः रोममध्यें शिरून सत्ता बळकाविल्या-वर त्यांना राज्यकारभार चालवूं देण्यांत आपली ती इभ्रत काय राहणार ? त्यापेक्षां आपणच मुसलिनीला प्रधानमंडळ बनविण्याची विनंती करावी ह्मणजे त्याचेंहि समाधान होईल व आपलाहि बोज राहून रोमवर बंडखोरांनीं चाल करून येण्याचा प्रसंगहि टळेल.'

आपल्या जवळच्या मंडळींना त्यांनीं आपला विचार सांगितला तेव्हां त्यांनाहि तो पसंत पडल्याचें दिसलें. तो दिवस २८ आक्टोबरचा होता. जनरल सिटेडिनीनें टेलिफोनवर मुसलिनीस बोलावून त्यास राजे-

साहेबांची इच्छा निवेदन केली. या भागाच्या पहिल्या प्रकरणांत, "महाराजांनीं आपल्याला ताबडतोब रोमला येण्याची विनंती केली आहे. प्रधानमंडळ बनविण्याची कामगिरी तुम्हांस सांगण्याचा त्यांचा मानस आहे" अशी जी तार उद्धृत केली आहे ती याच प्रसंगींची होय.

जनरल सिटेडिनी यांचा टेलिफोनवरचा संदेश ऐकून मुसलिनीस आनंद वाटला असल्यास नवल नाहीं. परंतु आनंदाच्या वेळीं सुद्धां त्यानें आपलें डोकें अगदीं शांत ठेविलें व व्यवहारदक्षता काडीइतकीहि सोडली नाहीं. टेलिफोनवरचा संदेश शिरसावंद्य मानून मुसलिनीनें राजेसाहेबांचें उचित शद्बांत आभार मानले व सिटॅडिनीस, "राजेसाहेबांची आज्ञा तारेनें कायम करण्याची व्यवस्था करावी," असें सुचविलें.

ती वेळ क्रांतिकारक, आणीबाणीची होती. अशा प्रसंगीं निश्चय ठरण्यास आणि ते मोडण्यास क्षणाचाहि अवधी लागत नाहीं. शिवाय अशा अस्थिर वेळीं कोणाचें काय कारस्थान चालू असेल तें कोणी सांगावें ? एकीकडे टेलिफोनवर गोडगोड थापा मारून वाटेल तसलीं भयंकर कारस्थानें कशीं रचलीं जातात तें वाचकांस सांगण्याचें कारण नाहीं. आपणहि अशा एकाद्या कारस्थानांत पकडले जाऊं नये ह्मणून 'हुकूम तारेनें कायम करण्याची' व्यवस्था करणें मुसलिनीस अगत्याचें वाटलें असल्यास नवल नाहीं. टेलिफोनवर बोलणाऱ्या व्यक्ती एकमेकांला दिसत नाहींत व त्यांचें संभाषण दुसऱ्यांना कळणें शक्य नसतें. त्यांतहि टेलिफोनवर राजेसाहेब असते तर गोष्ट निराळी; पण बोलणारी व्यक्ती पडली सिटॅडिनी. तेव्हां आयत्या वेळीं घोंटाळा उडूं नये म्हणून मुसलिनीला त्यानें घेतली तशी काळजी घेणें जरूरच होतें.

**मुसलिनी**

सदर तार हातीं आली त्या वेळीं मुसलिनी आपल्या 'पोपोलो' पत्राच्या कचेरींत होता. राजसंदेश ऐकून छापखान्यांतील आबालवृद्ध माणसांना अतिशय आनंद वाटला. ज्या उद्दिष्ट कार्यासाठीं मुसलिनी आणि त्याचे सहकारी कार्यकर्ते इतके दिवस अश्रांत श्रम करीत होते तें साध्य झालेलें पाहून हर्षातिशयाबरोबरच त्यास किंचित् हायसें वाटलें असल्यास नवल नाहीं. आनंदाचा प्रथम बहर ओसरतांच मुसलिनी पुढच्या तजाविजीस लागला. कालिदासानें म्हटल्याप्रमाणें,

औत्सुक्यमात्रमवसादयति प्रतिष्ठा
क्लिश्नाति लब्धपरिपालनवृत्तिरेव ॥

अशीच प्रत्येक कर्तृत्ववान व्यक्तीची स्थिती होत असते. राज्य मिळेपर्यंत कष्ट करावयाचे आणि तें मिळाल्यानंतर त्याच्या रक्षणाची आणि व्यवस्थेची काळजी वहावयाची ! आनंद–प्रदर्शनांत फारसा वेळ न घालवितां मुसलिनीनें आपलें पुढील धोरण संपादकमंडळास समजावून दिलें, लहान थोर सर्वांशीं त्यानें एकवार मनःपूर्वक हस्तांदोलन केलें, त्यांच्या सहकार्याचा गौरव केला व त्यांची रजा घेतली. मुसलिनी त्याच दिवशीं रात्रीं रोमला जाण्यासाठीं निघाला.

मुसलिनीच्या विजयाची बातमी क्षणार्धांत इटालीभर पसरली. टेलिफोन आणि टेलिग्राफ या खात्यांतलि लोक त्या दिवशीं रात्रंदिवस काम करीत होते तरी सुद्धां तें संपेना, इतके संदेश आणि प्रतिसंदेश त्या दिवशीं इकडून तिकडे, तिकडून इकडे चालले होते. रूटरची जगड्व्याळ संदेश संस्था, ही राज्यक्रांतीची बातमी आपल्या गिऱ्हाइकांना पोंचविण्यासाठीं धडपडत होती, तर अमेरिकन पत्रांचे बातमीदार मुसलिनीशीं दोन

मिनिटें बोलण्यास संधी सांपडेल म्हणून राजवाड्याच्या दरवाजाशीं उभे होते ! कांहीं बातमीदारांनीं त्याला मिलान येथेंच गांठण्याचा प्रयत्न केला होता. परंतु ते येण्यापूर्वींच त्यानें मिलान सोडल्यामुळें त्यांची निराशा झाली. एका बातमीदारानें तर इतर सर्वांवर ताण करण्याच्या हेतूनें विमानांतून रोमला जाण्याचें धाडस केलें. तो रोम येथें जाऊन पोहोंचला त्यावेळीं मुसलिनी आपल्या प्रधानमंडळास कांहीं महत्वाच्या सूचना देण्यांत गुंतला होता. मधल्या अवधींत दुसऱ्या एका बातमीदारानें मुसलिनीची गांठ घेऊन ती बातमी आपल्या पत्रास बिनतारी संदेशानें केव्हांच दिली होती ! विमानांतून घाईघाईनें आलेल्या बातमीदाराला ही हकीकत समजली त्या वेळीं त्याला काय वाटलें असेल त्याची कल्पनाच केली पाहिजे. विमानांच्या कार्यक्षमतेबद्दल आणि भावी उत्कर्षाबद्दल मात्र त्याचें मन साशंक झाल्याचें लोक सांगतात ! असो.

मुसलिनी ता. २८ रोजीं संध्याकाळीं मिलानहून निघाला, त्यामुळें त्याचा हा प्रवास बहुतेक रात्रीचाच झाला. मुसलिनीची गाडी ज्या ज्या ठिकाणीं थांबणार होती त्या त्या ठिकाणीं हजारों फॅशिस्ट व इतर लोक त्यास भेटावयासाठीं व त्याचें अभिनंदन करण्यासाठीं जमले होते. आपल्या अनुयायांचा उचित शब्दांत गौरव करीत त्यांनीं दिलेल्या सन्मानाचा साभार स्वीकार करीत व त्यांना उत्तेजन देत मुसलिनी चालला होता. लोकनायकाच्या ठिकाणीं जरूर असणाऱ्या गुणांपैकीं महत्वाचा गूण म्हणजे अनुयायांनीं दाखविलेल्या भक्तिभावाचा गौरवपूर्वक स्वीकार करणें व त्यांना भावी कार्याच्या जबाबदारीची जाणीव करून देणें हा होय. क्रांतिकारक चळवळ यशस्वी होण्याच्या मार्गावर असते, त्या वेळीं त्या

चळवळीच्या पुढाऱ्यावर फार मोठी जबाबदारी असते; ती म्हणजे उत्साहाच्या भरांत आपल्या अनुयायांच्या हातून कांहीं भलतेसलते प्रकार न होतील याविषयीं खबरदारी घेणें ही. मुसलिनीनें आपली ही जबाबदारी ओळखली होती असें त्याच्या खालीं दिलेल्या उद्गारांवरून कळून येईल. आपल्या अनुयायांना उद्देशून तो ह्मणतो,

"आज आपण एका अभूतपूर्व विजयाच्या अत्युच्च शिखरावर उभे आहों. हा विजय आपणां सर्वांचा आहे; तो आपण सर्वांनीं मिळून मिळविला आहे. त्याचा दुरुपयोग होणार नाहीं याबद्दल आपण खबरदारी घेतली पाहिजे. प्रधान-मंडळाची नेमणूक होईपर्यंत तुम्हाला लष्करी पोषाखांत रहावें लागेल. जें आपण मिळविलें आहे त्याचें रक्षण आणि संवर्धन करणें जरूर आहे. कडक शिस्त, आत्यंतिक व्यवस्था, आणि चित्ताची शांतता राखण्याची या वेळीं विशेष जरूरी आहे, ती तुम्ही ठेवाल याविषयीं मला यत्किंचितही शंका नाहीं.

"इटालीचा भविष्यत्काल आज आपल्या हातीं आला आहे. आपल्या मातृभूमीचें गतवैभव तिला पुनःप्राप्त करून देण्याचें सामर्थ्य आज फक्त आपल्याच ठिकाणीं आहे. तें तिला मिळवून देऊंच देऊं अशी आपण प्रतिज्ञा करूं या."

या स्फूर्तिदायक संदेशानें कोणतें तरुण अंतःकरण नव-उत्साहानें भरून येणार नाहीं? 'मुसलिनीकी जय,' इटालीकी जय,-"Viva Mussolini, Viva Italia" अशा जयजयकारांनीं इटालीच्या दशदिशा दुमदुमून गेल्या.

## राज-निमंत्रण.

१८८३ सालीं एका लोहाराच्या पोटीं जन्माला आलेला पोर १९२२ सालीं इटालीचा मुख्य प्रधान झाला ! ही विचार करण्यासारखी गोष्ट आहे. मुसलिनीच्या आंगीं बुद्धिमत्ता असेल, कर्तृत्व असेल, वक्तृत्व असेल, संघटना असेल आणि यासारखे आणखीहि हजारों गूण असतील. पण त्याची जन्मभूमी आणि कर्मभूमी इटाली जर स्वतंत्र नसती तर त्याच्या गुणांचें चीज झालें असतें काय ? स्वातंत्र्याच्या अभावीं असे शेंकडोंशें मुसलिनी आणि मॅझिनी भारतवर्षांत आज कुजून सडून मरून जात असतील ! देशाला पारतंत्र्य आलें म्हणजे कर्तृत्वाचे पंख गळून पडतात, बुद्धीचें तेज लोपतें, मर्दाचा नामर्द होतो, आणि राष्ट्राच्या आचारविचारावर नादानपणाची सुतकाची छाया पसरते. प्रसिद्ध आयरिश हुतात्मा मॅक्स्विनी यानें आपल्या Principles of Freedom * या पुस्तकांत म्हटल्याप्रमाणें "राष्ट्राला पारतंत्र्य आलें म्हणजे आधिभौतिक आणि आध्यात्मिक दोन्ही बाजूंनीं भयंकर नुकसान होत असतें. देश ऐहिक उत्कर्षाला मुकतो एवढेंच नव्हे तर विचाराची स्वतंत्रता हिरावून घेतल्यामुळें आध्यात्मिक दृष्ट्या तें राष्ट्र खुरटत जातें. पारतंत्र्यांत जाणाऱ्या प्रत्येक दिवसागणिक पारतंत्र्य–शृंखलेचा एक एक वेढा वाढत जातो आणि त्या प्रमाणांत स्वातंत्र्य दूरावतें."

स्वतंत्र देशाची गोष्ट याच्या उलट असते. त्यांतील प्रत्येक व्यक्तीला 'आपण देशाचे एक जबाबदार घटक आहों' अशी जाणीव असते. 'आपण काय वाटेल तें करूं' अशी त्याला धमक वाटत असते.

* या पुस्तकाचें भाषांतर माझे स्नेही श्री. स. आ. जोगळेकर यांनीं "स्वातंत्र्याचीं मूलतत्त्वें" या नांवानें नुकतेंच प्रसिद्ध केलें आहे.

व्यक्तीची कर्तृत्वशक्ती आणि ती व्यक्ती यांच्यामध्यें अंडसराप्रमाणें अडथळा आणणारी-परकी सत्ता तेथें नसते. प्रत्येकाला आपल्या बुद्धीचा विकास करण्यास आणि कर्तबगारी दाखविण्यास भरपूर अवसर असतो. एका व्यक्तीच्या कर्तबगारीचा उत्तम नमुना म्हणून मुसलिनीचें चरित्र आदरणीय आहे. तसेंच तें, स्वतंत्र राष्ट्रांत व्यक्तींना आपल्या आंगच्या गुणांचा विकास करण्यास कसा अमर्याद अवकाश असतो हें दाखविणारा, स्वातंत्र्याची आत्यंतिक आवश्यकता पटवून देणारा, आणि अंतःकरण थरारून सोडणारा एक साहसपूर्ण चित्रपट म्हणूनहि मननीय आहे, असें आमचें मत आहे.

# प्रकरण २८ वें.

# मुख्य प्रधान.

The world *has* to obey him who thinks and sees in the world.

—*Carlyle.*

Life is a search after power.

—*Emerson.*

मुसलिनीनें ता. ३० आक्टोबर १९२२ रोजीं दुपारीं रोममध्यें प्रवेश केला लोकांच्या झुंडीच्याझुंडी या असामान्य व्यक्तीला पहाण्याच्या इराद्यानें त्याच्या हॉटेलाभोंवती जमल्या होत्या. रोमशहरांत पाऊल टाकतांच मुसलिनीच्या कार्यास सुरवात झाली असें म्हणण्यास हरकत नाहीं. आपलें प्रधानमंडळ त्यानें तयारच ठेविलें असल्यामुळें त्याला इतरांप्रमाणें 'शोधाशोधी' करण्याचें कारण नव्हतें.

प्रधानमंडळाची नेमणूक त्यानें संध्याकाळीं ७ वाजतां जाहीर केली. पण तत्पूर्वीं, प्रसंगानुरूप ज्या लहानसहान गोष्टी करणें जरूर होतें त्यांच्याकडे मुसलिनीनें पहिल्या प्रथम लक्ष दिलें. पुष्कळ वेळां लहान दिसणाऱ्या गोष्टीच मोठ्या गोष्टींच्या आड येतात, व त्यांचा नीट बंदोबस्त झाला नसल्यास कार्यहानी होण्याचा संभव असतो, या व्यावहारिक तत्वानुसार मुसलिनी वागत होता. आपल्या पूर्वींच्या मुख्य प्रधानाची—सिनॉर फॅक्टा—त्यानें फॅशिस्ट स्वयंसेवकांकडून त्याच्या इतमामानुसार बोळवण केली.

मुख्य मुख्य महत्वाच्या ठिकाणीं स्वयंसेवक पाठवून, नाकेबंदी करून, विरोधी वर्तमानपत्रांवर नजर ठेवण्याची व्यवस्था केली. आपल्या अधिकाऱ्यांनीं कोणत्या प्रसंगीं कसें वागावयाचें त्यासंबंधीं सूचना मुसलिनीनें त्यांस देऊन ठेविल्या. तसाच वेडावांकडा प्रसंग आला तर त्याला छातीठोकपणानें तोंड देणें जरूर होतें व त्यासाठीं त्यानें वरीलप्रमाणें व्यवस्था करून ठेविली. आपली सर्व तयारी झाली असें पाहून मुसलिनीनें संध्याकाळीं प्रधान-मंडळाची नेमणूक जाहीर केली.

राजेसाहेबांशीं मुसलिनीचें वर्तन पहिल्यापासून अगदीं साधें होतें. इटालीचे सध्याचे राजेसाहेब व्हिक्टर इमॅन्युअल हे स्वभावतः दिलदार आणि कर्तृत्ववान माणसास वाव देणारे असल्यामुळें त्यांनीं मुसलिनीच्या मार्गांत कसल्याहि अडचणी आणल्या नाहींत. आपलें राजेपण राज्यकारभाराआड न येईल अशी ते नेहमीं काळजी घेतात. विशेषतः मुसलिनीच्या कर्तृत्वाबद्दल तर त्यांस यत्किंचितहि संशय नसल्यामुळें, त्यांनीं त्याला प्रधानमंडळ बन-विण्याची आज्ञा केल्यापासून तों आजतागाईत कोणत्याहि बाबतींत त्रास दिला नाहीं. 'ते आपला सल्ला मोकळ्यामनानें देतात; प्रसंगविशेषीं वाद-विवाद करून मतविरोधहि दर्शवितात. तथापि शेवटीं एकमत होत नाहीं असें दिसल्यास आपल्या प्रधानाच्या मताला आनंदानें मान देण्यास त्यांची तयारी असते.' मुसलिनी अधिकारारूढ झाल्यापासून इटालीबाहेर राजे-साहेबांचें अस्तित्वहि कित्येक वेळां शंकिलें जातें! कांहीं चांगल्या सुबुद्ध लोकांनासुद्धां इटालींत कोणत्या तऱ्हेची राज्यपद्धती आहे याची कल्पना नसल्याचें प्रस्तुत लेखकानें अनुभविलें आहे. फॅशिझमच्या अर्थाबद्दलहि कांहीं लोक बरीच मजा करितात. अमेरिकन लोकांना चुकण्याची भीतीच

वाटत नसल्यामुळें निःसंदिग्ध भाषेंत एका पत्रानें पुढील मजकूर प्रसिद्ध करून त्यांवरून फॅशिस्मोचा प्रसार इतक्या झपाट्यानें कां होतो याचा खुलासा केला होता. सदर पत्र ह्मणतें, "नवीन जन्मास आलेल्या मुलांना इटालींत कांहीं एका विशिष्ट तऱ्हेच्या पट्टयांनीं गुंडाळतात व या पट्टयांना 'फॅशी' अशी संज्ञा आहे. त्यांवरून इटालींतील सर्व लोक जन्मतःच फॅशिस्ट असतात, व म्हणूनच त्याचा प्रसार इतक्या झपाट्यानें होत आहे." फॅशिझमची, या पेक्षां अधिक मनोरंजक आणि विनोदी व्युत्पत्ति आमच्या इकडील मार्क ट्वेन श्रीपाद कृष्ण कोल्हटकर यांना सुद्धां देतां येणार नाहीं! असो.

प्रधान–मंडळाची नेमणूक जाहिर करून व त्यांस कामास लावून मुसलिनी फॅशिस्ट स्वयंसेवकांकडे वळला. त्या वेळीं रोममध्यें एकंदर ४०,००० फॅशिस्ट सैनिक आले होते. रेल्वे खात्याच्या प्रमुखाला बोलावून आणून मुसलिनीनें त्यास, "चोवीस तासांच्या आंत या ४०,००० लोकांना त्यांच्या त्यांच्या गांवीं पोंचविण्याची व्यवस्था झाली पाहिजे" असा हुकूम दिला.

"साहेब, तें अशक्य आहे. खुद्द लढाईच्या काळांत सुद्धां तें शक्य झालें नसतें! इतक्या लोकांना नेण्यास आम्हांला निदान ३ दिवस तरी लागतील;"–रेल्वेचा प्रमुख अडखळत बोलला.

"चोवीस तास हे माझे शब्द आहेत. अशक्य ही भाषाच मला माहित नाहीं. माझा हुकूम अंमलांत आलाच पाहिजे." मुसलिनीनें गंभीर आणि निश्चयी वाणीनें पुनः एकवार त्या अधिकाऱ्यास मोठ्यानें सांगितलें. पण क्षणार्धांत अधिकाराच्या आवाजास मित्रभावदर्शक विनंतीचें रूप

देऊन तो पुढें बोलूं लागलाः—" हें पहा. काम करावयाचें म्हणून ठरवि-ल्यास तें सहज करितां येतें. आणि तें केलेंच पाहिजे. विशेष प्रसंगीं सरकारची कामगिरी बजावणाऱ्या सेवकाची सेवा विसरली जात नाहीं, हें लक्षांत ठेवा. " झालें. मुसलिनीशीं हांसत हांसत हस्तांदोलन करीत काम पार पाडण्याचें अभिवचन देऊन तो प्रमुख तेथून निघाला. आणि सांगाव-याची मौज अशी कीं, खरोखरीच त्या दिवशींच्या त्या दिवशीं ४०,००० फॅशिस्टी शिपाई घरोघरीं रवाना झाले! आपल्या इकडील रेल्वे खात्याला ही गोष्ट खरीसुद्धां वाटणार नाहीं.

मुसलिनीच्या अनुयायांत मात्र या हुकुमानें बराच असंतोष उत्पन्न केला. या ४० हजारांपैकीं कित्येकांनीं त्यापूर्वीं कधीं रोम पाहिलें-सुद्धां नव्हतें. चार दिवस राहून रोमशहर पहावें व मग परत जावें असें त्यांस वाटत असल्यास नवल नाहीं. पण मुसलिनीच्या शब्दावर त्यांची इतकी निष्ठा होती कीं, 'घरीं जाण्याची आज्ञा कोणीहि अव-मानिली नाहीं.' मनुष्यस्वभावानुसार कांहींनीं थोडीशी कुरकुर केली असेल, कांहींना राग आला असेल, व कांहींचा हिरमोड झाला असेल, पण कोणीहि उघड विरोध केला नाहीं! लष्करी शिस्त ती हीच. इच्छेविरुद्ध आज्ञा-पालनाचें कर्तव्य करण्याचा प्रसंग मनुष्यावर नेहमीं येतो. त्या वेळीं त्याची मनःस्थिती कशी होते याचा ज्याचा त्यानें आपल्या मनाशींच विचार करून पहावा, म्हणजे फॅशिस्ट स्वयंसेवकांच्या आत्मसंयमनाची त्यास बरोबर कल्पना येईल. असो.


फॅशिस्टाची पहिली तुकडी त्या दिवशीं पहांटे रोम शहरीं येऊन दाखल झाली होती. शहराच्या कांहीं भागांतून फॅशिस्टांना विरोध करण्याचा

अल्पसा प्रयत्न झाला. एका घरांतून तर सपासप गोळ्या येऊन थोडेसे फॅशिस्ट घायाळहि झाले. परंतु प्राणहानी झाली नाहीं. फॅशिस्टांनीं मात्र आपल्या चित्ताची शांती बिलकुल ढळूं दिली नाहीं व उलट गोळीबार केला नाहीं ही गोष्ट लक्षांत ठेवण्यासारखी आहे.

त्यानंतर दुपारपर्यंत फॅशिस्टांच्या फौजा सारख्या येतच होत्या. त्यांचा काळा पोषाख, त्यांनीं चालविलेला जयघोष, त्यांची लष्करी शिस्त आणि चेहऱ्यांवर प्रकट होणारा आत्मविश्वास पाहून त्यांच्या शत्रूला चांगलाच वचक बसला असल्यास नवल नाहीं. 'पिआझा डेल पोपोलो' च्या विस्तीर्ण पटांगणांत फॅशिस्टांच्या सर्व फौजा एकत्रित करण्यांत आल्या, व तेथून फॅशिस्टांची जंगी मिरवणूक निघाली.

दुपारीं ३ वाजतां रणदुंदुभीच्या स्फूर्तीदायक घोषणेंत हजारों निशाणें फडकूं लागली. काळा फॅशिस्ट शर्ट घालून गंभीर मुद्रेनें मुसलिनी मिरवणुकीच्या अग्रभागीं चालला होता. इटालियन सेनाधिपती जनरल डिआझ आणि दर्यासारंग ॲडमिरल डी रिव्हेल हे दोघे इटालियन अधिकारी मुसलिनीच्या दोहों बाजूस होते. मुसलिनी व फॅशिस्ट यांची ती आश्चर्यकारक मिरवणूक पाहून इटालीचें अंःतकरण त्यादिवशीं अभिमानानें उचंबळून आलें असल्यास नवल नाहीं.

राजवाड्यासमोरून मिरवणूक चालली तेव्हां राजेसाहेबांनीं या सैनिकांना मुद्दाम दर्शन देऊन हास्यवदनानें त्यांचें समयोचित अभिनंदन केलें. पिआझा बेनेझियाच्या चौकांत, महायुद्धांत कामास आलेल्या 'अज्ञात' सैनिकाचें —" Unknown Soldier "—स्मारक आहे. तेथें ही मिरवणूक येतांच त्या स्मारकापुढें, त्या मूर्तिमंत स्वार्थत्यागापुढें, सर्व फॅशिस्टांनीं गुडघे टेंकून त्यास प्रणाम केला व मृतवीराविषयींचा आपला अमर्याद आदरभाव प्रकट केला.



मुसलिनी—मुख्य प्रधान.

काळ्या कभिन्न पोषाखांत ४० हजार लोक विनम्र होऊन गुडघे टेंकून मृतात्म्यांना नमस्कार करीत आहेत !! हा देखावा नुसत्या कल्पनेलाहि किती परिणामकारक आणि उदात्त वाटतो ! मग ज्यांनीं तो प्रत्यक्ष पाहिला किंवा त्यांत भाग घेतला त्यांना त्या उदात्तरम्य दृश्यानें काय वाटलें असेल याची कल्पनाच केली पाहिजे. ज्या हजारो लाखो जीवांनीं मायदेशासाठीं आपले प्राण वेचले, अनिर्वचनीय कष्ट सहन केले, त्यांच्या आत्म्यांना त्या दिवशीं किती धन्यता वाटली असेल, त्यांनीं किती अगणित स्वर्पुष्पांची वृष्टी त्या मिरवणुकीवर केली असेल, आनंदोत्साहानें एकमेकांना किती आलिंगिलें असेल, त्याचें शब्द-चित्र काढणें कठिण आहे. प्रत्यक्ष इटालियन समाज तर त्या देखाव्यानें मुसलिनीस पूर्ण वश झाला. सोशिआलिस्टांच्या अत्याचारांना आजपासून आळा पडणार या आशेनें इटालियन जनतेला हायसें वाटलें; तिनें विश्वासाचा उसासा टाकला, तोंडावरून श्रम परिहारक हात फिरविला आणि विश्वस्त हृदयानें घरचा रस्ता सुधारला. युद्धानंतर इतक्या दिवसांत, इटालीला समाधानाची अशी झोंप त्या दिवशीं लागली असेल ! मुसलिनीची झोंप मात्र त्याच दिवशीं संपली. कारण त्या दिवसापासून त्याला इटालियन राज्ययंत्राचें संरक्षण, डोळ्यांत तेल घालून करणें जरूर होतें. शत्रूवर दरारा बसला तरी अद्यापि त्याचा पराभव झाला नव्हता. मग विश्रांति घेऊन कसें चालेल ? मिरवणुकीला रजा देतांच मुसलिनीनें, " झालें. हा कार्यक्रम आटपला. आतां कामास लागावयाचें " असें म्हणून अस्तन्या वर सारल्या. मुसलिनीची काम करण्याची धमक आणि उरक शक्ती केवढी दांडगी आहे याची कल्पना तो प्रधानमंत्री होईपर्यंत फारच थोड्या लोकांना आली असेल. राज्यधुरा उचलल्या दिवसांपासून त्यानें कामाचें ढीग पाडले, व " मुसलिनी

म्हणजे कामाला नुसता राक्षस आहे" असे प्रशंसोद्गार मिळविले. "Mussolini is a glutton for work." [ Mr. Washburn Child, ex-Ambassador of the U. S. A. in Rome. ]

कोणत्याहि काळांतलि आणि देशांतील लोकविलक्षण व्यक्तींच्या जीवनक्रमाचा नुसता वरवर जरी विचार केला तरी त्यांच्या ठिकाणीं अचाट शारीरिक व मानसिक श्रम करण्याची विलक्षण शक्ती असते असें दिसून येतें. 'अमर्याद आणि अविश्रांत श्रम करण्याची पात्रता' असें असामान्य बुद्धिमत्तेचें लक्षण कार्लाइलनें दिलें आहे तें उगीच नाहीं. लो. टिळकांना २०।२० आणि २२।२२ तास काम केल्याचें लोकांनीं पाहिलें आहे. म. गांधीना १८ तास सतत काम करितांना पहाण्याचा सुयोग प्रस्तुत लेखकास आला आहे. नेपोलियनाच्या आणि ग्लॅडस्टनाच्या अतिरिक्त श्रम करण्याच्या विलक्षण सामर्थ्यांच्या अनेक गोष्टी प्रसिद्ध आहेत. शरीर आणि मन या दोहोंवर वाटेल तसा ताबा चालवितां आला नाहीं तर मोठ्या लोकांच्या हांतून मोठीं कार्यें पारच पाडणार नाहींत. असो.

मुसलिनीनें आपलें प्रधानमंडळ स्थापून इटालीची राज्यधुरा उचल्यापासून तों आज या घटकेपर्यंत त्याला विश्रांति अशी माहितच नाहीं असें म्हणण्यास हरकत नाहीं. विशेषतः त्याचें प्रधानमंडळ ज्यावेळीं अगदीं नवीन होतें, 'कचेरीच्या कामाला रुळलेलें' नव्हतें, त्यावेळीं तर मुसलिनीला साहजिकच भयंकर श्रम करावें लागत असत.

मनुष्याच्या काम करण्याच्या शक्तींना सुद्धां सीमा आहे. पण माणूस एखाद्या विशिष्ट ध्येयानें स्फुरित होऊन काम करूं लागला ह्मणजे तो

त्या सीमेच्याहि पलीकडे जातो. त्याला तहान भूक झोंप या सारख्या शारीरिक आणि नैसर्गिक गोष्टींचीहि बाधा होत नाहीं. त्या दिवसांत मुसालिनीला अती श्रम न करण्याबद्दल कोणी सांगूं लागल्या त्यास तो उत्तर देई कीं, " कांहीं हरकत नाहीं. काम व्हावयाचें तर तें याच वेळीं होईल; नाहीं तर मुळींच होणार नाहीं. मृत्युपंथास लागलेल्या आणि तात्काळ शस्त्र क्रियेची जरूरी असलेल्या रोग्यासारखी आपल्या देशाची स्थिती झाली आहे. डॉक्टरला कंटाळा आला असला किंवा तो दमला असला म्हणून त्या शस्त्र-क्रियेला एका क्षणाचा तरी विलंब सहन होईल काय ? ती शस्त्रक्रिया त्या क्षणीं केलीच पाहिजे. ' उद्यां मृत्यू यावयाचा आहे ' असें जरी मला समजलें तरी सुद्धां मी एका क्षणाचीहि विश्रांती घेणार नाहीं." महत्कार्यें तडीस जातात तीं अशा तऱ्हेच्या मृत्यूलाहि मारणाऱ्या श्रमसातत्यानें, आणि अंगीकृत कार्यावरील अढळ आणि अचळ निष्ठेनें. ' उद्यां मरावयाचें असलें तरी सुद्धां मी क्षणाचीहि विश्रांति घेणार नाहीं ! ' प्रत्येक शब्द तेजस्वी निश्चयानें आणि प्रखर कार्यभक्तीनें निघत असल्यामुळें तो अंतःकरणावर तात्काळ परिणाम करितो. आत्मस्फूर्ती शिवाय अशी भाषा निघत नसते.

' मुसलिनीनें पाशवी शक्तीच्या बळावर ( Physical force ) प्रधा-नपद मिळविलें असलें तरी त्याला राज्यकारभाराची प्रत्यक्ष माहिती मुळींच नसल्यामुळें लवकरच त्याची फजिती होईल व तो अनुभविक मंडळींकडे मदतीची याचना करील, ' अशी खुळी समजुत कित्येक लोकांनीं आपल्या उराशीं बाळगिली होती. पण मुसलिनीच्या काम करण्याच्या अभिनव पद्धतीमुळें त्याला तशी अडचण विलकुल वाटली नाहीं. शिवाय मुलकी अधिकाऱ्यांना त्यानें पूर्ण विश्वासांत घेतले असल्यामुळें ते त्यास हरएक

प्रकारची मदत करण्यास तयार असत. राज्यक्रांती झाली ह्मणजे विजयी पक्ष जुन्या लोकांना काढून त्यांच्या ठिकाणीं आपल्या लोकांची वर्णी लावण्यास कधींही चुकत नाहीं, असा आजपर्यंतचा अनुभव आहे. इटालियन सरकारी नोकरांसही आरंभीं उच्चाटनाची भीति वाटली असल्यास नवल नाहीं ! पण मुसलिनीनें प्रथम दिवशींच जाहीर केलें कीं, "जे लोक फॅशिझमशीं निष्कारण विरोध करणार नाहींत त्यांना आपल्या नोकरीविषयीं काळजी करण्याचें बिलकुल कारण नाहीं. सनदी लोकांना त्यामुळें धीर आला व त्यांनीं मुसलि-नीला एकनिष्ठपणें सहाय्य करण्याचें अभिवचन दिलें. मुसलिनीनें आपलें वचन अक्षरशः नसलें तरी बहुतांशीं पाळलें आहे ही गोष्ठ नमूद करणें जरूर आहे.

त्या काळीं मुसलिनीच्या कचेरींत एक दिवसाआड प्रधानमंडळाची बैठक होई व प्रत्येक बैठक ६।६ तास चाले ! मुसलिनीची आपल्या सहकाऱ्यांच्या कामावर सूक्ष्म नजर असे. अगदीं जुजबी कामापासून तों तहत महत्वाच्या कामापर्यंत त्याचें लक्ष असल्यामुळें त्याच्या सहकाऱ्यांना कामाची टाळाटाळ करणें शक्य नव्हतें. या ठिकाणीं ही गोष्ट नमूद करणें जरूर आहे कीं, प्रधानमंडळानेंहि त्या वेळीं काम करण्यांत बिलकुल कसूर केली नाहीं. सर्वजण एकदिलानें उत्साहानें आणि धडाडीनें सतत काम करीत होते. प्रधानमंडळापैकीं एकजण कामाचा ताण पडून शेवटीं मृत्यूहि पावला ! पण कोणी कुरकुर केली नाहीं.

एक वर्षभर काम करून आपल्या कार्याचा वर्षाअखेरीस आढावा घेतांना, ' गेराचिया ' या आपल्या मासिकांत मुसलिनीनें खालील उद्गार काढले आहेत. त्यांवरून त्या वेळीं फॅशिस्ट प्रधानमंडळावर कामाचा बोजा किती पडत असेल त्याची कल्पना होते. मुसलिनी म्हणतो, " खरोखर

अद्यापि विशेष असें आम्हांला कांहींसुद्धां करतां आलेलें नाहीं. शिल्की कामाचा ढीग पडला आहे. तो काढून टाकल्याशिवाय पुढील मार्ग दिसणार नाहीं. हें रस्ता साफ करण्याचें काम मी सध्यां करीत आहे ! अनेक जुन्या प्रश्नांची विल्हेवाट लावण्यांत मी सध्यां गढून गेलों आहे. शब्दावडंबराच्या पर्वताखालीं सदर प्रश्न धूळ खात पडलेले असल्यामुळें, अर्ध शतकाहूनहि अधिक कालावधीची धूळ त्यांवर साचली आहे. त्यांचा निकाल करण्याचें काम सोपें नाहीं. तथापि हेंच कठिण काम सध्यां आम्हीं हातीं घेतलें आहे. कोणत्याहि देशांतील प्रधानमंडळाला कार्य करून दाखविण्यास कांहीं अवधी पाहिजे. त्याचें आयुष्य कांहीं दिवस तरी अखंडित गेलें पाहिजे. अव्यवहित आणि अविच्छिन्न जीवनक्रमाशिवाय कोणत्याहि प्रधानमंडळास, मग तें कितीहि बुद्धिमान असो, कांहीं विशेष कार्य करून दाखवितां येणार नाहीं. आज कित्येक वर्षें इटालीचा राज्यकारभार अत्यंत अस्थिर आणि अल्पजीवी प्रधानमंडळांच्या हातीं होता. कित्येकांच्या वाट्यास पुरे ६ महिनेसुद्धां आले नाहींत ! मग त्यांनीं चिरपरिणामकारक राष्ट्रहिताचीं कामें हातीं घेतलीं नाहींत किंवा धडाडीचा कार्यक्रम आंखला नाहीं तर नवल काय ? या गोष्टी करण्यास कालाची अत्यंत जरूरी आहे ही गोष्ट विसरतां कामा नये. तैल बुद्धीच्या अस्थिर प्रधानमंडळापेक्षां मध्यम कर्तृत्वशक्तीचें पण स्थिर प्रधानमंडळच शेंकडों पटीनें श्रेयस्कर आहे."

आपले प्रधानमंडळ स्थापून मुसलिनीनें आपल्या जीवनकार्याचा मध्यबिंदू गांठला. यापुढें या मध्यबिंदूवर अचळ राहून इटालीचें राजकारण यशस्वीरीतीनें हांकून आपल्या राजकीय तत्त्वज्ञानाला, चिरस्थाई करणें हें महत्वाचें कार्य त्यास करावयाचें आहे. मुसलिनीच्या यशापशाची कसोटी लागण्याचे दिवस अद्यापि पुढेंच आहेत. राज्ययंत्र केवळ हातांत आलें

म्हणजे झालें नाहीं. तें शहाणपणानें राष्ट्रहितैक बुद्धीनें आणि जबाबदार रीतीनें चालवून दाखविण्यांतच अधिकारारूढ पक्षाची योग्यता ठरावयाची असते. मुसलिनीचे सर्व प्रयत्न सध्यां याच दिशेनें सुरू आहेत.

त्यानें भांडवलवाला पक्ष आणि मजुर पक्ष यांच्यातील तंटे पंचायती मार्फत सोडविण्याचा कायदा पास करून, आधुनिक औद्योगिक झगड्याला परिणामकारक पायबंद घातला आहे. शिक्षण सार्वत्रिक होतेंच; पण त्याविषयींची मातापितरांवरील जबाबदारी वाढवून त्यानें तें सक्तीचें केलें आहे. फॅशिस्ट मिलिशियाला राष्ट्रीय सैन्याचें स्वरूप देऊन पुंडगिरीला आळा घातला आहे. कारखानदारांना सवलती देऊन देशांतील उद्योगधंदे वाढविले आहेत. आरमार आणि वैमानिक दळ यांची वाढ करून आपल्या राष्ट्राच्या संरक्षणाची जय्यत तयारी केली आहे. ट्रिपोलीसारख्या इटालियन वसाहती वसतिक्षम करून इटालीच्या वाढत्या लोकसंख्येला जागा करून दिली आहे.

या ठिकाणीं मुसलिनीच्या चरित्राची परिसमाप्ती करण्यास हरकत नाहीं. कारण १९२२ पासून इटालीच्या राजकारणांशीं आणि राज्यव्यवस्थेशीं मुसलिनी इतका एकजीव होऊन गेला आहे कीं, त्यापुढें त्याला निराळें अस्तित्वच राहिलेलें नाहीं असें म्हणावयास हरकत नाहीं. त्यापुढील मुसलिनीची कृती म्हणजे इटालियन सरकारची कृती असल्यामुळें, तिची माहिती देणें म्हणजे इटालीचा प्रचलित इतिहासच लिहिण्यासारखें होणार आहे. मुसलिनी प्रत्यहीं इटालीचा नवा इतिहास बनवीत आहे. त्याच्या कृत्यांचा बरावाईट परिणाम समजण्यास बराच काळ लोटला पाहिजे. त्याच्या कृतीवर मत देण्याचें काम भविष्यकालाचें आहे. त्याच्या फॅशिस्मो तत्वाचा इतिहास प्रसार आणि कार्य याविषयीं विवेचन

दुसऱ्या भागांत केलें आहे. त्यांवरून वाचकांस मुसलिनीच्या १९२२ नंतरच्या कृतीची कल्पना येईल. हें प्रकरण संपविण्यापूर्वी एकाच गोष्टीचा उल्लेख करणें जरूर आहे. ती म्हणजे १९२५ च्या मार्च महिन्यांत इंग्लंडच्या राजेसाहेबांनीं इटालीस दिलेली भेट. मुसलिनीनें त्यांचें मनःपूर्वक स्वागत करून राजेसाहेबांची योग्य ती बडदास्त ठेविली होती हें सांगण्याची जरूरी नाहीं. त्यांच्या भेटीच्या प्रसंगाचें छायाचित्र मुद्दाम या पुस्तकांत दिलें आहे.

पुढील प्रकरणांत मुसलिनीच्या नित्य जीवनक्रमाची आणि त्याच्या आवडीनिवडींची थोडी फार चर्चा करून हा भाग संपविण्याचा उद्देश आहे.

## प्रकरण २९ वें

# केवळ खासगी.

The public man is born "public"—he bears the stigma from his birth......he is born to his doom. He can never escape it. His tragedy is one of infinite range-it extends from myrterdom to the supplying of autographs.

—*Mussolini.*

आतांपर्यंत इटालियन डिक्टेटरचा सार्वजनिक आयुष्यक्रम कथन केला. या प्रकरणांत त्याच्या केवळ व्यक्तिविषयक चरित्राचा त्रोटक वृत्तांत देऊन हा भाग संपवूं.

मुसलिनीचें सध्यां वय ४४ वर्षांचें आहे, म्हणजे पाश्चात्यांच्या जीवमानाप्रमाणें सध्यां तो ऐन तारुण्यकालांतच आहे असें म्हणावयास हरकत नाहीं. वयानें तरुण आणि शरीरानें सुदृढ असल्यामुळें त्याच्या ठिकाणीं काम करण्याची जबर शक्ती वास करीत असली तर नवल नाहीं. अविश्रांत श्रम करणारीं माणसें बहुशः मिताहारी आणि अल्पभाष असतात. मुसलिनीचा नित्यक्रम अगदीं साध्या पद्धतीचा आहे. आपल्या खासगी आयुष्यक्रमासंबंधीं, मि. टॉमस बी. मॉर्गन, 'ब्रिटिश युनायटेड प्रेसचे' रोम येथील प्रतिनिधी, यांच्याबरोबर झालेल्या मुलाखतींत त्यानें खालीं दिलेली माहिती प्रसिद्ध केली आहे. या मुलाखतींत अनेक विषयांचा उहापोह झाला असून मुसलिनीच्या आवडीनिवडींचाहि उल्लेख त्यांत आला आहे. सदर

मुलाखत म्हणजे मुसलिनींचें छोटेखानीं आत्मवृत्तच म्हटलें तरी चालेल. अशी ही महत्वाची मुलाखत त्याच्याच शब्दांत खालीं दिली आहे. वर म्हटल्याप्रमाणें, या मुलाखतींत अनेक विषय आले असल्यामुळें प्रत्येक विषयाला स्वतंत्र नांव देऊन त्याखालीं तद्विषयक मुसलिनीचें मत दिलें आहे.

## खाणेंपिणें.

"शरीराचा उत्साह कायम राहून बौद्धिक काम करण्यास भरपूर मदत होईल असा अत्यंत अल्प आहार मी घेत असतों. कॉफी आणि दारू यांचा मी कधींहि उपयोग करीत नाहीं. कॉफी उत्तेजक असल्यामुळें तिचा उपयोग केवळ औषधासाठींच करावा असें मला वाटतें. माझी सकाळची न्याहारी म्हणजे दुधाचा एक ग्लास. माझ्यां या छोट्या हजेरींत मी केव्हांहि फरक करीत नाहीं. माझें मुख्य जेवण मी दुपारीं २ वाजतां जेवतों. हें जेवणाहि अगदीं साधें असतें; त्यांत मसाले, फोडण्या आणि नानाविध प्रकारचीं लोणचीं रायतीं यांचें तुम्हांला कोठें नांवसुद्धां दिसणार नाहीं. माझ्या स्वयंपाकीण बाईचें नांव सेसिरा आहे. मला काय पाहिजे तें तिला बरोबर माहित झालें आहे. कोणत्या दिवशीं काय करावयाचें तें ती विचारीत बसत नाहीं, आणि तिनें तयार केलेल्या जिनसाबद्दल मीही कधीं चिकित्सा करीत नाहीं. माझ्या दुपारच्या जेवणांत तळलेलें किंवा भाजलेलें थोडेसें मांस, शिजवलेला एकाद दुसरा मासा आणि थोड्या कच्च्या भाज्या—मुळा, कोबी, गाजर, वाटाणाच्या शेंगा वगैरे—असतात या भाज्या कधीं कधीं थोड्याशा उकडून लोण्याबरोबर खाण्याचाहि माझा प्रघात आहे. अन्न जितकें साधें व कमी उकडलेलें किंवा तळलेलें असेल तितका त्याच्या ठिकाणीं अन्नांश जास्त असतो असें मला वाटतें. मला

मुखशुद्धीसाठीं कांहीं लागत नाहीं. तथापि मी कधीं कधीं एकादें मुसंबें किंवा सफरचंद जेवण झाल्यावर घेतों. माझा दुधावर अतिशय विश्वास आहे, व मी ते भरपूर प्रमाणांत पितों. सकाळीं न्याहारीच्या वेळीं, दुपारीं जेवतांना, सायंकाळीं ६ वाजतां, मधल्या वेळीं, आणि रात्रीं १० वाजतां निजतांना, असें मिळून मी चार ग्लासें दूध नियमानें पितो. ( मुसलिनीचा ग्लास चांगला मोठा असतो! ). मांसापेक्षां मांशाचें अन्न शरीराला जास्त पोषक असून पचनाला तें हलके असतें. त्यानें आळस येत नसल्यामुळें काम करण्यास मला भरपूर उत्साह राहतो. कोणत्याही क्षणीं पडेल तें काम करण्याची तयारी पाहिजे असें माझें मत आहे; आणि यासाठीं ज्याला शारीरीक आणि बौद्धिक तत्परता कायम ठेवावयाची असेल त्यानें आपला आहार अत्यंत माफक ठेवला पाहिजे. मोठ्या जेवणांनीं माणसाला आळस आणि अस्वस्थता मात्र येते. रात्रीं १० वाजतां सर्व काम आटोपलें ह्मणजे एक ग्लासभर दूध आणि थोडीं फळें खाऊन मी झोंपीं जातों.

## व्यायाम व उपवास.

या माझ्या अल्प आहारामुळें, शरीरांत निरुपयोगी आणि अपायकारक द्रव्यें सांठण्यास सवड मिळत नाहीं, किंवा मेदहि वाढत नाहीं. मी रोज १ तास खूप जोराचा व्यायाम घेतों; त्यामुळें कांहीं कमीजास्ती खाल्लें गेलें असल्यास तेंहि पचून जातें व शरीरयंत्र ताजेतवानें होतें. नियमित व्यायाम आणि विशिष्ट पद्धतीचा आहार यांची माझ्या देहाला इतकी संवय लागून गेली आहे कीं, मला माझ्या ठराविक पदार्थांपलीकडे दुसरें कांहीं खाण्याची कधीं इच्छाच होत नाहीं. माझ्या नियमितपणामुळें माझें शारीरिक व्यवहार

घड्याळाप्रमाणें चालतात. चांगल्या सवयींचें अखंड पालन केल्यानें शरीरांवर जरूर तो ताबा मिळवितां येतो. मी महिन्यांतून २।३ दिवस उपवास करतों. त्या दिवशीं थोडीशी साखर मिसळलेल्या पाण्याशिवाय मी कांहींएक खात पीत नाहीं. उपवासाला शारीरिक तसेंच अध्यात्मिक महत्व आहे. त्यानें मन भौतिक व्यवसायावरून उदात्त अध्यात्म विषयाकडे नेण्यास अतिशय मदत होते. नित्य व्यवहाराहून निराळ्या अशा उन्नत वातावरणांत गेल्याचा आनंद उपवासानें प्राप्त होतो. शरीरांत अन्नाचा जो भाग निष्कारण राहिला असेल त्याचें पचन होण्यास व शरीरयंत्राला जरूर ती विश्रांती देण्यास उपवासाचा फार उपयोग होतो. उपवासाच्या दुसऱ्या दिवशीं मला विलक्षण हुशारी वाटते. उपवासाच्या दिवशीं सुद्धां माझ्या रोजच्या कार्यक्रमांत यत्किंचितहि फरक करण्यांत येत नाहीं. सर्व कामें नित्याप्रमाणें पूर्ण उत्साहानें आणि तत्परतेनें करण्यांत येतात.

## धूम्रपान.

मी लढाईवर होतों त्या वेळीं मधून मधून सिगारेट्स पीत असे. परंतु हल्लीं मी धूम्रपानाला सर्वस्वीं फांटा दिला आहे. लढाईवर असतांना, तोंडांत सिगारेट धरून खंदकाच्या डोक्यावर जाण्यांत मला मोठी मजा वाटे. त्याकाळीं, धूम्रपानामुळें डोक्याला विश्रांती मिळण्यास आणि मन शांत ठेवण्यास मला बरीच मदत होई. सिगारेट प्यावयास मिळाली असतां शिपायांच्या ठिकाणीं नवा दम आल्याचें मी पाहिलें आहे. जखमी झालेले किंवा भीतीनें गांगरून गेलेले शिपाई विडीच्या एका झुरक्यासरशी जखमेच्या वेदना आणि भीतीचें कारण पार विसरून गेल्याचे प्रसंग मला कितीतरी माहित आहेत. एका विषयांवरून दुसऱ्या विषयांवर जाण्यास व

मनाला विरंगुळा म्हणून धूम्रपानाचा अतिशय उपयोग आहे. सिगार किंवा चिरूट ओढतांना किती आनंद होतो याची मला पूर्ण कल्पना आहे, परंतु माझी मानासिक तयारी इतकी झाली आहे कीं, आतां वाटेल त्या वेळीं विषय बदलून विचार करण्याची कला मला पूर्णपणें अवगत झाली आहे. आतां त्यासाठीं मला सिगारेटची मदत घेण्याची जरूरी वाटत नाहीं. सिगारेटच्या आनंदाला मी मुकलों असलों तरी कार्यक्षमतेच्या दृष्टीनें माझा फायदा झाला आहे. स्त्रियांनीं योग्य प्रमाणांत धूम्रपान करण्यास हरकत नाहीं. पण संसारांतील आपल्या महत्वाच्या जबाबदाऱ्या ओळखून त्यांनीं तें करावें.

## लठ्ठपणा.

मला लठ्ठपणाचा अतिशय तिटकारा आहे. अंगावर मांसाच्या वळकट्यावर वळकट्या नेणारा माणूस पाहतांच त्याच्या विषयीं मला भयंकर तिटकारा येतो. माझा भाऊ ओर्लेंडो विलक्षण लठ्ठ आहे. त्यानें मनांत आणल्यास निरुपयोगी मेद त्याला कमी करतां येईल. मी त्याला त्याच्या लठ्ठपणाबद्दल खूप बोलतों. अंगांत विनाकारण चरबी वाढूं देणें म्हणजे शरीर आळशी करण्यासारखें आहे. मेदामुळें विचारशक्तीवरहि परिणाम होऊन माणूस दीर्घसूत्री बनतो. व्यायाम घेऊन फॅशिस्ट लोकांनीं सडसडीत आणि सुदृढ झालें पाहिजे, कारण त्यांना अतिशय काम आणि तेंहि झपाट्यानें करावयाचें आहे.

## एकांतवास.

मला स्वभावतः एकांतवास फार प्रिय आहे. सायंकाळीं मी ऑफिसमधून घरीं परत निघालों तरी माझेबरोबर गाडी हांकणाऱ्याशिवाय

दुसरें कोणीहि नसतें. घरीं गेल्यापासून परत ऑफिसला येईपर्यंत मी घरीं अगदीं एकटा असतों. माझी स्वयंपाकीणबाई हीच माझें घरचें सर्व काम करते. मला खाण्याजेवण्याच्या वेळीं टेबलाशीं दुसरें कोणी असलेलें खपत नाहीं. मी अगदीं एकटा जेवतों. माझा भाऊ रोमला आला तरीसुद्धां मी त्याला सहसा कधीं जेवावयास बोलवत नाहीं. तो आपल्या खानावळींत जेवतो व मी माझें घरीं जेवतों. याचा अर्थ माझें माझ्या भावावर प्रेम नाहीं असें नव्हे. जेवतांना अगदीं एकटें असावें असें मला कां वाटतें याचें कारण मात्र मला देतां येणार नाहीं. माझी ती एक लहर आहे असें म्हटलें तरी चालेल. आतां, सार्वजनिक आणि दरबारी मेजवान्या व टी–पार्ट्या यांच्या बाबतींत मला माझा वरील नियम बदलावा लागतो ही गोष्ट कबूल केली पाहिजे. कोठें मेजवानीला जावयाचें म्हणजे मला अगदीं नकोसें होतें; पण नाइलाज म्हणूनच मी या प्रसंगांना हजर राहातों. मला मेजवान्यांचा आणि लिहून आणलेलें भाषण ऐकण्याचा भयंकर तिट-कारा आहे. मेजवान्यांच्या प्रसंगींसुद्धां मी कधीं दारू पीत नाहीं. मानसीक श्रम करणाऱ्या लोकांनीं तर दारू मुळींच पिऊं नये. दारूमुळें त्यांची विचार-शक्ती क्षीण होते. दारूच्या दुष्परिणामाबद्दल इतका उत्तम उहापोह आतां पर्यंत झाला आहे कीं, याविषयीं मी जास्त कांहीं सांगितलें पाहिजे असें नाहीं. शारीरिक श्रम करणाऱ्यांनीं मात्र माफक प्रमाणांत दारू घेतल्यास ती त्यांना हितावह होईल असें माझें मत आहे. उत्तम स्वादाची दारू असल्यास मला ती आवडते पण वर सांगितलेल्या कारणासाठीं मी तिला स्पर्शसुद्धां करीत नाहीं.

## खुनाचे प्रयत्न.

आतांपर्यंत माझा खून करण्याचा चार वेळां प्रयत्न झाला. पहिला प्रयत्न ४ नोव्हेंबर १९२५ रोजीं झाला. पण त्या कटाचा सुगावा आम्हांला

आगाऊच लागल्यामुळें पोलिसांनीं त्या कटवाल्यांची तात्काळ व्यवस्था केली. आतांपर्यंतच्या सर्व प्रयत्नांत हा प्रयत्न अत्यंत काळजीपूर्वक आणि पूर्वसंकेतानुसार करण्यांत आला होता. तो सिद्धीस गेला नाहीं हा भाग निराळा. दुसरा प्रयत्न ७ एप्रील १९२६ मध्यें झाला. हा प्रयत्न मिस गिबसन नांवाच्या एका आयरिश बाईनें वेडाच्या लहरींत केला. माझ्या नांकाला चाटून तिची गोळी गेली व मला थोडीशी मलमपट्टी करणें भाग पडलें इतकेंच ! तथापि आगाऊं ठरल्याप्रमाणें ट्रिपोलीला जाण्याच्या कार्यक्रमांत मी बिलकुल फरक केला नाहीं. जखम काळजी करण्यासारखी असली तरी फार जलद भरून आली व ट्रिपोलीस गेलों असतां स्वतः मोटार चालवून सुद्धां मला यत्किंचितहि त्रास झाला नाहीं. तिसरा प्रयत्न ( ११ सप्टेंबर १९२६ रोजीं, लसेटी नांवाच्या एका इटालियन तरुणानें केला. त्याच्या बॉंबनें फक्त मोटारींचें तावदान फुटलें. तो बांब पाहतांच माझ्या मनांत पहिला विचार आला तो हा कीं, 'तोच बांब उचलून त्या तरुणाच्या आंगावर फेंकावा.' चवथा प्रयत्न म्हणजे परवा ३० ऑक्टोबर १९२६ रोजीं बोलोना येथें दुसऱ्या एका तरुणानें केलेला होय. त्याच्या पिस्तुलाची एक गोळी उडाली व दुसरी तशीच अडकून राहिली.

माझ्या प्राणावर वरील सारखे प्रयत्न झाले असले तरी मी माझ्या नित्य कार्यक्रमांत थोडासुद्धां फरक करीत नाहीं. "Business as usual" किंवा "नित्याप्रमाणें व्यवसाय" हेंच अशा संकटकाळींसुद्धां माझें ध्येय वाक्य असतें. पहिला प्रयत्न झाला तो दिवस 'आर्मिस्टिस डे' म्हणजे युद्ध तहकुबीचा दिवस होता. मी चिगी राजवाड्याच्या सज्जांत उभा राहून बोल-णार होतों मी सज्जांत येतांच समोरच्या हॉटेलमधून माझ्यावर आपली

पिस्तुलें झाडण्याचें कटवाल्यांनीं ठरविलें होतें. मला कटाची बातमी समजली त्यावेळीं, मी एका चित्रकाराकडे माझ्या चित्रासाठीं बसलों होतों. तेथल्या तेथें झटपट हुकूम देऊन मी माझ्या चिताऱ्याकडे वळलों व त्यानें सांगितल्या प्रमाणें २० मिनीटें बसलों. लोकांनीं गडबडून जाऊं नये म्हणून त्या दिवसाचा सर्व कार्यक्रम पुरा पडेपर्यंत या कटासंबंधीं बिलकुल वाच्यता करण्यांत आली नाहीं. दुसऱ्या खेपेला तरी मी बँडेज करूनच ट्रिपोलीला गेलों. तेथें जाऊन पोहोंचतांच मी बँडेज सोडून टाकलें व सर्व कार्यक्रम व्यवस्थेशीर व ठरल्याप्रमाणें पार पाडला. तिसऱ्या खेपेस, मी ऑफिसांत येतांच पहिली गोष्ट केली ती म्हणजे लोकांना शांत राहण्याची विनंती. त्यानंतर, बांब टाकण्यांत आला तेव्हांपासूनची साग्र हकीगत स्वहस्तानें टाइपरायटरवर लिहून काढली व पोलीस अधिकारी येतांच त्याच्या हातीं तिचा खर्डा देऊन मी कामास लागलों. चवथा प्रयत्न झाला त्यावेळीं मी माझ्या जन्मस्थानीं फोर्ली येथें चाललों होतों. स्टेशनावर माझें कुटुंब व मुलें माझी वाट पहात होतीं. गाडींत मी मुलाबरोबर आनंदानें खेळलों व कुटुंबाला झाला प्रकार "विसरून जा" म्हणून सांगितलें. संवयीनें कोणतीहि गोष्ट आंगवळणी पडते त्याप्रमाणें माझ्या खुनाच्या बाबतींत माझें झालें आहे. मला आतां त्याचें बिलकुल कांहीं वाटत नाहीं. मानसशास्त्राच्या दृष्टीनें या प्रश्नाचा व्हावा तितका विचार अद्यापि झालेला नाहीं. मला वाटतें, तसा तो झाला पाहिजे. माझें आयुष्य म्हणजे सतत झगडा आहे; लढत लढत आपला मार्ग काढावयाचा आहे याची जाणीव मला पहिल्यापासून आहे आणि म्हणूनच कदाचित् मला माझ्या खुनासारख्या गोष्टींचें कांहीं वाटत नसावें. मी माझ्या ध्येयासाठीं सर्वप्रकारचे आत्मयज्ञ केले आहेत. दारुण

**केवळ खाजगी.**

हालअपेष्टा, अभूतपूर्व यातना आणि भयंकर अन्नानदशा मी अनुभविली आहे; एवढेंच नव्हे तर प्रत्यक्ष मृत्यूच्या जबड्यांत शिरण्यासहि मी कमी केलेलें नाहीं. कोणतीहि लढाई धैर्यानें लढावयाची एवढेंच मला माहीत असतें. जगाच्या व्यवहाराला, दोन्ही मुठी वळून तोंड देण्याला मी नेहमी सज्ज असतो. माझ्या आयुष्यांत मला अनेकवेळां शिक्षा झाली परंतु सदर शिक्षांना लढाईतील जखमा समजून मी आनंदानें त्यांचा स्वीकार केला. कारागृहाची भिती किंवा रिव्हॉल्व्हरची गोळी मला माझ्या उद्दिष्टांपासून च्युत करण्यास अद्यापि समर्थ झालेली नाहीं. अशा गोष्टींनीं माझे प्रयत्न शिथिल न होतां वर्धमान जोमानें चालू राहतात. अत्युच्च विजय मिळवावयाचा असल्यास या संकटांना तोंड देण्यास आपण कचरतां कामा नये."

वर दिलेल्या मुलाखतीवरून मुसलिनीच्या खासगी आयुष्यक्रमाची बरीच माहिती होते, व त्यांवरून व्यक्तीच्या सार्वजनिक आणि खासगी चरित्रांत कसा निकट संबंध असतो याचाहि उलगडा होता. "इटालियन राष्ट्राला पूर्ण कार्यक्षम करून त्याचें जगाच्या राजकारणांतील स्थान पहिल्या प्रतीचें करावयाचें" हें मुसलिनीचें ध्येय आहे. तें साध्य करावयाचें असल्यास राष्ट्राला शिस्तीचें आणि संयमनाचें शिक्षण मिळणें जरूर आहे. सामर्थ्याचा आविष्कार अनेकविध स्वरूपांनीं होत असला तरी त्याच्या मूळाशीं शिस्त आणि संयमन हीं दोनच तत्त्वें असल्याचें कोणासहि दिसून येईल. मुसलिनीनें या गुणांचें स्वतः आचरण करून सामर्थ्य संपादन केलें आणि त्या सामर्थ्याच्या जोरावर आपले अंगीकृत कार्य यशस्वी करून दाखविलें. "आधीं केलें, मग सांगितलें" या श्री समर्थांच्या उक्तीचा मुसलिनीनें अवलंब केला असल्यामुळें इटालियन राष्ट्राला त्याच्या उपदेशांविषयीं विश्वास वाटत असला तर नवल नाहीं.

**मुसलिनी.**




मुसलिनीची मुलगी इडा.




मुसलिनीचा मुलगा व्हिटोरिओ.

वरील मुलाखत वाचीत असतां एक गोष्ट प्रामुख्यानें लक्षांत येते ती ह्मणजे मुसलिनीला आपल्या आचरणाविषयीं आणि मतांविषयीं वाटणारा अलोट आत्मविश्वास किंवा अभिमान. त्याला विशेष शिक्षण मिळालेलें नाहीं किंवा चांगल्या विद्वान् लोकांचा सहवासहि लाभलेला नाहीं ही गोष्ट वाचकांना माहितच आहे. त्याचें खरें शिक्षण ह्मणजे दारिद्यावस्था आणि जीवनकलह. अनुभवाच्या विश्वविद्यालयांत मिळालेले पाठ मनावर परिणामकारक होतात ही गोष्ट खरी. परंतु विश्वविद्यालयीन शिक्षणाच्या ठिकाणीं असलेल्या संवेदनभावाचा लाभ अशा शिक्षणक्रमांत मिळत नाहीं.

अर्वाचीन राजकारण म्हणजे " खावयाचे दांत निराळे आणि दाखवावयाचे निराळे " असें आहे. इंग्रज ' डिप्लोमसी ' म्हणजे शुद्ध ढोंगीपणा आहे. इंग्रज मुत्सद्यांची सहानुभूती, आभार, अभिनंदन आदि प्रकार पाहिले ह्मणजे इंग्रजी साम्राज्य ढोंगीपणावर चाललें आहे कीं काय अशी प्रांजल शंका कोणाहि सच्चा अंतःकरणास आल्याशिवाय रहाणार नाहीं. पण आश्चर्याची गोष्ट अशी कीं इंग्रज हीच गोष्ट आज पिढ्यानपिढ्या करीत आले असून त्यांच्या साम्राज्याचा विस्तारहि जवळ जवळ याच दिखाऊ सभ्यपणाखालीं झाला आहे. हे विचार सुचण्याचें कारण मुसलिनीचा याच्या अगदीं विरुद्ध असलेला स्वभाव होय. इंग्रज मुत्सद्यांना कोणतेंहि काम धिमेपणानें करण्याची संवय आहे व राजकारणांत धिमेपणा हा महत्वाचा गुण मानला जातो. परंतु मुसलिनीच्या ठिकाणीं हा गुण नाहीं असें म्हणणें भाग आहे. त्याची धडाडी व काम करण्याची अभिनव पद्धत पाहून कोणीहि त्याचें कौतुक करील. परंतु आंतरराष्ट्रीय प्रश्नांची वासलात इतर गोष्टीप्रमाणें

 **केवळ खाजगी.**

झटपट लागणें शक्य नसतें ही गोष्ट मुसलिनीस अद्यापि पटलेली नसावी असें त्याच्या भाषणांवरून दिसून येतें. आपलें राष्ट्र बलिष्ठ व्हावें असें त्यास वाटत असलें तर त्याबद्दल त्यास कोणी दोष देणार नाहीं. परंतु ही इच्छा तो ज्या उतावळेपणानें आणि आडपडदा न ठेवतां स्पष्ट बोलून दाखवितो ती पद्धत मुत्सद्देगिरीला तितकीशी धरून नाहीं, असें म्हणणें भाग आहे. थोड्याच दिवसांपूर्वी मिलान येथें भाषण करतांना तो बोलून गेला कीं, " आपली लोकसंख्या आहे त्याच्या दुप्पट करून आपलें मनुष्य-बळ इटालीनें वाढविलें पाहिजे. या वाढत्या लोकसंख्येची व्यवस्था इटा-लियन वसाहती स्थापून व आपल्या साम्राज्याचा विस्तार करून आपण केली पाहिजे. या पुढील युद्धांतून विमानांना अग्रस्थान मिळणार असल्यामुळें आपलें वैमानिक सामर्थ्य इतकें वाढलें पाहिजे कीं विमानांच्या पसरलेल्या पंखांनीं सारें वातावरण भरून जावें. आपलें नाविक दळहि असेंच सुधारलें पाहिजे व भूमध्यसमुद्राचें वर्चस्व इटालीकडे आणलें पाहिजे. समुद्राच्या पृष्ठभागावर इटालीचा भविष्यकाळ अवलंबून आहे ही गोष्ट आपण विसरतां कामा नये......इटालीला वसाहतींची जरूरी आहे व त्या तिला मिळा-ल्याच पाहिजेत. " वगैरे वगैरे या उद्गारांनीं युरोपिअन मुत्सद्दीमंडळांत बरीच गडबड उडवून दिली असली तर नवल काय ? इटालीच्या वाढत्या लोकसंख्येची तरतूद होणें जरूर आहे व त्यासाठीं मुसलिनीनें जरूर खटपट करावी. पण वरील सारखी भाषा वापरून युरोपिअन राजकारणाला निष्का-रण धक्के देण्यांत काय अर्थ आहे ? पण ही गोष्ट मुसलिनीच्या धडाडीच्या वृत्तीला पटत नाहीं. तो आवेशांत येऊन बोलूं लागला म्हणजे कांहीं कांहीं वेळां स्वतःच्याच वक्तृत्वानें वाहून जाऊन बोलूं नयेत त्या गोष्टी तो बोलून जातो. इटालीचा इतिहास मर्दुमकीबद्दल, औदार्याबद्दल आणि अतुलनीय

स्वार्थत्यागाबद्दल प्रसिद्ध आहे. परंतु अर्वाचीन इतिहासांत एका काव्हूर खेरीज इटालींत नांव घेण्यासारखा मुत्सद्दी अजूनपर्यंत झाला नाहीं. मुसलिनीच्या ठिकाणीं इतर सर्व गुण असले तरी मुत्सद्याला जरूर असणारा थंडपणा त्याच्या ठिकाणीं नाहीं ही गोष्ट कबूल करणें भाग आहे. मुसलिनिच्या स्वभावांतील अधीरेपणाचें कारण बहुतांशीं त्याचें तारुण्य असावें. स्वभावतः तर तो अधीरा आहेच; पण त्यांत तारुण्याची भर पडल्यामुळें त्याचा उतावळेपणा जास्तच दिसून येतो. या स्वभावाचें द्योतक म्हणजे म्हातारपणाबद्दल मुसलिनीस वाटणारा कंटाळा. म्हाताऱ्या लोकांची पांढरी-सफेत दाढी पाहून आपल्या मनांत आदरभाव जागृत होतो तर मुसलिनीस अशा दाढीचा तिटकारा वाटतो. एकादा म्हातारा त्याच्या भेटीस गेल्यास त्याला वाटेला कसें लावावें हाच विचार त्याच्या मनांत पहिल्या-प्रथम उभा रहात असेल. आपले परमपूज्य कविराज रवींद्रनाथ टागोर यांचें व मुसलिनीचें एकंदरींत विशेषसें पटलें नाहीं. त्याचीं इतर कांहीं कारणें असलीं तरी मुख्य कारण रवींद्रबाबूंची ती लांब शुभ्र दाढी, तो त्यांचा पायघोळ टोगा आणि उंच अशी टोपी हींच मुसलिनीचा ग्रह त्यांच्याविषयीं प्रतिकूल करण्यास कारणीभूत झालीं असावींत. मुसलिनीच्या ठिकाणीं पश्चिमेचें तारुण्य ओसंडून चाललें आहे तर प्राची दिशेची ६ हजार वर्षांची पुराण संस्कृती कविराजांच्या ठिकाणीं मूर्तस्वरूपांत प्रकट झाली आहे. हा देखावा कल्पनेला किती रम्य वाटतो ! प्राचीन-अर्वाचीनाचें हें मीलन मधुर ठरावें अशीच कोणाचीहि अपेक्षा असणार; पण ही अपेक्षा शेवटीं अस्थानीं ठरली. दोन मेघांची टक्कर होऊन विजेचा कडकडाट झाला व या महापुरुषांनीं एकमेकांची रजा घेऊन तात्पुरत्या संमेलनप्रसंगावर शेवटचा पडदा पाडला !

**केवळ खाजगी.**

मुसलिनीचा उतावळेपणा इतका विलक्षण आहे कीं, एकादी गोष्ट करावयाची ह्मणजे त्याला क्षणाचाहि विलंब खपत नाहीं. त्याचा स्वभाव प्राणावर बेतली असतांहि न डगमगण्याइतका धैर्यशील आणि निधडा असला तरी थोडासा शकुनभोळा आहे. १९२३ सालची गोष्ट. ईजिप्त मधून एक 'ममी'–मसाल्यांत ठेवलेलें जुनें प्रेत–त्याच्याकडे भेट ह्मणून आलें होतें. त्याच वेळीं तुतेन–खामेनचीं वर्णनें इंग्रजी पत्रांतून प्रसिद्ध होत होतीं त्यांतच कांहीं लोकांनीं, "सदर ममींच्या वाटेस जाणाऱ्यांच्या जीवास अपाय किंवा अपघात होतो; सबब लॉर्ड कार्नरव्हॉन यांनीं आपलें ममी उकरण्याचें काम बंद करावें" असेंहि प्रतिपादिलें होतें. लॉर्ड कार्नर-व्हॉनच्या पूर्वी कोणी कसे प्रयत्न केले व त्यांच्यावर कशीं संकटें आलीं तेंहि सदर लेखांतून सांगण्यांत आलें होतें. मुसलिनीच्या शकुनभोळ्या मनाला तें वाचून कसेसेंच झालें व त्यानें त्याच्याकडे आलेली ममी कोठें तरी दुसरीकडे नेण्याची आज्ञा केली. ती ममी त्याच्या वाड्यांतून निघून एका पदार्थसंग्रहालयाच्या कोपऱ्यांत जाऊन पडेपर्यंत, आपल्या ऑफि-सरांना आणि चाकरमाणसांना त्यानें किती वेळां टेलिफोन केला असेल त्याचा पत्ता नाहीं. तो सारखा टेलिफोनवर हुकूम देत होता! गडबड करून मंडळींनीं ती ममी त्याच्या हुकुमाप्रमाणें दुसरीकडे नेली तेव्हां कोठें मुसलिनीला हायसें वाटलें. त्याचे विचार विद्युद्गतीनें बदलतांना पाहून कित्येकांनीं त्याच्यावर अनिश्चिततेचा आणि अस्थिरतेचा आरोप केला आहे. मुसलिनीची बुद्धी निसर्गतः कुशाग्र आहे परंतु शास्त्रीय वळण लागलेलें नसल्यामुळें पुष्कळ वेळां तिला आपले विचार बदलावे लागतात. तो आपले विचार फार जलद बदलतो म्हणून मुसलिनीला दोष देण्यापेक्षां तो बदललेल्या विचाराप्रमाणें वागण्यास भीत नाहीं याबद्दल त्याचें वास्त-

विक कौतुक केलें पाहिजे. बरट्रँड रसेलनें म्हटल्याप्रमाणें, ‘ विचार अत्यंत उदात्त, द्रुतगती आणि स्वतंत्र आहे. ’ मुसलिनीच्या आतांपर्यंतच्या स्वभाव-वर्णनावरून तो तापट असावा असें कोणी अनुमान काढलें असल्यास तें चुकीचें ठरणार नाहीं. मुसलिनीचा स्वभाव तापट रागीट आणि उतावळा असला तरी मनानें तो बराच प्रेमळ आहे. आपल्या मुलांवर त्याचें अतोनात प्रेम असून त्यांच्याशीं खेळतांना त्याला विलक्षण आनंद होतो. त्यास ४ मुलें आहेत. त्यापैकीं दोघांचीं छायाचित्रें या पुस्तकांत दिलींच आहेत.

मुसलिनीलि घोड्यावर बसण्याची अतिशय हौस असून आपल्या मुलांनींहि पटाईत घोडेस्वार व्हावें अशी त्याची इच्छा आहे. त्यासाठीं प्रत्येकाला स्वतंत्र ‘ पोनी ’ घेऊन दिला असून त्यांच्याकडून रोज नियमानें रपेट कराविण्यांत येते.

मुसलिनीचें लग्न तो २९।३० वर्षांचा झाला तेव्हां झालें. परंतु त्याची पत्नी सिनोरा गुइडि रॅचेला ही अगदीं साधी आणि केवळ आपल्या पतीच्या कीर्तींतच आनंद मानणारी असल्यामुळें तिच्याविषयीं कोठें कांहीं ऐकू येत नाहीं. इटालींत, इंग्लंडातल्याप्रमाणें स्त्रियांचें नसतें महत्व वाढविण्यांत येत नसल्यामुळेंहि कदाचित सिनोरा रॅचेलाचें नांव प्रत्येक वेळीं पुढें येत नसेल. मुसलिनीनें आपल्या पत्नीविषयीं कोठेंहि उल्लेख केलेला नाहीं. सर्फाटीबाईनीं मुसलिनीच्या लहानपणच्या बारीकसारीक गोष्टी सांगितल्या आहेत; परंतु त्यांच्या सूक्ष्म दृष्टींतून मुसलिनीच्या विवाहासारखी ठळक गोष्ट सुटली याचें आश्चर्य वाटतें. मुसलिनीच्या भ्रमरवृत्तीचा मागें २।३ वेळां उल्लेख केलाच आहे. त्यांवरून त्याचा स्वभाव एकपत्नीव्रताला

अनुकूल नसावा असें अनुमान निघतें. त्यामुळेंहि कदाचित् 'सिनोरा' व 'सिनॅार' याचें तितकेसें सख्य नसावें. परंतु याविषयीं तर्कवितर्क करीत बसण्यांत अर्थ नाहीं.

मुसलिनीला ऑर्लॅडो नांवाचा एक भाऊ आहे व त्याच्याकडे 'पोपोलो डी इटालिया' पत्राची सर्व व्यवस्था सोंपविण्यांत आली आहे. फॅशिस्टांचें अधिकृत मुखपत्र म्हणजे पोपोलोच होय. मुसलिनीला लिहिण्याची लहर आली म्हणजे तो मधून मधून याच पत्रांतून लिहितो. सध्यां इटालींत मुद्रणस्वातंत्र्यावर पूर्ण नियंत्रण असलें तरी मुसलिनीला वर्तमानपत्राच्या उच्च ध्येयांविषयीं अतिशय आदर वाटतो. 'एकाद्या वर्तमान पत्रकाराच्या पिशवींत बांबगोळे भरलेले असण्याचा संभव आहे. तेव्हां त्याच्याशीं आदरानेंच वागलें पाहिजे' असें आपलें मत त्यानें एका वर्तमानपत्रकारांच्या सभेंत बोलून दाखविल्याचें प्रसिद्ध झालें आहे.

मुसलिनी थोडासा शकुनभोळा असल्याचें व त्यामुळें तो एकादेवेळीं कसा निष्कारण भिऊन जातो त्याचें वर्णन वर आलेंच आहे. याच्या उलट त्याच्या ठिकाणीं दिसून येणारी साहसप्रियताहि पहाण्यासारखी आहे. "To live dangerously" हें त्याचें ध्येयवाक्य वाचकांच्या परिचयाचें आहेच. रोम येथील प्राणिसंग्रहांत एक सिंहिण आहे. तिच्याशीं 'इटालिया इटालिया बेला' म्हणत मुसलिनीला खेळतांना अनेकांनीं पाहिलें आहे. तेथील व्यवस्थापकाचा जीव मात्र मुसलिनी तेथून निघून जाईपर्यंत कितीवेळां खालीवर होत असेल त्याची कल्पनाच करणें बरें! सिंहिणीशीं खेळण्याच्या बाबतींत मुसलिनीला त्या ठिकाणीं वसत असणाऱ्या आकर्षक शक्तीचा आत्मविश्वास वाटतो. त्याच्या आतांपर्यंतच्या

चरित्राचा विचार करतां तो अगदींच अनाठायीं आहे असें कोण म्हणेल ? मुसलिनीचा नेपोलियनप्रमाणें आपल्या भवितव्यावर विलक्षण विश्वास आहे. 'आपण कांहींतरी विशेष कार्य करण्यासाठीं जन्माला आलों असून तें कार्य पुरें झाल्याशिवाय आपल्याला मृत्यू येणार नाहीं,' असें त्यास नेहमीं वाटतें व म्हणूनच तो खुनाच्या प्रसंगीं किंवा सिंहिणीशीं तिच्या पिंजऱ्यांत खेळतांना इतकें बेफिकीर वर्तन करतो. "सिंह ज्या प्रमाणें आपल्या नखाग्रांनीं पदार्थमात्रावर आपल्या पराक्रमाचा शिक्का उठवितो त्या प्रमाणें आपल्या इच्छाशक्तीचा ठसा वर्तमान युगावर उठवावा या कल्पनेनें मला वेडावून सोडलें आहे." अशा अर्थाचे त्याच्या अंतःकरणांतील विचार सर्फाटीबाईंनीं प्रसिद्ध केले आहेत.

मुसलिनीची महत्वाकांक्षा दांडगी, आत्मविश्वास दुर्दमनीय, आणि कामाचा उरक आश्चर्यकारक आहे. एकीकडे इटालीचें राजकारण धडाडीनें चालवीत असतांच मुसलिनीचे दुसरीकडे इतर अनेक उद्योग चाललेले असतात. इटालींत पेरुगिया येथें परदेशस्थ लोकांसाठीं एक विश्व-विद्यालय स्थापण्यांत आलें आहे. त्यांमध्यें मुसलिनीची राजकारणशास्त्रावर या वर्षी ३ जुलई ते सप्टेंबर ३० पर्यंत व्याख्यानें होण्याचें ठरलें होतें. फॅशिस्मोची माहिती सर्व जगभर पसरविण्यासाठीं मुसलिनीनें एडीसनच्या 'डिक्टोफोन' वर भाषणें केल्याचें व फॅशिस्मोच्या चित्रपटांत स्वतः काम केल्याचें वर्तमान नुकतेंच प्रसिद्ध झालें आहे. या एकंदर हकीगतीवरून मुसलिनीचा व्याप आणि कामाचा उरक केवढा दांडगा असेल त्याची कल्पना होते. अमेरिकन वकिलानें, त्याचें glutton of work म्हणजे 'कामाला नुसता राक्षस' असें जें वर्णन केलें आहे तें अगदीं बरोबर आहे असेंच कोणीहि म्हणेल. असो.

<u>केवळ खाजगी.</u>

अशा या महापुरुषाचें चरित्र आतांपर्यंत कथन केलें. पुढील भागांत त्याच्या फॅशिस्मो पंथाचा विचार केला आहे. व्यक्ती या दृष्टीनें विचार करतां मुसलिनीच्या तोडीचा कर्तृत्ववान पुरुष आज साऱ्या जगांत दुसरा कोणी नाहीं असें म्हटल्यास तें अतिशयोक्तीचें खास होणार नाहीं. हें मुसलिनीच्या व्यक्तीसंबंधीं झालें. त्याचा फॅशिस्मो पंथ म्हणजे प्रचलित लोकसत्ताप्रधान विचारसरणीच्या अगदीं विरुद्ध जाणारी विचारसरणी आहे. जगाच्या राजकीय तत्त्वज्ञानांत फॅशिस्मोनें बॉंबशेल टाकून जुन्या कल्पना उध्वस्त केल्या आहेत. फॅशिस्मोचा इतिहास त्याच्या संस्थापकाच्या चरित्राप्रमाणेंच अद्भुतरम्य आहे. वाचकांनीं तिकडे अवधान द्यावें अशी त्यास विनंती करून हा भाग येथेंच संपवितों.

भाग २ रा.

# फॅशिस्मो.

# भाग २ रा.

# फॅशिस्मो.

## प्रकरण १ लें.

## प्रास्ताविक.

"Englishmen......gladly acknowledge the good which ( Fascism ) accomplished—the deliverance from anarchy, the removal of a host of inveterate abuses, the security of property, the protection of labour, the improvement in the public services, and above all, the infusion of a new and vigorous spirit into a public life which had sunk into senile impotence."

—" *The Times*," *London*, *November 18*, *1926*.

It is a period of mutual suspicion and distrust; and with suspicion and distrust even thrones and dynasties cannot stand......For, in spite of everything, and to-day more than ever, the trend of the modern state is towards Democracy."

( *Don Luigi Sturzo: Leader of the Popular Party in Italy.* )

महायुद्धाच्या तोडीचें युद्ध जगाच्या आतांपर्यंतच्या इतिहासांत दुसरें झालें नाहीं. मनुष्यबळ द्रव्यबळ आणि शास्त्रिबळ यांची पराकाष्ठा

झालेली पहावयाची असल्यास ती याच महायुद्धांत. अशा अनन्यसामान्य गोष्टीचे परिणामहि तसेच अनन्यसामान्य झाले असले तर नवल नाहीं. कोणत्याहि मोठ्या गोष्टीचे परिणाम मोठेच व्हावयाचे, हा व्यवहारनियम आहे. महायुद्ध जसें जगड्व्याळ आणि अतुलनीय झालें तसेंच त्याचे परिणामहि जगड्व्याळ व अतुलनीय झाले आहेत. त्यांतील अत्यंत महत्वाचे म्हणजे इटालींतील फॅशिझम आणि रशियांतील बोल्शोव्हिजम हे होत. महायुद्धाच्या अभावीं या राजकारणपंथांचें नांव तरी ऐकूं आलें असतें कीं नाहीं याची शंका आहे! परंतु विधिघटनेनुसार महायुद्ध झालें व त्याचा परिणाम म्हणजे फॅशिस्मो आणि बोल्शोव्हिजम या तत्वांचा उदय होय.

गेल्या भागांत मुसलिनीच्या व्यक्तिगत आयुष्याचा विचार केला. या भागांत त्यानें प्रस्थापित करून उत्कर्षास आणिलेल्या त्याच्या फॅशिस्मो सांप्रदायाची विवेचक आणि चिकित्सक बुद्धीनें चर्चा करावयाची आहे. पुष्कळ वेळां व्यक्ती या दृष्टीनें एकाद्या माणसाच्या ठिकाणीं बहुमोल गुण असतात व त्याबद्दल आपण त्याचें कौतुक करतों. पण त्यांवरून त्याची विचारसरणी आपल्याला पटलेली असतेच असा नियम नाहीं. व्यक्ती या दृष्टीनें कै. आगरकरांच्या अंगच्या कळकळ, निस्पृहता, विद्वत्ता आणि कार्यनिष्ठा या गुणांबद्दल त्यांची सर्वांकडून वाहवा केली जाते परंतु सामाजिक सुधारणेसंबंधीं त्यांनीं स्वीकारलेली विचारसरणी मात्र बहुजनसमाजास मान्य होत नाहीं. तसाच कांहींसा प्रकार फॅशिस्मोचा विचार करतांना इंग्रजी आणि अमेरिकन वर्तमानपत्रकारांचा आणि राजकारणशास्त्रज्ञांचा झाला आहे. "रिव्हयू ऑफ रिव्हयूज' या मासिकाचे संपादक विकहॅम स्टीड यांचें नांव माहित नाहीं असा सुशिक्षित

माणूस विरळाच सांपडेल. त्यांचे आंतरराष्ट्रीय राजकारणांवरील लेख प्रमाणभूत मानले जातात एवढी एकच गोष्ट त्यांच्या विद्वत्तेची आणि व्यासंगाची खात्री पटवून देण्यास पुरे आहे. या गृहस्थांनीं आपल्या मासिकांतून "फॅशिझम" आणि "मुसलिनी" यांच्या संबंधीं अनेक लेख लिहून युरोपियन विचाराला चालना दिली आहे. मुसलिनीविद्दल, तो एक अत्यंत कर्तबगार व्यक्ती म्हणून त्यांना अतिशय आदर वाटतो. परंतु त्याच्या फॅशिझमविषयीं ते लिहूं किंवा बोलूं लागले म्हणजे मात्र त्यांना विवेक करणें अशक्य होतें. फॅशिझमचा त्यांच्याइतका कट्टा शत्रू दुसरा क्वचितच सांपडेल.

व्यक्तीचे गुणानुवाद करितांना एकादा उणाअधिक शब्द वापरला गेला तरी हरकत नसते. कारण व्यक्ती आज नाहीं उद्यां केव्हांना केव्हां तरी नाहींशीच व्हावयाची असते. परंतु व्यक्तीनें उत्पन्न केलेल्या विचारांची गोष्ट तशी नसते. विचार चिरंजीव असतात. या मर्त्य लोकांत अमर्त्य असें कांहीं असल्यास ते विचारच होत. उपनिषदांचे कर्ते कोणत्या कालांत झाले त्याचा आपल्याला अद्यापि निश्चित पत्ता लागलेला नाहीं. ते कधींच दिवंगत होऊन गेले. परंतु त्यांच्या विचारांची ती उदात्त उत्तुंगता पाहून 'मी मी' म्हणविणारे पाश्चात्य पंडितहि आज माना डोलवितांना दृष्टीस पडतात. माणसाच्या आयुष्याची मर्यादा 'शरदःशतम्' म्हणून अनादि कालापासून ठरली गेली असली तरी विचारांच्या आयुर्दायाचें भविष्य अद्यापि कोणी केलेलें नाहीं. कार्लाइलनें म्हटल्याप्रमाणें, "No Truth or Goodness realised by man ever dies, or can die; but all is still here, and, recognised or not, lives and works through endless changes." आणि म्हणूनच "फॅशिस्मो" चा विचार करितांना आपल्याला अत्यंत सावधान आणि जागृत राहिलें पाहिजे.

## प्रास्ताविक.

कोणतेंहि नवें मत म्हटलें कीं त्याचे कट्टे पुरस्कर्ते आणि कट्टे शत्रू असे दोन वर्ग निर्माण होणें अगदीं अपरिहार्य असतें. पुरस्कर्त्यांनीं आपल्या आवडत्या मताची सर्वतोपरी स्तुतीच केलेली आणि निंदकांनीं केवळ निंदाच केलेली आपण पाहतों. सत्य–शोधकांनीं आपली दृष्टी असल्या निंदास्तुतींनीं दूषित होऊं देतां कामा नये. दोन्हीं पक्षांत सत्याचा अंश असतो, तो वेंचून काढून सत्याला सापेक्ष स्वरूप देण्याचें काम निःपक्षपात बुद्धीच्या अभ्यासकाचें आहे. फॅशिझमचा विचार करितांना शक्य तों याच पद्धतीचा सर्वत्र अवलंब केला असल्याचें वाचकांस दिसून येईल.

या ठिकाणीं आणखी एका गोष्टीचा खुलासा करणें जरूर आहे. फॅशिझम हा आज प्रत्यक्ष आचरिला जात असलेला एक राजकीय पंथ आहे. तो एकादा केवळ तात्त्विकवाद नाहीं. अर्थातच त्याच्या योग्यायोग्यतेचा आणि न्याय्यन्याय्यतेचा विचार करितांना आपल्याला आचरणक्षम नीतिशास्त्राच्या ( Practical ethics ) नियमांच्या अनुरोधानेंच जावें लागेल. नाहींतर प्रो. जदुनाथ सरकारासारख्या अत्यंत मार्मिक इतिहासकारानें अफझुल-खानाच्या वधप्रकरणीं श्री शिवाजी महाराजांना दोषी ठरविण्यांत जी चूक केली आहे तीच चूक आपण फॅशिझमला कांहीं बाबतींत दोषी ठरवितांना रण्याचा संभव आहे. यःकश्चित कारणावरून भांडण झालें व त्यांत आपल्या हातून शेजाऱ्याचा खून झाला तर आपण निःसंशय दोषी ठरूं; परंतु स्वदेशावर परचक्र आलें असतां शत्रूकडील सैनिकांचा वध केला तर तो दोष होत नाहीं. उलट तें आपलें पवित्र कर्तव्य असतें व तें करणें हाच त्या-वेळचा धर्म असतो. मनुष्यहत्या करणें पातक होय; पण ती हत्या समाज-हितासाठीं, स्वदेशासाठीं असेल तर ती पापकारक होत नाहीं. फॅशिझमला सरसहा दोषी ठरविणाऱ्यांनीं ही चूक पुष्कळ वेळां केली आहे. तीपासून आपण सावध राहण्याचा प्रयत्न केला पाहिजे.

## मुसलिनी

फॅशिझम किंवा फॅशिस्मो या नांवानें जो राजकीय पंथ आज साऱ्या इटालभिर पसरला आहे, ज्यानें अनेक राजनैतिक शास्त्रकारांच्या विचारांना विलक्षण चालना दिली आहे आणि मुत्सद्यांना, ‘ भविष्यकाळीं राज्य-पद्धति कशा स्वरूपाची असावी ’ असा प्रश्न करून त्यांची मति कुंठित केली आहे त्याचा शक्य तों सांगोपांग अभ्यास करणें, केव्हांहि श्रेयस्कर आणि उपकारक होईल. फॅशिस्मो म्हणजे आपल्या समकालीन चळवळीं-तील एक अत्यंत महत्वाची चळवळ आहे. तिचें यथार्थ ज्ञान करून घेऊन हिंदुस्थानच्या प्रस्तुतच्या स्वराज्य चळवळींत तिचा कांहीं उपयोग होण्या-सारखा असल्यास त्याहि दृष्टीनें फॅशिस्मोचा विचार व अभ्यास करणें निरु-पयोगी ठरणार नाहीं.

फॅशिस्मो चळवळीचा आजचा विस्तार लक्षांत घेतला म्हणजे मन आश्चर्यानें थक्क झाल्याशिवाय राहत नाहीं. आज फॅशिस्मोच्या अनुयायांची संख्या ३०,००,००० आहे. २३ मार्च १९१९ रोजीं फॅशिस्मो मताची मिलान शहरीं प्राणप्रतिष्ठा करण्यांत आली. त्या दिवशीं स्वतःला फॅशिस्ट म्हणविणारे अवघे ३०—४० लोकच होते. आज या मताचा वृक्ष कसा फोंफावला आहे तें वर दिलेल्या आंकड्यांवरून दिसून येईल. अवघ्या ७ वर्षांच्या अवधींत ज्या राजकीय पंथानें परंपरागत राजकारणविचारांना विलक्षण धक्का दिला त्याचें सामर्थ्य तसेंच अलौकिक असलें पाहिजे.

“ फॅशिस्मो ” हा शब्द “ फॅशि ” म्हणजे काठ्यांचा जुडगा या शब्दावरून आला आहे. पूर्वीं रोमन साम्राज्याच्या काळांत मॅजिस्ट्रेटापुढें त्याच्या अधिकाराचें प्रतीक म्हणून मध्यें परशु असलेला एक काठ्यांचा जुडगा चालविण्यांत येत असे. त्यावरून मुसलिनीनें आपल्या पंथाला हें नांव दिलें.

<u>प्रास्ताविक.</u>

" A *fascio* of sticks with a battle-axe in their midst was carried by the Roman lictors: It was from the lictor's *fasces* that the Fascists derived their emblem." ( *Giuseppe Prezzolini.* )

मुसलिनीच्या अनुयायांनीं आपल्या पंथाला फॅशिस्ट हें नांव देण्यापूर्वींसुद्धां इटालीच्या राजकारणांत हा शब्द थोड्याबहुत प्रमाणांत रूढ झाला असला पाहिजे. १८९३ सालीं सिसीलियन शेतकऱ्यांनीं जी चळवळ केली तिचें नांव " फॅशी " असेंच होतें. आक्टोबर १९१४ ते मे १९१५ या कालांत ' फॅशी डी कॉंबॅटिमेन्टो ' किंवा ' सशस्त्र लोकांचे संघ ' म्हणून एक लष्करी पंथ निर्माण झाला होता. इटालीनें महायुद्धांत भाग घ्यावा अशा मताचे ते लोक होते. १९१७ सालींहि " फॅशिओ डी डिफेंसा नॅशनल "—राष्ट्र-संरक्षक-संघ—निर्माण झाले होते व त्यांनींहि आपल्याला ' फॅशि ' हीच संज्ञा घेतली होती. कोणत्याना कोणत्या तरी कारणामुळें या चळवळी अल्पायुषी ठरल्या व त्यामुळें फॅशीला इटालियन राजकारणांत विशेष प्रसिद्धी मिळाली नाहीं. परंतु त्यांवरून बीजरूपानें फॅशी चळवळ इटालींत आज अनेक वर्षें आहे एवढें अनुमान निघतें. खुद्द मुसलिनी १९१४–१५ सालच्या फॅशी चळवळींत असल्याचा पुरावा उपलब्ध आहे. फॅशी चळवळ जगाला आज अगदीं नवी वाटत असली तरी इटालीच्या राजकीय कोशांत तिनें यापूर्वीं कित्येक दिवस शिरकाव केला होता, असें म्हणावयास हरकत नाहीं.

फॅशिओ म्हणजे काठ्या किंवा लांकडें एकत्र बांधणारें बंधन. यापासून फॅशिस्मो हा शब्द निघाला आहे. शुद्धीकरण करून त्यास संघटन

असें नांव दिल्यास तो आपल्यां सहज परिचयाचा होईल. संघटन आणि फॅशिझम यांचें साधर्म्य आणि वैधर्म्य पाहणें मोठें मनोरंजक आहे. संघटनाच्या चळवळीला ज्याप्रमाणें मुसलमान समाजांकडून विरोध सहन करित करीत आपला मार्ग काढावा लागला त्याचप्रमाणें फॅशिझमलाहि आपल्या बाल्यावस्थेंत सोशिआलिस्टांकडून बराच प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष विरोध सहन करावा लागला. संघटन चळवळीचे आद्य पुरस्कर्ते स्वामी श्रद्धानंद यांनीं आपल्या प्रत्यक्ष रक्ताचें सिंचन करून हिंदुसंघटनाचा वृक्ष वाढीला लाविला आहे, तर मुसलिनीच्या हयातींतच फॅशिझमचा वृक्ष फलभारानें समृद्ध होण्याइतका फोंफावला आहे. मुसलिनीच्या प्राणावर आतांपर्यंत ४।५ वेळां प्रयत्न झाले असून त्याला केव्हां कोणाच्या गोळीला बळी पडावें लागेल याचा नेम नाहीं. स्वामीजींच्या अपमृत्यूनें संघटनाची चळवळ मरण्याऐवजीं, त्याचीं पाळेंमुळें हिंदुसमाजांत जास्तच खोल जाण्यास आणि संघटनाच्या कार्याचा विस्तार व प्रसार होण्यास मदत झाली आहे. उलटपक्षीं मुसलिनीच्या मृत्यूनें फॅशिझमची चळवळ जिथल्यातिथें पार मरून जाईल कीं काय अशी सकारण भीति फॅशिस्ट पक्षाला वाटत आहे. संघटनाची चळवळ शांतिप्रधान असून तिचें पर्यवसान आत्मिक उन्नतीमध्यें होणार आहे. याच्या उलट फॅशिझमचा पाया पाशवीशक्ती असून त्याची परिणतीहि तिलाच चिरस्थायित्व आणून देण्यांत होणार आहे. संघटनाची चळवळ म्हणजे अखिल हिंदुसमाजाची चळवळ आहे. उलटपक्षीं फॅशिस्मो केवळ मुसलिनीप्रणित व्यक्तिनिष्ठ चळवळ आहे. असो; मूलतः मात्र संघटन आणि फॅशिझम या चळवळी एकाच, म्हणजे समाजांत पसरलेला विस्कळितपणा मोडून आपआपल्या समाजांचें सामाजिक आणि राजकीय एकीकरण करण्याचे उद्देशानें प्रेरित झालेल्या चळवळी आहेत ही गोष्ट लक्षांत ठेविली म्हणजे झालें.

" A *fascio* of sticks with a battle–axe in their midst was carried by the Roman lictors: It was from the lictor's *fasces* that the Fascists derived their emblem." ( *Giuseppe Prezzolini.* )

मुसलिनीच्या अनुयायांनीं आपल्या पंथाला फॅशिस्ट हें नांव देण्यापूर्वींसुद्धां इटालीच्या राजकारणांत हा शब्द थोड्याबहुत प्रमाणांत रूढ झाला असला पाहिजे. १८९३ सालीं सिसीलियन शेतकऱ्यांनीं जी चळवळ केली तिचें नांव " फॅशी " असेंच होतें. आक्टोबर १९१४ ते मे १९१५ या कालांत ' फॅशी डी कॉंबॅटिमेन्टो ' किंवा ' सशस्त्र लोकांचे संघ ' म्हणून एक लष्करी पंथ निर्माण झाला होता. इटालीनें महायुद्धांत भाग घ्यावा अशा मताचे ते लोक होते. १९१७ सालींहि " फॅशिओ डी डिफेंसा नॅशनल "—राष्ट्र-संरक्षक-संघ—निर्माण झाले होते व त्यांनींहि आपल्याला ' फॅशि ' हीच संज्ञा घेतली होती. कोणत्याना कोणत्या तरी कारणामुळें या चळवळी अल्पायुषी ठरल्या व त्यामुळें फॅशीला इटालियन राजकारणांत विशेष प्रसिद्धी मिळाली नाहीं. परंतु त्यांवरून बजिरूपानें फॅशी चळवळ इटालींत आज अनेक वर्षें आहे एवढें अनुमान निघतें. खुद्द मुसलिनी १९१४–१५ सालच्या फॅशी चळवळींत असल्याचा पुरावा उपलब्ध आहे. फॅशी चळवळ जगाला आज अगदीं नवी वाटत असली तरी इटालीच्या राजकीय कोशांत तिनें यापूर्वीं कित्येक दिवस शिरकाव केला होता, असें म्हणावयास हरकत नाहीं.

फॅशिओ म्हणजे काठ्या किंवा लांकडें एकत्र बांधणारें बंधन. यापासून फॅशिस्मो हा शब्द निघाला आहे. शुद्धीकरण करून त्यास संघटन

असें नांव दिल्यास तो आपल्यां सहज परिचयाचा होईल. संघटन आणि फॅशिझम यांचें साधर्म्य आणि वैधर्म्य पाहणें मोठें मनोरंजक आहे. संघटनाच्या चळवळीला ज्याप्रमाणें मुसलमान समाजांकडून विरोध सहन करीत करीत आपला मार्ग काढावा लागला त्याचप्रमाणें फॅशिझमलाहि आपल्या बाल्यावस्थेंत सोशिआलिस्टांकडून बराच प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष विरोध सहन करावा लागला. संघटन चळवळीचे आद्य पुरस्कर्ते स्वामी श्रद्धानंद यांनीं आपल्या प्रत्यक्ष रक्ताचें सिंचन करून हिंदुसंघटनाचा वृक्ष वाढीला लाविला आहे, तर मुसलिनीच्या हयातींतच फॅशिझमचा वृक्ष फलभारानें समृद्ध होण्याइतका फोंफावला आहे. मुसलिनीच्या प्राणावर आतांपर्यंत ४।५ वेळां प्रयत्न झाले असून त्याला केव्हां कोणाच्या गोळीला बळी पडावें लागेल याचा नेम नाहीं. स्वामीजींच्या अपमृत्यूनें संघटनाची चळवळ मरण्याऐवजीं, त्याचीं पाळेंमुळें हिंदुसमाजांत जास्तच खोल जाण्यास आणि संघटनाच्या कार्याचा विस्तार व प्रसार होण्यास मदत झाली आहे. उलटपक्षीं मुसलिनीच्या मृत्यूनें फॅशिझमची चळवळ जिथल्यातिथें पार मरून जाईल कीं काय अशी सकारण भीति फॅशिस्ट पक्षाला वाटत आहे. संघटनाची चळवळ शांतिप्रधान असून तिचें पर्यवसान आत्मिक उन्नतीमध्यें होणार आहे. याच्या उलट फॅशिझमचा पाया पाशवीशक्ती असून त्याची परिणतीहि तिलाच चिरस्थायित्व आणून देण्यांत होणार आहे. संघटनाची चळवळ म्हणजे अखिल हिंदुसमाजाची चळवळ आहे. उलटपक्षीं फॅशिस्मो केवळ मुसलिनीप्रणित व्यक्तिनिष्ठ चळवळ आहे. असो; मूलतः मात्र संघटन आणि फॅशिझम या चळवळी एकाच, म्हणजे समाजांत पसरलेला विस्कळितपणा मोडून आपआपल्या समाजांचें सामाजिक आणि राजकीय एकीकरण करण्याचे उद्देशानें प्रेरित झालेल्या चळवळी आहेत ही गोष्ट लक्षांत ठेविली म्हणजे झालें.

# प्रकरण २ रें.

# फॅशिस्मोच्या आजूबाजूला.

Hunger is the root -cause of all revolutions.

—*Carlyle.*

फॅशिझमचा विचार करतांना मुख्यतः दोन गोष्टी आपण लक्षांत घेतल्या पाहिजेत, त्या म्हणजे फॅशिस्मोचें तत्त्व कोणत्या परिस्थितींत उदयाला आलें ती परिस्थिती व फॅशिस्मोचें 'प्रत्यक्ष कृति प्रधान स्वरूप' (Practical character. ) त्याच्या तात्त्विक स्वरूपाचा सविस्तर विचार पुढील प्रकरणांत केला आहे. या ठिकाणीं एवढें सांगणें जरूर आहे कीं, हा पंथ, 'आधीं विचार आणि मग आचार' या स्वरूपाचा नाहीं. उलट आचारावर याच्या तत्त्वज्ञानाची, आणि विचाराची सर्व इमारत उभारली आहे. राजकारण–शास्त्र हें बव्हंशीं अनुभव शास्त्रच असलें तरी यूरोपमध्यें १७ व्या शतकांपासून त्याला व्यवस्थित तात्त्विक स्वरूप देण्यांत आलें; व अमेरिकेंतील संयुक्त संस्थानासारख्या राष्ट्रांच्या शासनसंस्था राजकारण–शास्त्रांतील सिद्धान्तांना संमत होतील अशा रीतीनें आंखण्यांत आल्या. कोणत्याहि देशाची राज्यव्यवस्था कांहीं विशिष्ट आणि सर्वमान्य अशा मूलभूत तत्त्वांना अनुसरून ठरविण्यांत येते. जिला ऐतिहासिक पद्धत (Historical method) म्हणतां येईल अशा विचारसरणीवर आतांपर्यंत पाश्चात्य ग्रंथकारांचा आणि तत्त्वज्ञांचा विशेष भर आहे. रशियांतील सोव्हिएटपद्धतसुद्धां या ऐतिहासिक विचारसरणींतून सर्वस्वीं सुटूं शकली नाहीं ही गोष्ट लक्षांत ठेवण्या-

सारखी आहे. तुलनात्मक दृष्टीनें पाहतां यूरोपांतील व अमेरिकेंतील बहुतेक शासनसंस्था ऐतिहासिक पद्धतीवर अधिष्ठित झाल्या असून बहुतेकांनीं लोकसमाजाची अंतिम सत्ता, रुसोच्या 'Sovereignty of people' या तत्त्वाप्रमाणें कबूल केली आहे. फॅशिस्मोला हें तत्त्व मान्य नाहीं.

फॅशिझमनें आपला सर्व भर प्रत्यक्ष परिस्थिती आणि विशिष्ट अनुभव यांवर दिल्यामुळें या पंथाचें तत्त्वज्ञान 'प्रत्यक्ष कृति प्रधान' आहे. तें समजण्यास फॅशिस्मो ज्या विशिष्ट परिस्थितींत जन्माला आला तिचें ज्ञान होणें जरूर आहे. यासाठीं त्याच्या उदयापूर्वींची इटालीची राजकीय स्थिती थोड-क्यांत खालीं दिली आहे.

इटाली हें राष्ट्र अर्वाचीन इतिहासांत अद्यापि तरुण राष्ट्रांतच मोडतें. कारण त्याच्या राजकीय आकांक्षांना मूर्तस्वरूप येऊन अजून पुरें एक शतकहि लोटलेलें नाहीं. इटालीच्या विस्कळित राजसत्तेला १८७० सालीं खरें एक राष्ट्रीयत्व प्राप्त झालें यांवरून त्याच्या तारुण्याची कल्पना करतां येईल. परंतु इटालीमध्यें पहिल्यापासून लोकसत्ताक राज्यपद्धतीला अनुकूल विचारसरणी प्रस्थापित झाल्यामुळें १८९२ सालापासून समाजसत्तावादी पक्षाचें प्राबल्य तेथें दिसून येऊं लागलें. त्या सालीं सोशिआलिस्ट मताच्या लोकांनीं संघटना करून आपल्या पक्षाला व्यवस्थेशीर रूप दिलें. तेव्हां-पासून १९२२ च्या आक्टोबर अखेर म्हणजे उणींपुरीं ३० वर्षें इटालीचें राजकारण कमीअधिक प्रमाणांत सोशिआलिस्ट पक्षानें खेळविलें असें म्हणावयास हरकत नाहीं.

सोशिआलिस्ट लोकांना लढाई करणें तत्त्वतःच अमान्य असल्यामुळें त्यांच्या उपदेशाचा परिणाम इटालींत युद्धाविषयीं औदासिन्य उत्पन्न कर-

ण्यांत झालें असल्यास नवल नाहीं. मुसलिनी, डानान्झिओप्रभृति लोकांना जनतेमधून मावळत चाललेला युद्धोत्साह पुनरुज्जिवित करायास किती सायास पडले त्याचें वर्णन मागील भागांत केलेंच आहे. त्यांवरून इटालियन समाजाच्या मनावर सोशिआलिस्ट मतांचा पगडा किती बसला होता त्याची कल्पना होईल. युद्ध संपलें त्या वेळीं त्यांना इतरांप्रमाणेंच हायसें वाटलें असलें तर आश्चर्य नाहीं. परंतु विजय मिळाल्यामुळें जनतेला आनंद होत होता तसा आनंद सोशिआलिस्टांना होणें शक्य नव्हतें. वांझेला प्रसूतिवेदनाहि माहीत नसतात व अपत्यप्रेमाचीहि कल्पना नसते. सोशिआलिस्टांनीं कधीं युद्ध केलें नाहीं, त्याच्या हालअपेष्टा अनुभविल्या नाहींत व त्यामुळें साहाजिकपणेंच त्यांना विजयाचा आनंद झाला नाहीं. परंतु इटालियन चेंबरमध्यें हा पक्ष प्रभावी असल्यामुळें त्याला राजकारणांत वाटेल तसा धुमाकूळ घालतां आला. १९१२ सालच्या समाजसत्तावादी कॉंग्रेसनें ' आपला पक्ष क्रांतिकारकांचा असल्यामुळें प्रधानपद स्वीकारणें किंवा अधिकाराच्या जागा घेणें त्याला योग्य नाहीं " असा ठराव केला असल्यामुळें या पक्षाला ' कॉंस्टिटयूशनल ' जबाबदारी अशी कांहीं एक वाटत नसे. परंतु चेंबरमधल्या मताधिक्याचा उपयोग करून त्याला कोणत्याहि सरकारच्या कामांत गोंधळ माजविणें मात्र सोपें असें. 'जबाबदारी शिवाय हक्क' ( privileges without responsibility ) अशी त्याची स्थिती होती.

दुर्दैवानें, १९१९ ते १९२२ या कालांत इटालीला लाभलेलीं सरकारें एकापेक्षां एक कुचकामाची आणि कमकुवत निघालीं. कोणत्याही प्रधानमंडळाचें आयुष्य सरासरी ६ महिनेंसुद्धां नसे अशी अस्थिर परिस्थिती

निर्माण झाली. त्यामुळें इटालीच्या राजकारणांत एकसूत्रीपणा आणि निश्चय यांचा पूर्ण अभाव दिसूं लागला. एम्. क्लेमेन्को आणि लॉइड जॉर्ज यांनीं इटालीच्या या कमकुवत स्थितीचा फायदा घेऊन जर्मनीच्या वसाहती वाटेल तशा घशाखालीं टाकल्या व इटालीच्या तोंडाला पानें पुसण्याचा घाट घातला. ज्या लोकांनीं इटालीला महायुद्धांत पडण्यास लाविलें त्यांना त्यामुळें साहाजिकच राग आला व त्यांनीं सरकारवर वाटेल तशी टीका करण्यास प्रारंभ केला. सरकारच्या नेभळट वृत्तीचा जणूं निषेध करण्याकरितांच कीं काय, डानन्झिओनें आपल्या निवडक अनुयायांना बरोबर घेऊन १२ सप्टेंबर १९१९ रोजीं, फ्यूमवर चाल केली व तें बंदर इटालीच्या नांवानें ताब्यांत घेतलें. असें करणें आंतरराष्ट्रीय कायद्याला सोडून होतें. इटालीच्या तत्कालीन सरकारापुढें डानन्झिओच्या या धाडसानें मोठाच प्रश्न उपस्थित केला. त्याच्यावर सैन्य पाठवून त्याचा बंदोबस्त करावा तर इटालियन राष्ट्रीय पक्ष रागावणार, कारण त्याला फ्यूम बंदर पाहिजे होतें. सैन्य न पाठवावें तर इभ्रत जाते. अशा पेंचांत सरकार पडलें.

सरकारच्या या कमकुवत धोरणाचें अनिष्ट परिणाम दिसून येण्यास वेळ लागला नाहीं डानन्झिओच्या बंडखोरमुळें दांडगाईला महत्व आलें. 'मऊं लागलें म्हणजे कोंपरानें खणावें' असें म्हणतात, तशी इटालींत त्या काळीं स्थिती झाली. सरकारच्या ठिकाणीं धैर्य नाहीं असें दिसून येतांच समाजसत्तावादी पक्षानें चढाईचें धोरण स्वीकारलें. त्याच वेळीं रशियांत बोल्शेव्हिजमला अपूर्व विजय मिळून सर्व जगभर लेनिन आणि त्याचें सोव्हियट सरकार यांचा बोलबाला सुरू झाला होता. इटालियन सोशिआलिझम पहिल्यापासून रशियन विचारांशीं एकजीव झालेला अस-

त्यामुळें रशियांतील समाजसत्तावादाचा विजय म्हणजे आपलाच विजय असें त्यास वाटूं लागलें व इटालींतही कामकरी वर्गाची क्रांति घडवून आणण्याची भाषा येकूं येऊं लागली.

रशियांतलि राज्यक्रांतीचा झालेला परिणाम तत्कालीन इटालियन इतिहासांतील एक महत्वाचा भाग असला तरी युद्धानंतर सर्व यूरोपभर जी महर्घता आणि बेकारी वाढली तिनें इटालियन समाज जास्त खवळून गेला. लढाईवरून परत आलेल्या सैनिकाची मनस्थिती खालीं दिलेल्या अवतरणांवरून स्पष्ट दिसून येतें. इटालियन सैनिकाला वाटत होतें कीं, "ऑस्ट्रियाचा पराभव करून परत आलेले विजयी वीर म्हणून आपलें स्वागत होईल, आपल्याला जामिनी फुकट मिळतील आणि बक्षिसांचा आपल्यावर पाऊस पडेल. इटालीला वसाहतीसाठीं नवें क्षेत्र मिळून आपल्या वाढत्या लोकसंख्येची सोय लागेल. फ्यूम इटालीचें इटालीस मिळून एका जुन्या अन्यायाला मूठमाती मिळेल. शांततेमुळें व्यापाराला तेजी येईल आणि आपण आतां निर्धास्त चित्तानें, कुटुंब सौख्य उपभोगूं इतके दिवस खंदकांत आणि चिखलांत ज्या अनिर्वचनीय हालअपेष्टा सहन केल्या त्यांचें आपल्याला आतां गोड फळ चाखावयास मिळेल— किती आतुरतेनें आम्ही या काळाची वाट पहात होतो !—तो शेवटीं आला. इटालीच्या विजयानें आम्ही आज कृतार्थ झालों ! आंतरराष्ट्रीय राजकारणांत या पुढें इटालीला पहिल्या प्रतीच्या राष्ट्राचा मान मिळणार ?— आणि तो आम्ही मिळवून दिला. आतां 'माझा इटाली' इंग्रज, फ्रेंच, अमेरिकन प्रतिनिधींबरोबर समान हक्कानें मांडीस मांडी लाऊन बसणार! बस इटालीचा जयजयकार असो !"

**फॅशिस्मो**

इटालीच्या सैनिकाचे त्या काळचे विचार स्पष्ट अस्पष्ट भाषेंत वर रेखाटले आहेत. त्यांत इटालीच्या जनतेचीहि मनस्थिती व्यक्त होते. मनावरील लढाईचें ओझें दूर झाल्यामुळें हायसें वाटूं लागलें, आणि विजय मिळाल्यामुळें अनेक योग्य–अयोग्य आकांक्षांना भरती आली. परंतु प्रत्यक्ष परिस्थिती किती निराळी होती ! इटालीचें परराष्ट्रीय राजकारण दुबळा ऑर्लैंडो आणि उदासीन निटी यांचेकडे गेल्यामुळें पॅरिसच्या तहपरिषदेंत इटालीचें तेज पडलें नाहीं व जनतेच्या सरकारावरील विश्वासाला पहिला धक्का बसला.

इकडे सोशिआलिस्टांनीं रशियांशीं सूत जुळवून इटालीच्या औद्योगिक व्यवस्थेंत बखेडा माजविण्याचा घाट घातला. यःकश्चित् कारणांवरून संप होऊं लागले. जिनोवा, रोम, नेपल्स, आदि मोठ्या शहरीं एकदम संप झाले. रोमच्या संपानें तर अत्यंत उग्र आणि सार्वत्रिक स्वरूप धारण करून ऑर्लैंडोच्या प्रधानमंडळास फारच बिकट परिस्थितींत आणलें. रोटीची किंमत बेसुमार वाढली. कारखान्यांच्या अव्यवस्थेमुळें व लढाईवरून परत आलेल्या सैनिकांना काम न मिळाल्यामुळें सर्व देशभर बेकारांची संख्या कल्पनेबाहेर झाली. काम करण्याची इच्छा असूनहि काम मिळेना अशी विलक्षण स्थिती प्राप्त झाली. बरें, मिळेल तें काम करून चार दोन आणे मिळालें तरी रोटीची किंमत भयंकर प्रमाणांत वाढल्यामुळें त्या चार दोन आण्यांचाहि कांहीं उपयोग होत नसे. याचा परिणाम ठिक-ठिकाणीं दंगे होण्यांत झाला. रेल्वे, टेलिग्राफ आदि वाहतुकीच्या आणि दळणवळणाच्या खात्यांतील लोकांनीं आपल्या पगारांत वाढ मिळविण्या-साठीं संप पुकारले. सरकारकडे आपल्या अडचणींची दाद मागावयाची

झाल्यास अर्ज करण्याची किंवा शिष्टमंडळ नेमण्याची पद्धत सर्व सुधारलेल्या देशांत प्रचलित आहे. परंतु इटालींत त्या काळीं शासनसंस्था जवळ जवळ नामशेष झाल्यामुळें, लोकांना अशा अर्जाचा उपयोग होत नाहीं असें दिसून आलें होतें. कोणत्याही गाऱ्हाण्याची दाद लाऊन घ्यावयाची असल्यास लोक संपाचा अवलंब करीत. कित्येक संप सकारण असत तर कित्येक विनाकारणहि असत. सोशिआलिस्ट लोकांना सर्व देशभर असंतोष माजवून सोडावयाचा होता. ते सांपडेल त्या संधीचा फायदा घेऊन कामकऱ्यांना आणि सरकारी नोकरांना संप करावयास लावीत. संप केला असतां मजुरी व पगार वाढतो या कल्पनेनें लोक क्षुल्लक कारणावरूनहि संप करीत. विनाकारण संप कसे होत असत त्याचें एक मजेदार उदाहरण खालीं दिलें आहे. त्यांवरून इटालीची तत्कालिन समाजस्थिती वाचकांच्या लक्षांत येईल. व्हेरोना येथील एक सोशिआलिस्ट पुढारी एकदां एक बॉंब घेऊन चालला होता. परंतु वाटेंत कांहीं अपघात होऊन बॉंब उडाला व तो पुढारी मृत्यू पावला. झालें, सर्व शहरभर तत्काळ संप पुकारण्यांत आला ! " ट्रॅम्वे गाड्या, भाड्याच्या मोटारी, विजेच्या दिव्यांच्या कंपन्या आदि ठिकाणीं कांहींना कांहीं कारणानें संप होत व काम बंद करण्यांत येई." कित्येकवेळां संप करण्यास आर्थिक कारण सांपडलें नाहीं तर सहानुभूतीपर संप पुकारलें जात. एकाद्या सोशिआलिस्ट माणसाला चोरीच्या आरोपावरून जरी पकडले तरी त्या शहरभर तत्काळ त्याच्या सहानुभूतिपर संप करण्यांत येई !

१९२० सालीं इटालींत, कामकऱ्यांनीं कारखानें ताब्यांत घेण्याची एक लाट उसळली व तिला आळा घालण्याचें सामर्थ्य सरकारच्या ठिकाणीं नसल्यामुळें ती वणव्याप्रमाणें साऱ्या देशभर पसरली.

**<u>फॅशिस्मो</u>**

कांहीं कांहीं ठिकाणीं मालकांना गुदामांत कोंडून टाकून कारखान्यांची सत्ता कामकऱ्यांनीं आपल्या हातीं घेतली. कारखाना हातीं येऊन भागत नसते. तो चालविला तर ठीक, नाहीं तर तो हातीं येणे आणि दगडाची रास हातीं येणें सारखेंच. पण अशिक्षित कामकऱ्यांना हा विवेक कोठून असणार ? त्यांना वाटलें कारखाने हातीं आले, मग आणखी काय पाहिजे ! त्यांनीं कारखान्यांत पथाऱ्या पसरून झोंपण्यास आणि मनसोक्त दारू पिण्यास सुरवात केली. कारखान्याच्या तिजोरींतील शिल्लक संपेपर्यंत हा ऐषआराम ठीक चालला. परंतु उत्पादन बंद झाल्यामुळें नवीन पैसा येण्याचें थांबलें व कामकऱ्यांना निमूटपणें मालकांकडे जाऊन त्यांना कारखाने चालविण्याची विनंति करणें भाग पडलें !

या अव्यवस्थेमुळें इटालीचें भयंकर नुकसान झालें. आंतरराष्ट्रीय राजकारणांत त्याचा यत्किंचितहि बोज राहिला नाहीं व देशांत तर अश्रुतपूर्व बंडाळी माजून राहिली ! इटालीच्या या शोचनीय परिस्थितीच्या बुडाशीं समाजसत्तावाद्यांचें रशियन राजकारण होतें तशीच देशांतील आर्थिक निकृष्ठावस्थाहि होती. यूरोपांतील इतर देशाप्रमाणेंच इटालीनेंहि कागदी चलन प्रमाणाबाहेर काढल्यामुळें ' लीरा 'चा भाव भराभर उतरूं लागला. नाण्याची किंमत उतरतांच जिनसांच्या कीमती वाढतात असा अर्थशास्त्रांत एक ठोकळ सिद्धान्त आहे. त्याप्रमाणें नाण्याचा भाव उतरतांच इटालींत महर्घता भयंकर प्रमाणांत वाढली. मजुरी किंवा पगार पुरा पडेना म्हणून संप करण्यांत येऊं लागले. त्यांचा परिणाम बेकारी आणि महागाई आणखी वाढविण्यांत झाला. या वाढत्या महागाईमुळें पुनः संप आणि संपामुळें आणखी महागाई असें हें चक्र त्याकाळीं इटा-

लींत सारखें फिरत होतें. १९१९ ते १९२२ या काळांत इटालींत शेतकऱ्यांचे आणि औद्योगिक मजुरांचे अनुक्रमें ५०९ आणि ५१११ संप झाले व त्यांत १६५५३०४ शेतांवरील मजूर आणि ३३८४७२८ औद्योगिक कामकरी सामील होते !

देशांतील मध्यवर्ती शासनसंस्था दुर्बळ होतांच तिचा परिणाम राज्यकारभारांत सगळीकडे दिसूं लागतो. वर सांगितलेंच आहे कीं, इटालियन चेंबरमध्यें सोशिआलिस्टांना त्यांच्या मताधिक्यामुळें वाटेल तसा गोंधळ वाल्तां येत असे. कोणत्याहि पक्षाला प्रधानमंडळ बनवावयाचें झाल्यास या पक्षाला संतुष्ट ठेवावें लागे व त्यासाठीं तो घालील त्या अटी मान्य कराव्या लागत. सोशिआलिस्टांनींहि या संधीचा भरपूर फायदा करून घेण्यास कमी केलें नाहीं. रेल्वे खातें तर त्यांनीं जवळ जवळ 'सोशिआलिस्ट खातेंच' करून टाकलें. कोणाहि सोशिआलिस्टाला नोकरीची जरूरी लागतांच त्याची रेल्वे-खात्यांत हमखास वर्णी लागावयाची ! १९२१ मध्यें रेल्वेखात्यांत २ लक्ष ४१ हजार लोक होते ! या लोकांचे स्वतंत्र संघ असून त्यापैकीं एकालाहि दुखविण्याची त्याच्या वरिष्ठाची छाती नसे. कारण तसें केल्यास केव्हां संप होईल त्याचा नेम नसे. वरिष्ठाचा दरारा नसल्यामुळें रेल्वेखात्यांत भयंकर अव्यवस्था माजून गेली. मालाच्या आणि जिनसांच्या चोऱ्या होऊं लागल्या. मालाची नासधूस किती झाली असेल त्याचा पत्ताच नाहीं. रेल्वेनें १९१३–१४ सालीं नुकसान भरपाई म्हणून १५ लक्ष २० हजार लीरा दिले होते; तर १९२१–२२ सालीं ही रक्कम ९ कोटी, ३८ लक्ष, ४५ हजारावर गेली होती. (त्यापैकीं ५ कोटी, ८ लक्ष ३५ हजार लीरा केवळ, चोरीस गेलेल्या मालाबद्दल होते !) या चोरीच्या

मालाच्या उत्पन्नावर सोशिआलिस्ट पक्षाची तिजोरी नेहमी भरलेली असे. मोफत किंवा सवलतीच्या दराचे पास देण्याचें प्रमाण कल्पनेबाहेर वाढून १९२२ सालीं, अशा पासांची संख्या २१ हजारावर गेली होती. निरनिराळ्या ठिकाणच्या रेल्वे-संघांच्या तपासणीसाठीं हे पास काढण्यांत आले होते ! इटालियन सरकारच्या अंतर्गत दुसरें एक स्वतंत्र सरकारच रेल्वे कामकऱ्यांनीं त्या काळीं स्थापलें होतें.

रेल्वेखात्यांत सरकारचें दुबळेपण दिसून येत असलें तर सैनिकाच्या बाबतींत त्याची अनास्था आणि दुर्लक्ष व्यक्त होतें. वर एका ठिकाणीं इटालियन सैनिकांचे जे विचार दिले आहेत त्यांवरून त्यांच्या अंतःकरणांतील उत्साही आशावादित्वाची कल्पना होतें. ज्यांनीं आपल्या प्राणांचीहि पर्वा न करतां राष्ट्रासाठीं रणांगणावर आपलें रक्त सांडलें व शत्रूचा निःपात करून विजयश्री मिळविली त्यांचें इटालियन सरकाराकडून योग्य स्वागत होणें जरूर होतें. विजयी सैनिकांच्या आशा-आकांक्षा ज्या सरकारला समजणार नाहींत तें सरकार खरोखर नतद्रष्ट आणि दुर्दैवीच म्हटलें पाहिजे. त्याचा फार काळ टिकाव लागणें शक्य नाहीं.

निटीचा स्वभाव जात्या शांतताप्रधान आणि अयुद्ध धोरणाला अनुकूल असल्यामुळें इटाली युद्धांत पडला किंवा तो विजयी झाला या बद्दल त्यास विशेष आनंद किंवा हर्ष झाला नसल्यास त्यांत आश्चर्य नाहीं. अशा माणसाकडून लढाईवरून परत येणाऱ्या सैनिकांचें त्यांना उचित असें स्वागत होण्याची आशा करणें व्यर्थ होतें.

" इटालियन माणूस जात्या भावनाप्रधान असून त्याच्या ठिकाणीं थोडासा नाटकीपणा आहे. डामडौलाची आणि थाटामाटाची त्याला आवड

आहे. त्याचा कोणी गौरव केल्यास त्याला अतिशय आनंद होतो;–प्रसंग विशेषीं गोड शब्दांनीं त्याला फसवितांहि येईल इतका तो स्तुतीप्रिय आणि भोळा आहे. " अशा समाजांतील वीर, विजयी होऊन परत आले असतां त्यांना 'आपल्या मिरवणुकी निघाव्यात, युद्धस्मारकें व्हावींत; आपल्या सेनाधिपतींना प्रशंसापत्रें आणि सुवर्ण पदकें मिळावींत' असें वाटणें साहजीक होतें. परंतु घरीं परत येतात तों त्यांच्यापुढें निराशेचें ताट वाढून ठेवलें होतें. त्यांचा मान सन्मान तर राहोच पण त्यांना नुसतें कोणी विचारीना सुद्धां! प्राचीन काळीं विजयी होऊन परत आलेल्या सैनिकांच्या थाटाच्या मिरवणुकी निघत, गनराध्यक्ष त्या सैनिकांचा आदरपूर्वक सन्मान करीत, व नगरस्त्रिया आपल्या धवल स्मितानें त्यांचें स्वागत करीत. पण जर्मन-युद्धावरून परत आलेल्या सैनिकांपुढें दुसरेंच चित्र उभें राहिलें व साहजीकच त्यांच्या मनांत सरकाराविषयीं असंतोष उत्पन्न झाला. असो.

आतांपर्यंतच्या विवेचनावरून १९१९–२२ या सालांत इटालीची राजकीय, आर्थिक आणि सामाजिक परिस्थिती कशा प्रकारची होती याचा उलगडा होईल. या परिस्थितीला तोंड देण्यासाठीं मुसलिनीनें जी चळवळ उत्पन्न केली तीच फॅशिस्मो चळवळ होय. थोडक्यांत सांगावयाचें तर फॅशिझमच्या मूळाशीं खालीं दिलेलीं कारणें असल्याचें वाचकांस दिसून येईल.

१ इटालियन मुत्सद्यांचा परराष्ट्रीय राजकारणांत उडालेला बोजवारा;

२ त्याकाळीं यूरोपांत सगळीकडे दिसून येणारी आर्थिक आणि व्यापारविषयक अव्यवस्था;

३ लढाईवरून परत येणाऱ्या सैनिकांविषयीं तत्कालीन इटालियन सरकारनें दाखविलेली अनास्था;

४ बेकारी;

५ महर्घता: विशेषत: रोटीची बेसुमार वाढलेली किंमत;

६ बोल्शेव्हिक मताचा उदय आणि प्रसार व तदनुषंगिक संघ आणि दंगे;

७ सदर दंगे शांत करण्याच्या कामीं इटालियन सरकारनें दाखविलेलें पराकाष्ठेचें दौर्बल्य. हीं तीं ७ कारणें होत.

## प्रकरण ३ रें.

# फॅशिस्मो

Great truly is the Actual: is the Thing that has rescued itself from the bottomless deeps of theory and possibility, and stands there as a definite indisputable Fact, whereby men do work and live.

—*Carlyle: French Revolution.*

This epoch after the War, is a new Epoch, and new epochs call for new behaviours

—*Mussolini.*

आतांपर्यंत आपल्याला फॅशिस्मोचा अप्रत्यक्ष पण दाट परिचय झालाच आहे. तेव्हां या प्रकरणांत त्याच्याशीं प्रत्यक्ष हस्तांदोलन करण्यास हरकत नाहीं. विक्हॅम स्टीडच्या मतानें, 'फॅशिस्मोचें तत्त्व भयंकर' असलें तरी त्यास वाचकांनीं भिण्याचें कारण नाहीं. या भयंकर वाटणाऱ्या तत्त्वावरच आज इटालीसारख्या एका बलाढ्य राष्ट्राचा राज्यकारभार चालला असून त्याच्या प्रगती आणि स्वास्थ्याबद्दल सुधारलेल्या देशांतून त्याची वाहवा होत आहे. एवढें सांगून प्रस्तुत विषयाकडे वळतों.

फॅशिस्मोचीं मूलतत्त्वें खालीं दिलीं आहेत. तीं खुद्द मुसलिनीच्या वेळोवेळीं झालेल्या भाषणांतून जशीं प्रतिपादिलीं गेलीं तशींच दिलीं आहेत. फॅशिस्मो पंथ हा मुख्यतः कृतिप्रधान पंथ आहे; त्याचें अधिष्ठान प्रत्यक्ष कृती आणि कार्य यांवर असून तात्त्विक विचार त्या मानानें कमी आहे.

फॅशिस्मोची वाढ ही गेल्या ८।९ वर्षांतीलच असल्यामुळें त्याच्या भोंवती इतर जरठ संप्रदायाप्रमाणें विचारांचीं वलयें निर्माण झालेलीं नाहींत. याचा अर्थ हा पंथ विचारविहिन आणि केवळ परिस्थितीप्रमाणें बदलणारा आहे असा नव्हे. कांहीं विशिष्ट आणि सर्वमान्य राजकारण–तत्त्वांच्या खंबीर पायावर त्याची इमारत उभारली आहे, असें खालीं दिलेल्या तत्त्वांचें मनन केलें असतां वाचकांस दिसून येईल. या ठिकाणीं आम्हाला फक्त त्याच्या स्थूल स्वरूपाचें दिग्दर्शन करावयाचें असून तें आम्ही त्याचें लक्षण 'कृतिप्रधान पंथ' असें सांगून करतों.

फॅशिस्मोचीं तत्वें:—

१ स्वदेशाभिमान आणि राष्ट्रहित;

२ शिस्त आणि कर्तव्याचरण;

३ देशांतील सरकार कार्यक्षम करणें आणि वेदंदशाहीचा निःपात करणें.

४ नागरिकांच्या हितसंबंधांचा विचार सामुदायिक भावनेनें करणें.

५ धर्माला योग्य मान देणें;

६ राष्ट्रांतील हरएक जातीच्या उत्साहाचा विकास करणें.

७ कामकरी, शेतकरी आणि शस्त्रधारी यांची संघटना करणें.

८ हें धोरण साध्य करण्यासाठीं 'व्यक्तीपेक्षां राष्ट्राच्या हिताला जास्त महत्त्व देणें.

मुसलिनीनें एका ठिकाणीं म्हटल्याप्रमाणें, "आमच्यापुढें प्रत्यक्ष घडलेल्या गोष्टी व सत्यसिद्धान्त आहेत आणि त्यावर आमच्या फॅशिझम पंथाची प्राणप्रतिष्ठा झाली आहे. आध्यात्मिक किंवा राजकीय, कोणत्याही दृष्टीनें विचार केला तरी फॅशिस्मो इतका पायाशुद्ध पंथ दुसरा क्वचितच सांपडेल. उपरीनिर्दिष्ट तत्त्वें म्हणजे राष्ट्राचा संजीवनी मंत्रच नव्हे काय ?"

फॅशिस्मो

अशा या पंथाची स्थापना, मागें प्रास्ताविक प्रकरणांत सांगितल्या-प्रमाणें, २३ मार्च १९१९ रोजीं मिलान शहरीं करण्यांत आली. काळा शर्ट हा त्याचा विशिष्ट पोशाक, आणि मध्यें परशू असलेला काठ्यांचा जुडगा हें त्याचें प्रतिक ठरविण्यांत आलें. (या ठिकाणीं सांगण्यासारखी गोष्ट अशी कीं, फॅशिस्मोवर आणि मुसलिनीच्या चरित्रांवर फॅशिस्ट लेखकांचीं जीं पुस्तकें प्रसिद्ध झालीं आहेत, त्या बहुतेकांचें बाह्यांगसुद्धां 'काळें' ठेवण्यांत आलें आहे.) फॅशिस्मोचीं वर जीं ८ मूलभूत तत्त्वें दिलीं आहेत त्यांवरून, राष्ट्राला कार्यक्षम करण्यावरच या पंथाचा सर्व भर आहे असें दिसून येईल. राष्ट्राला सर्व प्राधान्य देऊन व्यक्ती ही सर्वस्वीं राष्ट्राच्या उद्दिष्टाला आणि प्रगतीला पोषक झाली पाहिजे असें फॅशिस्मोचें धोरण आहे. राष्ट्रासाठीं व्यक्ती आहे, व्यक्तीसाठीं राष्ट्र नाहीं. राष्ट्राचा आत्यंतिक व सर्वांगीण उत्कर्ष हें साध्य आणि व्यक्ती हें त्याचें साधन; अशी फॅशिस्मोची विचारसरणी आहे. ही विचारसरणी सुप्रसिद्ध इटालियन राजकारणशास्त्रज्ञ मॅकिव्हेली याच्या विचारांशीं बहुतांशीं जुळते. देशाचा सर्वांगीण आणि आत्यंतिक उत्कर्ष व्हावयास देशांतील सरकार कार्यक्षम आणि दक्ष असणें जरूर आहे. तसें तें असण्यास त्याची सत्ता अविच्छिन्न आणि अविभाज्य पाहिजे असें फॅशिस्मोचें मत आहे. 'राष्ट्राचा निरपवाद अधिकार आणि व्यक्तीचें तदर्थ कर्तव्य' हें फॅशिस्मोच्या राजकारणाचें सूत्र आहे. व्यक्तीचा सर्वतो-परी उत्कर्ष होण्यास जरूर असणारी परिस्थिति व्यक्तीला मिळालीच पाहिजे ही गोष्ट फॅशिस्मोस कबूल आहे. कारण व्यक्तीच्या उत्कर्षाशिवाय राष्ट्राचा उत्कर्ष होणें शक्य नाहीं. परंतु व्यक्तीला राष्ट्राहून जास्त महत्व देण्यास फॅशिस्मो तयार नाहीं. रूसोच्या 'Contract Social' पासून राजकारण शास्त्रज्ञांनीं लोकसमाजाच्या अंतिम सत्तेचें (Sovereignty of People)



मुसलिनी—कमान्डन्ट जनरल—नॅशनल मिलीशिया.

तत्त्वं मान्य केलें आहे. परंतु फॅशिस्मोला तें कबूल नाहीं. ( Fascism rejects the theory of popular sovereignty and sets up in its place that of the sovereignty of the State. –Sr. Luigi Villari) याचा अर्थ लोकांना राज्यकारभारापासून अजिबात दूर ठेवावयाचें असा नव्हे. राज्य कारभारांत त्यांच्या मताला उदार मतवादी राजकारणशास्त्रज्ञांनीं जें निर्णायक महत्व दिलें आहे तें फॅशिस्मोला संमत नाहीं एवढाच त्याचा अर्थ. *

---

* या विवेचनांत state या इंग्रजी शब्दाबद्दल राष्ट्र हा पर्याय शब्द पुष्कळ ठिकाणीं उपयोजिला आहे. State, Government आणि Nation या संज्ञांनीं व्यक्त होणाऱ्या कल्पना मराठींत त्यांना प्रतिशब्द देऊन आणणें बरेंच कठिण आहे. State आणि Government, यांना मराठींत एकच म्हणजे सरकार ही संज्ञा आहे. वास्तविक सरकार हा Government या शब्दाचा प्रतिशब्द असून त्यानें कार्यकारी ( Executive) सरकारचा बोध होतो. इंग्रजी मध्यें State या शब्दांत, स्थूलदृष्ट्या, सरकारच्या सर्व प्रकारच्या अधिकारांचा समावेश होतो असें म्हणण्यास हरकत नाहीं. ' पार्लमेंट राजसत्ता व प्रधानमंडळ ' या सर्वाला मिळून State हा शब्द इंग्रजी भाषेंत वापरला जातो; एवढेंच नव्हे तर ' पार्लमेंट व प्रधानमंडळ ' यांच्या मागें अप्रत्यक्षरीत्या उभ्या असलेल्या लोकमतांतर्गत सत्तेचाहि त्यांत अंतर्भाव होतो. मराठीला या सूक्ष्म कल्पनाच नव्या असल्यामुळें त्या विशद करणारे शब्द अद्यापि मराठींत रूढ झालेले नाहींत. यासाठीं कांहीं ठिकाणीं State व Nation यांना राष्ट्र म्हणून संबोधिलें असून कांहीं ठिकाणीं State बद्दल सत्ताधारी सरकार किंवा राष्ट्र अशीहि शब्दयोजना केली आहे. सुज्ञ वाचकांस कोणत्या ठिकाणीं कोणता अर्थ अभिप्रेत आहे हें निराळें सांगणें नकोच.

फॅशिस्मोचें ध्येय, 'शेतकरी, कामकरी व शस्त्रधारी लोकांचें संघटन करण्याचें' असलें तरी रशियन बोल्शेव्हिक मताप्रमाणें तो भांडवल-वाल्या वर्गाविरुद्ध नाहीं. खासगी मालमत्ता (private property) करण्यास फॅशिस्मोची हरकत नाहीं. खासगी मत्ता करण्यास परवानगी नसल्यास जनतेमधील बचत करण्याची प्रवृत्ती नाहींशी होऊन त्याचा परिणाम देशांतील भांडवलच नाहींसें करण्यात होईल. राष्ट्राचें भांडवल म्हणजे जनतेनें बचत केलेला पैसा. आतां, एकाद्याच व्यक्तीच्या हातांत अगणित संपत्ती होऊन तिनें त्या संपत्तीचा मजुरांना छळण्याचें कामीं दुरुपयोग केल्यास मात्र सरकारनें त्या बाबतींत लक्ष घालून कामकऱ्यांचा त्रास दूर केला पाहिजे. फॅशिझमला तें मान्य आहे. उलटपक्षीं कामकऱ्यांचे संप कायद्यानें बंद करण्याची व्यवस्था फॅशिस्मोनें केली आहे.

२० व्या शतकांत मजूर आणि भांडवलवाला यांच्या लढ्यानें अत्यंत तीव्र स्वरूप धारण केलें आहे. अमेरिकेंत भांडवलवाल्याची चलती आहे व रशियांत मजुरवर्ग प्रभावी आहे. दुष्परिणाम न होऊं देतां भांडवलवाला काय करूं शकतो याचें उत्तम उदाहरण म्हणजे फोर्ड मोटार-कंपनीचें देतां येईल. मजुरवर्ग काय करूं शकेल त्याचा प्रयोग रशियांत सध्यां चालू आहे. फॅशिस्मोनें या दोन्ही वर्गांविषयीं आदरवृत्ती ठेऊन तटस्थपणा स्वीकारला आहे, व दोघांत लढा उपस्थित झाल्यास तो निःपक्षपातीपणानें सोडविण्याची जबाबदारी स्वतःवर घेतली आहे. फॅशिस्मोचें ध्येय एकाद्या विशिष्ट वर्गाचाच उत्कर्ष असें नसून सर्व राष्ट्राचा उत्कर्ष असें आहे. सोशिआलिझमला फक्त कामकरी वर्गांचेंच हित दिसतें; देशांतील इतर वर्गांविषयीं तो उदासीन असतो.

फॅशिस्मो

'फॅशिस्मो' ही इटालींतील तरुण वर्गानें काढलेली चळवळ आहे. तिचें नाविन्य तिच्या धडाडीच्या वृत्तींत आहे. 'फॅशिस्मो' हा बोलून चालून शिपाई बाण्याचा पंथ आहे. अत्याचाराला अत्याचारानें व सोट्याला सोट्यानें उत्तर देण्याचा त्याचा बाणा आहे. गुइसिपी प्रेझोलिनी यांनीं म्हटल्याप्रमाणें "एका राजकीय पक्षाची लष्करी संघटना करण्यांत" फॅशिस्मोचें वैशिष्ट्य आहे. ( Military organization of a political party ). फॅशिस्मोनें राजकारण शास्त्रांत नव्या विचारांची भर घातली असें नाहीं. परंतु जुने विचार नव्या तऱ्हेनें मांडून तें आचरणांत आणून दाखविण्यांत त्यानें जी धडाडी आणि निश्चयवृत्ती दाखविली तीच अत्यंत महत्वाची आहे. एकादें तत्त्व प्रतिपादणें सोपें असलें तरी त्याचा प्रत्यक्ष व्यवहारांत उपयोग करून दाखविणें मात्र तितकेसें सोपें नसतें. फॅशिस्मोनें तत्त्वप्रतिपादनापूर्वी त्या तत्त्वाचें आचरण करून दाखविलें असल्यामुळें हा पंथ 'बोले तैसा चाले' या कोटींतील आहे; केवळ वायफळ कार्यक्रम ठरविणारा किंवा कंठाळी ठराव पास करणारा तो नाहीं. याबद्दल दुमत असण्याचें कारण नाहीं. एवढें त्याचें तात्त्विक विवेचन करून त्याच्या वरील कांहीं आक्षेपाकडे वळतों.

प्रथमारंभींच एक गोष्ट सांगून ठेवणें इष्ट आहे कीं, फॅशिस्मो अद्यापि बाल्यावस्थेंत आहे. त्याच्या जन्माला अजून १० वर्षेंसुद्धां झालीं नाहींत, तेव्हां त्याच्या गुण दोषांचा उहापोह करण्याचा काल अद्यापि यावयाचा आहे असें आमचें मत आहे. लहानपणीं झालेल्या भल्याबुऱ्या गोष्टीबद्दल बालकास आपण जबाबदार धरत नाहीं किंवा त्यांवरून त्याच्या भावी आयुष्याचें चित्र रेखाटीत नाहीं. तोच न्याय साधारणपणें

फॅशिस्मोसारख्या नवीनच स्थापित झालेल्या पंथानाहि कां लावूं नये ? परंतु टीकाकारांना हा विवेक रहात नाहीं व ते टीका करतात. अशा टीकाकारांच्या कांहीं ठळक आक्षेपांना खालीं उत्तर देण्याचा प्रयत्न केला असून त्याच्या प्रसाराचीहि थोडक्यांत माहिती दिली आहे.

हा पंथ सर्वस्वीं युद्धजन्य आहे. युद्धोत्तर कालांत यूरोपभर आणि विशेषतः इटालीमध्यें जी अभूतपूर्व अव्यवस्था माजून गेली व बोल्शेव्हिक मतांमुळें जी विचारक्रांती झाली तिला तोंड देण्यासाठीं व इटालियन राष्ट्राची अधोगती थांबविण्यासाठीं फॅशिस्मोचा उदय झाला. तथापि अगदीं आरंभीं फॅशिस्मोला बोल्शेव्हिक मतांचा उग्र वास येत असें हें कबूल करणें भाग आहे. १९१९ सालीं फॅशिझम पंथ स्थापला गेला त्या काळीं इटालींतील बहुजनसमाजाच्या मनावर बोल्शेव्हिक मतांचा चांगलाच पगडा बसला होता ही गोष्ट वाचकांच्या परिचयाची आहे. त्यामुळें १९१९ सालच्या विशिष्ट परिस्थितीचा परिणाम फॅशिस्मोच्या तत्कालीन विचारसरणीवर झाला असल्यास नवल नाहीं. राजसत्ताच नको असें म्हणण्यापर्यंत त्या काळचा फॅशिस्ट 'मॅनिफेस्टो'–जाहीरनामा गेला होता ! आज सर्वच मनू बदलला असून फॅशिस्ट म्हणजे कडवा राजपक्ष झाला आहे. हिंदुस्थानाच्या शोधार्थ बाहेर पडलेल्या कोलंबसानें अमेरिका खंडाचा शोध लावावा तशांतलाच हा प्रकार होय असें सकृद्दर्शनीं वाटण्याचा संभव आहे. पुष्कळ लोकांनीं फॅशिस्मोला 'अपॉर्च्युनिस्ट' म्हणजे ध्येयहीन म्हणून दोषहि दिला आहे. हा दोषारोप सर्वस्वीं नाकबूल करणें चुकीचें होईल याची आम्हांस जाणीव आहे. परंतु तो सर्वस्वीं कबूलहि करतां येत नाहीं, ही गोष्ट विसरतां कामा नये.

**फॅशिस्मो**

फॅशिस्मोचीं मूलभूत तत्त्वें सांगतांना त्यांत आद्यस्थान, 'स्वदेशाभिमान आणि राष्ट्रहित' या तत्त्वाला दिलें आहे तिकडे या टिकाकारांनीं जरूर लक्ष द्यावें. फॅशिस्मोच्या सर्व तत्त्वज्ञानाचें सार या पहिल्या तत्त्वांत आहे. फॅशिस्टांनीं इटालीची राजसत्ता अबाधित ठेविली त्याचें कारण, त्या संस्थेचा राष्ट्रहिताला होणारा उपयोग हें होय. तिच्यामुळें इटालीचें नुकसान होण्याचा संभव असता तर मुसालिनीनें राजेसाहेबांची सन्मानपूर्वक रवानगी करण्यास कमी केलें नसतें. "फॅशिस्मोचा पाया स्वदेशहित आहे." एकाद्या इमारतीचा मूळ पाया आणि रूपरेखा (जनरल प्लॅन) कायम ठेऊन तींत चार दोन खिडक्या किंवा एकाद दुसरा दरवाजा नवा पाडला म्हणून ती इमारत आमूलाग्र बदलली असें आपण म्हणत नाहीं. तोच न्याय फॅशिस्मोलाहि लागूं आहे. स्वदेशहिताच्या ध्रुव ताऱ्यावर दृष्टी निश्चळ ठेऊन जाणाऱ्या पक्षाला ध्येयहिन समजणें कितपत बरोबर होईल याचा वाचकांनींच विचार करावा.

'स्वदेशाभिमान' हा फॅशिस्मोचा आत्मा मानल्यास तरुण वर्गास त्याचें बाह्य शरीर समजण्यास हरकत नाहीं. या पंथाला अभूतपूर्व यश येण्याला इटालीची तत्कालीन विशिष्ट परिस्थिती कारणीभूत झाली असली तरी त्याला देशांतील तरुण वर्गाचें मिळालेलें पाठबळ हें एक आद्य आणि मुख्य कारण आहे ही गोष्ट लक्षांत ठेविली पाहिजे. लढाई करून परत आलेला शिपाईवर्गहि बहुतांशीं तरुणच होता. या तरुणांच्या अंतःकरणांत उत्पन्न होणाऱ्या आशा-आकांक्षांचें शब्दचित्र 'फॅशिस्मोच्या आजूबाजूला' या प्रकरणांत दिलें आहे. त्यांवरून हा वर्ग, शिस्मोला कां मिळाला असेल त्याचा उलगडा होईल. स्वदेशीं परत आलें असतां, "मान सन्मान तर राहिलाच पण नुसतें कोणी आपल्याला विचारीतही नाहीं; व ज्या इटाली-

फॅशिस्मोसारख्या नवीनच स्थापित झालेल्या पंथानाहि कां लावूं नये ? परंतु टीकाकारांना हा विवेक रहात नाहीं व ते टीका करतात. अशा टीकाकारांच्या कांहीं ठळक आक्षेपांना खालीं उत्तर देण्याचा प्रयत्न केला असून त्याच्या प्रसाराचीहि थोडक्यांत माहिती दिली आहे.

हा पंथ सर्वस्वीं युद्धजन्य आहे. युद्धोत्तर कालांत यूरोपभर आणि विशेषतः इटालीमध्यें जी अभूतपूर्व अव्यवस्था माजून गेली व बोल्शेव्हिक मतांमुळें जी विचारक्रांती झाली तिला तोंड देण्यासाठीं व इटालियन राष्ट्राची अधोगती थांबविण्यासाठीं फॅशिस्मोचा उदय झाला. तथापि अगदीं आरंभीं फॅशिस्मोला बोल्शेव्हिक मतांचा उग्र वास येत असें हें कबूल करणें भाग आहे. १९१९ सालीं फॅशिझम पंथ स्थापला गेला त्या काळीं इटालींतील बहुजनसमाजाच्या मनावर बोल्शेव्हिक मतांचा चांगलाच पगडा बसला होता ही गोष्ट वाचकांच्या परिचयाची आहे. त्यामुळें १९१९ सालच्या विशिष्ट परिस्थितीचा परिणाम फॅशिस्मोच्या तत्कालीन विचारसरणीवर झाला असल्यास नवल नाहीं. राजसत्ताच नको असें म्हणण्यापर्यंत त्या काळचा फॅशिस्ट 'मॅनिफेस्टो'—जाहीरनामा गेला होता ! आज सर्वच मनू बदलला असून फॅशिस्ट म्हणजे कडवा राजपक्ष झाला आहे. हिंदुस्थानाच्या शोधार्थ बाहेर पडलेल्या कोलंबसानें अमेरिका खंडाचा शोध लावावा तशांतलाच हा प्रकार होय असें सकृद्दर्शनीं वाटण्याचा संभव आहे. पुष्कळ लोकांनीं फॅशिस्मोला 'अपॉर्च्युनिस्ट' म्हणजे ध्येयहीन म्हणून दोषहि दिला आहे. हा दोषारोप सर्वस्वीं नाकबूल करणें चुकीचें होईल याची आम्हांस जाणीव आहे. परंतु तो सर्वस्वीं कबूलहि करतां येत नाहीं, ही गोष्ट विसरतां कामा नये.

**फॅशिस्मो**

फॅशिस्मोचीं मूलभूत तत्त्वें सांगतांना त्यांत आद्यस्थान, 'स्वदेशाभिमान आणि राष्ट्रहित' या तत्त्वाला दिलें आहे तिकडे या टिकाकारांनीं जरूर लक्ष द्यावें. फॅशिस्मोच्या सर्व तत्त्वज्ञानाचें सार या पहिल्या तत्त्वांत आहे. फॅशिस्टांनीं इटालीची राजसत्ता अबाधित ठेविली त्याचें कारण, त्या संस्थेचा राष्ट्रहिताला होणारा उपयोग हें होय. तिच्यामुळें इटालीचें नुकसान होण्याचा संभव असता तर मुसालिनीनें राजेसाहेबांची सन्मानपूर्वक रवानगी करण्यास कमी केलें नसतें. "फॅशिस्मोचा पाया स्वदेशहित आहे." एकाद्या इमारतीचा मूळ पाया आणि रूपरेखा ( जनरल प्लॅन ) कायम ठेऊन तींत चार दोन खिडक्या किंवा एकाद दुसरा दरवाजा नवा पाडला म्हणून ती इमारत आमूलाग्र बदलली असें आपण म्हणत नाहीं. तोच न्याय फॅशिस्मोलाहि लागूं आहे. स्वदेशहिताच्या ध्रुव ताऱ्यावर दृष्टी निश्चळ ठेऊन जाणाऱ्या पक्षाला ध्येयहिन समजणें कितपत बरोबर होईल याचा वाचकांनींच विचार करावा.

'स्वदेशाभिमान' हा फॅशिस्मोचा आत्मा मानल्यास तरुण वर्गास त्याचें बाह्य शरीर समजण्यास हरकत नाहीं. या पंथाला अभूतपूर्व यश येण्याला इटालीची तत्कालीन विशिष्ट परिस्थिती कारणीभूत झाली असली तरी त्याला देशांतील तरुण वर्गाचें मिळालेलें पाठबळ हें एक आद्य आणि मुख्य कारण आहे ही गोष्ट लक्षांत ठेविली पाहिजे. लढाई करून परत आलेला शिपाईवर्गहि बहुतांशीं तरुणच होता. या तरुणांच्या अंतःकरणांत उत्पन्न होणाऱ्या आशा-आकांक्षांचें शब्दचित्र 'फॅशिस्मोच्या आजूबाजूला' या प्रकरणांत दिलें आहे. त्यांवरून हा वर्ग, शिस्मोला कां मिळाला असेल त्याचा उलगडा होईल. स्वदेशीं परत आलें असतां, "मान सन्मान तर राहिलाच पण नुसतें कोणी आपल्याला विचारीतही नाहीं; व ज्या इटाली-

साठीं आपण रक्ताचे पूर वाहविले त्याच्या हितसंबंधाची केवळ वाताहत चालली आहे" असें पाहून या ध्येयाभ्यासी तरुण हृदयांचा तिळपापड उडाला व त्यांनीं फॅशिस्मोच्या निशाणाखालीं जमण्यास सुरवात केली. स्वतः मुसलिनी तरुण आणि त्याची विचारसरणी या तरुण सैनिकांच्या विचार सरणीशीं पूर्णपणें पटणारी, असा योग जुळून आल्यामुळें फॅशिस्मो चळवळ थोड्याच अवधींत तरुणांची चळवळ ( " Fascismo is the movement of the youth"—*Mussolini.* ) झाली.

कोणत्याही देशाच्या राजकीय इतिहासाकडे नजर टाकिली तरी तरुणांचा पाठिंबा मिळालेली चळवळच जोरानें प्रसार पावत असल्याचें दिसून येईल. लो. टिळक, म. गांधी व देशबंधू दास यांच्या चळवळी यशस्वी झाल्या त्याचें कारण त्यांना देशांतील तरुणांचें असलेले पाठबळ हेंच होय. आयर्लंड, ईजिप्त आणि तुर्कस्थान यांच्या जळवळीकडे जरी ओझरतें लक्ष दिलें तरी त्यांच्या यशाचें बीज तद्देशीय तरुण वर्गाच्या उत्साही सहाय्यासच असल्याचें दिसून येईल. राष्ट्रांतील तरुण वर्गाचें अंतःकरण म्हणजे उत्साहाचा अक्षय्य भाता आहे. या भात्याचा ज्याला योग्य उपयोग करून घेतां येईल त्याला यशःप्राप्ती हटकून व्हावयाची. तरुणांचें हृदय निराशेनें गंजलेलें नसतें, नाउमेदीनें खचलेलें नसतें, किंवा निष्क्रियतेनें निष्प्रभ झालेलें नसतें. तरुणापुढें स्वदेशाचा दीप्तिमान् भविष्यत्काळ उभा असतो. उज्वल ध्येयाच्या मूक वक्तृत्वानें त्याचे बाहु स्फुरण पावतात; राष्ट्रांतील वीरभाव त्याला धैर्याचें आणि उत्साहाचें भरतें आणतात; आत्मविश्वासाचा दिव्य संदेश देऊन वीरोचित इतिहास त्याला कार्यप्रवण करतो. पलंगपंडितांना तरुणांच्या उत्साहाचें, त्यांच्या कार्याच्या धडाडीचें आणि संकटांविषयींच्या

त्यांच्या बेफिकीर वृत्तीचें आकलन होणें शक्य नाहीं. तरुणांचें राजकारण मंचकावर पडून करावयाचें नसतें. स्वदेशासाठीं लढावयाचें म्हटल्यावर तरुणाला कुसुमशेज आणि फड्या निवडुंगांतील फरक दिसेनासा होतो. त्याला आपलें ध्येय आणि फक्त ध्येयच दिसत असतें.

मुसलिनीनें आपल्या फॅशिस्ट चळवळीला तरुणांच्या 'डायनामाइटची' सुरुंगाची-जोड मिळवितांच, तिचा प्रसार इटालीभर हां हां म्हणतां झाला. या तरुण वर्गाबरोबर मध्यम वर्ग, श्रीमंत व्यापारी, कारखानदार आणि भांडवलवाला वर्ग यांचीहि सहानुभूती फॅशिस्ट चळवळीस मिळूं लागली. पहिल्या पहिल्यानें फॅशिस्ट चळवळ म्हणजे समाजसत्तावादाची सुधारून वाढविलेली आवृत्ती आहे अशी भांडवलवाल्या वर्गाची समजूत होती. परंतु १९२०-२१ सालीं समाजसत्तावाद्यांच्या चिथावणीनें झालेल्या संपाच्या वेळीं फॅशिस्टांनीं जे अविश्रांत श्रम केले व प्रसंग विशेषीं आपल्या प्राणांचीहि पर्वा न करतां, ते मोडले, तें पाहून त्यांच्याविषयीं असलेला गैरसमज आस्ते आस्ते दूर झाला.

१९२० सालीं कामकरी लोकांनीं पुष्कळ ठिकाणीं कारखानें आपल्या ताब्यांत घेऊन बोल्शेव्हिक तत्त्वावर ते चालविण्याचा प्रयत्न केला. परंतु भांडवलवाल्या वर्गाची नियंत्रक आणि प्रेरक शक्ती कारखान्याच्या चाकामागें नसल्यास कारखाना चालत नाहीं असें दिसून आलें. त्यामुळें मुसलिनीची भांडवलवाल्यांविषयींची पूर्वींची कल्पना बदलली व तो त्यांचा उल्लेख आदरपूर्वक करूं लागला. राष्ट्रांतील उत्पादनाला मजुराइतकीच भांडवलवाल्या वर्गाचीहि अवश्यकता आहे हें तत्त्व फॅशिस्मोनें मान्य केल्यामुळें आता श्रीमान् वर्गाचा त्याच्यावर पूर्ण विश्वास बसला आहे. कांहीं टीकाकारांनीं तर फॅशिस्ट पक्षाला दुसरा भांडवलवाला पक्षच ठरविलें आहे !

साठीं आपण रक्ताचे पूर वाहविले त्याच्या हितसंबंधाची केवळ वाताहत चालली आहे" असें पाहून या ध्येयाभ्यासी तरुण हृदयांचा तिळपापड उडाला व त्यांनीं फॅशिस्मोच्या निशाणाखालीं जमण्यास सुरवात केली. स्वतः मुसलिनी तरुण आणि त्याची विचारसरणी या तरुण सैनिकांच्या विचार सरणीशीं पूर्णपणें पटणारी, असा योग जुळून आल्यामुळें फॅशिस्मो चळवळ थोड्याच अवधींत तरुणांचीं चळवळ ( " Fascismo is the movement of the youth"—*Mussolini.* ) झाली.

कोणत्याही देशाच्या राजकीय इतिहासाकडे नजर टाकिली तरी तरुणांचा पाठिंबा मिळालेली चळवळच जोरानें प्रसार पावत असल्याचें दिसून येईल. लो. टिळक, म. गांधी व देशबंधू दास यांच्या चळवळी यशस्वी झाल्या त्याचें कारण त्यांना देशांतील तरुणांचें असलेले पाठबळ हेंच होय. आयर्लंड, ईजिप्त आणि तुर्कस्थान यांच्या जळवळीकडे जरी ओझरतें लक्ष दिलें तरी त्यांच्या यशाचें बीज तद्देशीय तरुण वर्गाच्या उत्साही सहाय्यासच असल्याचें दिसून येईल. राष्ट्रांतील तरुण वर्गाचें अंतःकरण म्हणजे उत्साहाचा अक्षय्य भाता आहे. या भात्याचा ज्याला योग्य उपयोग करून घेतां येईल त्याला यशःप्राप्ती हटकून व्हावयाची. तरुणांचें हृदय निराशेनें गंजलेलें नसतें, नाउमेदीनें खचलेलें नसतें, किंवा निष्क्रियतेनें निष्प्रभ झालेलें नसतें. तरुणापुढें स्वदेशाचा दीप्तिमान् भविष्यत्काळ उभा असतो. उज्वल ध्येयाच्या मूक वक्तृत्वानें त्याचे बाहु स्फुरण पावतात; राष्ट्रांतील वीरभाव त्याला धैर्याचें आणि उत्साहाचें भरतें आणतात; आत्मविश्वासाचा दिव्य संदेश देऊन वीरोचित इतिहास त्याला कार्यप्रवण करतो. पलंगपंडितांना तरुणांच्या उत्साहाचें, त्यांच्या कार्याच्या धडाडीचें आणि संकटांविषयींच्या

त्यांच्या बेफिकीर वृत्तीचें आकलन होणें शक्य नाहीं. तरुणांचें राजकारण मंचकावर पडून करावयाचें नसतें. स्वदेशासाठीं लढावयाचें म्हटल्यावर तरुणाला कुसुमशेज आणि फड्या निवडुंगाची शेज यांतील फरक दिसेनासा होतो. त्याला आपलें ध्येय आणि फक्त ध्येयच दिसत असतें.

मुसलिनीनें आपल्या फॅशिस्ट चळवळीला तरुणांच्या 'डायनामाइटची' सुरुंगाची-जोड मिळवितांच, तिचा प्रसार इटालीभर हां हां म्हणतां झाला. या तरुण वर्गाबरोबर मध्यम वर्ग, श्रीमान् व्यापारी, कारखानदार आणि भांडवलवाला वर्ग यांचीहि सहानुभूती फॅशिस्ट चळवळीस मिळूं लागली. पहिल्या पहिल्यानें फॅशिस्ट चळवळ म्हणजे समाजसत्तावादाची सुधारून वाढविलेली आवृत्ती आहे अशी भांडवलवाल्या वर्गाची समजूत होती. परंतु १९२०-२१ सालीं समाजसत्तावाद्यांच्या चिथावणीनें झालेल्या संपाच्या वेळीं फॅशिस्टांनीं जे अविश्रांत श्रम केले व प्रसंग विशेषीं आपल्या प्राणांचीहि पर्वा न करतां, ते मोडले, तें पाहून त्यांच्याविषयीं असलेला गैरसमज आस्ते आस्ते दूर झाला.

१९२० सालीं कामकरी लोकांनीं पुष्कळ ठिकाणीं कारखानें आपल्या ताब्यांत घेऊन बोल्शेव्हिक तत्त्वावर ते चालविण्याचा प्रयत्न केला. परंतु भांडवलवाल्या वर्गाची नियंत्रक आणि प्रेरक शक्ती कारखान्याच्या चाकामागें नसल्यास कारखाना चालत नाहीं असें दिसून आलें. त्यामुळें मुसलिनीची भांडवलवाल्यांविषयींची पूर्वीची कल्पना बदलली व तो त्यांचा उल्लेख आदरपूर्वक करूं लागला. राष्ट्रांतील उत्पादनाला मजुराइतकीच भांडवलवाल्या वर्गाचीहि अवश्यकता आहे हें तत्त्व फॅशिस्मोनें मान्य केल्यामुळें आता श्रीमान् वर्गाचा त्याच्यावर पूर्ण विश्वास बसला आहे. कांहीं टीकाकारांनीं तर फॅशिस्ट पक्षाला दुसरा भांडवलवाला पक्षच ठरविलें आहे !

अशा रीतीनें फॅशिस्मोचा प्रसार चालला होता. कोणत्याही नव्या राजकीय पक्षाला त्याच्या बाल्यावस्थेंत विरोधांशीं टक्कर द्यावी लागते. या लढ्यांत टिकून राहून त्यानें स्वमतप्रसार केला तरच त्याच्या हातून कांहीं काम होण्याची आशा. विरोधाच्या पहिल्या झुळकेसरशी उडून जाणारा पक्ष काय काम करूं शकणार ? फॅशिस्मोला आरंभीं आरंभीं अत्यंत कठिण प्रसंगांतून जावें लागलें. फॅशिस्मोचा विजय म्हणजे आपला मृत्यू ही गोष्ट सोशिआलिस्टांना थोड्याच काळांत कळून चुकली. तेव्हां शक्यतर मूळांतच या पक्षाचा कांटा काढून टाकावा म्हणून १९१९ च्या नेंबरच्या निवडणुकींत त्यांनीं या नव्या पक्षाला जोराचा विरोध केला. या निवडणुकींत फॅशिस्टांची कशी वाताहत झाली त्याचा वृत्तांत वेळोवेळीं दिलाच आहे. याच कालांत म्युनिसिपल निवडणुकी झाल्या. बोलोनो येथें ४ फॅशिस्ट उमेदवार निवडून आले. म्युनिसिपालिटीच्या पहिल्याच बैठकींत त्यांपैकीं एकजण मारला गेला व दुसऱ्या दोघांना जबर जखमा करण्यांत आल्या. फेरारा येथेंहि दंगा होऊन ७।८ फॅशिस्ट मृत्युमुखीं पडले. ट्यूरीन येथें सॉन्झिनी नांवाचा एक विद्यार्थी व स्किम्युला नांवाचा तुरुंगावरील अधिकारी यांच्यावर ते फॅशिस्ट आहेत म्हणून खटला भरण्यांत आला, व तेथें स्थापन झालेल्या 'इटालियन सोव्हियट सरकारनें' त्यांना देहांतशिक्षा फर्मावली. तेथील कारखान्याच्या जळत्या भट्टींत टाकूनच त्यांचा मोक्ष करण्याचा 'सरकारचा' विचार होता. परंतु कारखाना बंद असल्यामुळें भट्टया थंड पडल्या होत्या तेव्हां त्या अपराध्यांना गोळ्या घालण्याचें ठरून त्याप्रमाणें करण्यांत आलें ! या प्रकरणांवर लिहितांना अव्हान्टी–सोशिआलिस्टांचें मुखपत्र–वर्तमानपत्रानें, "फॅशिझमच्या वतीनें लढणाऱ्यांनीं यावरून धडा घ्यावा" असा उपदेश केला होता ! वरील सारखे प्रकार त्या काळीं

इटालींत प्रत्यहीं चालले होतें. यावरून फॅशिस्मोला किती विकट परिस्थितींतून आपला मार्ग काढावा लागला असेल त्याची कल्पना होते. असें असतांहि फॅशिस्मो पंथ मेला तर नाहींच पण १९२४ साल संपण्यापूर्वींच सगळ्या इटालीचीं अधिकारसूत्रें त्यानें आपल्याकडे घेतलीं.

आरंभीं आरंभीं फॅशिस्ट लोक अत्याचाराचा प्रतिकार उलट अत्याचारानें करीत नसत. याचें उत्तम उदाहरण म्हणजे बोलोना येथें म्युनिसिपालिटींतील फॅशिस्ट सभासदाचा खून झाला त्यावेळचें. ज्या फॅशिस्टाचा खून झाला होता त्याचा स्नेही जवळच उभा होता व त्याच्या खिशांत भरलेलें पिस्तूलहि होतें. परंतु आपल्या मित्राचा देह पडतांच ' मला मारावयाचें असल्यास खुशाल मारा; मी मात्र उलट कोणाहि इटालियनाला मारणार नाहीं, " असें म्हणून तो तरुण निश्चल उभा राहिला ! परंतु थोड्याच काळांत मुसलिनीच्या आणि इतरहि फॅशिस्टांच्या असें ध्यानांत आलें कीं, जगांतील व्यवहार केवळ सात्विक आणि आत्मिक बळावर चालवून भागत नाहीं. शरीराची जोड मिळाल्याशिवाय नुसत्या आत्म्याला स्थान नाहीं या सिद्धान्ताविषयीं त्यांची खात्री झाली. त्यांनीं तत्काळ प्रतिकाराची तयारी केली. फॅशिझमच्या चळवळींतील बहुसंख्याक लोक युद्धावरून परत आलेले सैनिक असल्यामुळें, त्यांना सैन्यांतील शिस्त आणि प्रतिकाराचे प्रकार यांची पूर्ण ओळख होती. त्यांनीं आपलें शिपाई-स्वरूप दाखविण्याचें ठरविलें. बोल्शेव्हिक सोशिआलिस्ट आणि फॅशिस्ट सैनिक असा तो लढा होता. लढाईलाच सुरवात झाल्यावर कोणाकडून कसे अत्याचार झाले यांचा विचार करण्यांत अर्थ नाहीं. ' In love and war, all is fair ' हा कवि-सिद्धान्तच अशा प्रसंगीं ग्राह्य ठरतो. सोशिआलिस्टांनीं फॅशिस्टांना ठोकावें व फॅशिस्टांनीं सोशिआलिस्टांना उलट झोडपून काढावें असा क्रम

त्या काळीं साऱ्या इटालीभर चालला होता. कोणी कोणाचीहि गय करीत नसे. या लढ्यांत फॅशिस्टांनीं ज्या एका नव्या साधनाचा उपयोग केला त्याचा या ठिकाणीं नामनिर्देश करणें जरूर आहे. तें साधन म्हणजे एरंडेल तेल होय. प्रतिपक्षी सांपडला कीं, ' धर त्याचें नाक व ओत त्याच्या घशांत एरंडेल तेल ' असा अगदीं अश्रुतपूर्व उपाय फॅशिस्टांनीं त्याकाळीं अंमलांत आणला होता. प्रसंगविशेषीं या अस्त्राचा प्रयोग उलट त्यांच्यावरहि होण्यास चुकत नसे ! या अवधींत उभय पक्षाकडील शेंकडों लोक ठार मारले गेले व हजारों लोकांनीं मार खाल्ला. कित्येक ठिकाणीं सोटासोटी चाले तर कित्येक ठिकाणीं एरंडेल तेलाच्या बाटल्या रिकाम्या होत. असो. अशा रीतीनें हा लढा भयंकर त्वेशानें २॥ वर्षे चालला होता. इटालींत त्याकाळीं सरकारचें अस्तित्व जवळ जवळ नव्हतेंच असें म्हणावयास हरकत नाहीं !

या लढ्यांत शेवटीं फॅशिस्मो विजयी झाला. त्याचीं मुख्य कारणें म्हणजे ( १ ) त्यांची लष्करी शिस्त, ( २ ) स्वदेशाविषयीं असलेलें उदात्त ध्येय आणि ( ३ ) सरकारी पोलीस व लष्कर यांनीं त्यास केलेलें सहाय्य, हीं होत. " इटालीला बोल्शेव्हिकांच्या तावडींतून सोडवून तिचें अंतरराष्ट्रीय स्थान उच्च आणि आदरणीय करावयाचें " या उदात्त विचारानें फॅशिस्ट लोक वागत असल्यामुळें आपल्या चळवळीचें स्वरूप पहिल्यापासून उज्वल ठेवण्याकडे त्यांचा साहजीक कल असे. सोशिआलिस्टांच्या अतिरेका पासून जनतेचें रक्षण करण्यांस तत्कालीन सरकार असमर्थ ठरलें त्या वेळीं फॅशिस्टांनीं तें केलें. त्यांची लोकहिततत्परता खरोखरीच वाखाणण्या सारखी होती. " कोठें आग लागली, अतिवृष्टीनें पूर आला किंवा आगगाडीचा अपघात झाला तर त्या ठिकाणीं मदतीसाठीं धावून जाण्यास

फॅशिस्ट लोक नेहमीं तयार असत." याचा साहजिक परिणाम होऊन जनतेंमध्यें फॅशिस्ट पक्षांविषयीं विश्वास, आदर आणि सहानुभूती वाटूं लागली. अत्यंत बिकट प्रसंगीं राष्ट्राचें रक्षण करणारा म्हणून या पक्षाची साऱ्या इटालीभर कीर्ति होण्यास वेळ लागला नाहीं. ही कीर्ती मिळविण्यास त्यांना 'लोखंडाचे चणें' कसें खावें लागले होते याचा खुलासा वर केलाच आहे. या ठिकाणीं फॅशिस्टांच्या अत्याचाराविषयीं चार शब्द लिहिणें जरूर आहे. कारण अनेक लोकांनीं फॅशिझमवर अत्याचारी पक्ष म्हणून आग पांखडली आहे.

प्रथमारंभींच एक गोष्ट नमूद करणें जरूर आहे कीं, फॅशिस्मोच्या नांवाखालीं मोडणारे सर्वच अत्याचार फॅशिस्ट लोकांनीं केलेले नव्हते; व जे केले ते सर्वच समर्थनीय होते असेंहि नाहीं. फॅशिस्मोच्या इतिहासांत 'मॅटिओटीचा खून' हें प्रकरण कोणत्याहि प्रकारें समर्थनीय ठरणार नाहीं. या खुनाच्या कटांत फॅशिस्ट पक्षांतील अत्यंत वजनदार पुढारी गोंवले गेले असून खुद्द मुसलिनीला सदर गुन्ह्याची माहिती पूर्वींपासून नव्हतीच असें म्हणणें थोडें धाडसाचें होईल असेंहि वाटतें. फॅशिस्मोच्या उज्ज्वल नांवावर या खुनाचा डाग कायमचा राहणार ही गोष्ट सत्याला स्मरून बोलावयाचें तर, प्रांजलपणें कबूल करणें भाग आहे. लुइगी व्हिलारी सारख्या फॅशिस्ट लेखकांनीं या कृष्णकृत्यावर चुन्याचा हात फिरविण्याचा कितीहि प्रयत्न केला तरी त्याचा काळेपणा कमी होईल असें वाटत नाहीं. मॅक्बेथला आपल्या हातांवरील रक्ताचे डाग त्रिभुवनांतील समुद्रसुद्धां धुवूं शकणार नाहींत असें वाटत होते. कारण त्यानें केलेला खून सर्वस्वीं अनैतिक होता. मॅटिओटीच्या खुनाविषयींहि असेंच म्हणावें लागेल. या

बाबतींत आमचें मत अशा रीतीनें असंदिग्ध भाषेंत व्यक्त केल्यावर फॅशिस्टांच्या इतर अत्याचाराकडे वळण्यास हरकत नाहीं.

अत्याचाराची मीमांसा किंवा समर्थन करणें बरेंच धोक्याचें आहे. कारण नैतिक दृष्ट्या सर्व अत्याचार सारखेच दूषणीय होत. खुनाबद्दल फांशीची शिक्षा देणेंसुद्धां अनैतिक आहे असें म्हणण्यापर्यंत कित्येक समाज शास्त्रज्ञांची मजल गेली आहे. परंतु हा तात्त्विक विचार झाला. निर्भेळ तत्त्व आणि सत्य यांच्या मार्गानेंच जावयाचें म्हटल्यास जगाच्या प्रस्तुत व्यवहारांत तें शक्य नाहीं. एका पक्षानें अत्याचार आणि अनाचार सुरू केल्यानंतर त्याला तोंड देणें, त्यांचा निःपात करणें, समाजहितार्थ अत्यंत जरूर असतें. 'पापाचा प्रतिकार करूं नका' हें बायलांतलि तत्त्व निरपवाद नीतिशा-शास्त्राच्या दृष्टीनें कितीहि उदात्त असलें तरी प्रत्यक्ष व्यवहारांत पापाचा प्रतिकार न केल्यास तें वाढतच जातें, असा जगाचा आतांपर्यंतचा अनुभव आहे. शिवाय कित्येक तत्त्वें व्यक्तिधर्माच्या दृष्टीनें अत्यंत उच्च असलीं तरी राष्ट्रधर्माच्या दृष्टीनें तीं तशीं नसतात. समाजाचीं यष्टी आणि समष्टी अशीं दोन भिन्न स्वरूपें आहेत व त्यांना भिन्न भिन्न धर्म आहेत. ही गोष्ट विसरली गेली म्हणजे तें राष्ट्र किंवा तो समाज अवनतीला जाऊं लागतो. भगवान् बुद्धाच्या "अहिंसा परमोधर्मः" या तत्त्वाची योग्य संगती लावण्यास हिंदुस्थान चुकला म्हणूनच त्याला आजच्या रौरवसम पारतंत्र्यांत पडावें लागलें. भगवान् बुद्धांचा उपदेश व्यक्तीसाठीं आहे; त्याच्या उद्दिष्टाचा विपर्यास करून लोकांनीं त्याला सर्व देशाचा धर्म बनविलें व राष्ट्रावर कायमची आपत्ती ओढवून घेतली. अत्याचाराविषयीं विचार करतांनाहि त्याच्या अंतिम उद्दिष्टाकडे आणि त्याच्या मागें असलेल्या विशिष्ट भावनेकडे लक्ष देण्यास आपण विसरतां कामा नये.

**फॅशिस्मो**

फॅशिस्मोनें अत्याचार केले यावद्दल वाद नाहीं. त्यांपैकीं मॅटीओटी किंवा तत्सम अत्याचार अत्यंत गर्हणीय होत याबद्दलहि दुमत असण्याचें कारण नाहीं. परंतु १९१९ ते १९२२ पर्यंत किंवा त्यानंतरहि इटालींत जे अत्याचार झाले ते सर्व फॅशिस्मोच्याच माथीं मारण्याचा जो प्रयत्न करण्यांत येतो तो मात्र योग्य नाहीं. असा प्रयत्न करणें म्हणजे सत्यावरच अत्याचार करण्यासारखें होईल ! फॅशिस्मोच्या अत्याचारांचा विचार करतांना खालीं दिलेल्या २ गोष्टी लक्षांत ठेविल्या पाहिजेत. ( १ ) इटालिची तत्कालीन विशिष्ट परिस्थिती; ( २ ) आणि समाजसत्तावादीपक्षानें उत्पन्न केलेली अराजकता. त्या काळीं इटालींतील मध्यवर्ती सत्ता जवळ जवळ नामशेषच झाल्यामुळें कोणीतरी जनतेचें संरक्षण करणें जरूर होतें. इटालियन राष्ट्राचा त्या वेळीं बचाव झाला नसतां तर त्याची आज काय अवस्था झाली असती हें सांगणें कठिण आहे. इटालियन सोशिआलिस्टांनीं राज्यक्रांती करण्याचा आणि रशियन पद्धतीवर सोव्हियट सत्ता स्थापण्याचा उघड उघड उद्योग चालविला होता. राज्यक्रांतीची पूर्व तयारी म्हणून त्यांनीं साऱ्या इटालीभर संप आणि दंगे करण्यास सुरवात केली होती. त्यांच्या या धोरणामुळें इटालीचा व्यापार बसला व देशाला अन्नान्न दशा प्राप्त झाली. 'बुभुक्षितः किंन्न करोति पापं' या सुभाषिताची सत्यता त्या काळीं इटालींत पटूं लागली. ही परिस्थिती कोणत्याहि देशाला अहितकारक आणि परिणामीं अत्यंत अनिष्टच होय याबद्दल मतभेद असणें शक्य नाहीं. इतकें असूनहि, समाजसत्तावाद्यांनीं आपली चळवळ शांततेच्या आणि अनत्याचाराच्या मार्गानेंच चालविली होती असें म्हणावें तर तसेंहि नव्हतें. त्यांच्या अत्याचारांचे कांहीं मासले वर दिलेच आहेत. अशा स्थितींत सरकारनें पुढें येऊन शांतता आणि सुव्यवस्था राखणें जरूर होतें. परंतु तत्कालीन इटालियन

सरकाराची स्थिती काय होती याची वाचकांस कल्पना आहेच. फॅशिस्ट पक्षांपुढें, 'सोशिआलिस्टांच्या अत्याचारांना आणि धांगडधिंग्यांना उलट अत्याचारांनीं तोंड देऊन राष्ट्राचा बचाव करणें; किंवा निरपवाद अनत्याचारी राहून आपल्या प्रिय मातृभूमीचे निघतील ते धिंदवडे निमूटपणें पाहणें एवढे दोनच मार्ग शिल्लक होते. पहिल्या मार्गाचा अवलंब केल्यास निरपवाद नीतिशास्त्राच्या दृष्टीनें ते दोषी ठरत होते व दुसऱ्या मार्गाचा अवलंब केल्यास आपल्या राष्ट्राचा अधःपात झालेला पहाण्याचें पाप त्यांच्या माथीं बसणार होतें. कोणत्या तरी एका पापाचे धनी होण्याशिवाय गत्यंतर नव्हतें. फॅशिस्टांनीं त्यापैकीं पहिल्या मार्गाचा अवलंब करून निरपवाद नीतिशास्त्राचा दोष सहन करण्याचें ठरविलें व समाजसत्तावाद्यांच्या अत्याचारांना अत्याचारांनींच उत्तर देण्याची तयारी केली.

फॅशिस्ट पक्षानें स्वीकारलेल्या या धोरणाविषयीं बोलतांना या पक्षाच्या संस्थापकानें काढलेले उद्गार मननीय आहेत. मुसलिनीनें ता. ३ एप्रील १९२१ रोजीं बोलोना येथें केलेल्या भाषणांत अत्याचारावर खालील विचार प्रदर्शित केले आहेत. तो म्हणतो, 'अत्याचार करूं नयेत. परंतु नाइलाज झाला व जरूरच पडली तर ते करण्यास फॅशिस्ट पक्ष केव्हांहि मागें घेणार नाहीं. महायुद्धांत शत्रूशीं लढून संपतें न संपतें तोंच, आपल्याचं रक्तामासाच्या भाईबंदांशीं, इटालियनांशींच, आज लढावें लागत आहे याबद्दल आम्हांला अत्यंत वाईट वाटत आहे. आमच्या पक्षाच्या लोकांनीं एक गोष्ट नेहमीं लक्षांत ठेवणें जरूर आहे कीं, आपल्या अत्याचारांचें स्वरूप केव्हांहि घाणेरडे असतां कामा नये. अत्याचार करावे लागले तर ते केवळ अपरिहार्य म्हणून आणि सर्वस्वीं प्रतिकारार्थच कर-

ण्यांत यावेत. ते नैतिकदृष्ट्या समर्थनीय असले पाहिजेत. 'केवळ अत्याचारासाठींच अत्याचार' हें आपलें ब्रीद नव्हे. आपला अत्याचार न्याय्य पाहिजे; त्यानें आपल्या फॅशिस्ट निशाणाला केव्हांहि मलिनपणा आणतां कामा नये. यांवरून आम्हांला अत्याचाराचा संप्रदाय स्थापावयाचा नाहीं ही गोष्ट उघड होईल.' अत्याचाराचें यापेक्षां सुंदर विवेचन आणि समर्थन दुसरीकडे क्वचितच पहावयास मिळेल.

फॅशिस्मोवरील मुख्य आक्षेपांचा आतांपर्यंत विचार केला. आतां आणखी एका गौण पण महत्वाच्या आक्षेपाचा विचार करून हें प्रकरण संपवूं. फॅशिस्मोवर, "तो केवळ व्यक्तिनिष्ठ पक्ष असल्यामुळें त्याला राजकारण शास्त्रांत चिरंतन स्थान नाहीं." असा एक आक्षेप घेण्यांत येतो. या आक्षेपाच्या पुरस्कर्त्यांनीं ही गोष्ट लक्षांत ठेविली पाहिजे कीं, कोणताहि पक्ष आरंभीं प्रायः व्यक्तिनिष्ठच असतो. ख्रिश्चन धर्माची स्थापना झाली त्या वेळीं एक जीझस आणि त्याचे १० शिष्य एवढ्यांचाच तो धर्म होता; व त्या काळीं तरी तो सर्वस्वीं व्यक्तिनिष्ठच होता. पण त्यामुळें त्याचें चिरंतनत्व काडीइतकेंहि कमी झालेलें नाहीं. हा आक्षेप घेणारे 'मँचेस्टर गार्डियनचे' संपादक आणि रॅम्से मॅक्डोनाल्ड स्वतः याच व्यक्तिनिष्ठ धर्माचे अनुयायी आहेत, ही गोष्ट लक्षांत ठेवण्यासारखी आहे. कोणताहि पंथ किंवा संप्रदाय यशस्वी ठरतो व चिरंतन होतो तो त्याच्या मूळाशीं असलेल्या सत्य तत्त्वावरच होय. फॅशिस्मोच्या यशस्वीपणाबद्दल दुमत नाहीं. त्याच्या चिरंतनत्वाविषयीं सध्यां कांहींच बोलतां येत नाहीं; कारण मागें सांगितल्याप्रमाणें जन्माला अद्यापि १० वर्षेंहि पुरीं लोटलीं नाहींत त्याचें भविष्य काय सांगावें? वयोमानानें हा पंथ अद्यापि बाल्यावस्थेंतच आहे असें म्हणावयास हरकत नाहीं.

राजसत्ता, लोकसत्ता आदि राज्यपद्धती इतिहासकालापासून चालत आल्या असून त्यांची विचारसरणी आणि कार्यपद्धती आतां ठरून गेली आहे. राजकीय विचारांत यापुढें त्यांचेकडून विशेष भर टाकिली जाईल असें वाटत नाहीं. यानंतर राजकारणशास्त्रांत नव्या कल्पना आणि नवी कार्यपद्धती आणली जाण्याचा संभव फक्त एकाच दिशेकडून आहे. ती म्हणजे रशियन सोव्हिएट पद्धत. या पद्धतीविषयीं अद्यापि निर्विकार मनाचा आणि समतोल बुद्धीचा उहापोह झालेला नाहीं. सोशिआलिस्टांना सोव्हिएट पद्धत म्हणजे स्वर्गीय देणगी वाटते तर इंग्रज व अमेरिकन वर्तमानपत्रकारांना आणि समाजशास्त्रज्ञांना सोव्हिएटचें नांव ऐकतांच कांपरें भरतें ! या दोन्ही दृष्टी चुकीच्या आहेत. परंतु सध्यां रशिया म्हणजे मिटलेला ग्रंथ असल्यामुळें त्यांत काय आहे व काय नाहीं याचा उहापोह करण्यांत अर्थ नाहीं.

फॅशिझमकडून राजकीय विचाराला फारशी मदत होईल असें वाटत नाहीं. याचें कारण त्याच्या विचारसरणींत तसें विशेष नाविन्य नाहीं. फॅशिस्मोला परंपरागत लोकसत्ता मान्य नाहीं. पार्लमेंटला मुसलिनीनें लोकांचें खेळणें ( people's toy ) म्हणून संबोधिलें आहे. त्यांवरून लोकसत्तात्मक राज्यपद्धतीविषयीं त्याचें काय मत आहे तें उघड दिसतें. फॅशिस्मोला ॲरिस्टॉक्रसी किंवा महाजन–पद्धती संमत आहे. रोमन कॅथोलिक पंथांत ज्याप्रमाणें अधिकाराची विभागणी खालपासून वरपर्यंत केलेली असली तरी त्या पंथाचा जो मुख्य पोप त्याच्या हातांत सर्व सत्ता केंद्रीभूत केलेली असते त्याप्रमाणेंच फॅशिस्मोंतहि सर्व सत्ता एका व्यक्तीच्याच हातांत केंद्रीभूत झाली आहे. मुसलिनीच्याच

<u>फॅशिस्मो</u>

शब्दांत सांगावयाचें तर " A Hierarchy must culminate in a pin-point." फॅशिस्मोचा सर्व भर राज्ययंत्र पराकाष्टेचें कार्यक्षम करण्यावर आहे. विशिष्ट प्रकारचीच राज्यपद्धती पाहिजे असा फॅशिस्मोचा वास्तविक आग्रह नाहीं. परंतु इटालीला एकमुखी सत्तेशिवाय ही कार्यक्षमता दुसऱ्या कोणत्याहि पद्धतीनें लाभणें शक्य नाहीं अशी फॅशिस्टांची कल्पना असल्यामुळें फॅशिस्मोनें एकमुखी सत्तेचा पुरस्कार केला आहे. "राज्ययंत्र कार्यक्षम होण्यास सरकारचें धोरण, जबाबदारी, आणि चालकत्व यांत एकसूत्रीपणा पाहिजे आणि तो येण्यास त्या राज्ययंत्राच्या चालकाचा अधिकार अविच्छिन्न आणि अविभाज्य असला पाहिजे" असें मुसलिनीचें मत आहे. सोशिआलिझमच्या विचारसरणीचा स्वाभाविक परिणाम राज्यसत्तेची आत्यंतिक विभागणी होण्यांत होणार असल्यास फॅशिस्मोचा परिणाम ती एकमुखी करण्यांत होणार आहे.

आपण या एकमुखी सत्तेला सुलतानशाही हें नांव देऊं. फॅशिस्मोची सर्व विचारसरणी राष्ट्रहित बुद्धीनें निबद्ध असल्यामुळें ही सुलतानशाही आणि पूर्वकालीन सुलतानशाही यांत महत्वाचा फरक पडतो. इतिहासांतील सुलतानांचा मुख्य हेतू स्वार्थसाधन हा असून, त्यांच्या सर्व बऱ्यावाईट गोष्टींवर स्वार्थाचा छाप पडलेला स्पष्टपणें दिसून येतो. मुसलिनींचें धोरण आरंभापासून वर सांगितल्याप्रमाणें केवळ स्व-राष्ट्रहितबुद्धीनें बद्ध आहे. फॅशिस्मोचा सुलतान प्लेटोच्या 'उपकारक सुलताना' सारखा (Benevolent Despot) आहे. फॅशिस्मो आपल्या सुलतानाच्या ठिकाणीं उपकारकत्व गृहित धरतो. प्लेटो तें केवळ इच्छितो. हें उपकारकत्व ज्याच्या ठिकाणीं नसेल तो माणूस फॅशिस्मोंत सुलतान पदाला जाऊंच शकणार नाहीं, असें मात्र म्हणता येणार

नाहीं. तो आपल्या अधिकाराचा दुरुपयोग करूं लागल्यास त्याचें नियंत्रण कोणी करावें याला फॅशिस्मोंत समाधानकारक उत्तर सांपडत नाहीं, ही गोष्ट कबूल करणें भाग. तथापि या आक्षेपाला असें उत्तर देतां येईल कीं, उपरीनिर्दिष्ट उपकारकत्व हाच फॅशिस्मोचा पाया असल्यामुळें, त्याला आपली इमारत कायम ठेवावयाची असल्यास त्यानें आपलें उपकारकत्व सोडतां कामा नये. तें सोडल्यास, पायाच ढासळलेल्या इमारतीप्रमाणें, फॅशिस्मोहि आपोआप उलथून पडेल. नेपोलियनाची सुलतानशाही, उपकारत्व होतें तों पर्यंतच टिकली. 'बर्लिन डिक्रीज' आणि 'व्हिएन्हा डिक्रीज' निघून जनतेच्या हितसंबंधांची गळचेपी सुरू होतांच नेपोलियनाच्या कर्तृत्वाचा भव्य प्रासाद क्षणार्धांत खालीं आला.

असो, आतांपर्यंत फॅशिस्मोच्या तात्त्विक व व्यावहारिक सिद्धान्तांचा त्यांच्यावरील आक्षेपासह उहापोह केला. हा उहापोह त्रोटक आहे व त्यांतील कांहीं मुद्यावर तरी पूर्वपक्ष उत्तरपक्ष करतां येणें शक्य आहे याची आम्हांस जाणीव आहे. परंतु विस्तारभयास्तव तो वाढवितां येत नाहीं. एका वाक्यांत फॅशिस्मोचें सार सांगावयाचें झाल्यास तें, 'शंभर नंबरी स्वदेशाभिमान म्हणजे फॅशिस्मो' असें सांगतां येईल. पुढील प्रकरणांत फॅशिस्मोच्या प्रत्यक्ष कार्याचा विचार केला आहे.

## प्रकरण ४ थें.

# फॅशिस्मोचें कार्य.

"Fascismo will bring a complete regeneration to my Father-land."

—*Mussolini.*

"The Nation is the God-appointed instrument for the welfare of the race, and in this alone its moral essence lies."

—*Mazzini.*

गेल्या प्रकरणांत फॅशिस्मोच्या सिद्धान्तांचा विचार केला. त्यांवरून हा पंथ कृति प्रधान असून त्याचा मुख्य भर प्रत्यक्ष कार्य आणि अनुभव यांवर आहे ही गोष्ट वाचकांस दिसून आलीच असेल. या प्रकरणांत, त्यानें आपल्या उद्दिष्टाप्रमाणें प्रत्यक्ष कार्य काय केलें, त्याचा विचार करावयाचा आहे. कोणताहि पंथ प्रत्यक्ष कार्याच्या कसोटीला कितपत उतरतो त्यावरच त्याची थोरवी अवलंबून असते. या कसोटीला फॅशिस्मो उतरला तर त्याला महत्व आहे; नाहींपेक्षां तो आणि सर्वसाधारण सुलतानशाही यांत काय फरक राहिला ? शिवाय " आमचा पंथ तरुणांचा आहे. म्हणजे तरुणांच्या प्रकृतीप्रमाणें तो कार्यकर्ता पक्ष आहे " असें ज्या पक्षाविषयीं अभिमानानें सांगण्यांत येतें त्याला तर कार्याच्या कसोटीला चांगलेंच उतरलें पाहिजे.

गेल्या भागांतील ' राजनिमंत्रण ' या प्रकरणांत सांगितल्याप्रमाणें रोमचीं राज्यसूत्रें हातीं येऊन १९२२ सालीं फॅशिस्मो पक्ष अधिकारारूढ झाला.

**फॅशिस्मोचें कार्य**

तोंपर्यंतच्या त्याच्या कार्याचें धोरण कमी अधिक प्रमाणांत विघातक स्वरूपाचेंच असणें अपरिहार्य होतें. फॅशिस्मोचा मुख्य शत्रू जो बोलशे-विझम् त्याचा पराभव करण्याच्या कामीं त्याला पहिलीं २-२।। वर्षें घालवावीं लागलीं. या अवधींत आपल्या लष्करी शिस्तीच्या जोरावर त्यानें सोशिअलिस्टांच्या अत्याचारांना तर आळा घातलाच परंतु स्वतःविषयीं जनतेंत विश्वास उत्पन्न केला. त्याचप्रमाणें पोलीस व सैन्य यांचा पाठिंबा मिळवून पुढील धोरणाला मजबुती आणून ठेविली. देशांतील लष्करानें सहाय्य केल्याशिवाय कोणतीहि राज्यक्रांती यशस्वी होणें शक्य नाहीं. तसेंच, सैनिकांच्या मनांत एकदां राज्यक्रांतीचे विचार सुरू झाले म्हणजे ती न होणेंहि तितकेंच अशक्य आहे. मुसलिनीनें आपल्या मताला पुष्कळ लष्करी अधिकारी आणि सेनापती मिळवून घेतल्यामुळें इटालीचें सैन्य, तो रोमवर चालून गेला त्यावेळीं, त्याच्याविरुद्ध शस्त्र उगारण्यास तयार नव्हतें. फॅशिस्मो विरुद्ध जाण्याविषयीं लष्कराची नाखुषी, आणि मुसलिनीची वडाडी, यांचा योग्य परिणाम होऊन इटालीच्या राजेसाहेबांनीं राज्याचीं अधिकारसूत्रें ३० आक्टोबर १९२२ रोजीं मुसलिनीच्या हातीं सोंपवून फॅशिस्ट राज्यपद्धतीला सुरवात केली. त्या दिवसांपासून फॅशिस्ट वर्षगणना सुरू झाली असून त्यास फॅशिस्ट शक असें म्हणतात. गेल्या ३० आक्टोबरला फॅशिस्ट शकाला ६ वें वर्ष लागलें !

अधिकारसूत्रें हातीं येतांच फॅशिस्मोनें पहिल्या प्रथम परराष्ट्रीय आणि आर्थिक प्रश्नाकडे लक्ष देण्याचें ठरविलें. पूर्वकालीन सॅलान्ड्रा निटीप्रभृती लोकांच्या अनिश्चित आणि अस्थिर धोरणामुळें इटालीचा आंतरराष्ट्रीय राजकारणांत कसा बोजवारा उडून गेला होता तें आपण 'फॅशिस्मोच्या आजूबाजूला' हिंडत असतां पाहिलेंच आहे. अर्थातच

यूरोपांत इटालीला त्याचें पूर्वीचें मानाचें स्थान मिळवून देण्याचें काम किती बिकट झालें असेल त्याची कल्पना होते. परराष्ट्रीय खातें मुसोलिनीनें आपल्याकडे ठेविलें व आपल्या धोरणाविषयीं परराष्ट्रांना शंका येऊं नये किंवा गैरसमज राहूं नये म्हणून त्यानें, 'पूर्वींच्या प्रधानमंडळांनी केलेले तह व करार फॅशिस्मोकडून बिनशर्त पाळले जातील' असें जाहीर केलें. व इटालियन सरकार आपली जबाबदारी ओळखणारे आहे असा विश्वास इतर राष्ट्रामध्यें उत्पन्न केला. फ्रेंच मुत्सद्यांना मुसलिनी विषयी विशेष भीती वाटत होती. परंतु वरील धोरण जाहीर केल्यामुळें ती दूर झाली, त्यानंतर लौकरच मुसलिनी लॅसान येथें गेला. तेथें फ्रेंच व इंग्रज मुत्सद्यांशीं तुर्कस्थानाशीं करावयाच्या तहाबाबत त्याचा जो संबंध आला त्यामुळें तर परराष्ट्रीय राजकारणाच्या महत्त्वाविषयीं त्याची खात्रीच झाली. मुसलिनीच्या रुबाबदार वर्तनाचा आणि निश्चित धोरणाचा युरोपियन मुत्सद्दी मंडळास पहिला अनुभव आला तो या लॉसान परिषदेंतच. त्यानंतर लौकरच, जर्मन युद्ध खंडणीच्या प्रश्नावर कांहीं महत्वाच्या सूचना करण्यांत फॅशिस्ट पक्षानें पुढाकार घेतल्यामुळें 'इटालीचें तरुण सरकार विधायक कार्य करणारें आहे,' अशी त्याची युरोपियन मुत्सद्यांनीं वहावा केली. १९२३ सालीं इटालियन मुत्सद्दी जनरल टेलिनी याचा ग्रीसमध्यें खून झाला. त्या बाबतींत मुसोलिनीच्या प्रधानमंडळानें दाखविलेल्या चिकाटीच्या आणि नेटाच्या धोरणामुळें आंतरराष्ट्रीय राजकारणांत इटालीचा वचक बसला. १९२४ सालीं फ्यूमचा बिकट प्रश्न तें बंदर इटालीस मिळवून देऊन सोडविण्यांत आला. या पेक्षांहि आश्चर्याची गोष्ट म्हणजे ७ फेब्रुवारी १९२४ रोजीं, फॅशिस्ट सरकारनें रशिया बरोबर व्यापारी स्नेहसंबंधाचा केलेला तह. या दोन्ही देशांच्या विचारसरणींत दक्षिण—उत्तर ध्रुवाइतकें अंतर होतें तरी त्यांनीं

परस्परांच्या देशांत वकिलाती स्थापून व्यापाराला सुरवात केली. गहूं व रॉकेल यांच्या पुरवठ्यासाठीं इटालीस परदेशांच्या तोंडाकडे पाहणें भाग पडतें. रशियांशीं दळणवळण सुरू न झाल्यास या अत्यंत अवश्यक पदार्थांसाठीं अमेरिका व इंग्लंड हीं राष्ट्रें सांगतील त्या अटी कबूल करणें इटालीस भाग होतें. निटीच्या कारकीर्दींत प्रे. वेल्सननें इटालीस गहूं पाठविण्याचें बंद करण्याचा धाक घातल्याचेंहि प्रसिद्ध आहे ! तीची पुनरावृत्ती होवूं नये म्हणून रशियांशीं तह करून फॅशिस्ट पक्षानें एक मोठें भावी संकटच टाळलें असें म्हणावयास हरकत नाहीं. 'तरुणांना दूरदृष्टी व अनुभव नसतो' म्हणून नाकें मुरडणाऱ्यांनीं हा रूसो-इटालियन तह जरूर लक्षांत घ्यावा.

फॅशिस्ट सरकारनें जर्मनी, स्वित्झरलंड, पोलंड, ग्रीस, आल्बानिया तुर्कस्थान आदि लहान मोठ्या देशांशीं स्नेहभावाचे तह करून व्यापारी दळणवळण वाढविलें आहे. अगदीं ताजा तह म्हणजे आरबस्थानांतील येमेनच्या इमामांशीं झालेला. लोकार्नोची परिषद यशस्वी करण्याचें कामीं व अशा रीतीनें जगाची शांतता अबाधित राखण्याचें कामीं इटालीनें दाखविलेल्या सहकार्याचाहि उल्लेख करणें जरूर आहे. या सर्व विवेचनावरून इटालीचें प्रस्तुत प्रधानमंडळ जगाशीं सलोख्यानेंच वागत आहे असें दिसून येईल.

या ठिकाणीं मुसलिनी आणि फॅशिस्ट पक्ष यांच्या युद्धाच्या खुमखुमी विषयीं थोडासा उहापोह केल्यास तो अस्थानीं होणार नाहीं असें वाटतें. गिल्बर्ट मुरे, स्टीड आदि इंग्रज ग्रंथकारांनीं मुसलिनीवर युद्धाच्या खुमखुमीचा आरोप करून, 'फॅशिझमचा पंथ आंतरराष्ट्रीय शांततेला धोका आणणारा आहे' असा कांगावा करण्यास प्रारंभ केला आहे. याचें मुख्य

कारण इटालीनें वसाहतींच्या बाबतींत स्वीकारलेलें निर्भीड आणि स्पष्ट धोरण, व त्यामुळें इंग्लंड व फ्रान्स यांच्या अन्याय्य आप्पलपोटेपणाला मिळणारा शह हें होय. इटालीचें राजकीय एकीकरण १८७६ सालीं झालें, व युरोपियन राजकारणांत इटालीला महत्व येऊं लागलें तें तेव्हांपासूनच. परंतु त्यापूर्वींच फ्रान्स, इंग्लंड, बेल्जम आदि राष्ट्रांनीं आफ्रिकेंत व इतरत्र हातपाय पसरून वसाहतीला योग्य अशीं बहुतेक ठिकाणें व्यापून टाकिलीं होतीं. इटालीला वसाहतींचें महत्व वाटूं लागलें त्या वेळीं अव्याप्त असा जगाचा फारच थोडा भाग शिल्लक होता. इकडे इटालियन लोकसंख्या मात्र झपाट्यानें वाढत होती. सध्यां इटालीची लोकसंख्या ४ कोटी आहे, व दरवर्षीं ५ लक्षांनीं तिची वाढ होते. याचा साहजिक परिणाम होऊन बरेच लोक पोटभरण्यासाठीं परदेशीं जात असतात. अशा रीतीनें बाहेर जाऊन तेथेंच कायमची वस्ती करून राहणाऱ्या इटालियनांची संख्या ९० लक्षावर गेली आहे. इटालीचे मुत्सद्दी वसाहतींच्या बाबतींत अस्वस्थ कां असतात हें यावरून दिसून यईल. १९१५ च्या लंडनच्या तहाप्रमाणें व १९१७ च्या सेंट जीन डी मॉरिनीच्या कराराप्रमाणें, एशिया मायनरमधील बराच प्रदेश इटालीस मिळणें जरूर आहे. परंतु जुन्या कराराप्रमाणें रशियाची त्यास संमती पाहिजे व प्रस्तुत परिस्थितींत ती मिळत नाहीं या सबबीवर लाईड जार्ज व क्लेमेन्को यांनीं तह परिषदेंत इटालीच्या तोंडास पानें पुसलीं. वास्तविक रशियाशीं या दोस्त राष्ट्रांचें कितपत सरळ होतें व आहे ती गोष्ट महशूरच आहे. 'न करत्याचा वार शनवार' म्हणतात तें कांहीं खोटें नाहीं.

फॅशिस्टपक्ष अधिकारारूढ होईपर्यंत उपरीनिर्दिष्ट मुत्सद्यांची ही कारवाई चालणें शक्य होतें; परंतु आतां ती तशीच चालणें शक्य नाहीं

असें पाहून इंग्रज लोकांनीं मुसलिनीवरच कुरघोडी करून 'त्यास साम्राज्य तृष्णा लागली आहे;' 'युद्धाची खुमखुम आली आहे;' 'त्याला प्रती नेपोलियन होण्याचीच हांव सुटली आहे;' 'मुसलिनी म्हणजे जगाच्या शांततेला मोठाच शत्रू,' वगैरे प्रकारें त्याची नालस्ती करण्यांस सुरवात केली आहे. इंग्रजांनीं तरी साम्राज्यतृष्णेच्या बाबतींत लांब जीभ काढून बोलूं नये. हितोपदेशांतल्या वाघानें ब्राह्मणाला अहिंसा धर्माचे पाठ द्यावेत तशांतलाच हा प्रकार नव्हें काय? असें असूनहि आमच्या मधल्या कांहीं विद्वान् म्हणविणाऱ्या लोकांचा डॉ. मुंज्यांच्या शब्दावर विश्वास बसतो व ते लोक मुसलिनी आणि फॅशिस्मो यांना दोषी ठरवितात!

सध्यां 'मँडेटेड एरिआज' म्हणून जे प्रांत फ्रान्स व इंग्लंडकडे गेले आहेत त्यांच्या विभागणीचा प्रश्न प्रचलित मँडेटची मुदत संपल्या नंतर पुन्हा उपस्थित होईल, आणि त्या वेळीं इटालीच्या वाट्यास त्यापैकीं कांहीं भाग येईल अशी इटालीयन मुत्सद्यांस आशा आहे!

फॅशिस्ट कारभारास प्रारंभ झाल्या पासूनचा इटालीचा परराष्ट्रीय राजकारणाचा वर आढावा घेतला. फॅशिस्टांना बाहेर यश येण्यास त्यांच्या घरचा कारभार त्यांनीं नीट चालविला पाहिजे. कारण घरांत मान असला तरच बाहेर मान मिळतो हें व्यावहारिक तत्त्व व्यक्तीला आणि राष्ट्राला सारखेंच लागूं आहे. यासाठीं मुसलिनीच्या प्रधानमंडळानें अंतर्गत राज्यकारभार सुधारण्यास सुरवात केली. अंतर्गत अव्यवस्थेची मळकीं वस्त्रें अंगावर घेऊन जाणाऱ्या राष्ट्राला आंतरराष्ट्रीय मुत्सद्दी मंडळांत मानाचें स्थान मिळणें शक्य नाहीं याची जाणीव असल्यामुळें मुसलिनी व त्याचें प्रधानमंडळ यांनीं रोज १४।१८ तास खपून इटालीचें राज्ययंत्र साफ केलें. मुसलिनीच्याच शब्दांत सांगावयाचें म्हणजे, "त्यावेळीं आम्हीं जुना केर

कचरा उपसून टाकून घर स्वच्छ करण्याचें काम करीत होतों." फॅशिस्ट प्रधानमंडळ वयानें लहान असल्यामुळें त्याला कामाचा अनुभव नव्हता. शिवाय टेबलाशीं सारखें बसून नेटानें काम करण्याची संवय नसल्यामुळेंहि या नव्या दमाच्या तरुण प्रधानांना प्रथम कांहीं दिवस बराच त्रास झाला. मुसलिनी व त्याच्या प्रधानमंडळांतील इतर सभासद यांच्या वयोमानांची बेरीज केली तर ती २०० वर्षांपेक्षां विशेष जास्त भरत नाहीं. उलट गुऑलिटीच्या एका प्रधानमंडळाच्या वयोमानांची बेरीज ११०० वर्षांवर गेली होती ! यावरून फॅशिस्ट प्रधानमंडळ किती तरुण असेल त्याची कल्पना होते.

फॅशिस्ट पक्ष अधिकारारूढ झाला त्यावेळीं इटालीची राज्यव्यवस्था सर्वप्रकारें निस्काळित आणि अव्यवस्थित झाली होती. त्यामुळें त्याला सर्वच खात्यांतून साफसफाईचें आणि काटकसरीचें काम करावें लागलें. सगळीकडे पसरलेल्या महागाईमुळें राज्यकारभाराचा खर्च प्रमाणाबाहेर वाढला होता. रेल्वेखात्याचा खर्च तर इतका बेसुमार वाढला होता कीं त्यांत करावी तेवढी काटकसर कमीच होती. एकट्या रेल्वेमध्यें १९२१ अखेर २ लक्ष ४१ हजार लोक होते. फॅशिस्टांनीं ही संख्या थोड्याच काळांत ( १९२४–२५ मध्यें ) १ लक्ष ७३ हजारावर आणून ठेविली. सोशिआलिस्टांच्या कारकीर्दींत जीं अनेक निष्कारण खातीं उघडण्यात आलीं होतीं तीं बंद झालीं. पुष्कळ लहान थोर नोकरांचे पगार कमी करण्यांत आले. ८ तासांच्या कामाचा नियम नसोशिनें अंमलांत आणल्यामुळें या कमी केलेल्या लोकांवरहि रेल्वेचा कारभार उत्तम तऱ्हेनें चालूं लागला. पूर्वी गाड्या वेळेवर सुटत नसत व डबे गलिच्छ असून उतारूंच्या सुखसोईकडे बिलकूल लक्ष दिलें जात नसे. आतां फॅशिस्टांनीं रेल्वेखातें इतकें शिस्त-

वार आणि नमुनेदार बनविलें आहे कीं, प्रवाशांना यापुढें तक्रार करण्यास बिलकूल जागा राहूं नये. जी गोष्ट रेल्वेखात्याची तीच पोस्ट, तार आणि मुलकी खात्यांची होती. या खात्यांतूनहि नोकरांची फाजील संख्या कमी करून आणि पगार उतरवून काटकसर करण्यांत आली व बजेट ताळ्यावर आणण्यांत आलें. प्रतिवर्षीं बजेटांत तूट येतच जाणार व नवें कर्ज काढावें लागणार असा पूर्वीच्या सरकारांचा ठाम सिद्धान्त ठरून गेला होता. परंतु वर सांगितल्याप्रमाणें काटकसरीची पराकाष्ठा करून प्रो. स्टिफानीनें बजेटांतील तूट शक्य तों कमी करण्याचें ठरविलें. १९२३–२४ ( फॅशिस्ट बजेट ) वसूल २०,५८१ ( दश लक्ष ) लीरा आला व खर्च २०,९९९ ( दश लक्ष ) लीरा झाला; म्हणजे तूट फक्त ४१८ ( दश लक्ष ) लीरांचीच आली. बजेटांत ती २,६१६ ( दश लक्ष ) लीरा धरण्यांत आली होती. या एकाच गोष्टीवरून स्टीफानींची कात्री किती निर्दयपणानें लाविली गेली असेल त्याची कल्पना होते.

१९२४–२५ सालीं, वसूल २०,४५६ ( दश लक्ष ) लीरा आला व खर्च २०,२४७ ( दश लक्ष ) लीरा झाला. म्हणजे २०९ (दश लक्ष) लीरांची बचत झाली. इटालींत गेल्या १५ वर्षांत बजेटांत शिल्लक उरल्याचा तो पहिलाच प्रसंग होता. १९२५–२६ सालच्या बजेटांत १७८ (दश लक्ष) लीरांची शिल्लक राहील असा अंदाज आहे. बजेटाच्या बाबतींत फॅशिस्ट सरकारनें मिळविलेला विजय खरोखरच आश्चर्यकारक आणि अभिनंदनीय आहे. यापक्षाचें निश्चयपूर्ण धोरण आणि धडाडीचा कार्यक्रम यांतच त्याच्या यशाचें बीज आहे.

अंदाजपत्रकांत, भलतेच कर वाढवून किंवा राष्ट्रसंवर्धक खातीं बंद करून किंवा त्यांचा जरूरीचा खर्चसुद्धां कमी करून आणि जमेची बाजू

मुद्दाम फुगवून व खर्चाची आंखडती घेऊन कागदी शिल्लक दाखविणें फारसें अवघड नसतें. परंतु फॅशिस्टांनीं तसें बिलकुल केलेलें नाहीं. एवढेंच नव्हे तर कित्येक जाचक कर त्यांनीं कमी केले व करांचा बोजा जनतेच्या मगदुराप्रमाणें सर्वांवर सारखा पडेल अशी त्यांची विभागणी केली पूर्वींच्या कारकीर्दींत कर देण्यांत भयंकर टाळाटाळी होत असे. कित्येक करांची रक्कम ते वसूल करण्यास येणाऱ्या खर्चापेक्षांहि कमी असे! ही सर्व अव्यवस्था फॅशिस्टांनीं नाहींशी केली.

प्रो. डी. स्टीफानीं यांनीं अशा रीतीनें अंतर्गत बजेटाची व्यवस्था लाविली. परंतु त्यामुळें अमेरिकेचें कर्ज व 'लीरा' नाण्याच्या हुंडणावळीचा प्रश्न सुटण्यासारखा नव्हता. हुंडणावळीचा प्रश्न अद्यापिहि सुटलेला नाहीं. एका वर्षापूर्वी इटालीच्या हुंडणावळीचा भाव १ पौंडास १४८ लीरा असा होता, यांवरून इटालियन नाण्याची किंमत किती खालीं गेली होती त्याची कल्पना होते. तेव्हांपासून प्रयत्न करून कौंट व्हॉल्पी यांनीं तो भाव आजकाल ९० वर आणून सोडला आहे. परंतु लीराची किंमत वाढविण्यांत फॅशिस्टांना बऱ्याच कृत्रिम उपयांचा अवलंब करावा लागला असून पुष्कळ लोकांत त्यामुळें असंतोष वाढला आहे ही गोष्ट कबूल केली पाहिजे. आंतरराष्ट्रीय कर्जाच्या बाबतींत मात्र फॅशिस्टांनीं उत्कृष्ट कामगिरी केली आहे. १९२५ च्या आक्टोबरमध्यें कौंट व्हॉल्पी अमेरिकेस गेला व तेथें इटालियन कर्जाविषयीं बोलणीं सुरू झालीं. इटालीनें अमेरिकेचें, केवळ युद्धासाठीं म्हणून जें कर्ज घेतलें होतें व ज्यांतून तिनें परत अमेरिकेकडूनच गहूं, रॉकेल, दारूगोळा व इतर युद्धसामुग्री खरेदी केली होती तें कर्ज अमेरिकेनें इटालीस माफ करावें,-कारण त्या खरेदींत अमेरिकेला भरपूर नफा झालाच

होता—असें ठरलें. युद्धानंतर घेतलेलें कर्ज ६२ वर्षांत फेडण्याचें इटालीनें कबूल केलें. व्याजासह ती रक्कम २,०४८,०००,०००, डॉलर्स होते. या करारामुळें इटालीची आंतरराष्ट्रीय इभ्रत एकदम वाढली व अमेरिकेंतच मॉर्गन कंपनीच्या मार्फत ७ टक्क्याचें १० कोटी डॉलरचें दुसरें कर्ज इटालीस उभारतां आलें ! यानंतर लौकरच १९२६ च्या प्रारंभी इंग्लंडाशींहि अशाच मित्रभावानें करार करून त्याच्याहि कर्जाचा प्रश्न सोडविण्यांत आला. त्याचीहि मुदत अशीच ६०।६२ वर्षांची करण्यांत आली आहे.

बजेटासारखे अंतर्गत आणि राष्ट्रीय कर्जासारखें आंतरराष्ट्रीय प्रश्न समाधानकारक रीतीनें सोडवून फॅशिस्टांनीं आपल्या विधायक धोरणाची लोकांस खात्री पटवून दिली. परंतु इटाली कडून कराराप्रमाणें वर्तन घडण्यास तिची आर्थिक सुधारणा झाली पाहिजे ही गोष्ट फॅशिस्मो विसरला नाहीं.

प्रथमारंभींच एक गोष्ट सांगून ठेवणें इष्ट आहे कीं, आर्थिक सुधारणेच्या बाबतींत फॅशिस्मोनें केलेले प्रयत्न व त्यास मिळालेलें यश प्रत्यक्ष स्वरूपांत दाखविणें कठिण आहे. कारण, आर्थिक सुधारणांच्या प्रयत्नांचें फळ ' पी हळद आणि हो गोरी ' अशा तऱ्हेचें नसतें. आज लावलेल्या अक्रोडाच्या झाडाचें फळ साठ वर्षांनीं मिळावयाचे त्याप्रमाणें आर्थिक आणि औद्योगिक प्रयत्नांची गोष्ट असते. सर्व साधारणपणानें असें म्हणतां येईल कीं, फॅशिस्मोच्या कारभाराला सुरवात झाल्यापासून उद्योग धंद्यांना जरूर ती शांतता मिळाली व सरकारनें आपलें आर्थिक धोरण त्यांना पोषक होईल असें ठेवल्यामुळें इटालीची आर्थिक प्रगति

झपाट्यानें होण्यास मदत झाली. रस्ते सुधारणें व नवे करणें; वाहतुकीचीं साधनें वाढविणें; अंतर्गत आणि आयात मालावरील जकातीचें धोरण व्यापाराला उपकारक होईल असें ठेवणें; देशांतील शेताची सुधारणा करून आयात व निर्गत होणाऱ्या मालाबाबत दक्षता ठेवणें व कारखानदार व व्यापारी यांच्या मार्गांत असलेल्या अडचणी दूर करणें या सारख्या गोष्टी करून फॅशिस्ट सरकारनें आपल्या राष्ट्राची आर्थिक स्थिती सुधारण्याचा प्रयत्न चालविला आहे.

इटालींत कोळसा व लोखंड विशेष सांपडत नसल्यामुळें त्याची औद्योगिक वाढ करणें कोणत्याहि सरकारास कठिण जाईल. तथापि कोळशाची वाण विद्युत्शक्तीच्या सहाय्यानें दूर करून व लोखंडाशिवाय जे दुसरे कारखाने आहेत त्यांचीच विशेष वाढ करून, उपरीनिर्दिष्ट खनिज पदार्थांतील अडचण दूर करण्याचा प्रयत्न फॅशिस्ट सरकार करीत आहे. इटालीच्या विशिष्ट प्रकारच्या भूरचनेमुळें त्याला विद्युत्शक्ती अल्प प्रयासानें मुबलक प्रमाणांत निर्माण करतां येते. या गोष्टीचा फायदा घेऊन रेल्वे, गिरण्या, कारखाने आदि ठिकाणीं शक्य असेल तेथें विजेचा उपयोग करून कोळशाचा प्रश्न सुटण्यासारखा आहे व इटालीचें तिकडे लक्ष आहे. विजेच्या धंद्यांत इटाली सर्वांपुढें आहे असें म्हणावयास हरकत नाहीं. इटालीला गव्हासाठीं परदेशाच्या तोंडाकडे पहावें लागतें. ही स्थिती बदलण्यासाठीं मुसलिनीनें पराकाष्ठेचे प्रयत्न चालविले असून त्यांचा इष्ट परिणामहि दिसूं लागला आहे. इटालीचा दक्षिण भाग हा शेती प्रधान आहे व त्याची सुधारणा झपाट्यानें करण्याचे फॅशिस्टांचे प्रयत्न सुरूं आहेत. या कामीं एक स्वतंत्र कमिशन नेमून तिच्याकडे ही कामगिरी सोंपविण्यांत आली आहे.

<u>फॅशिस्मोचें कार्य</u>

फॅशिस्ट कारकीर्दींत; इटालीची आर्थिक व औद्योगिक प्रगती समाधानकारक रीतीनें होत आहे याबद्दल सर फेलिक्स श्स्टर यांचे खालीं दिलेले उद्गार लक्षांत ठेवण्यासारखे आहेत. सदर गृहस्थ ब्रिटिश–इटालियन बँकिंग कंपनीचे चेअरमन आहेत; या एकाच गोष्टीवरून त्यांच्या योग्यतेची कल्पना होईल, ते म्हणतात, " प्रस्तुत सरकाराविरुद्ध बाहेर कितीहि हाकाटी करण्यांत येत असली तरी खुद इटालींत पहावें तर सरकारच्या विरुद्ध म्हणण्यासारखी तक्रार केलेली ऐकूं येत नाहीं. सर्व देशभर औद्योगिक कारखान्यांचें जाळेंच पसरून गेल्याचा भास होतो. लोक चिकाटीनें आणि आनंदानें काम करीत आहेत असेंच सगळीकडे दिसून येतें. जुन्या काळीं सर्वत्र आढळणाऱ्या भिकारचा आतां कोठें मागमूसही लागत नाहीं. सगळ्यांत आश्चर्याची आणि आनंदाची गोष्ट म्हणजे मजुर व कारखानदार यांच्यामधील सलोख्याचे संबंध. परिस्थितीला अनुरूप आणि योग्य कायदे करण्याच्या सरकारी धोरणामुळें देशांतील आर्थिक शक्तींचें एकीकरण झालें आहे. शिस्त, स्वाभिमान आणि देशहित यांचें वारें सर्व देशांत वहात असल्याचें स्पष्ट दिसून येतें. उत्पादन आणि साहस यांना विशेष उत्तेजन दिलें जात असून निर्गत मालाची निपज वाढविण्याकडे व आयात मालाची संख्या कमी करण्याकडे विशेष लक्ष पुरविण्यांत येतें. स्वदेशासाठीं पडेल तो स्वार्थत्याग करण्यास इटालियन समाज तयार आहे व याच भावनेच्या जोरावर तो कोणत्याहि प्रकारच्या संकटांना तोंड देऊन त्यांतून यशस्वी रीतीनें बाहेर पडेल अशी मला खात्री आहे. "

सर फेलिक्स यांच्या अभिप्रायांत उल्लेखिलेल्या ' मजुर व कारखानदार यांच्यामधील सलोख्याच्या संबंधा'विषयीं या ठिकाणीं दोन शब्द

लिहिणें जरूर आहे. फॅशिस्टांच्या अपूर्व कार्यशक्तींत या गोष्टीचा आविर्भाव होत असून राष्ट्राची प्रगती करण्याच्या कार्यी तिचा अत्यंत उपयोग झाला आहे. अर्वाचीन काळांत, कोणत्याहि राष्ट्राला पुढे यावयाचें असल्यास त्यास भांडवल व मजूर या वर्गांमधील अनिष्ट स्पर्धा शक्य तितकी कमी करण्याची काळजी घेतली पाहिजे. लेनिनच्या शब्दांत सांगावयाचें तर आज मजूर हीच सत्ता आहे. Prolatariat is power. तेव्हां अशा सत्तेकडे दुर्लक्ष करून चालणार नाहीं. याची जाणीव ठेऊन फॅशिस्टांनीं मजुरांचें संघटन केलें असून त्यांच्या न्याय्य हक्कांचें संरक्षण योग्य प्रकारें केलें आहे. इतर देशांची मजुर-चळवळ व फॅशि-स्टांची मजुर-चळवळ यांत मुख्य फरक असा आहे कीं, इतर देशांतील मजुर, फक्त आपल्या विशिष्ट वर्गाच्या हितासाठींच झटत असतात; व योग्यायोग्य गोष्टींचा विचार न करतां मजुरीचे दर वाढविण्याकडे त्यांचा कल असतो. इंग्लंडांत गेल्यावर्षीं झालेल्या कोळशाच्या संपानें हीच गोष्ट जगाच्या निदर्शनास आणून दिली. इटालींत फॅशिस्टांनीं जी नवी भावना निर्माण केली आहे तीमुळें मजुरवर्गाच्या मजुरी वाढविण्याच्या वृत्तीला आळा पडला असून त्यांना 'राष्ट्राचें हित आधीं व व्यक्तीचें त्यानंतर' या तत्त्वाविषयीं खात्री पटली आहे. कोणत्याहि धंद्यांतील मजुरीचे दर कांहीं विशिष्ट मर्यादे बाहेर गेल्यास तो नुकसानींत येऊन कदाचित् बंदहि होईल व मग आज मिळणारी मजुरीहि नाहींशी होईल या गोष्टीची जाणीव असल्यामुळें इटालियन मजुरांनीं आपलें धोरण नेमस्त आणि न्याय्य ठेविलें आहे. मजुर व कारखानदार यांच्या मधील तंटे तोडण्याची पंचा मार्फत व्यवस्था करून संपाना कायद्यानें मनाई केली आहे. कारखान्याच्या व्यवस्थापकमंडळांत मजुरांचे प्रतिनिधी घेण्याची व्यवस्था केली असून सर्व प्रकारच्या वाटा-घाटींत त्यांचें मत घेतलें जातें. मजुरांचीं राहण्याचीं घरें हवाशीर करणें;

त्यांच्या आरोग्याकडे व शिक्षणाकडे पूर्ण लक्ष देणें; अपघातापासून त्यांचें रक्षण करणें; अपघात झाल्यास नुकसान भरपाई देणें; कामाचे तास ८ करणें आणि एकंदरींत त्यांच्या सर्व प्रकारच्या नडीअडचणी दूर करणें असें फॅशिस्मोचें व्यापक धोरण असल्यामुळें इटालींत मजुर व कारखानदार यांचे संबंध विलक्षण प्रेमाचें आणि जिव्हाळ्याचे झाले आहेत. कारखानदार व मजुर यांचे हितसंबंध राष्ट्राच्या हितसंबंधांशीं निगडित झाले आहेत, या जाणीवीमुळें, हे दोन्ही वर्ग परस्परांशीं एका कुटुंबांतील माणसाप्रमाणें सलोख्यानें वागत असतात. इटालीची आर्थिक आणि औद्योगिक प्रगती इतक्या झपाट्यानें होण्याचें मुख्य कारण मजुर व कारखानदार यांच्यामध्यें वसणारा हा प्रेमळ सलोखाच होय.

इटालींत प्राथमिक शिक्षण मोफत व सक्तीचें होतेंच. त्याला धर्म शिक्षणाची जोड देऊन व शिक्षण खात्याची पुनर्घटना करून फॅशिस्टांनीं तें कार्यक्षम आणि प्रस्तुत कालाला अनुरूप केलें आहे. शिक्षणाच्या धोरणांत मात्र त्यांनीं आमूलाग्र फरक केला आहे, तो म्हणजे विद्यार्थ्यांच्या नैसर्गिक प्रवृत्तीची आणि शीलाची वाढ करणें हें ध्येय ठरविण्यांत. केवळ अनेक गोष्टींची खिचडी वजा माहिती देणें म्हणजे शिक्षण ही पूर्वीची कल्पना दूर सारून मुलांच्या बुद्धीचा स्वाभाविक विकास होऊं देण्याचें इटालीच्या शिक्षण क्रमाचें धोरण आहे. हें धोरण अद्यापि विशेष फलदायी झालेलें नाहीं. तथापि असल्या सुधारणा आस्ते आस्तेच व्हावयाच्या ही गोष्ट लक्षांत ठेविली पाहिजे.

न्याय पोलीस आरोग्य आदि सर्व खात्यांतून फॅशिस्मोनें कांहींना कांहीं सुधारणा व नवे उपक्रम सुरू केले आहेत.

**फॅशिस्मो**

---

फॅशिस्मोच्या आतांपर्यंतच्या कार्याचा त्रोटक आढावा वर दिला आहे. त्यांवरून त्याच्या विधायक कामगिरीची साधारण कल्पना होईल. आतां त्याच्या विघातक कार्यांची थोडी माहिती देतों.

बहुतेक उदारमतवादी इंग्रज लेखकांचा मुसलिनीवर मोठा आक्षेप म्हणजे त्यानें मुद्रण-स्वातंत्र्यावर घातलेलें नियंत्रण हा. इटालींत आजकाल वाटेल तें लिहिण्याबोलण्याची मुभा नाहीं ही गोष्ट कसूल केली पाहिजे. मुद्रण-स्वातंत्र्याला आळा कायद्यानें घातला असून वाक्स्वातंत्र्याला तो फॅशिस्टांच्या दराऱ्यामुळें बसला आहे. इटालियन वर्तमानपत्रांतील लोकमतांत प्रस्तुत काळीं विशेष फरक दिसत नाहीं याचें कारण शेंकडा ९० पत्रें 'फॅशिस्ट' मताचीं आहेत. बाकी राहिलेल्या १० पत्रांत, कांहीं उदारमतवादी, कांहीं सोशिआलिस्ट मताचीं व कांहीं विशिष्ट विषयाकरितांच वाहिलेलीं अशीं असल्यामुळें इटालींत सध्यां लोकमताच्या स्फुटीकरणाला अवसर मिळत नाहीं. वर्तमानपत्रांचें इतकें कडक नियंत्रण करण्याचें कारण इटालीची विशिष्ट राजकीय स्थिती. मुसलिनीनें अनेक वेळां दाखविल्याप्रमाणें १९१९ ते २२ या कालांतील इटालीची परिस्थिती अत्यंत भयजनक झाली असून तिला तोंड देण्यास तशाच कडक आणि जाज्वल्य उपायांचा अवलंब करणें जरूर होतें. १९२२ सालापासून तो मनू बदलूं लागला असून राष्ट्र बोल्शेव्हिक मतांच्या मगरमिठींतून सुटून आस्ते आस्ते नित्य स्थितीला अनुकूल होऊं लागलें आहे. Normalisation ( नित्य स्थिति )चें कार्य हळूं हळूंच व्हावयाचें, हीं गोष्ट विसरतां कामा नये. आतां नित्य स्थिती प्राप्त होऊं लागली असल्याची फॅशिस्मोला कल्पना असून वर्तमानपत्रांवरील नियंत्रण यापुढें तसेंच राहणार नाहीं असेंहि मुसलिनीनें जाहीर केलें आहे.

दुसऱ्या एका बाबतींत मुसलिनीच्या सरकारावर टीका होते ती बाब म्हणजे त्यानें देशांतील विरोधी पक्षाचें केलेलें उच्चाटन आणि मुस्कटदाबी. मुद्रण--स्वातंत्र्याच्या नियंत्रणाच्या समर्थनार्थ जीं कारणें फॅशिस्मो कडून पुढें केलीं जातात तींच याहि बाबतींत लागूं आहेत. त्या शिवाय व्यावहारिक आणि मुख्य कारण म्हणजे असें कीं, कोणत्याहि क्रांतिकारक पक्षानें अधिकारसूत्रें आपल्या हातीं घेतल्यानंतर त्याला स्वसंरक्षणार्थ पहिली कोणती गोष्ट करणें जरूर असेल तर ती प्रतिपक्षाचें उच्चाटन किंवा शक्य तर निर्मूलन करणें ही होय. प्रतिपक्षाला अस्तनींतील निखाऱ्याप्रमाणें जवळ बाळगून राज्यक्रांती यशस्वी करून दाखविण्याची महत्वाकांक्षा कोणीहि समंजस राजकारणी पुरुष धरणार नाहीं. 'कान्स्टिटयूशनल ऑपोझिशन' (सनदशीर विरोध) च्या गोष्टी शांततेच्या काळांत ठीक आहेत. परंतु अशीच आणिबाणीची वेळ आल्यास ब्रिटिश सरकार सनदशीर विरोधाला कितपत जुमानतें याचा अनुभव हिंदुस्थानांत तरी कोणास सांगावयास नको. असो.

फॅशिस्मोच्या विधायक आणि विघातक अशा दोन्ही प्रकारच्या कार्यांचा विचार आतांपर्यंत झाला. फॅशिस्मोंत विनाश आणि जुलूम यां शिवाय कांहींसुद्धां न पहाणाऱ्या इंग्रज लेखकांना आणि त्यांचीं मतें वेदवाक्य समजणाऱ्या आमच्या इकडील कांहीं विद्वान् वाचकांना आम्हीं वर दाखविलेलें त्याचें विधायक कार्य पाहून थोडासा अचंबा वाटेल. परंतु खरें पहातां इंग्रज व कांहीं अमेरिकन लेखक दाखवितात तितका फॅशिस्मो दुष्ट नाहीं, ही गोष्ट अशा वाचकांनीं जरूर लक्षांत ठेवावी. फॅशिस्मोनें राज्यक्रांती साध्य केली असून त्याचें अधिष्ठान शारीरिक सामर्थ्यावर आहे; हा

फॅशिस्मो

पंथ अद्याप नवा असून त्याला स्थैर्य यावयाचें आहे; आणि इटालीच्या राजकारणांत व जगाच्या राजकीय विचारांत कांहीं विशेष कार्य करून दाखविण्याची त्याची महत्वाकांक्षा आहे; या सर्व गोष्टी ध्यानांत घेऊन विचार करतां फॅशिस्मोनें राजकीय स्वातंत्र्याच्या बाबतींत कडक सोवळेपणा पाळला नसल्यास त्याबद्दल त्यास कोणी दोष देण्याचें कारण नाहीं. शिवाय इंग्लंडांतील आणि इटालींतील राजकीय परिस्थिती अगदीं भिन्न आहे. गुइसिपी प्रेझोलिनी यांनीं इंग्रज आणि इटालियन यांच्या स्वातंत्र्याच्या कल्पनेंतील फरक अतिशय मार्मिक रीतीनें दाखविला आहे. थोडक्यांत सांगावयाचें तर इंग्रजाचा कल कायदा पाळण्याकडे असतो तर इटालियनाचा तो मोडण्याकडे असतो. इंग्रजांना सनदशीर स्वातंत्र्याची ७शें वर्षांची परंपरा आहे. तर इटालीला स्वतंत्र होऊन अद्यापी उणीपुरीं ५०-६० वर्षेंहि झालीं नाहींत. अशा स्थितींत इटालींतील राजकारण इंग्लंडांतल्याप्रमाणें चालत नाहीं म्हणून त्याच्यावर टीका करण्यांत काय अर्थ आहे ? असो. आमचें विवेचन शक्य तों निर्विकार मनानें आणि समतोल बुद्धीनें करण्याची आम्ही खबरदारी घेतली आहे. फॅशिस्मोंतील निषेधार्ह भाग दाखविण्यासही आम्ही कमी केलेलें नाहीं. अर्थातच त्याच्या विधायक कामगिरीचें वर्णन करतांना त्याच्या आंगीं नसते गुण चिकटविण्याचा प्रयत्न आमचे हातून होणार नाहीं, हें उघड आहे. असो. अशा प्रकारें, फॅशिस्मोच्या बऱ्यावाईट कार्याचें विहंगम दृष्टया आतापर्यंत आलोचन केलें. पुढील प्रकरणीं त्याच्या भविष्यत्कालाचा विचार करून वाचकांची रजा घेण्याचा मानस आहे.

## प्रकरण ५ वें.

# भविष्य कालांत.

" A Nation is a living task, her life is not her own, but a force and a function in the universal Providential scheme............Countries are but workshops of humanity."

—*Mazzini.*

भविष्य काळासारखा नितांत सुंदर काल दुसरा कोणता असेल ? वर्तमान कालांतील नित्य कटकटी आणि त्रास अनुभवणाऱ्या मनाला भविष्य कालांतील कल्पना-चित्रें रंगविण्यांत आणि शेखमहंमदी मनोरे बांधण्यांत वाटणारी मजा कांही और असतें. भूतकाल ब्रह्मीभूत झालेला असतो त्यामुळें त्याचा विचार, माणूस उदासीन आणि निर्विकार मनानें करतो. या दृष्टीनें पहातां काव्याला गत आणि वर्तमान हे दोनहि काल विशेष उपयोगीं नसतात. 'आज'ला 'उद्या' नसतां तर मनुष्याचें जीवित कष्टमय आणि दुःख पूर्ण झालें असतें. परंतु 'उद्यां' आहे म्हणूनच मनुष्य 'आज'चीं दुखें विसरतो, 'काल'च्यावर काळा पडदा ओढतो आणि 'उद्यां'ची रम्य चित्रें रेखाटतो. फॅशिस्मोच्या भावी विकासाचा विचार करतांना आपण केवळ शेखमहंमदी मनोराज्येंच बांधणार नसलों तरी भविष्य काळाचा पडदा बाजूला सारून पलीकडे काय आहे तें आपण पहाणार आहों. आतांपर्यंत फॅशिस्मोच्या पूर्वकालीन आणि वर्तमान कालीन परिस्थितीचा आपण विचार केला; त्या अर्थींहि त्याच्या भविष्य कालाचा विचार करणें औचित्याला सोडून होणार नाहीं असें वाटतें.

फॅशिस्मो

फॅशिस्मोचा विचार करतांना पहिली गोष्ट नजरे समोर येते ती त्याच्या व्यक्तिनिष्ठतेची. फॅशिस्मोची ही गगनभेदी इमारत पायापासून शिखरापर्यंत, सर्वच्यासर्व, केवळ एका माणसानें बांधली आहे. पिरॅमिडचा शिर्ष बिंदु खालीं करून ती उभी केली तर तिचा सर्व आधार तो शिर्षबिंदु होईल. त्याप्रमाणेंच मुसलिनी--व्यक्तीच्या शिर्षबिंदूवर फॅशिस्मोची ही पिरॅमिड उभी आहे. एका दृष्टीनें, इतक्या नाजुक पायावर उभारलेली इमारत कच्च्या पायाची आणि अस्थिर बुडाचीच म्हणावें लागेल. कांहीं अंशीं, फॅशिस्मोचा पायाहि असाच अस्थिर आहे ही गोष्ट कबूल करणें भाग आहे. व्यक्तिनिष्ठ चळवळींना सर्वमान्य तत्त्वांचा आधार नसल्यास, ती व्यक्ती नष्ट होतांच त्या चळवळीहि नामशेष होऊं लागतात. फॅशिस्मोहि शेवटपर्यंत व्यक्तिनिष्ठच राहिल्यास त्याचीहि गत तीच होईल. ही गोष्ट नाकबूल करण्यांत अर्थ नाहीं. फॅशिस्मो बाल्यावस्थेंत आहे, त्याची वाढ अद्यापि व्हावयाची आहे. अशा स्थितींत आपल्याला कोणाच्या तरी बॉबला किंवा गोळीला बळी पडावें लागल्यास आपण इतक्या आस्थेनें आणि श्रमानें उभारलेली ही राजकारणाची भव्य इमारत क्षणार्धांत जमीनदोस्त होईल याची फॅशिस्मोच्या संस्थापकाला जाणीव आहे. ही भावी आपत्ती ध्यानांत आल्यापासून मुसलिनीनें आपलीं तत्त्वें इटालींत बद्धमूल करण्याचें प्रयत्न चालविलें आहेत.

देशांतील प्रत्येक गोष्टींत फॅशिस्टांच्या उत्साहाचा ठसा स्पष्टपणें उमटला पाहिजे अशी व्यवस्था मुसलिनीनें केली असून राष्ट्रांतील, शक्यतों प्रत्येक व्यक्तीला फॅशिस्मोच्या निशाणाबद्दल अभिमान वाटावा अशी त्याची मनीषा आहे. लोकांनीं व्यक्तिशः आपल्याला मोठें म्हणण्यापेक्षा फॅशिस्मोला मोठें म्हणावें अशी त्याची इच्छा आहे. फॅशिस्मोचें तत्त्व आणि

**भविष्य कालांत**

ध्येय चिरस्थायी होण्यासाठीं मुसलिनीनें देशांतील सर्व प्रकारच्या संघटनात्मक चळवळींना फॅशिसमोच्या कक्षेंत आणलें आहे. १९२३ पूर्वीं इटालींत सगळीकडे इतर देशांतल्याप्रमाणें, मजुरांचे 'लेबर युनियन्स,' 'ट्रेड युनियन्स' 'रेलवे युनियन्स,' वगैरे सारखे संघ असत. त्या ऐवजीं मुसलिनीनें आतां मजुरांचे फॅशिस्ट सिंडिकेटस् म्हणजे फॅशिस्ट मजूर संघ स्थापले असून त्यांना कारखान्याच्या कारभारांत कांहीं अधिकारहि दिले आहेत. बहुतेक ठिकाणीं जुने मजुरसंघ मोडून त्यांच्या ठिकाणीं या फॅशिस्ट सिंडिकेटस्ची स्थापना झाली आहे. रेलवे कामकऱ्यांच्या फॅशिस्ट युनियन्स स्थापण्यांत आल्या आहेत. सर्वप्रकारच्या फॅशिस्ट मजुरसंघांत मिळून २१ लक्ष ५० हजार मजुरांचें संघटन झालें आहे!

स्त्री फॅशिस्टांचे संघ स्थापण्यांत आले असून त्यांची संख्या ५९० असून सभासदांची संख्या २५,००० आहे. 'ॲव्हान गार्डिस्टी' नांवाची १५ ते १८ वर्षांच्या तरुण विद्यार्थ्यांचीं फॅशिस्ट मंडळे स्थापण्यांत आलीं असून त्यांत ९० हजार तरुणांनीं आपलीं नांवें दाखल केलीं आहेत. 'बॅलिला' नांवाचीं फॅशिस्ट बालचमू तयार करण्यांत आली असून त्यांत ८ ते १५ वर्षांपर्यंतच्या मुलांचा समावेश करण्यांत आला आहे. या बालचमूंत ७० हजार मुलें आहेत. त्याच्या 'बॅलिला' या नांवात सुद्धां विशेष अर्थ आहे. १७४६ सालीं बॅलिला नांवाच्या एका लहान मुलानें एका आस्ट्रियन सैनिकांला एक दगड मारला व त्या कारणामुळें इटालीचें व आस्ट्रियाचें युद्ध होऊन त्याची परिणती इटालियन स्वातंत्र्यांत झाली. या इतिहास प्रसिद्ध बालवीराच्या चिरस्मरणार्थ बाल फॅशिस्टांच्या चमूला बॅलिला हें नांव देण्यांत आलें आहे!

**फॅशिसमो**

या बालचमूंतील मुलांना फॅशिस्ट तत्त्वांचें ज्ञान त्यांना समजेल अशा सोप्या भाषेंत दिलें जातें. लहानपणा पासूनच शिस्त आणि स्वदेशाभिमान यांचें त्यास वळण लागावें व त्यांच्या बुद्धीच्या विकासाबरोबरच त्यांच्या स्वदेशविषयक अभिमान भावनेचाहि परिपोष व्हावा अशी व्यवस्था शिक्षणक्रमांत केली असल्यामुळें इटालींतील भावी पिढी, सध्यांची राज्यव्यवस्था आणखी १५।२० वर्षें टिकून राहिल्यास, सर्वस्वीं फॅशिस्ट मताची अभिमानी अशी निपजेल असें वाटतें.

लहानपणीं बॅलिलांमध्यें, तरुणपणीं अव्हान् गार्डिस्टींमध्यें, व पुढें फॅशिस्ट संघांत अशा रीतीनें जें राष्ट्र तयार केलें जात आहे तें प्रस्तुत फॅशिस्ट विचारसरणीनें पुढेंहि बरेच दिवस चालेल असें म्हणावयास काय हरकत आहे ? तरुण पिढीला राष्ट्राचा भावी आधारस्तंभ म्हणून संबोधण्यांत येतें; तें बरोबर असल्यास, आजचा तरूण इटालियन हाच उद्याचा फॅशिस्ट पुढारी आणि चेंबर मधला लोक प्रतिनिधी कां होणार नाही ? आणि अशा रीतीनें विचार करतां, ' फॅशिस्मो ' पंथ इटालींत चिरस्थाई होईल असें कोणी भविष्य केल्यास तें सर्वस्वीं चुकीचें ठरेल काय ?

फॅशिस्मोचें भावी सामर्थ्य आजच्या बालचमूवर आणि अव्हान गार्डिस्टी संघावर अवलंबून असलें तरी त्याचा मुख्य भर ' राष्ट्रीय सैनिकावर ' (National Militia) आहे. फॅशिस्मोचा आत्मा म्हणजे मुसलिनी आणि राष्ट्रीय सैनिक म्हणजे त्याचें शरीर असेंहि म्हटलें तरी चालेल इतकें महत्त्व या सैनिकांचें आहे. ' फॅशिस्ट राज्यक्रांतीला सर्वतोपरी उचलून धरावयाचें ' हें त्यांचें ' क्रीड–( निष्ठाप्र–तिज्ञा ) आहे. मिलीशियांतील सैनिकांना पगार मिळत नाहीं. त्यांना विशेष कामगिरीवर

पाठविलें असेल तरच पगार मिळतो व तोहि नित्य खर्चा पुरता. त्यांना पूर्वी राजनिष्ठेची शपथ घ्यावी लागत नसे. परंतु १९२४ च्या रॉयल डिक्रीप्रमाणें आतां राजनिष्ठची शपथ प्रत्येक राष्ट्रीय सैनिकाला घ्यावीच लागते. त्यांच्या क्रीडमध्यें मात्र फरक केलेला नाहीं.

मुसलिनीच्या सत्तेचा उगम आणि आधार म्हणजे हा मिलीशिया. अर्थातच तो सर्वस्वीं मुसलिनीस जबाबदार आहे. त्याच्यावर हुकमत फक्त एका मुसलिनीचीच चालते. या ठिकाणीं एक नाजूक प्रश्न उपस्थित होण्याचा संभव आहे तो म्हणजे नॅशनल मिलीशियानेंच उद्यां बंड केलें तर फॅशिस्मोचें काय होईल ? प्रश्न विचार करण्यासारखा आहे. कारण पाशवी शक्ती आपल्या मालकावरच केव्हां उलटेल याचा नेम नसतो. ती विस्तवा सारखी आहे. विस्तवाला कह्यांत ठेऊन त्याचा योग्य उपयोग करून घेतल्यास त्याच्या सारखा उपकारक नोकर नाहीं; परंतु तो आपल्या आंवाक्या बाहेर गेल्यास मात्र काय अनर्थ ओढवतील तें सांगणें कठिण ! तीच गोष्ट पाशवी शक्तीची आहे. दुसरें असें कीं, राष्ट्रीय सैनिकांवरील अंतिम सत्ता मुसलिनीच्या हातीं असली तरी सैनिकावर मुख्य सत्ता त्यांच्यावरील ऑफिसरांचीच असते हा नेहमींचा अनुभव आहे. ऑफिसरांनींच डोक्यांत बंड घेतलें तर कोणत्याहि जनरलचें किंवा कमांडरचें विशेष कांहीं चालावयाचें नाहीं. या दृष्टीनें विचार करतां नॅशनल मिलीशियाचा अधिकारी वर्ग सर्वस्वीं विश्वसनीय आहे किंवा काय या विषयीं शंका आल्याशिवाय रहात नाहीं. जनरल डी बोनो यास आरंभी राष्ट्रीय सैन्याचा प्रमुख करण्यांत आलें होतें. पुढें, बोनो मॅटिओटी प्रकरणांत चांगलाच गुरफटून गेला व त्यास "मुसलिनी आपणास आयत्यावेळीं सोडेल काय ?" अशी भीती वाटू

लागली. त्याबरोबर त्यानें मुसलिनीस धमकविजा पत्रें पाठवून त्याचीं अंतस्थ कारस्थानें फोडण्याचा धाक घातला! बोनोचें एकच उदाहरण या ठिकाणीं दिलें आहे. परंतु त्यांवरून वारा कसा वहात आहे त्याची कल्पना होते. बोनो एकदम मुसलिनीवर उलटण्यास तयार झाला याचें कारण फॅशिस्ट तत्त्वांत आध्यात्मिकतेचा अभाव हें होय. स्वदेशाभिमानाचें तत्त्व कितीहि उदात्त असलें तरी त्याला आत्यंतिक त्यागाचें आध्यात्मिक अधिष्ठान नसेल तर तें चिरपरिणामीं होऊं शकत नाहीं. बाळाजी आवजी आणि खंडो बल्लाळ या इतिहास प्रसिद्ध व्यक्ती शेवटपर्यंत कसास टिकल्या याचें कारण मराठ्यांच्या राजकीय आकांक्षांना आध्यात्माचें अधिष्ठान होतें. फॅशिस्मोचें तत्त्व इतर अनेक दृष्टिनीं कितीहि मोठें आणि कार्यक्षम असलें तरी त्याची उभारणी व संपादणी बव्हंशीं पाशवी सामर्थ्यावरच असल्यामुळें त्याच्या ठिकाणीं मानवी अंतःकरणाला क्षणभर गुंग करणारी उदात्तरम्य ध्येयात्मकता नाहीं. याचा अर्थ असा होतो कीं, फॅशिस्मोची लष्करी शिस्त कायम आणि अविच्छिन्न असेतोंपर्यंतच त्याला महत्व रहाणार. फॅशिस्मोचा जन्म आणि विकास शारीरिक सामर्थ्यांत झाला, आणि त्याची परिणतीहि इटालीला शारीरिक सामर्थ्यांत संपन्न आणि बलिष्ट करण्यांतच होणार ही गोष्ट उघड आहे. भूमध्य समुद्राचें स्वामित्व इटालीकडे येण्यासाठीं मुसलिनीच्या सरकारानें चालविलेलें प्रयत्न या बाबतींत विचार करण्यासारखे आहेत. इटालीनें जहाजें बांधणाऱ्या गोद्यांना सरकारी मदत मोठ्या प्रमाणावर देऊन आपलें नाविकबल १५ लक्ष टनावरून ३० लाख टनावर नेलें आहे! वैमानिक दळांतहि इटालीनें शिकस्तीची प्रगती करावयाचें धोरण ठेविलें असून १९३० अखेर २,८०० लष्करी विमानें बांधण्याचें

ठरविलें आहे! यांवरून 'फॅशिस्मोची परिणती पाशवी सामर्थ्याच्या उत्कर्षामध्येंच होणार' असें आम्हीं कां म्हणतो याचा उलगडा होईल.

याबद्दल आम्हीं फॅशिस्मोला दोष देत नाहीं. कारण सारेंच यूरोप खंड सध्यां आपली पाशवीशक्ती वाढविण्याच्या कामीं गुंतलें आहे. युद्धापूर्वी आरमार वाढविण्याची स्पर्धा लागली होती; व इंग्लंड, जर्मनी, फ्रान्स, अमेरिका आदिराष्ट्रें कोट्यावधी रुपये दरवर्षी नवीं जहाजें आणि विनाशिका तयार करण्यांत खर्च करीत असत. आतां जहाजें जरा मागें पडलीं असून अजस्र विमानांचे जगड्व्याळ काफिले तयार करण्याकडे यूरोप-अमेरिकेच्या पैशाचा व्यय होऊं लागला आहे. असो. फॅशिस्मोचें राजकीय धोरण सर्वसत्ता एका व्यक्तीच्या हातीं केंद्रीभूत करण्याकडे असून राष्ट्राचें भौतिक जीवन सर्वतोपरी उच्च व्हावें एवढ्याच उद्देशानें त्याचे प्रयत्न चालले आहेत असें आतांपर्यंतच्या विवेचनांवरून वाचकांस दिसून येईल. या धोरणाचे परिणाम काय होतील त्याचेंहि दिग्दर्शन वर केलेंच आहे. ते परिणाम जगाच्या शांततेला बाधक होतील अशी जी कित्येकांची कल्पना आहे ती अस्थानीं आहे. कारण आतांपर्यंतचें मुसलिनीचें परराष्ट्रीय धोरण विचारांत घेतां तें कोणत्याहि बाबतींत अशांतता उत्पन्न करणारें नाहीं असेंच म्हणावें लागेल. इटालिनें शस्त्रसंन्यास परिषदेंत भाग घेतला नाहीं. परंतु त्याचीं कारणें उघड होतीं. फॅशिस्ट लेखकांनीं दाखविल्याप्रमाणें 'जी परिषद नुसता वादविवाद होऊन मोडण्यासाठीच जमत होती' तिला हजर राहून तरी काय उपयोग?

आंतरराष्ट्रीय शांततेला फॅशिस्मोकडून धोका येण्याचा संभव नाहीं. याचें मुख्य कारण मुसलिनीला यूरोपांतील कोणत्याहि राष्ट्राची तरी

सहानुभूती नाहीं. त्याच्यांशीं सगळ्यांनीं स्नेहभावाचे तह केले असले तरी त्याचा अर्थ इटालीशीं तीं राष्ट्रं प्रेमानें वागतात असा नव्हे. रशिया व फ्रान्स, आणि फ्रान्स व इटाली यांचे परस्परांशीं सलोख्याचे संबंध आहेत. परंतु त्यांपैकीं प्रत्येकजण एकमेकाला ओळखून आहे, व लढाईचा प्रसंग आला तर कोणी कोणाला मदत करणार नाहीं. शिवाय, महायुद्धांतील जखमा अद्यापि इतक्या ताज्या आहेत कीं त्यावर पुनः नवे वार करण्यास कोणताहि शहाणा मुत्सद्दी तयार होईल असें वाटत नाहीं. अशा स्थितींत फॅशिस्मोच्या नांवानें ' जगाच्या शांततेला धोका आणणारा पंथ, म्हणून हाकाटी करण्यांत काय अर्थ ?

फॅशिस्ट पक्ष इटालीबाहेर कोणास विशेष त्रासदायक होणार नसला तरी स्वदेशांत मात्र तो सर्वस्वींच निरुपद्रवी राहील असें म्हणतां येणार नाहीं. फॅशिस्मोला सरकारचें पाठबळ असून तो स्वतः लष्करी शिस्तीचा पक्ष असल्यामुळें त्याच्या ठिकाणीं एक प्रकारें सामर्थ्याचा उन्माद निर्माण होणारच नाहीं असें कोणी म्हणावें ? शिस्तीला आणि कडकपणाला कांहीं सीमा असते. प्रसंग विशेषीं कडक शिस्त हितकारकहि होते. परंतु शिस्तीची उपकारकता कोठें संपते व तिचा मारकपणा कोठें सुरू होतो तें नक्की सांगणें कठिण आहे. दुसरें, व्यक्तीला शिस्त लावणें निराळें आणि एका सबंध राष्ट्राला शिस्त लावणें निराळें. अशा व्यापक स्वरूपांत लावलेली शिस्त, तिची जरूरी संपतांच ती दूर न केली गेली तर तिचा दुरुपयोग होऊन राष्ट्राची प्रगती खुंटते. नाहींपेक्षां, राष्ट्राच्या प्रगतीसाठीं शिस्तीची योजना करावी व तिच्यामुळेंच त्याची प्रगती खुंटावी असा प्रकार व्हावयाचा. फॅशिस्मोनें ही अत्यंत महत्त्वाची गोष्ट वेळींच लक्षांत घेतली पाहिजे.

**भविष्य कालांत**

राजकारणांत सनदशीर विरोधाचा फार मोठें महत्त्व आहे. आपल्या कृतींतील दोष आपल्याला दिसत नाहींत. परंतु विरोधकाच्या ध्यानीं तें तत्काळ येतात. दोष-निदर्शन हेंच सनदशीर विरोधाच्या अस्तित्वाचें समर्थन आहे. प्रजेचें भावी नुकसान अशा दोषाविष्करणामुळें टळतें व सार्वजनिक जविनक्रम निरामय होण्यास मदत होते. तशाच कठिण प्रसंगीं प्रतिपक्षाची मुस्कटदाबी करण्यास हरकत नाहीं. शत्रूवर चाल करून जावयाच्या वेळीं करावयाचें भाषण वीररसपूर्ण आणि भावनाप्रधानच पाहिजे. त्या ऐवजीं तेथें कोणी शांतिपाठ म्हणूं लागला तर तें बंद करणें जरूर आहे. परंतु लढाई संपून स्थिरस्थावर झाल्यावरसुद्धां तेंच धोरण कायम ठेविल्यास त्याचे अनिष्ट परिणाम झाल्याशिवाय रहाणार नाहींत. फॅशिस्मोनें स्वीकारलेल्या जरूर त्या निश्चयीपणाचें आम्ही समर्थन करीत असलों तरी, यापुढें त्यांत फरक करण्यांत आला नाहीं तर त्याचे परिणाम फॅशिस्मोला जाचक होतील व त्याचें धोरणहि निषेधार्ह ठरेल. असें आमचें मत आहे मुद्रण-नियंत्रण दूर होणें, भाषण-सभा आदिवरील फॅशिस्टांची कदर कमी करणें आणि शिस्तीच्या नांवाखालीं अतिप्रसंगीं फॅशिस्टांनीं अत्याचार चालविले असल्यास ते निर्मूल करणें, न्याय खात्याचें स्वातंत्र्य अबाधित आणि निरपवाद राखणें, आणि पोलीस खात्यांतील घाण कमी करणें आदि कांहीं अत्यंत महत्वाच्या सुधारणा करून मुसलिनीनें वेळींच फॅशिस्मोची शुद्धी करणें जरूर आहे. सध्यां न्यायखातें इतर खात्याप्रमाणेंच कमी अधिक प्रमाणांत फॅशिस्ट पक्षाभिनिवेशानें चालतें. ही स्थिती लौकर सुधारली गेली नाहीं तर जनतेचा फॅशिस्ट न्यायपद्धतीवरील विश्वास उडण्यास फार काळ लागणार नाहीं. न्यायपद्धतीवरील विश्वास हाच कोण-

त्याहि राज्यपद्धतीचा भक्कम पाया असतो. 'न्यायखातें राजकीय पक्षभेदांपासून सर्वस्वीं अलिप्त ठेवणें' हें इंग्रज लोकांच्या राजनीतिचें आद्य तत्त्व आहे. आणि म्हणूनच मोर्ले, मिल यासारख्या राजकीय तत्त्ववेत्त्यांनीं आणि ग्लॅडस्टन ॲस्क्विथ या सारख्या मुत्सद्यांनीं या तत्त्वाचा असंदिग्ध भाषेंत पाठपुरावा केला आहे. त्या सर्वांना ही गोष्ट पूर्णपणें पटलेली आहे कीं, सरकारच्या न्यायीपणा-वरील जनतेचा विश्वास उडाल्यास तें सरकार क्षणभरहि टिकणें शक्य नाहीं. म. गांधींनीं ब्रिटिश सरकारची ही मख्खी ओळखूनच न्यायकोर्टा-वरील बहिष्कार उपदेशिला होता. परंतु दुर्दैवानें त्याच्या ठिकाणीं व्यव-हार्यतेचा भाग कमी होता म्हणून असो किंवा जनतेची तितकी तयारी झाली नव्हती म्हणून असो; पण इतर बहिष्काराप्रमाणेंच हाहि अत्यंत महत्वाचा बहिष्कार मागें पडला. असो.

वर सांगितल्याप्रमाणें फॅशिस्मोंत योग्य त्या सुधारणा होणें जरूर आहे. त्या होऊन, मुसलिनीच्या सुलतानशाहीचें (Dictatorship) उपकारकत्व कायम राहिल्यास इटालीला फॅशिस्मोपासून भिण्याचें कारण नाहीं. उलट कार्यकारी सरकार आटपशीर आणि एकमुखी राहिल्यानें, अंतर्गत कारभार जास्त संघटित आणि कार्यक्षम होऊन इटालीची भरभराटच होईल, व भरभराटलेल्या देशालाच कोठेंहि मान असतो, या दृष्टीनें, इटालीचा आंतरराष्ट्रीय राजकारणांतील मान वाढून त्याचें "वसाहतींच्या साम्राज्याचें सुखस्वप्न" व्यवहारांत येण्यास मदत होईल.

इटालीला स्वास्थ्य देऊन फॅशिस्मोनें आपल्या अस्तित्वाची लायकी सिद्ध केली आहे. त्याला चिरस्थायी आणि चिरपरिणामकारक व्हावयाचें असल्यास त्यांत उपरीनिर्दिष्ट सुधारणा होणें जरूर आहे. मुसलिनीच्या

तीव्र आणि संशोधक दृष्टींतून या गोष्टी गेल्या असतील असें वाटत नाहीं. तो लौकरच या सुधारणा घडवून आणून आणि स्वतःच्या व्यक्तीच्या ठिकाणीं सर्वमान्य तत्त्वांची स्थापना करून फॅशिस्मोचें राजकारणांतील स्थान अजरामर करील अशी आशा आहे.

दा. क्र. 3333

समाप्त.

REFBK-0003333

# आधार ग्रंथ.


1. The Life of Benito Mussolini, by Mergherita B. Sarfatti.
2. Benito Mussolini: the man, by Jeanne Bordeux.
3. Fascism, by Giuseppe Prezzolini
4. Fascist Experiment, by Luigi Villari.
5. Italy & Fascismo, by Luigi Sturzo.
6. Mussolini: His work and the New Syndical Law, by Cavaliere Raffaele Murielle.
7. Mussolini: As revealed in his political speeches: by Quaranta di San Severino.
8. Those Europeans, by Huddleston.
9. Three Master-Builders & Another, by Pelham H. Box.
10. Italy under Mussolini, by Bolithe.
11. The Banking and Fiscal Policy of the Fascist Government.
12. Italy: Nations of To-day Series, Edited by John Buchan.
13. The Renaissance in Italy, by Symonds.
14. The Development of the European Nations: 1870 to 1900, by J. Holland Rose.
15. Machiavelli: The Prince, translated by N. Thompson.
16. Fascist Movement in Italian Life, by Dett. Pietre Gorgolini.
17. Theory of the State ( Bluntschli ).

*Reviews etc:—*

1. Political Science Quarterly (New York).
2. Review of Reviews.
3. Round Table.
4. National Review.